म. ग्रं. सं. ठाणे
य जिको सं
. क्र. ५१८
9283



# हिंदी महाकाव्ये

## कथा आणि परिचय

REFBK-0013100

# हिंदी महाकाव्यें

कथा व परिचय

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
ग्रं. क्र. १३१००

शि. शं. आपटे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर.
अनुक्रम ३५०५३ दि: १०/०१/९५
क्रमांक ९५१८ नों दि: २०-८-८४

REFBK-0013100

वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २

दोन रुपये

श्री : ४७४ [ ११-६३ ]

© १९६३
व्होरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.

आवृत्ति पहिली
शके १८८५
सन १९६३

मूल्य रु. २-००

प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
व्होरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि. करितां
३ राउंड बिल्डिंग, मुंबई २

मुद्रक :
अ. चिं. रायरीकर
स्वस्तिक मुद्रणालय
४३९ शनिवार पेठ, पुणें २

# हिंदी महाकाव्यें

* * * * * * * * *

| | | |
|---|---|---|
| पृथ्वीराज रासो | १ | चंद वरदाई |
| पद्मावत् | २ | मलिक मुहंमद जायसी |
| रामचरितमानस | ३ | गोस्वामी तुलसीदास |
| य प्रवास | ४ | हरिऔध |
| साकेत | ५ | मैथिलीशरण गुप्त |
| कामायनी | ६ | जयशंकर प्रसाद |
| कुरुक्षेत्र | ७ | दिनकर |
| कृष्णायन | ८ | द्वारकाप्रसाद मिश्रा |

# हिंदी महाकाव्यें

# हिंदी भाषेंतील सुप्रसिद्ध महाकाव्यें

## *प्रास्ताविक दोन शब्द*

मी साहित्यिक नाहीं. तसेंच दुसऱ्यांच्या वाङ्मय-पक्वान्नाची परीक्षा करण्यास आवश्यक त्या साहित्यशास्त्राचें पुरेसें ज्ञानहि नाहीं मला. पण स्वयं-पाक करतां येत नाहीं म्हणून पदार्थांची रुचि कां सांगतां येत नाहीं? पानावर बसलों कीं ताटांतील पदार्थांच्या षड्रसांचा स्वाद घेण्यासाठीं अथवा ते बेचव आहेत असें म्हणण्यासाठीं पाकशास्त्राच्या ज्ञानाची कोठें आवश्यकता असते? एकाद्या काकी–मामीच्या हातून मिठाच्या ऐवजीं साखरच अधिक पडल्यामुळें गोड थापासारख्या गुळमुळित वाटणाऱ्या पदार्थास आपण आळणी, बेचव म्हणत नाहीं का? किंवा समजा भीतभीत काडी लावून स्टोव पेटविण्यास नुकत्याच शिकलेल्या आपल्या मित्राच्या नवत्या सुसंस्कृत सुशिक्षित गृहपत्नीनें अगदीं पाकशास्त्रांतील धडयांप्रमाणें बनविलेल्या पुलावाला खिचडी म्हणून थट्टा करायला पाकशास्त्राचें ज्ञान लागतें का? पदार्थाचे गुण सुगंधांत आणि रुचींत असतात आणि त्यांचा अनुभव नाकानें व जिभेनेंच येतो. स्वान्त:सुख देणाऱ्या रुचि आणि गंधाची ओळख होण्यासाठीं शास्त्रांची फारच थोडी आवश्यकता असते असें मला वाटतें.

अगदीं हीच गोष्ट वाङ्मय-पक्वान्नांची नव्हे काय? साहित्याच्या ताटांत नवरसांची रुचि आणणारे निरनिराळे लहानमोठे पदार्थ मुख्य पक्वान्नांच्या आंवतींभोवतीं वाढलेले असतात. त्या पदार्थांची रसनिष्पत्ति कोणत्या पाकशास्त्राच्या प्रक्रियेनें झाली, चरक सुश्रुतांतील पथ्यें संभाळून झालीं कीं नाहीं, वगैरे गोष्टींचा कोण विचार करतो? जीभ सांगते कीं पदार्थ आंबट तिखट, आळणी, मधुर अथवा रसहीन झाला आहे. जिभेला तर पदार्थाला स्पर्श तरी करावा लागतो पण नाक दुरूनच ओरडतें. घाण, उग्र वास किंवा छान वास सुटला आहे हें नाक दुरूनच ओळखतें आणि त्याच सूचनेबरोबर

जिभेला पाणी सुटतें. पदार्थ जसा रुचिर आणि सुगंधी असावा लागतो तसाच तो सुदर्शनहि असला पाहिजे. हें सर्व वाङ्मय-पक्वान्नांच्या बाबतींतहि पूर्णपणें लागू पडतें. वाईट कोणतें हें सांगण्यासाठीं माणसाला कला आणि शास्त्राची दृष्टि व ज्ञान आवश्यक असेल, चांगलें कोणतें हें मात्र साधारण माणसाला अनुभवानें सांगतां येतें.

मी एक भारतीय प्रवासी आहें. विविध प्रदेशांतून हिंडतांना तेथील लोकसाहित्यांतील चांगलें तें गोळा करण्याचा माझा छंद आहे. मराठी आणि बंगाली या दोन संपन्न भाषा आहेत तशीच तामीळसुद्धां. त्या मानानें हिंदी अगदींच नवथर, अविकसित अशी समजली जाते. पण आश्चर्य आढळलें कीं बंगाली आणि मराठींत महाकाव्यें नाहींत. दुसऱ्या कोणत्याहि भाषेंत, अर्थात् संस्कृत वगळून, नांव घेण्यासारखीं महाकाव्यें नाहींत आणि हिंदींत पहावें तर एकापेक्षां वरचढ दुसरें अशीं कितीतरी महाकाव्यें रचलीं गेलीं आहेत. या शतकाच्या पूर्वार्धांत तर भारतीय सरस्वतीला हिंदी साहित्यिकांनीं वाग्वैजयंतीच्या अनेक सुगंधी, सुवर्णी पुष्पमाला चढविल्या आहेत.

कविसम्राट रविंद्रांची महाकाव्य--रचनेची कल्पना हजार गीतांत छिन्न झाली. ते म्हणतात,

आमि नवमहाकाव्य, संरचने छिल् मने
ढेकल् करवन तोमार कंकन किंकिणीते
कल्पनाटी गेल फटी, हाजार गीते
महाकाव्य,से अभाव्य,
दुर्घरनाय पाथेर् काछे छडिये आछे, कणाय कणाय,
आमि नवमहाकाव्य संरचने छिल् मने ॥

सरस्वतीच्या नूपुरकांकणांचा किण्किण् रव ऐकण्यांत आणि तिला प्रसन्न करण्यासाठीं गीतें गाण्यांत दिगन्त कीर्ति महाकवीची प्रतिभा हजारों कणाकणांत विखुरली गेली.

आपल्या मराठीच्या नगरींत अमृताशीं पैजा जिंकणाऱ्या साहित्याची पैदास गेलीं हजार वर्षे जवळ जवळ प्रत्येक शतकांत एकाद-दुसऱ्या अमर ग्रंथानें होण्याची परंपरा पडली असतांना या शतकांत एकहि महाकाव्य निर्माण झालें नाहीं. ज्या एका अभिजात सारस्वतीच्या लेखणींत तें सामर्थ्य सहज

३७०५३
१७.८.८४
सं. शा.
निबंध.
१५१८.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३७०५३ वि: निबंध
क्रमांक १५१८ नो दि १७.८.८४

जिभेला पाणी सुटतें. पदार्थ जसा रुचिर आणि सुगंधी असावा लागतो तसाच तो सुदर्शनहि असला पाहिजे. हें सर्व वाङ्मय-पक्वान्नांच्या बाबतींतहि पूर्णपणें लागू पडतें. वाईट कोणतें हें सांगण्यासाठीं माणसाला कला आणि शास्त्राची दृष्टि व ज्ञान आवश्यक असेल, चांगलें कोणतें हें मात्र साधारण माणसाला अनुभवानें सांगतां येतें.

मी एक भारतीय प्रवासी आहें. विविध प्रदेशांतून हिंडतांना तेथील लोकसाहित्यांतील चांगलें तें गोळा करण्याचा माझा छंद आहे. मराठी आणि बंगाली या दोन संपन्न भाषा आहेत तशीच तामीळसुद्धां. त्या मानानें हिंदी अगदींच नवथर, अविकसित अशी समजली जाते. पण आश्चर्य आढळलें कीं बंगाली आणि मराठींत महाकाव्यें नाहींत. दुसऱ्या कोणत्याहि भाषेंत, अर्थात् संस्कृत वगळून, नांव घेण्यासारखीं महाकाव्यें नाहींत आणि हिंदींत पहावें तर एकापेक्षां वरचढ दुसरें अशीं कितीतरी महाकाव्यें रचलीं गेलीं आहेत. या शतकाच्या पूर्वार्धांत तर भारतीय सरस्वतीला हिंदी साहित्यिकांनीं वाग्वैजयंतीच्या अनेक सुगंधी, सुवर्णी पुष्पमाला चढविल्या आहेत.

कविसम्राट रविंद्रांची महाकाव्य--रचनेची कल्पना हजार गीतांत छिन्न झाली. ते म्हणतात,

आमि नवमहाकाव्य, संरचने छिल् मने
ढेकल् करवन तोमार कंकन किंकिणीते
कल्पनाटी गेल फटी, हाजार गीते
महाकाव्य,से अभाव्य,
दुर्घरनाय पाथेर् काछे छडिये आछे, कणाय कणाय,
आमि नवमहाकाव्य संरचने छिल् मने ।।

सरस्वतीच्या नूपुरकांकणांचा किण्किण् रव ऐकण्यांत आणि तिला प्रसन्न करण्यासाठीं गीतें गाण्यांत दिगन्त कीर्ति महाकवीची प्रतिभा हजारों कणाकणांत विखुरली गेली.

आपल्या मराठीच्या नगरींत अमृताशीं पैजा जिंकणाऱ्या साहित्याची पैदास गेलीं हजार वर्षे जवळ जवळ प्रत्येक शतकांत एकाद-दुसऱ्या अमर ग्रंथानें होण्याची परंपरा पडली असतांना या शतकांत एकहि महाकाव्य निर्माण झालें नाहीं. ज्या एका अभिजात सारस्वतीच्या लेखणींत तें सामर्थ्य सहज

होतें त्यानें आपली लेखणी क्षणभर दूर ठेवून हातांत खड्ग घेतलें. सरस्वती-ऐवजीं स्वातंत्र्यलक्ष्मीला प्रसन्न करण्यासाठीं काव्यगायन सोडून आपल्या तन–मन–धनाचें जीवनाचें हवन आरंभलें. स्वातंत्र्ययज्ञांत एकेक आहुति देतांना मंत्र म्हणून तो जें कांहीं गुणगुणला तें खरोखर अमर काव्य ठरलें आहे. ज्याचे खंड पहायला मिळतात तें संकल्पित महाकाव्य संपूर्ण रचलें गेलें असतें तर . . . पण तसें व्हायचें नव्हतें. कवीला वीररसाचीं गाणीं गाण्यापेक्षां किंवा कथा लिहिण्यापेक्षां स्वातंत्र्यसमरांत शौर्य गाजवावयाचें होतें, इतिहास घडवावयाचा होता, अद्वितीय अशा एका महाकाव्यासाठीं नायक म्हणून जीवनाचें नाटक खेळायचें होतें. कारण कांहीं असो, आपली मराठी भाषा एका महाकाव्याला आंचवली. इतर संपन्न भाषांची अशी अवस्था असतांना सुद्धां अविकसित समजल्या जाणाऱ्या हिंदींत मात्र अनेक महाकाव्यें आहेत.

आपण जिला सर्वसाधारण हिंदी म्हणून समजतों, तिच्या अनेक बोली आहेत. उत्तर भारताची भाषा हिंदी पण प्रदेशानुसार तिचे अनेक भेद आहेत. राजस्थानी, डिंगल, पिंगल, अवधी, व्रज, भोजपुरी, मैथिली आणि खडी बोली इत्यादि. या सर्वांत अवधी, व्रज आणि मैथिली यांची परंपरा प्राचीन आणि थोर आहे. त्यांचें साहित्य लोकमान्य आहे. विसाव्या शतकापर्यंतची सर्व राजमान्य व लोकमान्य झालेली काव्यरचना या भाषांतूनच झालेली आढळते. अपवाद काय तो एका 'पृथ्वीराज रासोचा'.

अठराव्या शतकापासूनच उत्तर भारतांत उर्दू ही एक बोली निर्माण होऊन राहिली होती. उर्दूचा उगम भारतांतलाच, तिची आई संस्कृतच परंतु तिचें दायीपण यवनांनीं केलें. ती बाजारांत, सैन्य-शिबिरांतच नव्हे तर यवनांच्या राजदरबारांत सुद्धां हिंडूं लागली. आपल्या भारतीय लेकरांवर यावनी, अरबी, फारशी वस्त्रप्रावरणें, अलंकारभूषणें ती चढवूं लागली, उर्दूचा हा अमर्याद चवचालपणा म्हणा किंवा भ्रष्टपणा म्हणा उत्तरीय हिंदूंना आवडला नाहीं. त्यांनीं उर्दूच्या शरीरावरची भडक, परदेशी दिसणारी संकीर्ण साजसजावट उतरवून त्या ठिकाणीं शुद्ध परिमार्जित संस्कृत शब्दालंकार सजविण्याचा उपक्रम केला. त्या नव्या भारतीय वेशभूषेंत जी उभी राहिली तिचें नांव झालें 'खडी बोली'. पण एक शतकभर या बोलीला साहित्यिकांनीं व विशेषत: कवींनीं जवळ केलें नाहीं, इतकेंच नव्हे तर चांगली परिमार्जित व

अर्थसंपन्न अवस्था प्राप्त झाल्यानंतर सुद्धां अक्षम म्हणून तिची अवहेलना करण्यांत आली होती. साहित्यिकांनीं उपेक्षा केली तरी सुद्धां जनतेंत मात्र ती अधिक प्रिय आणि आपलीशी होऊं लागली होती. घ राराउळांत, उत्सव व धर्मप्रसंगीं ही परिमार्जित हिंदी मोठ्या अभिमानानें वावरूं लागली होती. याच सुमारास राष्ट्रीयतेच्या भावना सर्व देशभर सर्व क्षेत्रांत उजाळल्या गेल्या, त्यांतच भाषाशुद्धीची चळवळसुद्धां. हिंदीला सधन करण्याचें साहित्यिकांनीं ठरविलें आणि हिंदी खडी बोलींत कथा, कविता, उपन्यास, काव्यें आणि महाकाव्यें रचलीं जाऊं लागलीं. 'प्रिय प्रवास', 'वैदेही वनवास', 'साकेत,' 'यशोधरा', 'कामायनी' इत्यादि एकापेक्षां सरस दुसरें अशी रचना झाली. 'कामायनी'नें तर महाकाव्याची मर्यादा गाठली. 'कामायनी'नंतर अनेक महाकाव्यें लिहिलीं गेलीं आणि त्यांतील कांहीं चांगल्या वरच्या दर्जाचीं आहेत. पण मला वाटतें हिंदी महाकाव्यांचा 'कामायनी' हा कळस आहे. त्याहून उंच पताका दुसरा कोणी केव्हां चढवूं शकेल याची प्रतीक्षाच करावी लागेल!

आपल्या मराठीच्या नगरींत ब्रह्मविद्या, इतिहास, उपन्यास आणि इतर वाङ्मयाच्या शाखा चांगल्या फुललेल्या, फळलेल्या आहेत. आजकाल कथा, लघुकथा आणि नवकाव्यांचा सुकाळ झाला आहे. पण महाकाव्याची उणीव भरून निघाली नाहीं. नांव घेण्यास सुद्धां आपल्याजवळ एकहि महाकाव्य नाहीं. पौराणिक कथांना नवीन साज चढवून बनविलेलेंहि नाहीं. मग स्वतंत्र विषयांवर कोठलें ? 'कमला' हें एक खंडच राहिलें. गीतरामायण आतां झालें आहे पण त्याच्या गुणांचें मूल्यमापन व्हायचें आहे. जी गोष्ट मराठीची तीच किंबहुना त्याहून शोचनीय इतर भाषांची. केवळ हिंदी भाषेंतच या शतकार्धांत अनेक महाकाव्यें प्रसवलीं आहेत. भारतीय भाषांच्या या बाजारांत कोठें काय चांगलें वाईट दिसतें हें न्याहाळीत भटकतांना मला हिंदी साहित्यांत महाकाव्यांचीं जीं मधुर पक्वान्नें आढळलीं त्यांची ओळख करून द्यावी असें वाटलें. या लहानशा पुस्तकांत मी कांहीं हिंदी काव्यांचा परिचय मराठी भाषिकांना करून देत आहें. हा परिचय अर्थात् एक वाचक या नात्यानेंच; काव्याचा शास्त्रीय मर्मज्ञ म्हणून मी त्यांचें मूल्यमापन करणार नाहीं. केवळ आकर्षक गुणगंध कोठें आहेत, कोणत्या शब्दांच्या जादूनें श्रोते उत्कर्ण, उत्कंठ होतात व मान डोलावूं लागतात हें मी सांगणार आहें.

एकाद्या सहृदय श्रोत्याची माझी भूमिका आहे. काव्यशास्त्राच्या तांत्रिकाची व तर्कटाची नाहीं.

हिंदी भाषेच्या जन्माची कूळकथा न सांगतां महाकाव्यांची रचना केव्हां आरंभली आणि कशी विस्तारली गेली हें जाणणें योग्य होईल. आणि तें सांगतांनाच हिंदी काव्यांच्या उत्कर्षाचे काल व वाद यांचें ठोकळ दिग्दर्शन मी करून देतों.

हिंदी साहित्यांत पहिलें महाकाव्य राजकवि चंद याचें ' पृथ्वीराज रासो '. रास म्हणजे लीला. रामकृष्णांच्या लीला नृत्यनाटचानें दाखविण्यासाठीं ज्या गेय काव्याचा प्रयोग केला जात असे त्याला रास म्हणत. भागवताच्या दशम स्कंधांत तेहतिसाव्या अध्यायांत श्रीकृष्णाच्या रासलीलेचें सुंदर वर्णन आहे. " मंडलांत कृष्णवधू ( गोपी ) आणि मध्यें कृष्ण नाचत असतांना त्या योषितांच्या वलयांचा, नूपुरांचा, किण् किण् आवाज होत होता. एक पद्धतीनें तालांत पावलें पडत होतीं. हात वेळावीत, सस्मित भुवयांचा विलास करीत, केव्हां कट-तट तर केव्हां कुचपट मोडत, उंचावत, आनंदानें अभिलाषेनें आपल्या पाठीवरच्या वेण्यांना विलोल करीत, त्यांच्या गाठींशीं खेळ करीत, नाचत आणि नाचतांना गीत-गान करीत, त्या गोपी मेघमंडलांत विजेसारख्या चमकत होत्या. " त्या काळीं रास हा एक असा क्रीडाप्रकार होता कीं, ज्यांत नृत्य नाटचाबरोबर गानाची साथ असे. पूर्वीं रास हें प्रेमलीलांचें काव्य असे. पुढें पुढें हें बंधन जाऊन तें एक गेय काव्य बनलें. गुजराथ आणि राजस्थान प्रदेशांत अशीं अनेक रासकाव्यें आहेत. राजस्थानच्या पिंगल आणि डिंगल बोलीमध्यें रासकाव्यांची लोकप्रियता वाढत गेली आणि परिणामीं ' पृथ्वीराज रासो ' हें महाराणा पृथ्वीराज यांच्या जीवनावर, त्यांच्याच समकालीन कविमित्रानें एक अमरकाव्य रचलें. त्याचा आपण परिचय करून घेणार आहोंत.

पृथ्वीराज हा स्वतंत्र भारताचा अंतिम हिंदु सम्राट होता. त्याचें शोचनीय पतन झालें आणि त्याचबरोबर वीररसाला उंचवळणारा कवि चंदहि गेला. मागें राहिलें तें एक अमरकाव्य. वीर्य-पतनच झालें तेव्हां वीररस कोठून येणार? सम्राटच गेला तेव्हां भाट आणि कवि कसे जगणार?

वीरकथाच नाहीं तर गाथा कोण गाणार ? सारा भारत दास बनला, कवींनीं काय करायचें ?

मूर्तिभंजक यवनांची सत्ता केवळ दिल्लीसच नव्हे तर भारतांतील साऱ्या लहानमोठ्या प्रदेशावर प्रस्थापित होत होती. या काळांत हिंदु जनतेवर, त्यांच्या धार्मिक भावनांवर आणि पवित्र पूजास्थानांवर किती मर्मभेदी आघात झाले हें आपणांस वाचून माहीत आहे.

त्यांचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य उत्तर भारतीय जनतेंत उरलें नव्हतें. इस्लामच्या पाशवी आक्रमकांसमोर उभें रहाण्यास शक्तिमान् असा राजा नव्हता. तशा परिस्थितींत परमेश्वराला आळविणें याच्याशिवाय दुसरा कोणताहि उपाय अगतिक हिंदुसमाजापुढें राहिला नव्हता. संत-महंतांनीं कवि आणि तत्त्वज्ञान्यांनीं परमेश्वराला भक्तिभावानें आळविलें. याच काळाला हिंदी साहित्यांत भक्तिकाल म्हणतात. या भक्तियुगांत सूरदास व तुळसीदास हे महाभक्त कवि होऊन गेले. कांहीं मुसलमान संत भारतीय भक्तिमार्गाकडे आकर्षित होऊन रामकृष्णांच्या भक्तिरसानें ओथंबलेली कविता लिहूं लागले होते. त्या भक्तिकाव्याच्या सगुण-निर्गुण आणि सूफी अशा धारा आहेत. सगुण, निर्गुण भक्तीविषयीं नवीन असें सांगण्यासारखें नाहीं. सूफी हें एक दर्शन आहे असें मानलें जातें. माझ्या मतें तो एक पंथ आहे. या पंथाच्या उत्पत्ति व हेतूविषयीं मतभेद आहेत. सूफी पंथ इस्लाम-सारखा एकेश्वरवादी आहे. तो स्वत:ला कोणत्याहि धर्माच्या अंतर्गत मानीत नाहीं. कोणत्याहि धर्माच्या मर्यादा आणि बंधनें त्याला बांधीत नाहींत. तरी पण पैगंबर महंमदविषयीं या सूफी पंडितांना नितान्त आदर असतो. इस्लाम-प्रमाणें अल्ला आणि आदमी यांच्यामध्यें मात्र कोणी रसूल म्हणजे मध्यस्थ प्रेषित सूफी पंथाला मान्य नाहीं. भारतीय दर्शनांत ब्रह्माचा आणि जीवाचा जो संबंध गृहीत धरला आहे, तोच सूफी पंथानें मान्य केला. ईश्वर निराकार आहे, माया ही एक सैतान आहे, ती माणसाला भुलविते, या सैतानाच्या फांसांतून सुटतांच जीवाचें ब्रह्माशीं मीलन होतें आणि हेंच त्यांच्या मतें अंतिम साध्य. ब्रह्ममीलनासाठीं आतुर असा सूफी भक्ति आणि प्रेमाचीं गाणीं गातो. परमेश्वर हा पुरुष-पति—आणि भक्त ही एक नारी या कल्पनेंत रंगून सूफी कवींनीं जीं गीतें गायिलीं तीं भारतीय मधुराभक्तीसारखींच

आहेत. कांहींच्या मतें तर मधुराभक्तींतील परमेश्वर व भक्त यांचा पति–पत्नीसम संबंध, या सूफी पंथाच्या प्रभावाचा परिणाम आहे. तो संबंध भारतीय नाहीं. कांहीं असो. या सूफी कवींनीं हिंदु–मुस्लिम एकता, राम-रहीम यांची अभिन्नता प्रामाणिकपणें वा अन्य हेतूनें प्रसृत केली. कांहींच्या मतें हताश हिंदु मनांत इस्लामविषयीं सहानुभूति निर्माण करून वाढत असलेली कटुता कमी करावयाचा हा एक कुशल कावा होता. " कोई हिंदु कोई तुरक कटावै एकजमीपर रहिये " असें कबीरानें म्हटलें खरें, पण त्याचा परिणाम जसा हिंदूंवर झाला, तसा अत्याचारी मुसलमानांवर झाला नाहीं, आणि हिंदु कवींच्या तोंडून उद्‌गार निघाले. " राजा कोणी असो, आम्हां भक्तांना त्याचें काय ? "

हिंदु तत्त्वज्ञान, संस्कृति, आचार पौराणिक आणि ऐतिहासिक कथा यांचा स्वीकार करून जी साहित्य रचना या सूफी कवि पंडितांनीं केली तिनें भारतीय मनावर पुष्कळच पकड मिळविली, सूफी कवि भक्तिकालांत नांवा-रूपाला आले. या भक्तिकालांत विद्यापति, कबीर, महंमद जायसी, रसखान, सूरदास व तुळशीदास होऊन गेले. या काळांतच दोन महाकाव्यें निर्माण झालीं. महंमद जायसीचें ' पद्मावत् ' आणि तुळशीदासाचें ' रामचरित् मानस '. हीं दोन्ही अवधी बोलींत आहेत. त्यांचा परिचय आपण करून घेणार आहोंत.

मोंगल साम्राज्य स्थिर झालें होतें. अकबर, जहांगीर यांच्या काळांत देशांत उत्तरोत्तर वाढती शांती आणि सुबत्ता नांदूं लागली होती. अत्याचार, अनाचार, धार्मिक कटुता आणि विरोध या गोष्टी कमी होऊं लागल्या होत्या. संभ्रान्त जनतेचें लक्ष साहजिकच हळूहळू कला, साहित्य, शिल्प व काव्य यांकडे वळलें. या सर्वांतून सुखविलास, शृंगार साधण्यासाठीं माध्यमाचा शोध साहित्यिक करूं लागले. भक्तिरसानें पाझरणारीं परमेश्वराचीं स्तोत्रें कमी होऊन सौंदर्यप्रशंसेकडे कविमनें वळूं लागलीं. नायिकांच्या प्रकृति, विलास, शृंगार व सौंदर्यांची मीमांसा होऊं लागली आणि त्यावरून नायिकाभेद नांवाचे संकेत हिंदी साहित्यांत निर्माण झाले. या काळाला रीतिकाल म्हटलें गेलें आहे. भक्तिकालांतील गीतगोविंदकार जयदेव, तसेंच महाकवि विद्यापति यांनीं हरिस्मरण करतां करतां सौंदर्याचा कलाविलास मधुरकोमलकांत पदावलीनें

करून दाखविला होता. रीतिकालांत सौंदर्योपासना वाढली पण ती नायिकांच्या सौंदर्याची. हावभाव, पदन्यास कुच-कटी, नख-शिखादींच्या एकेक प्रकारांवरून नायिकांचें भेद आणि रीति कल्पिल्या गेल्या. या कालांत सौंदर्य शृंगारानें उत्तान आणि खरें म्हणजे अश्लील सुद्धां स्वरूप धारण केलें. या कालांत सुद्धां भक्तिभावानें रसरसणारी कांहीं कविता रचली गेली पण बहुतांशीं आपापल्या शृंगारसिद्धान्तांच्या अभिव्यक्तीसाठीं कवींनीं राधाकृष्णाला प्रेमलीला करावयाला लावलें. या कालांत शब्दांची शिल्पकला शिखराला पोहोंचली यांत संशय नाहीं, परंतु महाकाव्य असें निर्माण झालें नाहीं. एका कवीचा मात्र उल्लेख करणें उचित होईल. तो कवि म्हणजे कविराज भूषण, 'शिवराज भूषण', 'शिवबावनि', 'छत्रसाल दशक' हीं वीररसप्रधान काव्यें या तेजस्वी कवीनें लिहिलीं व शृंगाराच्या गर्तेत पडलेल्या हिंदी कवितेला वर उचलण्याचा त्यानें प्रयत्न केला. राजा शिवाजीवर भूषणानें रचलेलें काव्य हें अत्यंत ओजस्वी आणि वीररसपरिपूर्ण आहे.

यानंतरचा काळ म्हणजे हिंदी साहित्याच्या आधुनिक युगाचा. त्याचा प्रारंभ भारतेंदु या थोर गृहस्थानें केला. त्यांना आधुनिक हिंदी साहित्याचे जनक जमजलें जातें. भारतेंदूच्या तुतारीनें हिंदी साहित्यिकांना जागृत केलें. आपल्या मराठींतील राष्ट्रीय कवीप्रमाणेंच भारतेंदूची प्रेरणा भारतमातेच्या असहाय अवस्थेंतूनच झाली. जें जें विदेशी तें तें स्वदेशांतून बाहेर फेकून भारताला स्वाधीन, स्वतंत्र करणें हें सूत्र होतें त्यांच्या सर्व साहित्यनिर्मितीचें. हा एक मोठा विचित्र विधियोग आहे कीं, ज्या इतिहासप्रसिद्ध शेठ अमिचंदानें भारतमातेला पाशबद्ध करणाऱ्या इंग्रज क्लाइव्हला सहाय्य आणि सहकार्य दिलें, त्याच्याच कुळांत जन्मास आलेल्या हरिश्चंद्रानें आपल्या मातृभूमीच्या पाशविमोचनासाठीं उत्तर भारतांतील पहिली तुतारी वाजविली. भारतेंदूच्या ओजस्वी काव्यानें सुप्त हिंदी साहित्यिकांना जागृत करून त्यांच्यांत ज्वलन्त राष्ट्रीय भावना भरून टाकली. भारतेंदूचें एक कडवें देण्याचा मोह मला आवरत नाहीं.

" पृथ्वीराज जयचंद कलहकरि जन बुलाये ।
तिमिरलंग चंगेस आदि बहु नरन करायो ।

अल्लादीन औरंगजेब मिले धरम नसायो
विषय वासना दुसह मुहंमदसह फैलायो
तब लौ सोअे वहुनाथ, तुम जागे नहीं कोऊ जतन
अब तौ जागौ, बलि बेरी भयि हे मेरे भारत रतन"

क्लाइव्हच्या जुलमाला कंटाळून काशीस आलेल्या अमिचंदाच्या कुटुंबांतील हरिश्चंद्र ऊर्फ भारतेंदूनें आपल्या साहित्याद्वारें हिंदी वाङ्मयांत राष्ट्रीयतेची भावना पेरली आणि भारतेंदु मंडलांतील कवींनीं तें कार्य पुढें चालविलें. भारतेंदु नाटककार, कवि, पत्रकार होते. ( संवत् १९०७ ते १९४१ )

भारतेंदूनंतर हिंदी साहित्याचें द्विवेदी युग उजाडलें आणि त्यानंतर प्रसादयुग. हिंदी साहित्यिकांच्या या युग परिभाषेचें आपणांस थोडें हंसू येईल. वीसपंचवीस वर्षांच्या कालाला युग म्हणायचें म्हणजे विनोदच नाहीं का ? पण त्या परिभाषेप्रमाणें अर्थात् थोडा मथितार्थ आहे. या दोन-चार युगांत हिंदी कवितेनें विविध वादांच्या भरीला पडून वेशपरिवर्तनच नव्हे तर काया-कल्पहि केलेले आहेत.

द्विवेदी युगांतील दोन वैशिष्टचें म्हणजे हिंदी सारस्वतांनीं आतांपावेतों उपेक्षित अशा खडी बोलीचा परिवंश स्वीकारला. द्विवेदी यांनीं सन १९०० मध्यें सरस्वती नांवाचें मासिक काढून नवयुगाचा आरंभ केला. जनतेच्या साध्या बाजारी भाषावेषांत म्हणजे खडी बोलींत हिंदी कविता वावरूं लागली. पुढच्या दोनतीन दशकांत या खडी बोलीनें उत्कृष्ट क्षमता सिद्ध करून दाखविली. कविवर्य हरिऔधानें खडी बोलींत महाकाव्यें रचलीं जाऊं शकतात हें आश्चर्य करून दाखवितांच त्यांच्याच मागोमाग, मैथिलीशरण, जयशंकर, दिनकर इत्यादि कवींनीं हिंदी सारस्वत अक्षय धनानें भरून टाकलें. द्विवेदी युगांत जसें भाषापरिवर्तन झालें, तसेंच काव्यविषयांची बांधबंधनें तोडण्यांत आलीं. आतांपावेतों काव्यांचे विषय ठराविक संकेतानुरूप असत, पण या युगांत ' मुंगीपासून हत्तीपर्यंत ' कोणत्याहि विषयावर काव्यरचना होऊं लागली. भारतेंदूनें राष्ट्रीय भावनेचें जें बीज पेरलें होतें तें द्विवेदी युगांत सर्वदूर फोंफाऊं लागलें. राष्ट्रीय भावना लसलसूं लागली आणि ती सुफला होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं.

ज्याला प्रसाद युग म्हणतात तें वास्तविक युग नसून एक वाद आहे. द्विवेदी युगापर्यंतचें काव्य, चरित्र, प्रबंध, इतिहास यांच्या आधारावर रचलेलें असे. कल्पना आणि भावनांचा आविष्कार त्यांना परंपरागत संकेताच्या पलीकडे जाऊन करतां येत नसे. अन्तर्मुख झालेल्या आत्मनिष्ठ कवीला आपल्या अनुभूति व भावना व्यक्त करावयाच्या होत्या. केवळ वस्तुनिष्ठ दृष्टीनें वर्णन करण्याची शैली बदलून त्याला आत्मनिष्ठ कोनानें सर्व जगाकडे पहायचें होतें. असें अखिल वस्तुजात, निसर्ग आणि प्रत्यक्ष मानवी व्यवहार, यांचें मनोमूल विश्लेषण करण्याचा प्रथम उपक्रम अमरकवि जयशंकर प्रसादानें केला. या उपक्रमाला छायावाद अथवा रहस्यवाद असें म्हटलें गेलें. या वादाचीं वैशिष्ठ्यें म्हणजे (१) स्थूल वस्तु वर्णनापेक्षां सूक्ष्म भावांच्या विश्लेषणांवर भर; (२) द्विवेदी युगांत सौंदर्य शृंगारावर जे कठोर निर्बंध आले होते, त्यांना झुगारून सौंदर्य विषय भावनांचें मनःपूत पण प्रच्छन्न विशदीकरण; (३) रहस्यवादी काव्य व्यक्तिनिष्ठ भावना--कल्पनांच्या आलंबावर आधारलेलें असतें. अर्थात् त्यांत सामाजिक दृष्टिकोन सांपडणें कठीणच. (४) शब्दरचना, रेखा आणि शैली, भावनांचें अभिव्यंजक शब्दसौष्ठव आणि रसांचें अर्थवाहक नादमाधुर्य, यांवर अत्यंत लक्ष. शब्दांच्या सहाय्यानें रंग, रूप, रेखा आणि नाद यांची मधुर लय साधण्याचा प्रयत्न हें या काव्यांच्या यशाचें रहस्य आहे. काव्य बहुतेक गेयच असतें. जयशंकर प्रसाद या शैलीचे अग्रेसर होते. ख्यातनाम सुमित्रानंदनपंत, महादेवी वर्मा, निराला, इत्यादि महान् समकालीन कवींच्या काव्यांत छायावादाचा अभिनव आल्हाददायक परिपोष सांपडतो. छायावाद आणि रहस्यवाद यांतील किंचितसें अंतर असें कीं, ज्या काव्यांत अध्यात्मिक अथवा तात्त्विक चिंतन अधिक तों रहस्यवाद व ज्यांत स्नेह, प्रेम, प्रणय यांसारख्या भावनांचें गुंजन अधिक प्रमाणांत असतें त्याला छायावाद म्हणतात. या वादांत विशेषतः मानवी भावनांचें निसर्गावर आरोपण अथवा निसर्गाच्या पार्श्वभूमीवर मनोव्यापारांचें चित्रण असतें.

छायावादी कवि कल्पनेच्या मागें लागून प्रकाशाकडे दुर्लक्ष्य करून, केवळ छायेच्या शोधांत इतके भुलले, भटकले, बहकले कीं, उंच उंच जाणाऱ्या

हेलिकोप्तरप्रमाणें वास्तव जीवनापासून त्यांचे संबंध तुटले. एकाद्या लाडक्या मुलाला श्रीमंत आईबापांनीं मातींत खेळायचें बंद केल्यानंतर त्या मुलाच्या मनांत मातीविषयीं एक प्रकारची घृणा उत्पन्न होते. त्यामुळें कबड्डी तर दूरच राहो, पण गोट्या खेळण्यांत सुद्धां त्याच्या हाताला माती लागते, त्याचे कपडे खराब होतात, त्याला बंड गुंड मुलांच्या बाल - कलहाची चीड येते, तद्वत् या कवींची अवस्था झाली. कटलेला पतंग जसा वाऱ्यावर इतस्ततः तरंगतो, त्याप्रमाणें हे छायावादी कवि वास्तविक जीवनापासून अगदीं दूर, असंवद्ध उंच उंच उडूं लागले, श्रुतिमधुर ताल-नादांत ते रमले, सुगंधाच्या गुंगींत भान विसरले, सुवर्ण सौंदर्याच्या शोधांत वेडे होऊन सांवल्यांशीं शिवाशिवी खेळूं लागले, जीवनांतील सत्यांची आणि स्वातंत्र्यार्थ चाललेल्या संघर्षाची त्यांनीं कधीं तिलकीशी दखल घेतली नाहीं. केवळ उद्यानांतील पल्लवांच्या छायेंत मधुर गुंजन करण्यांतच त्यांनीं आपल्या प्रतिभेला खेळविलें.

काव्य आणि जीवन यांचा कांहीं संबंध आहे कीं नाहीं ? नाटकांत जीवनाचें प्रतिबिंब दिसतें. काव्यांत दिसावें कीं दिसूं नये, हा विषय निराळा आहे. पण छायावादी कवींच्या काव्यांत यथार्थ जीवनाची जाणीवच नव्हे तर उघड उघड तिरस्कार दिसत असे. जणुं कांहीं हे छायावादी कवि देवदूता-प्रमाणें तरल, निर्मल वातावरणांत अमूर्तसे वावरत. त्यांचे वेश, त्यांच्या भूषा, त्यांचे आचार, व्यवहार आणि सभ्यता जणुं काय नंदनवनांतून नुकत्याच अवतरलेल्या विमानांतून उतरलेल्या गंधर्वाप्रमाणें असत. या हास्यास्पद परि-स्थितीचा अतिरेक होतांच प्रतिक्रिया सुरू झाली. काव्य श्रुतिमधुर असेल पण जीवनांतील कोलाहल तें किती दिवस बुडवून टाकूं शकेल ? काव्यांतील ‘ मधु 'प्याल्यानें मद्याची नशा तर दूरच पण एक वेळची भूक तहान सुद्धां भागत नाहीं. द्वितीय महायुद्धांत जीवनकलह अधिक कठोर झाला. आणि त्याचे पड-साद हिंदी साहित्यांत दिसूं लागले. त्याला प्रगतिवाद असें म्हटलें जातें. या वादानें जीवनाकडे केवळ रसात्मक दृष्टीनें पाहण्यांतच काव्य नसून ग्राह्या-ग्राह्य हेतूनें आलोचन–समीक्षण प्रवृत्ती निर्माण केली, भावनातरंगांपेक्षां विचार-तर्कांना अधिक मान्यता मिळवून दिली. निर्विकल्प आनंदापेक्षां जीवन पूर्ण आणि सुखावह करणाऱ्या आधिभौतिक मूल्यांची प्रतिष्ठा वाढविली.

मानवाची समानता, वैषम्याचा निरास, सुखसाधनांचे समान अधिकार आणि वितरण, इत्यादि प्रगत सिद्धान्तांचें पुष्ट पोषण करण्यासाठीं हा वाद निर्माण झाला. मानव हाच या जगाचा स्वामी आणि सर्वांचें ऐहिक जीवन समृद्ध, संपूर्ण आणि सर्वसुखी करणें हेंच या वादाचें मूळ सूत्र आहे. काव्य म्हणजे मधुरकोमलकांत पदावलीनें लसलसणारें व लालित्यपूर्ण असलें पाहिजे असा होता सनातन संकेत. पण प्रगतिवादी कवि जीवनाकडे यथार्थवादी दृष्टीनें पाहतात. जीवनांतील कोलाहल, कलह, कुरूपता इत्यादि सार्‍या उपेक्षित अथवा वर्ज्य केलेल्या सत्यांचा काव्यांत अनुल्लेख केल्यानें जीवनांतून तीं टळत नाहींत. आपल्या जीवनांतील सार्‍या समस्यांचें सम्यक् दर्शन करून त्यांची उकल करून दाखवील तें उत्कृष्ट काव्य असा या वादाचा अभिप्राय आहे. या वादाचे पुरस्कर्ते कवि आज हिंदी साहित्याचा पुरोभागीं आहेत.

प्रगतिवादी कवींच्या कांहीं न्यूनतेंतून आणखी एक नवीनच वाद हिंदी साहित्यांत उपटला आहे. प्रगतिवादी कवि एकांगी प्रचारकी असून, व्यक्तीला विसरून केवळ समाजनिष्ठ बनणारे, स्नेह, प्रेम, मृदुता, माधुर्य, सौंदर्य इत्यादि कल्पनांच्या प्रतियोगी कठोरता, विद्वेष, असूया, कर्कशता, कुरूपता इत्यादि सत्यांचें भयानक प्रदर्शन करून आज़पावेतोंच्या सर्व संकेतपरंपरांच्या मूर्ति व कल्पनांचा भंग करण्यास प्रवृत्त झाले होते. नवप्रयोगवाद्यांनीं आपला थोडासा नवीन मार्ग शोधला आहे. काव्यक्षेत्राकडे नव्या दृष्टीनें पाहण्याचे त्यांचे प्रयत्न आहेत. परंतु अजूनपर्यंत या नवीन मार्गानें जाणार्‍या कवींनीं आपणांस जायचें कोठें व कसें हें सुद्धां ठरविलेलें दिसत नाहीं. तेव्हां त्यांच्याविषयीं अधिक लिहिणें अप्रस्तुत होईल.

हिंदी कविता दोन तीन युगांतून या तीन-चार मार्गांनीं कसा प्रवास करीत आली आहे हें मराठी वाचकांना थोडक्यांत दाखविण्याचा मी प्रयत्न केला. हिंदी साहित्यांत काव्याची निपज सुकाळाची आहे. कोणी तरी कांहीं तरी "बेढंग" "बेधडक" "निराला" "निरंकुश" "निरंजन" अशीं कुतूहलपूर्ण कधीं सार्थ तर कधीं व्यर्थ नांवें घेऊन "तुकबाजी" करून कांहीं तरी भरकटून टाकलें, म्हणजे झालें काव्य तयार. असें हिंदी काव्य प्रभूत आहे त्यांतून शाश्वत मौलिक, किती मागें राहील, हा प्रश्नच आहे. आजकाल तर

महाकाव्यें सुद्धां खूप लिहिलीं जात आहेत. आपण त्यांचें मूल्यमापन एका पिढीनंतर तीं आठवणींत राहिल्यावरच करणें बरें होईल.

माझा हेतु हिंदींतील महाकाव्यांचा परिचय करून देण्याचा आहे. एका लहानशा पुस्तिकेंत तें कसें साधायचें ? तरी पण पहिल्या महाकाव्यापासून आरंभ करून या अर्धशतकांतील कांहीं प्रातिनिधिक काव्यांची मी ओळख करून देणार आहें. मागें म्हटल्याप्रमाणें हें शास्त्रीय मूल्यमापन नाहीं. मराठींत महाकाव्यें नाहींत. हिंदींतील ही काव्यसंपदा पाहून कोणातरी अज्ञात सुप्त प्रतिभेच्या महाकवीस असला एकादा अलंकार घडवून आपल्या भाषा-मातेस लेवविण्याची प्रेरणा लवकर होवो अशी इच्छा व्यक्त करून हें लांबट प्रास्ताविक संपवितों.

■ ■ ■

* १ *

# ॥ पृथ्वीराज रासो ॥

## कवि चंद वरदाई

दिल्लीचा अंतिम हिंदु राजा पृथ्वीराज या वीर पुरुषाच्या अद्‌भुत जीवनावर त्याचा आमरण मित्र ‘ कवि चंद ’ यानें महाकाव्य लिहिलें तेंच हिंदीसाहित्यांतलें पहिलें महाकाव्य आहे. ‘ कवि भूषणा ’च्या ‘ शिव बावनी ’-प्रमाणें ‘ रासो ’ हें राजकवीनें साक्षात् पाहिलेलें काव्यमय चरित्र आहे. कवि चंद हा पृथ्वीराजाचा बाल्यापासून मरणापर्यंत मित्र आणि मंत्री होता. अर्थात् हें काव्य ऐतिहासिक मानलें पाहिजे. पण कांहींच्या मतें यांतील ऐतिहासिक घटनांचें प्रामाण्य संशयास्पद आहे. कांहींच्या मतें राजकवि चंदासारखा पृथ्वीराजाचा समकालीन कोणी कवि होऊन गेला हें सुद्धां शंकनीय आहे. या महाकाव्यांत कांहीं थोडया घटना आणि अनेक अद्‌भुत कथा अशा अतिशयोक्त आहेत कीं, त्या कोणाहि समकालीन साक्षीदारानें तशा लिहिल्याच नसत्या. ऐतिहासिक प्रामाण्याचा प्रश्न बाजूस ठेवला तर मात्र या विशाल महाकाव्याची वाङ्‌मयीन मौलिकता असाधारण आहे.

‘ कवि चंद ’ खरोखर झाला कीं नाहीं याविषयींच जेथें शंका तेथें त्याचें चरित्र काय सांगायचें ? ‘ इक्कदीह उत्पन्न इक्क दी है समाय क्रम ’ या उल्लेखावरून रासोप्रमाणें पृथ्वीराज आणि चंद यांचें मरणच नाहीं तर जन्म सुद्धां एकाच दिवशीं झाले होते. गझनी येथें शहाबुद्दिनाचा वध केल्यानंतर आपलें जीवनकार्य संपलें असें समजून या दोघां शूरांनीं एकमेकांना कटयारीनें मारून घेतलें. रासोच्या सर्व प्रतींत ही घटना निरपवाद आढळते. परंतु इतिहासांत मात्र तिला पुष्टी सांपडत नाहीं. कवि आणि राजाची अनन्य अभिन्न मैत्री मात्र काव्यांतून पदोपदीं प्रतीत होते.

**कथासूत्र**–राजा अनंगपाल दिल्लीवर राज्य करीत होता. त्याच्या कमला आणि सुंदरी नांवाच्या दोन मुली होत्या. राज्याला वारस पुत्र मात्र त्याला नव्हता. वडील मुलगी कमला त्यानें यज्ञकुंडांतून उत्पन्न झालेल्या चौहाण कुलांतील अजमेरच्या राजा सोमेश्वराला दिली होती व लहान सुंदरी ही कन्नौजच्या राजा विजयपालाला दिली होती. कमलेचा मुलगा हा या महाकाव्याचा नायक पृथ्वीराज, तर सुंदरीचा जयचंद हा काव्यांतील जणुं खलच होय.

कवीनें पृथ्वीराजाच्या शिशुक्रीडा, विद्यार्जन, शौर्य, धैर्याच्या अनेक गोष्टी अद्‌भुतपणें वर्णन केल्या आहेत. अनंगपालानें गादीला वारस म्हणून पृथ्वीराजाला दत्तक घेतलें. पृथ्वीराज आतां दिल्लीश्वर झाला होता. पण या घटनेनें त्याचा मावसभाऊ जयचंद याला अतिशय दु:ख झालें. पृथ्वीराजाच्या द्वेषानें तो धुमसूं लागला.

पृथ्वीराज हा अत्यंत साहसी वीर होता. धनुर्विद्येंत तर तो अद्वितीय असा योद्धा होता. त्यानें गुर्जरेश चालुक्यवंशी राणा भीमदेवाला पराजित करून 'इंछिनी'शीं विवाह केला. भीमदेव हा त्याचा प्रतिस्पर्धी बनला.

'शशिव्रता' नांवाच्या एका सुंदरीचा विवाह जयचंदाच्या पुतण्याशीं ठरला होता. शिवपूजनासाठीं जात असलेल्या त्या युवतीला त्यानें पळवून आणलें आणि तिच्याशीं विवाह केला. अर्थात् शशिव्रतेचें मन जयचंदाच्या पुतण्यापेक्षां पृथ्वीराजावरच बसलें होतें. जयचंदाचें सैन्य आडवें आलें असतां पृथ्वीराजानें त्याचा पार धुव्वा उडवून दिला. या घटनेमुळें मत्सरी जयचंदाच्या मनांत अधिकच शत्रुता उत्पन्न झाली.

राजा जयचंदाला 'संयोगिता' नांवाची एक अत्यंत रूपवती कन्या होती. या संयोगितेचें स्वयंवर ठरलें. तत्कालीन क्षत्रिय रीतीप्रमाणें जयचंदानें सर्व राजांना व सरदारांना आमंत्रण धाडलें. पण पृथ्वीराजाला मात्र त्यानें साधें औपचारिक निमंत्रणसुद्धां धाडलें नाहीं. इतकेंच नव्हे तर त्याचा अपमान करण्याचा बेत त्यानें केला. पृथ्वीराजाचें पौरुष व सौंदर्य यांच्या कथा कर्णोपकर्णीं साऱ्या देशभर पसरल्या होत्या त्या संयोगितेच्या कानावरहि गेल्या होत्या. पृथ्वीराज हा एकच पुरुष आपणांस वरण्यास योग्य आहे, असा दृढनिश्चय संयोगितेनें केला होता. पृथ्वीराजाला स्वयंवराची वार्ता कळलीच

होती. संयोगितेचें स्वरूपसौंदर्य हें त्याला माहीतच होतें. आमंत्रण नव्हतें तरी त्यानें स्वयंवराला जाण्याचें ठरविलें. दरबारांत भाट, ज्योतिषी, त्याच्या पांच राण्या या सर्वांनीं मात्र पृथ्वीराजाला विरोध केला. परंतु त्या सर्वांचा उपदेश त्यानें मानला नाहीं. आपला मित्र कवि चंद आणि निवडक सैन्य बरोबर घेऊन तो कन्नौजकडे गेला.

जयचंदानें पृथ्वीराजाचा अपमान करण्यासाठीं त्याची मूर्ति बनवून द्वारपाल म्हणून ती स्वयंवर-मंडपाच्या प्रवेशद्वारीं उभी केली होती. संयोगिता वरमाला घेऊन सभामंडपांतून बाहेर आली व तिनें धीटपणानें पृथ्वी-राजाच्या मूर्तीच्या गळ्यांत ती घातली. राजदरबारांत गोंधळ माजला. जय-चंद खूप रागावला. त्यानें संयोगितेला गंगाकिनारीं एका राजप्रासादांत कोंडून ठेवलें. पृथ्वीराज आणि कवि चंद कन्नौजमध्येंच होते. त्यांना हें वर्त-मान कळलें. एके दिवशीं धाडसी पृथ्वीराजानें त्या प्रासादांत प्रवेश मिळ-विला. संयोगितेशीं त्यानें गांधर्व विवाह केला आणि तिला घोड्यावर घालून तो दिल्लीकडे जायला निघाला. जयचंदानें खूप पाठलाग केला. परंतु अजिक्य पृथ्वीराजानें सर्व अडचणी पार करून दिल्ली गांठली.

पृथ्वीराज संयोगितेशीं प्रणयक्रीडेंत इतका रंगून गेला कीं, राज्य-शासनाकडे त्याचें संपूर्ण दुर्लक्ष झालें. दिल्लीश्वर विलासप्रियतेमुळें दुर्बल झाला आहे असें पाहून गझनीचा सुलतान शहाबुद्दिन घोरी यानें दिल्लीवर आक्रमण केलें. अति स्वप्नमय अशा वातावरणांतून जागृत झालेला पृथ्वीराज संयोगितेला लौकर परतण्याचें आश्वासन देऊन शत्रूला तोंड देण्यासाठीं रणां-गणावर उतरला. दुर्दैवानें त्याचा पराजय होऊन तो घोरीच्या हातीं सांपडला.

संयोगिता इतर राण्यांसह अग्निप्रवेश करती झाली. शहाबुद्दिनानें पृथ्वीराजाला गझनीस नेऊन कैदेंत टाकलें. व त्याचे डोळे फोडून त्याला अंध केलें. आपल्या अविवेकी प्रेमलीला आणि कर्तव्यविन्मुखतेचा पश्चात्ताप करीत पृथ्वीराज दिवस कंठीत होता.

एके दिवशीं अनपेक्षितपणें कवि चंद त्याला भेटण्यास आला. कवि-मित्रानें राजाला सर्व वृत्त सांगितलें. दोघांनीं पुष्कळ विचार केला. आणि शेवटीं पृथ्वीराजानें शहाबुद्दिनाचा शब्दवेध करण्याची योजना आंखली गेली.

राजकवि चंदानें शहाबुद्दिनाला आपल्या काव्य-गायनानें प्रसन्न केलें. आपला मित्र अद्वितीय धनुर्धारी आहे अशी स्तुति करून शहाबुद्दिनाच्या मनांत पृथ्वीराजाचें धनुर्नैपुण्य पहाण्याचें कुतूहल निर्माण केलें. घोरीच्या आज्ञेप्रमाणें एक समारंभ ठरविण्यांत आला. शहाबुद्दिनाच्या दरबारांत अंध पृथ्वीराजास आणण्यांत आलें. सारा दरबार पृथ्वीराजाकडे उत्कंठ पहात होता. एकदोन प्रयोग झाल्यानंतर चंदानें पृथ्वीराजाला आपल्या लक्षाचें म्हणजे शहाबुद्दिन घोरीच्या कंठनालाचें अंतर, दिशा, उंची इत्यादींचें प्रमाण त्या विख्यात श्लोकानें सांगितलें आणि विनविलें कीं, ' चौहान कुलभूषण, ही सुवर्ण संधी परत येणार नाहीं. ओढ धनुष्याची दोरी आणि वैराचा बदला घे. ' पृथ्वीराजानें मित्राचा इषारा ऐकतांच धनुष्याची दोरी कानापर्यंत ओढली. तेथून सहज सुटलेला बाण घोरीच्या कंठास जाऊन भिडला. पुढच्याच क्षणीं कवि आणि राजा यांनीं आपल्या हातांनीं एकमेकांचा अंत करून घेतला.

रासोची ही मुख्य कथा आहे. तत्कालीन संकेताप्रमाणें शुक आणि शुकीच्या तोंडून हें सारें प्रबंध काव्य वदविलें आहे. काव्यशास्त्राच्या नियमा-प्रमाणें महाकाव्याचीं सारीं वैशिष्टयें कथानक, उपकथानक, ऋतु, मास, चंद्रसूर्योदय, तारका आणि नक्षत्रें, पर्वत, प्रासाद, युद्ध, प्रेम, इत्यादि इत्यादि सर्व कांहीं या विराट काव्यांत खच्चून भरलेलें आहे. तेराव्या शतकांतल्या या काव्यांत अद्‌भुत कथांचा समावेश झाला असल्यास आश्चर्य नाहीं. ६९ सर्गांच्या या चरित्रांत चमत्कारांचें वैपुल्य आहे. कांहींच्या मतें चंद हा ऐति-हासिक पुरुष होऊन गेला असेल आणि त्यानें प्रत्यक्ष पाहिलेलें आपल्या राज-मित्राचें चरित्र लिहिलें असेल. त्या वेळेस तें एक छोटें कथाकाव्य असावें. मागाहून वाढतां वाढतां भारताचें जसें महाभारत बनलें, तसेंच हें महाकाव्य वाढलें असावें. उघड उघड प्रक्षिप्त दिसणारे अनेक प्रसंग या काव्यांत आहेत. उदाहरणार्थ शेवटची घटना कवि चंदानें लिहिलेली आहे असें मानायचें झालें तर तें सारें वर्णन प्रथम लिहून ठेवून मागाहून त्या योजनेप्रमाणें त्यानें पृथ्वी-राजाचा अंत केला असें समजणें प्राप्त होईल. किंवा असें तरी मानावें लागेल कीं पृथ्वीराज आणि चंद यांचें तें अखेरचें वीरमरण पहाणारा तिसराच कोणी साक्षीदार उपस्थित असला पाहिजे व त्यानें स्वतः किंवा एकाद्या

दुसऱ्या कवीकडून त्या काव्यपंक्ति लिहून घेतल्या. पहिली कल्पना असंभाव्य मानली तर हा भाग चंदाच्या लेखणींतला नाहीं हें उघडच होतें.

या महाकाव्याच्या विभागांना 'समय' अशी संज्ञा आहे. प्रत्येक 'समय' पृथ्वीराजाच्या जीवनांतील एक एक प्रकरण आहे. उदाहरणार्थं पृथ्वीराजाचीं अनेक प्रेमप्रकरणें, त्यासाठीं झालेलीं युद्धें, शहाबुद्दिनाचीं आक्रमणें, रजपूत सेनापतींनीं केलेले त्याचे पराभव, संयोगिताहरण इत्यादि गोष्टींनीं काव्याचा विस्तार अडीच हजार पृष्ठांचा झाला आहे. तीनचार छंदांमध्यें ही सारी रचना झालेली आहे.

पृथ्वीराज रासोचा प्रधान रस वीररस आहे. परंतु प्रसंगानुरूप करुण, शृंगार, इत्यादि इतर रसांचाहि आविष्कार फार चांगला आढळतो. 'नवरस सरस चंद छंद कीय अमीय सम' कवि चंदानें अमृतासारखे गोड सरस नव-रस आपल्या छंदानें निर्माण केले हें सर्वथा यथार्थ वर्णन आहे या काव्याचें. वीररसाला उधाण आणणारें हिंदींतीलच नव्हे तर मला वाटतें कोणत्याहि प्रांतिक भाषेंतलें हें पहिलें महाकाव्य आहे. शोकान्त असूनसुद्धां महाकवि चंदानें सुख आणि समाधानाचा निःश्वास टाकावयास लावणारी एक ओळ अखेरीस लिहून ठेविली आणि ती म्हणजे 'म्लेंच्छांच्या जाचांतून धरणी मुक्त झाली.'

हें रसिक महाकाव्य मध्ययुगीन भारताच्या ऱ्हासयुगाचें यथार्थ दर्शन देतें. सामंतांमधील हेवे-दावे, राजप्रासादांतील विलासप्रियता, राज्याराज्यांतील संघर्ष आणि स्पर्धा यांनीं भारताला त्या वेळीं कसें आणि किती दुर्बल केलें होतें हें या काव्यावरून स्पष्ट दिसतें. दुसरी प्रमुख गोष्ट म्हणजे मध्य-युगापर्यंत चालत आलेल्या हिंदूंच्या संस्कृति व समाज संकेतांचा अभ्यास करणाऱ्यास या काव्यांत खूप साहित्य सांपडेल. कवि चंद हा एक महान् शब्द-शिल्पी होता. त्याच्या या अमर कृतींतून तेजस्वी सुभाषित-सुमनें आणि काव्य मौक्तिकें गोळा केलीं तर त्यांच्या अनेक माला बनवितां येतील. कवि चंद हा केवळ राजभाट नव्हता. त्यानें काव्यशास्त्राचा, शब्दांच्या रूपरेखा-आकाराचा अभ्यास केला होताच पण त्याबरोबरच कौमार अवस्थेपासून कंठ सुरेल करण्यासाठीं काव्यछंद मुखोद्गत केले होते. त्यामुळें त्याची 'उकति, उच्चार,

बृद्धि, तरंग, समगंग' झाले होते. इतकेंच नव्हे तर त्याच्या वाणींत 'अमृत कलेचें वशीकरण सामर्थ्य' आलें होतें. आपल्या ज्ञानेश्वरांनीं सुद्धां 'मराठी बोलींत अमृताशीं पैजा जिकण्याची मधुरता' ओतली होती. त्याचप्रमाणें चंदानेंहि 'कविता आदि अंत जिके जिके' अशा विश्वासानें 'काव्य समुद्र निर्माण केला' त्यापासून 'मुगति, समप्पन, ग्यान, राजनीति' सुफळ होऊन भवसागर पार तरून जातां येतो. कवि चंदानें एका पंक्तींत असें म्हटलें आहे,

'उक्ति धर्म विशालस्य राजनीति नवम् रसम्,<br>षड् भाषा पुराणंच कुराणंच कथितम् मया ।।'

******

* २ *

# ॥ पद्मावत् ॥

■ ■

## मलिक मुहंमद जायसी

हिंदी भाषतील दुसरें महाकाव्य 'पद्मावत्', हें भक्तिकाव्यांतील एका सूफी मुसलमान कवीची रचना आहे हें वाचून आपणांस थोडें आश्चर्य वाटेल. आक्रमक सुलतान आणि पादशाहा भारताचे भिन्नभिन्न प्रदेश जिंकून इस्लामचें वर्चस्व वाढवीत होते. त्याच युगांत भारतीय संस्कृति आणि तत्त्वज्ञानानें कांहीं महंमद चिंतक प्रभावित झाले आणि कांहीं थोडे हाताच्या बोटांवर मोजण्यापुरतेच रामकृष्णाच्या भक्तिरसांत लय पावून गेले. आश्चर्य म्हणजे उत्तर भारतांत कांहीं महंमदी संतांनीं उत्कृष्ट भक्तिकाव्य निर्माण केलें. मलिक मुहंमद जायसी या कवीनें तर शुद्ध अवधी भाषेंत 'पद्मावत्' नांवाचें एक महाकाव्यच लिहिलें.

शतायुषी मलिक मुहंमदाचा जन्म सं. १४९९ मध्यें उत्तर प्रदेशांत जायसा नगरींत झाला. लहानपणींच देवीच्या आजारांत मुहंमदाचा एक डोळा आणि कान अक्षम झाले होते. विद्यार्जन घडलें नाहीं. अशिक्षित अशा मुहंमदानें काव्यलेखन सुद्धां उशीरांच आरंभलें. मोंगल साम्राज्याच्या वैभवकाळांत वाढलेल्या या कवीनें भारतीय तत्त्वज्ञान, संस्कृति आणि साहित्यरेखा नि रसांचा आविष्कार आपल्या काव्यांत करण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थात् त्यांत अनेक दोष उतरले आहेत. कृष्णभक्त रसखानासारखी भारतीय भक्तियोगाची अनुभूति झालेली नसल्यामुळें मुहंमदाच्या रचनेंत भक्ताची समरसता आढळत नाहीं. इतकेंच नव्हे तर इस्लामी मतांचा आग्रह मधून मधून डोकें वर काढतांना दिसतो. ग्रामनामावरून जायसी म्हणून प्रख्यात झालेल्या मुहंमदानें फारच थोडी काव्यरचना केली. पण त्याचें पद्मावत् हें हिंदी साहित्यांतील कालानुक्रमें दुसरें, म्हणूनच नव्हे तर, एक अप्रतिम असें

अविस्मरणीय महाकाव्य ठरलें आहे. संवत् १५६९ मध्यें मुहंमद जायसी अमेठी या गांवीं पैगंबरवासी झाला. 'अखरावट' आणि 'आखिरी कलाम' नांवाच्या दोन काव्य-प्रबंधांत जायसीनें आपले अध्यात्मिक सूफी विचार प्रकट केले आहेत.

दंतकथा आणि इतिहासाच्या अर्धवट आधारावर बनलेल्या प्रेमकथेवर 'पद्मावत्' महाकाव्य रचलेलें आहे. ऐतिहासिक कथाभागांत सुद्धां कवीनें पुष्कळ दोषार्ह बदल केलेले आहेत. भाषा जरी निर्दोष हिंदी असली तरी भारतीय महाकाव्याच्या रूपरेखा सर्गादि संकेत मोडून फारसी काव्यरचना पद्धतीचा कवीनें अवलंब केलेला आहे. काव्यारंभीं हजरत मुहंमद व बादशहा यांना वंदन करूनच कवीनें कथा सांगितली आहे. या प्रदीर्घ काव्यांत अर्थात् शृंगार, वीर वगैरे रस, ऋतु, देश, नदी, पर्वत वन, उपवन, समुद्र, यात्रा, युद्ध, उत्सव, भोजन, पान, वस्त्रप्रावरणें, ऐश्वर्य इ. इ. सर्व गोष्टींचीं रसाळ व अतिशयोक्तिपूर्ण वर्णनें खच्चून आहेत. आणि तीं वाचतांना या कवीचें भारतीय जीवनाविषयींचें अर्धज्ञान वा अज्ञान प्रकट होतें.

'पद्मावत्' एक प्रेमकाव्य आहे. पण सूफी कवीनें लिहिलेलें असल्या-मुळें त्यांत कांहीं तरी अध्यात्मिक तत्त्वज्ञान गढलेलें असलेंच पाहिजे या विचारानें आधुनिक आलोचक 'पद्मावत्'मधील कूटतत्त्वज्ञान शोधण्याचा प्रयत्न करतात. कांहींनीं 'पद्मावता'चा अध्यात्मिक अर्थ लावून दाखविला, तर कांहींना मात्र निराळेंच धर्मरहस्य आढळलें. पण त्याचें दिग्दर्शन करण्यासाठीं काव्याची कथावस्तु सांगणें अवश्य आहे.

पद्मावती ही सिंहलद्वीपाची राजकन्या. तिच्याजवळ एक सूज्ञ आणि सुभाप असा पोपट होता. त्या हिरामण राघूशीं साहित्यसौंदर्याच्या विनोद-वार्ता करण्यांत पद्मावतीचा बाल्यकाल संपून आतां ती नवयौवना झाली होती. पद्मावतीच्या सौंदर्याच्या आख्यायिका प्रतिदिनीं दूरदेशीं पसरूं लागल्या. हिरामणनें एके दिवशीं पद्मावतीला म्हटलें, "मला आज्ञा दे, मी देश-देशान्तरीं भटकून तुला शोभेल असा वर शोधून आणतों."

राजा गंधर्वसेनाला हिरामणच्या कारस्थानाचा सुगावा लागला. त्यानें त्याला मारण्याची आज्ञा दिली. परंतु राजकन्या पद्मावतीच्या आग्रहानें व आर्जवानें राजानें त्याला जीवदान दिलें. हिरामणला मात्र आपल्या जीवितास

आतां धोका निर्माण झाला असें वाटूं लागलें. एके दिवशीं पद्मावती आपल्या सख्यांसह मानससरोवरास गेली असतांना हिरामण उडून गेला.

वनांत आनंदानें विहरत असतांना हिरामण पारध्याच्या जाळ्यांत फसला. पारध्यानें त्याला पकडलें. चितोडच्या बाजारांत एका ब्राह्मणानें हिरामणास विकत घेतलें. ब्राह्मणाच्या घरांत हिरामण पंडित झाला. त्या काळीं चितोडवर राजा रत्नसेन राज्य करीत होता. हिरामणची ख्याति राजाच्या कानांवर जातांच रत्नसेनानें ब्राह्मणाला एक लक्ष रुपये देऊन पोपटाला राजप्रासादांत आणलें. हिरामणनें आपल्या समयसूचक मधुर वाणीनें सर्वांचीं मनें आकर्षित करून टाकलीं. रत्नसेनाची आवडती राणी नागमती रूपसुंदर तर होतीच पण त्यापेक्षांहि अधिक अभिमानी होती. एकदां तिनें हिरामणला आपल्यापेक्षां अधिक रूपमती स्त्री जगांत असेल काय असें विचारलें. हिरामणनें सिंहल राजकुमारी पद्मिनीची प्रशंसा केली व म्हटलें कीं पद्मिनीशीं तुलना केली तर नागमती सूर्यप्रभेसमोर अंधारी रात्र दिसावी तशी ठरेल.

गर्विष्ट नागमतीला वैषम्य वाटलें. द्वेषाबरोबर तिच्या मनांत भय उद्भवलें. न जाणो पतीच्यासमोर पोपटानें पद्मिनीचें रूपवर्णन केलें तर परिणाम काय होईल! तिनें रत्नसेन शिकारीला गेला आहे असें पाहून त्या पोपटाला मारण्याची दासीला आज्ञा दिली. पण इतक्यांत राजा परतला. त्यानें हिरामणची चौकशी केली. लपविलेल्या पोपटाला आणविलें. हिरामणनें रत्नसेनाला सारी हकीकत सांगितली. राजा पद्मिनीच्या सौंदर्यावर भान विसरला. हिरामणला बरोबर घेऊन जोगी बनून तो पद्मिनीच्या प्राप्तीसाठीं प्रासादाचा त्याग करून बाहेर पडला. त्याच्याबरोबर आणखी १६००० युवकहि निघाले.

जोगी रत्नसेन हिंडतां हिंडतां सिंहलद्वीपाभोंवतीं असलेल्या मानससरोवरांत पोहोंचला. एका महादेवाच्या देवळांत तळ देऊन राजानें तपश्चर्या आरंभली. हिरामण आपल्या परिचित राजकन्येकडे गेला. हिरामणला पहातांच पद्मिनीला आनंदाचें भरतें आलें. दोघांनीं मनसोक्त गप्पा केल्या. हिरामणनें रत्नसेनाच्या शौर्य, धैर्यादि गुणांचें वर्णन करून तोच एक तिच्यासाठीं सुयोग्य वर कसा आहे हें सांगितलें. रत्नसेन पद्मिनीसाठीं प्रेमवेडा होऊन

बैरागी बनून कोठें तपश्चर्या करतो आहे हेंहि सांगितलें. आणि पद्मिनी-रत्नसेनाची भेट ठरविली.

पद्मिनी ठरल्याप्रमाणें देवळांत आली. रत्नसेन-पद्मिनीची दृष्टादृष्ट झाली. दोघांच्याहि अंत:करणांत आकर्षण उत्पन्न झालें. पण रत्नसेन इतका आतुर झाला होता कीं त्याला मूर्च्छा आली. मूर्च्छा ओसरल्यावर रत्नसेनानें अग्निप्रवेश करण्याचें ठरविलें. पण महादेवानें त्याचें मन वळवून पद्मिनी मिळवून देण्याचें आश्वासन दिलें. रत्नसेनानें पद्मिनीसाठीं गंधर्वसेनापाशीं मागणी घातली. सिंहलाधिपतीला या जोगड्याच्या उद्धट मागणीचा राग आला व त्यानें ती धुडकावून लावली. इतकेंच नव्हे तर रत्नसेनाला त्याच्या साथीदारांसहित कैद केलें आणि दुसऱ्या दिवशीं त्यांना फांसावर चढविण्याची आज्ञा दिली.

महादेवानें आपल्या भक्ताचें संकट पाहून राजा गंधर्वसेनाच्या दर-बारांत भाटाच्या रूपानें प्रकट होऊन हा जोगी कोण आहे तें समजावून दिलें. इकडे रत्नसेनाला साहाय्य करण्यासाठीं महादेवाचे अनुचर, देव, देवता आणि हनुमानसुद्धां जोगी वैराग्यांच्या रूपानें युद्धासाठीं सज्ज होऊन आले. हनुमानानें शत्रुपक्षाच्या हत्तींना आपल्या शेपटींत गुंडाळून आकाशांत भिर-काऊन दिलें. अशा अद्भुत पराक्रमापुढें भेदरून जाऊन गंधर्वसेन महादेवाला शरण गेला. देवाच्या आदेशाप्रमाणें पद्मिनी रत्नसेनाला देण्याचें त्यानें मान्य केलें.

रत्नसेन-पद्मिनीचा विवाह राजानें फार मोठ्या थाटांत केला. राजजामाताच्या सोळा हजार साथीदारांचेहि विवाह होऊन तें राजकुल मोठ्या आनंदांत राहूं लागलें.

कांहीं दिवसांनीं विरहव्याकुल नागमतीनें पतिशोधासाठीं एका पक्ष्यास धाडलें होतें. त्याला रत्नसेन दिसतांच चितोडला परतण्याची त्यानें त्याला आठवण करून दिली. रत्नसेनानें अपरंपार धनसंपत्तीसह आपल्या श्वशुराचा निरोप घेतला. रूपमती पत्नी व अमर्याद लक्ष्मी बरोबर घेऊन तो समुद्रयात्रेस निघाला. पण त्याचें हृदय गर्वानें फुललें होतें, दृष्टि अंध झाली होती. याचकाच्या रूपानें दान मागण्यास आलेल्या समुद्राची त्यानें अवहेलना केली. समुद्रानें रत्नसेनाचें सारें नाविक दल पाण्यांत बुडविलें. रत्नसेनाची व

पद्मिनीची ताटातूट झाली. शोकविव्हल पद्मिनीला सागरकन्या लक्ष्मीनें धीर दिला. आपल्या पित्याला आळवून तिनें रत्नसेनाची पद्मिनीशीं परत भेट करवून दिली. कांहीं दिवस पाहुणचार घेऊन रत्नाकरानें दिलेल्या चार अद्वितीय वस्तूंसहित हें राजयुगुल आपल्या चितोड राज्याला पोहोचलें. त्यांना रत्नाकरानें अमृत, हंस, शार्दूल आणि पारस पथ्थर अशा चार देणग्या दिल्या होत्या.

चितोडला राजा रत्नसेन आणि राणी नागमती पद्मिनीसह सुखसागरांत विहार करूं लागलीं.

चितोडच्या राजदरबारांत राघवचेतन नांवाचा एक त्रिकालज्ञ ज्योतिषी राजाश्रयांत होता. त्यानें सांगितलेलें एक भविष्य असत्य निघालें. रत्नसेनाला राग आला आणि त्यानें त्या पंडिताला हाकलून लावलें. भारताच्या इतिहासांत वारंवार उफाळणारी–अपमानाचा सूड घेण्याची राष्ट्रघातक वृत्ति राघवांत पेटली. अल्लाउद्दीन नांवाच्या यवनानें दिल्लीच्या सुभ्यावर आपलें स्वामित्व प्रस्थापित केलें होतें. राज्यलोभ आणि धर्मविषयाच्या हावेनें अल्लाउद्दीन संधी सांपडेल तेथें आपलें घोडें दामटीत नेत होता. अवमानित राघव यवनाच्या दरबारांत येऊन पोहोंचला. सूडाच्या आगीनें पेटलेला तो ब्राह्मण विवेक आणि कर्तव्य विसरला. त्यानें अल्लाउद्दिनास राज्याचे भेद सांगितले, चितोड जिंकण्यास प्रोत्साहित केलें आणि पद्मिनीसारखी अनुपम लावण्यवती पळविण्याचा उपदेश केला.

अल्लाउद्दिनानें चितोडवर स्वारी केली. राघवचैतन्यासारखा अंतरभेदी साहाय्यक मिळाल्यामुळें अल्लाउद्दिनानें दगा देऊन रत्नसेनाला पकडलें आणि दिल्लीस नेलें. पण पद्मिनी त्याच्या हातीं लागली नव्हती. अल्लाउद्दीन पद्मिनीसाठीं हट्ट धरून बसला होता. शेवटीं रत्नसेनाच्या जिवलग सरदारांनीं आपल्या राजास सोडविण्यासाठीं एक कारस्थान रचलें. गोरा आणि बादल या दोन रजपूत सरदारांनीं सोळाशें पालख्या सजविल्या. त्या प्रत्येक पालखींत एक एक शस्त्रसज्ज रजपूत वीर वेष बदलून बसला. पालख्या वाहणारे सारे कसलेले वीरच होते. एका मोठ्या पालखींत पद्मिनी आहे आणि ती आपल्या सोळाशें संख्यांसह अल्लाउद्दिनाच्या अंतःपुरांत जाण्यासाठीं निघाली आहे असा निरोप अल्लाउद्दिनास धाडण्यांत आला. पद्मिनीसाठीं एकदां रत्नसेनाला भेटून चितोडचा किल्ला रत्नसेनाला देण्याची अनुमति मागण्यांत

आली. विषयाधीन अल्लाउद्दिनानें तशी परवानगी देतांच त्या साऱ्या पालख्या रत्नसेनाच्या शिबिराकडे धाडण्यांत आल्या.

राजा रत्नसेनासमोर त्या पालख्या उतरतांच एकींतून एक लुहार बाहेर आला. त्यानें रत्नसेनाच्या बेड्या तोडल्या आणि इषारा करतांच सर्व पालख्यांतून शूर रजपूत बाहेर पडले आणि सर्वांनीं एकच गर्दी करून राजाला चितोडला पळविलें.

अल्लाउद्दिनाला हें सारें वृत्त कळतांच त्यानें रत्नसेनाचा पाठलाग केला. गोरा आणि बादल यांनीं पराक्रमाची शर्थ केली. पण देवपाल नांवाच्या एका कुलांगाराशीं लढतांना राजा रत्नसेनाला मरण आलें. राणी नागमती आणि पद्मावती राजाच्या शवाबरोबर सती गेल्या. त्यानंतर प्रचंड सेनेसह अल्लाउद्दिनानें चितोड गाठलें आणि जिंकलें. पण त्याला पद्मावती पहायला मिळाली नाहीं. तिची राख होऊन गेली होती. अल्लाउद्दीन आला तसाच दिल्लीस परतला.

अशी आहे अद्‌भुत कथा या महाकाव्याची. हिंदी काव्यक्षेत्रांत जायसी हा प्रेमरसाचा एक लोकप्रिय गायक समजला जातो. भारतीय काव्य-पद्धतीचा संपूर्णपणें अंगिकार करून संस्कृत शैलीनें वीर, शृंगार, विप्रयोगादि रसांचा कौतुकास्पद परिपाक त्यानें या भारतीय लोककथेंत साधला आहे. ज्या काळीं इस्लामी आक्रमक जेत्यांच्या अभिनिवेशानें भारतांतील हिंदु मानबिंदूचा इतस्ततः उपमर्द करण्यास सैरावैरा धांवत होते, त्या महंमदी वर्चस्वाच्या काळांत महंमदजायसीसारख्या सूफी कवीनें भारतीय काव्यशास्त्राचा सखोल अभ्यास करून आदर करावा हें निःसंशय कौतुकास्पद वाटतें. केवळ प्रेम-शृंगार इत्यादि रसांचा आविष्कार करण्याची परिपक्व शैली म्हणूनच जायसी त्याकडे आकृष्ट झाला. इतकेंच नव्हे तर या कवीनें सूफी संप्रदायाच्या संकेतानुरूप धर्माधर्मांच्या मर्यादांपलीकडे जाऊन मौलिक तत्त्वांची एक-वाक्यता प्रकट करावयाचा प्रयत्न केला आहे. अर्थात् त्यांत त्याला जें कबीराच्या दोह्यांत अथवा रसरवांच्या भक्तिरसांत आढळतें तें निर्दोष यश लाभलें नाहीं. तत्त्वज्ञानांतील अनेक विचारसुमनें आपल्या काव्यमालांत ओवण्याचा प्रयत्न त्यानें केला असला तरी त्याच्या अंतःकरणांतील महंमदीय

निष्ठाहि वारंवार वर डोकावतेच आणि तितक्या प्रमाणांत त्याच्या महाकाव्याच्या हेतूविषयीं गौरव करण्याऐवजीं संदेह वाटूं लागतो.

कांहीं समालोचकांच्या मतें 'पद्मावत्' हें एक अन्योक्तिपूर्ण तत्त्वज्ञान-गर्भ काव्य आहे. रत्नसेन हा पुरुष आत्मा, पद्मिनी बुद्धि, नागमती म्हणजे प्रवृत्ति. बुद्धि आणि प्रवृत्ति या दोन भावनांतील संघर्ष जायसीनें पद्मिनी आणि नागमतीच्या सापत्नकलहांत अत्यंत प्रकृष्टपणें चितारला आहे. इथपावेतों ठीक आहे. पण कवीला हें रूपक उत्तम रीतीनें सजवितां न आल्यामुळें काव्यांत अनेक गोंधळ आढळतात. जायसी कवीला रसखानाची प्रतिभा तर नाहींच पण आपल्या वर्ण्य विषयाशीं तादात्म्य पावण्याची कलाहि साधली नव्हती. रसखान या अद्वितीय मुसलमान कवीचीं राधा-कृष्णाचीं शब्दचित्रें अवर्णनीय पावित्र्यानें रसरसलेलीं उतरलीं, कारण त्याच्या अंतःकरणांत मुरली-मोहन कृष्णाविषयीं अनन्य भक्तिभाव होता. जायसीनें पद्मिनीच्या सौंदर्याचीं कांहीं वर्णनें जमविण्याचा प्रयत्न केला पण त्यांत पावित्र्यविडंबन झालें आहे. केवळ एका कुरूप कवीची शरीरसौंदर्याविषयींची वैषयिकता उफाळून आली आहे.

या प्रदीर्घ महाकाव्यांत स्वतंत्र कल्पना-विलास कोठेंच आढळत नाहीं. काव्यशास्त्रांतील सर्व संकेतांच्या, परंपरागत उपमा, रूपकें आणि उत्प्रेक्षा यांच्या उसनवारीवरच कवीनें आपलें काम भागविलें आहे. भारतीय काव्य-शास्त्राच्या अस्मितेची ओळख करून घेतल्यावांचूनच केवळ जुन्या उदाहर-णांचा उपयोग केल्यामुळें या काव्यांत अनेक हास्यास्पद वर्णनें पाहायला मिळतील. पद्मिनीची कंबर कशी होती ? कवि सांगतो. " मानहु नाल खंड दुई भये। दुहु बिच लंक तार रह गये " ( मला वाटतें कमळाचे देठ दुभंगावे —म्हणजे त्यांत तंतु जसा तारेसारखा लोंबकळतो—तशीच पातळ नाजुक होती तिची कंबर. )

महाकाव्यच असल्यामुळें जीं वर्णनें असायला हवींत तीं भरपूर आहेत. ऋतु, मास, सूर्य, चंद्र, तारका, नक्षत्रें, सरोवरें आणि सप्तसमुद्र, महानगरी आणि राजैश्वर्य, सर्व प्रकारचीं वस्त्रें आणि अलंकार यांचीं वर्णनें या काव्यांत विखुरलेलीं आहेत. मौजेची गोष्ट म्हणजे राजप्रासादांतील भोज-भोज्य पक्वान्नांचीं वर्णनें मोठीं पाल्हाळिक आहेत.. अनेक प्रकारच्या मत्स्य-मांस

पक्वान्नांचीं वर्णनें मला वाटतें या काव्याशिवाय इतरत्र कोठें पहाण्याससुद्धां मिळणार नाहींत. या दरिद्री कवीला राजप्रासादांत कधीं भोजन करण्याचा प्रसंग आला असता तर त्यानें केलेल्या चुका टाळल्या असत्या. चकोर हा पक्षी केवळ काव्यसंकेतांत आहे हें कवीला माहीत नव्हतें म्हणूनच त्यानें चकोराच्या मांसाच्या पक्वान्नांचें वर्णन केलें आहे.

जायसी हा सूफी होता. सूफी तत्त्वज्ञानाचा भारतीय भक्तिसंप्रदाया-वर प्रथम प्रथम बराच परिणाम झाला असावा असें दिसतें. भारतीय काव्यांत पूर्वी न आढळणारी विशिष्ट भावुकता व भक्तिभाव सूफी कवींनीं खेळायला लावली असें एक मत आहे. काव्याचा हेतु भारतीय शास्त्रानुसार कोणत्या तरी महान् उद्देशाची सेवा व साधना समजला जातो. केवळ निरुद्देश्य आनंदाचें साधन म्हणून काव्याकडे आपल्या आचार्यांनीं पाहिलें नाहीं. अर्थात् भक्तिरसानें ओथंबलेलीं काव्याचीं अनेक उदाहरणें भारतीय काव्यांतून आढळतील. पण सूफी संप्रदायाच्या प्रभावानंतर भारतीय कल्पना आणि भावनांत बदल झाल्याचें स्पष्ट दिसतें. भावनात्मक गूढगुंजन हें सूफी कवींच्या रचनेंतून प्रथम प्रकट झालें. कबीरकाळापासूनच ही भावनाविशिष्ट भक्ति आपल्या काव्यांत पुष्ट होऊं लागली. प्रेम, वियोगांतील पीडा आणि अस्वस्थता–पूर्वी ज्या पद्धतीनें वर्णिली जात असे त्यापेक्षां अगदीं निराळ्या शैलीनें आणि भावनेनें प्रकट होऊं लागली, आणि ही सर्व सूफी संप्रदायाची देणगी होती. भारतीय कवींनीं भगवान आणि भक्त यांमधील नात्याच्या अनेक कल्पना केल्या आहेत, पण त्यांत पतिपत्नी अशी भावना कधींच प्रकट झाली नव्हती. आणि ही भावना सूफी प्रभावानेंच परिपुष्ट झाली.

सूफी दर्शनांत ब्रह्म आणि जीव यांच्या भारतीय कल्पनांचा बहुतांशानें स्वीकार करण्यांत आला आहे. जीव-ब्रह्माचें मीलन हेंच अत्यंत सुखदायी साध्य असल्यामुळें मृत्यु हा काम्य ठरला. भक्तिकाव्यांत ही अभारतीय कल्पना सूफी काव्याच्या प्रभावानें फोफावली. आपल्या शुद्ध भक्तींत भगवंताच्या सेवेपुढें मुक्तीसुद्धां तुच्छ समजण्यांत येत असे. म्हणून मरणापेक्षां जीवनांतच भगवंताची सेवा व भक्ति करण्याचा सुयोग प्राप्त होतो. पण सूफी कल्पनांतील प्रभाव मात्र आजपर्यंत आपल्या काव्यांत आढळतो.

परमात्मा हा पति अशी कल्पना कबीरानें प्रथम प्रचलित केली. अर्थात् पतिसंयोगांत सर्वसुख. जीवशिवाच्या मीलनाला पति-पत्नी संयोगाची उपमा देण्यांत आली आणि त्यांतूनच या नवभक्तिभावनेंत शृंगार आला. सूफी कवींनीं इष्क–मजाजीला इष्कहकीकीचा सोपान म्हटलें. संतांनीं प्रेमाला धर्मसाधनेचें माध्यम म्हटलें तर सूफी कवींनीं त्याला 'शुगल' म्हटलें.

"प्रेमकवि जायसी" यानें सूफी दर्शनाचा आविष्कार भारतीय कथांतून केला. त्यानें इराणी व अरबी कथांवर काव्यरचना केली नाहीं हें खरें पण तेवढ्यावरूनच त्याला कितपत भारतीय म्हणायचें हा विवाद्य विषय आहे. त्याच्या उपमा व वर्णनशैली ही भारतीय आहे–पण त्याच्या काव्याची रूपरेखा ही मसनवी आहे–महाकाव्याच्या संकेतानुसार नाहीं. 'पद्मावत्'मध्यें त्यानें इराणी आणि भारतीय काव्यपद्धतीचें मिश्रण केलें असलें तरी त्याच्या काव्याचा आत्मा शुद्ध सूफीच नव्हे तर इस्लामी आहे. अर्थात् इस्लामी तत्त्वांचा आविष्कार करतांना जायसीनें आपल्या काव्यसुमनांना प्रचाराची घाण लागूं दिली नाहीं. अल्लाउद्दिनाचें चित्र रेखाटून त्यानें एकाहि शब्दानें त्याची प्रशंसा केलेली नाहीं. इतकेंच नव्हे तर इतिहासांत हा यवन जसा छल दुःशासक दिसतो तसेंच त्याला त्यानें रंगविलें आहे. परंतु हें निःसंशय कीं, इस्लामी–सूफी–मतांचा प्रचार एक भारतीय प्रेमाचें आख्यानकाव्य लिहून जायसीनें केलें.

'पद्मावत्' काव्य प्रसारित झाल्यानंतर समाजांत जायसीला काफिर समजण्यांत आलें. आपण मुसलमानच आहोंत हें दाखविण्यासाठीं जायसीनें 'अखरावट' आणि 'आखिरी कलाम' लिहिलीं. व त्यांत कुराणांतील तत्त्वांचा भरपूर प्रचार केला. 'कयामत'–मुसलमानी 'प्रलय'कल्पना ग्रथित करून जीवनाची नश्वरता प्रतिपादिली आहे व म्हणून मानवाला साधनेचा मार्ग चोखाळायला सांगितला आहे.

जायसी म्हणतो, "आदि अंत जो एक मुहंमद कह दुसरा कहा ?" 'एक अकेला न दुसरा जानि" "मुहंमद एक मिग़ान है" 'पद्मावतां'त मात्र या एकाचा थांग लागत नसला तरी अखरावटमध्यें कवि सांगतो– 'अलिफ–एक अल्ला बड़ सोई".

'पद्मावतां 'त कैलास पर्वताचा उल्लेख आहे–पण तो शंकराचा नाहीं. तर हजरत मूसचा तूर पहाड होय. तेथें त्याला अलौकिक ज्योतिदर्शन झालें होतें.

अल्ला जेव्हां सृष्टीची रचना करायला बसला तेव्हां त्यानें केवळ चारच तत्त्वें निर्माण केलीं. आणि सजीव सृष्टीच्या प्रारंभीं त्या 'एकानें' 'पहले रचा मुहम्मद नाऊँ' एका हिंदी समीक्षाकानें तर असें स्पष्ट म्हटलें आहे, "अल्लाउद्दिनाची तलवार जें काम करूं शकली नाहीं तें आपल्या लेखणीनें साधण्यासाठींच जणुं जायसीनें हें प्रेमकाव्य लिहिलें असावें. अगदीं स्पष्टच सांगायचें म्हणजे काव्याच्या लक्षावेशांत इस्लामचा प्रचार करण्याचीच त्याची आकांक्षा होती."

हिंदी काव्य-दर्शनाचे लेखक श्री. हिरालाल भिवारी यांचें तर असें स्पष्ट मत आहे कीं, "कोणी सांगावें, रत्नसेनाचा मृत्यु अल्लाउद्दिनाच्या हातून न करवितां देवपालाच्या संघर्षांत घडवून आणण्यांत नायकाचें माहात्म्य वाढविण्यापेक्षांहि अल्लाउद्दिनाच्या संबंधीं सहानुभूति निर्माण करण्याचा तर नसेल ना ? अल्लाउद्दिनाला कवीनें मायेचें प्रतीक बनविलें आहे आणि नारदाला सैतान म्हणून ज्या अभद्र शब्दांचा आहेर केला आहे, त्यासारखें अल्लाउद्दीनाला एकाहि कटु शब्दानें न संबोधतां तो केवळ मायेचा अवतार होता असें म्हटलें आहे. कवीच्या अंतःकरणांत अल्लाउद्दिनाबद्दल इतकी सहानुभूति कां असावी ? "

जायसीच्या मतानुसार हा सारा संसार मिथ्या आहे, शाश्वत नाहीं. केवळ ब्रह्मच ( म्हणजे ज्योति–जी मुसाला पहाडावर दिसली ) तीच सत्य आहे.अर्थात् तिचें स्वरूप वर्णन करणें शक्य नाहीं. तरी पण त्या निर्गुण-निराकार ज्योतींतच निर्माण नवाशांच्या अवघ्या शक्ति सामावलेल्या आहेत. जीव आणि ब्रह्म मायेमुळें दोन दिसतात पण खरें म्हणजे एकरूप होण्यासाठीं सदैव आकुल असतात. या जीव व शिवाच्या मीलनाच्या आड येणाऱ्या तीन गोष्टी कवीनें सांगितल्या आहेत. एक–माया ('माया अल्लाउद्दीन सुलतान् ') गोरख-धंदा ( 'नागमती–यह गोरखधंदा ') आणि सैतान–म्हणजे आपल्या कथेंत 'राघवदूत साइं सैतान् ' तसेंच नारदालाहि त्यानें सैतान म्हटलें आहे.

एकंदरींत या कवीची निष्ठा इस्लाम धर्मांतच आहे. मग त्यानें मानवी कल्याणासाठीं प्रेषितांचा धर्म स्वीकारण्याचा उपदेश केला तर त्यांत काय

आश्चर्य ? जायसी म्हणतो– " कुराण एकतांच नारद ( सैतान ) पळून जातो," " जो नमाज पढतो तोच सर्वांत श्रेष्ठ गुणी होय. " कारण–" जितके कांहीं स्वर्गाला जाण्याचे मार्ग आहेत त्यांत मुहम्मद पंथ सर्वश्रेष्ठ व सुंदर बसेरा आहे ! "

पद्मावत् महाकाव्याच्या कथानकामागें अध्यात्मिक सूफी तत्त्वज्ञानाचा जांवईशोध करणाऱ्यांनीं या प्रेमकाव्याचा अर्थ खालीलप्रमाणें लावण्याचा प्रयत्न केला आहे. " गुरूच्या मार्गदर्शनानुरूप मन बुद्धीच्या शोधांत शरीर-प्रकृतीला विसरून हृदयाचा ठाव घेतें. अनेक दिव्यांनंतर बुद्धीचा प्रकाश फांकतो. तेव्हां सैतानाला मात्र ती आपल्या देशांतून निष्कासित करते. या वेळेस बुद्धि सैतानाच्या हातीं आपलें कंकण देते. तिच्या योगें माया बुद्धीकडे आकर्षित होते. माया प्रवृत्तींना उत्तेजित करून शरीरावर ताबा करते. पण बुद्धि शेवटीं मनाला मायेच्या पाशांतून मुक्त करते. मायेच्या कचाटयांतून सुटलेलें मन दुसऱ्याच एका शक्तीची शिकार बनतें. "

' पद्मावत् ' मध्यें मारूनमुटकून अशा अध्यात्मिक प्रवचनाचा सांगाडा जुळविण्याचा प्रयत्न या कवीनें केला आहे. पद्मावत् एक पहिलें वहिलें महा-काव्य म्हणून सर्वश्रुत आहे. पण त्याचें कथानक इतिहासाशीं विसंगत आहे. काव्यशास्त्राच्या दृष्टीनें मात्र अनेक दोषांचा संकर आढळतो. आणि हेतु शोधण्यास जावें तर त्यांत कोणतेंहि विशुद्ध तत्त्वज्ञान तर नाहींच, उलट कवीच्या हेतूविषयींच आशंका निर्माण होते. केवळ हिंदु कथा भारतीय काव्याच्या वेशभूषेंत सजविणाऱ्या या महंमदी कवीस भारतीय कथासागराची थोडीशी चांगली ओळख झालेली असती तर त्यानें अनेक खुळ्या कल्पना आपल्या पौराणिक संकेतांना धक्का देणाऱ्या पद्धतीनें मोडून तोडून उलटयाच सुलटचा सांगितल्या नसत्या. कांहीं मानतात त्याप्रमाणें जायसीनें हिंदु धर्म आणि संस्कार, काव्य आणि शास्त्रांचा सखोल अभ्यास केला होता. हें खरें असेल तर मात्र असेंच म्हणावें लागेल कीं त्यानें आपल्या एकेश्वरी धर्माचा छद्मी प्रचार करण्यासाठींच ही काव्यरचना केली असावी. याविषयीं कोणाला शंका वाटत असल्यास पद्मावत्‌चें हें अंतिम विधान " चितऊर भा इस्लाम " काय सुचवितें याचें उत्तर द्यावें.

******

* ३ *

# ॥ रामचरितमानस ॥

■ ■

## गोस्वामी तुळशीदास

हिंदी साहित्यांत सर्वांत अत्यंत मान्यता पावलेलें असें पहिल्या प्रतीचें महाकाव्य म्हणजे तुळशीदासांचें रामायण होय. जगांतील ज्या कांहीं थोड्या वाङ्मयकृति अत्यंत लोकप्रिय होऊन घरोघर पोहोंचल्या आहेत अशा भगवद्गीता, बायबल, कुराण यांच्याच तोडीची भारतीय भाषांतील एकादी वाङ्मयरचना सांगावयाची झाल्यास तुळशीदासांचें हें रामायण होय. डॉ. ग्रियरसनच्या मतें बायबलाचा प्रचार व प्रसार ख्रिस्ती जगांत जितक्या घरीं पोहोंचला त्यापेक्षां तुळशीचें रामायण अधिक प्रचारित झालें आहे. कांहींच्या मतें तर राम-चरित्राचा आदर्श उत्तर भारतांत जो इतका कळसाला पोहोंचला तो याच रामायण ग्रंथानें होय. इतकें महत्त्व या महाकाव्याचें आहे. तुळशीदासाचें रामायण हें केवळ एका भारतीय आदर्शाचें अद्वितीय चरित्रच म्हणूनच नव्हे तर काव्यशास्त्र दृष्ट्यासुद्धां अत्यंत उच्च प्रतीचें वाङ्मय निपजलें आहे. चरित्रनायकाच्या जीवनाप्रमाणेंच महाकवि तुळशी-दासांचें चरित्रसुद्धां अद्भुत् आहे.

संवत् १५५४मध्यें प्रयाग तीर्थाजवळ बांदा जिल्ह्यांतील राजापूर गांवीं या महान् संताचा जन्म झाला. अशी दंतकथा आहे कीं, पूर्ण बारा महिन्यांच्या गर्भवासानंतर जन्मास आलेल्या या अलौकिक पुरुषानें १२६ वर्षांच्या दीर्घायुष्यानंतर रामनाम म्हटलें. तुळशीच्या जन्मापासूनच अनेक अद्भुत दंतकथा प्रचलित झाल्या. जन्मतःच त्यानें ‘राम राम’ असा टाहो फोडला होता ; उपजतच त्याच्या तोंडांत संपूर्ण बत्तिशी आणि डोक्यावर भरगच्च जावळ होतें. जन्माच्या तिसऱ्या दिवशींच या अद्भुत बालकाची माता ‘हुलसी’ हिनें आपल्या चुनिया नांवाच्या दासीबरोबर त्या नवबालकास पितृगृहीं पोहोंचवून ती दिवंगत झाली.

त्या चुनिया दासीनें मोठ्या प्रेमानें तुळशीचें पालनपोषण केलें. परंतु ती सुद्धां त्या साडेपांच वर्षांच्या बालकास सोडून मरण पावली. तेव्हां तें अनाथ बालक दारोदार भटकूं लागलें. एका ब्राह्मण स्त्रीनें त्या बालकाचा भार उचलला. इतक्या बाल्यावस्थेंत रामनामाचा सदैव गजर करणाऱ्या तुळशीला सर्वांनीं ' रामबोल्या ' असें नांव दिलें. कोणीहि न सांगतां शिकवितां यज्ञोपवीत संस्कार झाला त्या वेळीं या बालकानें गायत्री मंत्र म्हणून सर्वांना विस्मयांत टाकलें. पुढें नरहर स्वामी नांवाच्या एका महापुरुषानें तुळशीस हाताशीं घेऊन वैष्णवदीक्षा दिली. त्यांच्याच घरीं तुळशीचें अध्ययन सुरू झालें. एके प्रसंगीं गुरुशिष्यांची ही जोडी सूकर क्षेत्रीं ( सोरो येथें ) गेली असतांना नरहर स्वामींनीं प्रथम रामबोल्याला रामायणकथा सांगितली. त्यानंतर तुळशीदास काशीस गेले आणि त्यांनीं पंधरा वर्षें वेदवेदांगांचें अध्ययन केलें. गुरूंच्या अनुज्ञेनें विद्वान् झालेले तुळशीदास आपल्या जन्मग्रामीं परतले. तेथें प्रतिदिनीं रामायण कथा सांगण्याचा त्यांनीं उपक्रम सुरू केला.

संवत् १५८३ त तुळशीदासानें एका ब्राह्मण युवतीशीं विवाह करून संसारप्रवेश केला. त्या रामभक्तास आपल्या स्वरूपसुंदर पत्नीचा अतिशय लळा लागला. एकदां ती माहेरीं गेली असतांना विरह असह्य होऊन तुळशीदास अधीरपणें तिच्या मागोमाग गेला. त्या भारतीय स्त्रीला आपल्या पतीची ही वैपयिकता पाहून लाज वाटली, आणि तिनें त्याची कठोर शब्दांत निर्भर्त्सना केली.

" माझ्या हाडामांसाच्या शरीरावर तुमची जितकी आसक्ती आहे, त्याच्या अर्ध्यानें जरी तुमच्या मनांत भगवंताची भक्ति स्फुरती तरी तुमची जीवननौका संसाराच्या मोहउदधींतून तीराला लागली असती. " या झण-झणीत अंजनानें तुळशीदासाचे डोळे उघडले. एकहि क्षण न थांबतां कांचन कामिनीमय संसाराकडे सदाची पाठ फिरवून त्यांनीं प्रयागकडे प्रयाण केलें. त्रिवेणी संगमावर गृहस्थी वेषभूशेचा त्यांनीं त्याग केला. आतां त्यांच्या अंत:करणांत एकच मनीषा उरली होती आणि ती म्हणजे भगवंताचें दर्शन. अत्यंत निर्मल अंत:करणानें व एकाग्र निष्ठेनें रामभक्ति करणाऱ्या तुळशी-दासाला दर्शन देण्यासाठीं एके दिवशीं चित्रकूटाच्या घाटावर प्रत्यक्ष रघुवीर उपस्थित होऊन, " बाबा, हमें चंदन दो । " अशी मागणी करूं लागले. त्या

वेळेस हा वेंधळा रामभक्त पूर्वी एकदां चुकला आणि दर्शनास मुकला, तशी फसगत परत होऊं नये म्हणून त्याला सावध करण्यासाठीं प्रत्यक्ष हनुमंतानें पोपटाच्या वाणीनें एक दोहा म्हणून दाखविला, तो आज रामभक्तांच्या सृष्टींत प्रसिद्ध आहे.

" चित्रकूटके घाटपर भयि संतनकी भीड़ तुलसी चंदन दिसे तिलक देत रघुवीर "–असें पोपटाच्या तोंडून ऐकून सावध झालेल्या तुळशीदासानें समोर उभ्या असलेल्या प्रभु रामचंद्राचें दर्शन घेतलें; आणि ते देहभान विसरले. रामचंद्रानें आपल्या भक्ताच्या भालावर चंदनतिलक लावला आणि ते अन्तर्धान पावले.

यापुढचें तुळशीदासाचें सारें जीवन राममय बनलें. तुळशीदास हे संस्कृतचे प्रकांड पंडित होते. एके दिवशीं त्यांना साक्षात्कार व आज्ञा झाली कीं, त्यांनीं लोकभाषेंत काव्य करावें म्हणजे तें सामवेदासारखें अमर ठरेल.

तुळशीदास अयोध्येस पोहोंचले. संवत् १६३१ मध्यें रामनवमीचा योग अगदीं तोच होता कीं जो त्रेतायुगीं रामजन्माच्या वेळीं होता. हा शुभ मुहूर्त लक्षांत घेऊन त्या दिवशींच ' रामचरित मानसा 'ला तुळशीदासांनीं प्रारंभ केला. दोन वर्षें, सात महिने आणि सव्वीस दिवसांत संवत् १६३३ मध्यें मार्गशीर्षाच्या शुक्ल पक्षांत रामविवाहाच्या तिथीलाच उत्तरभारताच्या साहित्यांतील सप्तसोपानी असें हें अभंग वाङ्मयमंदिर निर्माण झालें.

आपला समग्र ग्रंथ घेऊन तुळशीदास काशीस आले. तेथें भगवान् विश्वनाथ व जगन्माता अन्नपूर्णा यांच्या समोर त्यांनीं हें महाकाव्य वाचून दाखविण्यास आरंभ केला. त्या काळची परिस्थिति लक्षांत घेण्यास महाराष्ट्रांतील ज्ञानेश्वर, तुकारामाच्या प्राकृत रचनेचें स्मरण करावें लागेल. संस्कृत कथा-कीर्तनें सोडून तुळशीदासाच्या रामायण कथाश्रवणासाठीं जनतेचे पूर वाहूं लागले. ग्रंथाचें पारायण संपलें त्या दिवशीं तुळशीदासांनीं आपला ग्रंथ भगवंताच्या समोर ठेवून दिला. अशी आख्यायिका आहे कीं, दुसऱ्या दिवशीं सकाळीं ग्रंथपट उघडून पाहतात तों त्यावर " सत्यं, शिवं, सुंदरम् ' असा अभिप्राय भगवान् विश्वनाथाच्या सहीनें लिहिलेला आढळला.

रामचरित मानसाला ' सत्यं शिवं सुंदरम् ' असें प्रत्यक्ष भगवंतांनींच वाखाणलें, तेथें आपल्यासारख्यांनीं त्यावर टीका-प्रशंसा काय करायची ?

परंतु मानवी स्वभाव हा आज आहे तसाच तेव्हांहि होता. संस्कृताच्या माहेरघरीं एका प्राकृत ग्रंथाला भगवंतानें 'सत्यं शिवं सुंदरम्' म्हणावें हें वैदिक विद्वानांना न पटून ते तुळशीदासाचा हेवा करूं लागले. तो ग्रंथ नाहींसा करण्यासाठीं त्यांनीं कारस्थानें रचलीं. अशी दंतकथा आहे कीं, ग्रंथ चोरण्यासाठीं दोन गुंड या रामभक्ताच्या झोपडीजवळ गेले. तेव्हां त्यांना दोन धनुर्धारी झोपडीचें रक्षण करण्यासाठीं सज्ज उभे असलेले दिसले. अर्थात् त्यांना पाहून त्या गुंडांचा भ्रमनिरास झाला आणि ते रामभक्त बनून तुळशीदासाला शरण गेले. तुळशीदासाला ही गोष्ट कळली तेव्हां अत्यंत विषाद होऊन त्यानें आपणासाठीं देवाला इतके कष्ट होतात म्हणून सर्व चीजवस्तु गरिबांना देऊन टाकली. आपला ग्रंथ (एक प्रत) मित्र तोडरमल याकडे ठेवून दिला. परंतु ग्रंथाच्या प्रति होऊन त्याचा प्रसार झाला. आणि रामभक्ती-बरोबर तुळशीदासाची कीर्ति सर्व भारतांत पसरूं लागली.

विषण्ण व पराजित झालेल्या विद्वानांनीं श्री. मधुसूदन सरस्वतींना ग्रंथाची परीक्षा करण्यास विनविलें. श्री. मधुसूदन सरस्वती ग्रंथ पाहून इतके प्रसन्न झाले कीं त्यांनीं खालील श्लोकांत त्याची प्रशंसा केली.

"आनंदकानने ह्यस्मिन् जंगमस्तुलसी तरुः।
कवितामंजरी भाति रामभ्रमरभूषिता॥"

या सत्त्वपरीक्षेनें सुद्धां पंडितांचें समाधान झालें नाहीं. त्यांनीं आणखी एक कसोटी लावण्याचें ठरविलें. एके रात्रीं या पंडितांनीं वेद, शास्त्रें, पुराणें आणि त्यांच्या खालीं 'रामचरितमानस' रचून देवासमोर ठेवून दिलीं. दुसऱ्या दिवशीं सकाळीं पाहतात तों रामचरितमानस वेदांच्याहि वर असलेलें त्यांना दिसलें. त्यांचा संशय फिटला. सर्वांनीं तुळशीदासाची क्षमा मागितली आणि 'रामचरितमानस' डोक्यावर घेऊन त्याची त्यांनीं पूजा केली.

या सर्व दंतकथांतून एक सत्य प्रतीत होत असेल तर तें हें कीं, उत्तर भारतांत 'रामचरितमानस' या महाकाव्याची महत्ता वेदांपेक्षाहि थोर समजली जाते. 'सत्यं शिवं सुंदरम्' या अभिप्रायास पात्र असें हें महाकाव्य आहे.

रामचरित्र सर्वांनाच माहीत आहे. तुळशीदासाच्या रामायणाचें मूल्यमापन या लहानशा लेखांत करणें शक्य नाहीं. कांहींच्या मतें तें महा-काव्य सुद्धां नाहीं, एक भक्ति-भावपूर्ण प्रबंध आहे. असें एकादें प्रक्षिप्त मत

सोडल्यास सर्वानुमतें महाकाव्यास आवश्यक असे सर्व गुण या रामायणांत आहेत. या सात-सोपी महाकाव्यांत रामभक्ति हेंच जरी प्रधान सूत्र आणि रस असलें तरी इतर रसांचा परिपोष सुद्धां अत्यंत उत्कृष्टपणें साधलेला आहे. सर्व काव्य परिमार्जित अशा अवधी भाषेंत आहे. 'रामचरितमानस' हें गेय महाकाव्य आहे. उत्तर भारताच्या रामलीला उत्सवांतून 'रामचरित-मानस' गायिलें जातें, त्या वेळेस त्या मधुर गायनानें लक्षावधी ग्रामोग्रामीं सहस्रावधी जनता नऊ दिवस आनंदांत डुंबत, डोलत राहते. तुळशीदास हे केवळ रामभक्तीनें भारलेले भाबडे संत नव्हते. व्यवहार, राजकारण, समाज-नीति इत्यादि सर्व विषयांवर अत्यंत उपयुक्त आणि हितावह असा उपदेश या महाकाव्यांत त्यांनीं जागोजागीं केला आहे. कांहीं समीक्षकांच्या मतें तर हिंदुधर्मावर आलेल्या त्या अस्मानी सुलतानीच्या काळांत हिंदु समाजास आपल्या धर्माशीं एकनिष्ठ आणि अव्यभिचारी राहण्यास जर कोण्या एका ग्रंथानें समर्थ केलें असेल तर तें तुळशीदासांच्या रामायणानेंच होय. या महा-काव्याचा एक विशेष असा कीं, रामाशीं ज्या ज्या व्यक्तींचा संबंध आला त्या त्या सर्वांना उंचावण्याचा तुळशीदासांनीं अति कुशल प्रयत्न केला आहे.

अशा या तीन शतकें उत्तरोत्तर अधिकाधिक लोकप्रिय झालेल्या महाकाव्याचा परिचय मराठी वाचकांनीं मुळांतील कांहीं दोहे, चोपाया आणि श्लोक वाचूनच करून घ्यायला हवा. आपल्या इकडील ज्ञानेश्वर, तुकाराम आणि रामदास यांच्या काव्यांतील अनेक वचनें जशीं आज सुभाषितें म्हणून भाषेंत आणि लोकव्यवहारांत उतरलीं आहेत, तशींच उत्तर भारतांत या रामायणांतून अवतरलीं आहेत. कोणताहि कठीण प्रसंग, कर्तव्या-कर्तव्याची समस्या वा हिता-हिताची चर्चा सुरू होऊन प्रश्न उभा राहिला कीं, त्याचें समर्पक उत्तर व उपाय तुळशीदासांच्या या महाकाव्यांतून एकाद्या वचनानें सांगितले जातात. अशीं किती तरी सुभाषितें उत्तर भारतांतील निरक्षर जनतेच्या तोंडीं बसलेलीं आहेत. खरें म्हणायचें म्हणजे तुळशीदासांचें रामायण हें उत्तर भारतीय अज्ञ अशिक्षित जनतेची शहाणपणाची अक्षय्य बँकच आहे. अशा थोर महाकाव्याची गोडी मुळांत तें वाचण्यांतच आहे, शब्दांनीं मी ती किती व कशी वर्णन करूं?

* ४ *

# ॥ प्रिय प्रवास ॥

■ ■

## हरिऔध

या शतकांतलीं पहिलीं दोन महाकाव्यें ' प्रिय प्रवास ' आणि ' वैदेहि वनवास ' हीं एका ऋषितुल्य कवीच्या कृती आहेत. 'हरिऔध' म्हणून विख्यात झालेल्या हरिसिंह उपाध्याय यांचा जन्म संवत् १९२२ मध्यें काशी-जवळ आजमगड जिल्ह्यांत झाला. हें शुक्ल यजुर्वेदी घराणें बऱ्याच वर्षांपूर्वी शिखपंथी झालें होतें.

हरिसिंहांचें शिक्षण काशीच्या महाविद्यालयांत प्रवेश करण्याइतकेंच झालें. उपाधि मिळविण्यापूर्वींच त्यांना शिक्षण आवरावें लागलें. घरच्याघरीं मात्र त्यांनीं फारशी, संस्कृत व इंग्रजीचा विशेष अभ्यास केला. आणि त्यांना काव्याची गोडी लागली. निजामाबाद या आपल्या जन्मग्रामीं त्यांनीं एका शाळेंत शिक्षकाचा पेशा पतकरला. कांहीं वर्षांनीं ते ' कानुगो ' म्हणजे कुलकर्णी बनले. त्या नोकरींतून निवृत्त झाल्यानंतर काशी येथील हिंदु विश्व-विद्यालयांत त्यांनीं अध्यापन-कार्य केलें. हरिऔध यांनीं आपलें प्रदीर्घ जीवन अत्यंत शुद्ध आचरणांत व धर्म, संस्कृति व साहित्याचें अध्ययन व अध्यापन करण्यांतच घालविलें. कृष्ण चरित्रांतील एका घटनेवर म्हणजे कृष्णाचें मथुरा सोडून द्वारकागमन या विषयावर ' प्रिय प्रवास ' आणि रामाच्या उत्तर-चरित्रांतील 'सीता-त्यागावर' ' वैदेहि-वनवास ' अशीं दोन अमौलिक काव्यें लिहून त्यांनीं हिंदी साहित्यांतील उणीव भरून काढली. एवढेंच नाहीं तर खडी बोलीचें महाद्वार आगामी कवींसाठीं खुलें केलें.

' प्रिय-प्रवास ' या काव्याचा कथाविषय श्रीकृष्णाची मथुरायात्रा आहे. खरें म्हणजे कवीनें योजलेलें ' व्रजांगना-विलाप ' हेंच नांव ठेवलें असतें तर तें अधिक अन्वर्थक आणि विषय-बोधक झालें असतें. श्रीकृष्णचरित्रावर

काव्य, मग त्यांत राधेसह गोपी आल्याच पाहिजेत. कृष्ण आणि गोपी म्हणजे शृंगाररसाचा पूर असा संकेत काव्यांत रूढ आहे. पण 'प्रिय-प्रवासां'त कृष्णाच्या मथुराप्रयाणामुळें व्रजांगनांच्या विलापांत कारुण्यरसालाच प्राधान्य आलें आहे. तत्कालीन परिस्थितीनें व्रजवासी गोपगोपींच्या आवडत्या मेघश्यामाला मथुरेला जावें लागलें. तीन कोसांवर गेलेल्या कृष्णाचा विरह व्रजजनांना असह्य होऊन त्याला परत आणण्यासाठीं उद्धवाला धाडण्यांत आलें. पण भगवान परतले नाहींत, उलट त्यांना फार दूर, द्वारकेला, जाणें भाग पडलें. गोकुळांतील अंगनांच्या साऱ्या आशा समाप्त झाल्या. गोपींचे मनोरथ आणि सुखस्वप्नें भंग पावलीं. लक्षलक्ष व्रजजन जे मेघश्यामाच्या वाटेकडे डोळे लावून बसले होते ते अश्रु ढाळूं लागले. गृह, पंथ, वन, कुंज जेथें कोठें दृष्टि टाकावी तेथें एकच दृश्य दिसे. प्रत्येकाच्या हृदयांत वेदना व डोळ्यांत अश्रु.

शोकप्रलयांत बुडालेल्या गोकुळांत अति-सरळ स्वभावाची एक सुंदर बाला मात्र निशि-दिन, घरींदारीं, वनोपवनीं, सतत फिरत होती. कोण्या मूर्च्छितेला ती सहृदयतेनें आपल्या मांडीवर घेऊन वारा घालून सावध करी; तर दुसऱ्या कोणा विरह-तप्त बालिकेला कुवलयदलाच्या शय्येवर झोपवून शीतल घड्या ठेवीत असे; कोणी उन्मना तर कोणी बावळी झालेली; कोणी जमिनीवर लोळण घेत होती. तर कोणी रोमांचकारी 'आह' फोडीत होती. त्या सर्वांच्या अंतःकरणांतील व्यथा ती गोपी-सुंदरी आपल्या मृदु वचनांनीं दूर करीत असे. पण स्वतः मात्र आकाशांतील तारे मोजीत अश्रु ढाळण्यांत ती रात्रींच्या रात्री घालवीत असे. नंदांगनांचें सांत्वन करीत, गोपालांना आपले उद्योग यथापूर्व करण्यास प्रवृत्त करीत, गोपबालांना खेळणीं देऊन रिझवीत, वीणा-वेणूवर सर्वांचीं प्रिय गाणीं वाजवून आनंद देत, त्या सुंदर युवतीनें व्रजदेशाला स्थिर केलें. वृद्ध व व्याधिपीडितांना तिनें स्वस्थ केलें; कलह-दुर्गुणांचा तिनें नायनाट केला, सर्वांच्या हृदयांत प्रेमाची पेरणी केली. चिंता घालवून शांति प्रस्थापित केली. केवळ व्रजमानवच नाहीं तर त्या वनोपवनांतील किडा-मुंगी पशु-पक्षीसुद्धां सुखसंपन्न झाले. एकदां उद्विग्न यशोदेनें "माझा जीवनाधार श्याम गोकुळांत परत येईल का?" म्हणून तिला विचारलें, तेव्हां तिनें म्हटलें, "हो येईल. व्यथित व्रजभूमीला श्याम कधीं विसरेल का?" असें उत्तर तर तिनें दिलें. पण तिच्या डोळ्यांतून जलधारा

वाहूं लागल्या. तेव्हां यशोदा म्हणाली " राधे, तूं रडतेस कशाला? बेटा, खिन्न नको होऊं."

" आई, मी दुःखानें रडत नाहीं; हे माझे अश्रू आनंदाचे आहेत. आई, तुमच्या सेवेंत माझें शरीर पुलकित होतें आणि डोळ्यांतून अश्रु वाहतात. ' त्या राधेनें गोकुळांत गोपाळाविषयीं इतकें प्रेम निर्माण केलें कीं, जळीं, स्थळीं, घरांत, देव्हाऱ्यांत, वाचेंत आणि व्यवहारांत कृष्ण-कृष्ण नाचूं लागला. आणि ती राधा या कृष्णाची जणुं छाया बनून गेली. व्रजभूमींतील उत्कंठ जीवांना मेघश्यामाचा विसर पडेना. त्याच्या लीलेचा मायामोह आवरेना. व्रजप्रियाच्या प्रवासानें गोकुळांत जें विरह-दुःख पसरलें तें आजपर्यंत युगानुयुग चालत आलें आहे. भगवंतासारखा, कृष्णासारखा, मानवकुलाचा सच्चा स्नेही आणि राधेसारखी सदयहृदया प्रेमिका या भरतभूमींत परत एकदां येवोत आणि मग अवघ्या राष्ट्राला व्याकुल करणारी विरह-घटना परत केव्हांहि न घडो."

हिंदी साहित्याच्या अनेक बोली आहेत. विसाव्या शतकापर्यंत लिहिलीं गलेलीं सर्व काव्यें हीं अवधी, व्रज, मैथिली, राजस्थानी इत्यादि भिन्न बोली भाषेंत लिहिलीं गेलीं. खडी बोली (सध्यांची साधारण हिंदी) इतर प्रादेशिक बोलींना मागें टाकून अखिल भारतीय मान्यता मिळवून राहिली होती. पण या बोलींत साहित्यरचना फारच कमी होती व काव्यरचना तर जवळ जवळ नव्हतीच. मैथिलीशरण गुप्त यांनीं आपलें ' जयद्रथ वध ' लिहिलें पण तेंहि खंडकाव्य होतें.

दुसरी गोष्ट म्हणजे संस्कृतखेरीज इतर भाषांतील साहित्यांत जें सर्वत्र आढळतें त्याला. हिंदींत तरी अपवाद कसा असणार! काव्य म्हटलें म्हणजे तें वृत्त, छंद, यमक अनुप्रासयुक्तच असलें पाहिजे असा अबाधित संकेत होता. या वृत्तानुप्रासांना अलंकाराच्या ऐवजीं शृंखला समजून ज्या भाषेंतील शब्दसृष्टींतील परमेश्वरांनीं त्यांना दूर झुगारून स्वच्छंदानें अथवा मुक्तछंदानें काव्यगान केलें त्या त्या भाषेंतील काव्योद्यानांना बहर आले. विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकांतच ' हरिऔध' यांना आपल्या हिंदी भाषेंत महाकाव्य लिहिलें जावें आणि तें मुक्तछंद अथवा तुकबंदी-'रट' युक्त श्रुतिमनोहर अनुप्रासांच्या कृत्रिम नादसंगीतांत जखडलेलें नसावें अशी हुरहूर लागली आणि त्यांतून या दोन महाकाव्यांची निर्मिती झाली.

या दोन्ही महाकाव्यांत करुणरसाचें प्राधान्य आहे. 'एको रसः करुण एव।' हें भवभूतीचें वचन प्रमाण मानून हरिऔध म्हणतात "शृंगारादि रस म्हणजे करुणरसाचींच निमित्तभेदानें दिसणारीं भिन्न रूपें होत. अर्थात् हें मत सर्वमान्य नाहीं. नवरसांमध्यें वीर आणि शृंगाररसालाच प्रधान समजतात. शृंगाराला तर रसराज म्हटलें आहे. तरी पण हेंहि निर्विवाद आहे कीं, कारुण्याची पकड कांहीं और असते. हरिऔधांना करुणरसाची ओढ लागण्याचें दुसरेंहि एक प्रमुख कारण आहे. आदिकवि वाल्मिकींची काव्यप्रतिभा जागृत झाली तीसुद्धां क्रौंचवधाच्या करुण दृश्यानेंच.

हरिऔधांनीं एक गमतीचें सादृश्य दाखविलें आहे. संस्कृतप्रमाणें फारशी-मध्यें सुद्धां असा समज आहे कीं, पहिला वहिला शेर गाईला गेला तो आदमच्या मुखानें. आदम हा परमेश्वराचा आवडता आदमी. आदमला दोन मुलें होतीं. एकानें दुसऱ्याची हत्या केली. हें पाहतांच बाबा आदमचें हृदय शोकानें भरलें आणि त्यांच्या मुखानें करुणोद्गार बाहेर पडले. संस्कृत, फारसी, इसाई इत्यादि काव्यप्रेरणांचा पहिला स्रोत कारुण्यरसांतूनच वाहिला हें यावरून उघड नाहीं का ?" करुणरसाची विशेषता आणि मर्मस्पर्शिता यांनीं माझें अंतःकरण सदैव आकृष्ट केलें. आणि त्यांतच 'प्रिय प्रवास'च्या व 'वैदेहि वनवास' च्या प्रेरणांचें रहस्य आहे." असें हरिऔधांचें म्हणणें आहे.

हरिऔधांनीं काव्याचे कांहीं परंपरागत संकेत-निर्बंध झुगारून नवीन साचे निर्माण केले. तसेंच विषय, कथानक, आणि त्यांतील व्यक्ति यांचेकडे पाहण्याचे दृष्टिकोनसुद्धां बदलले. ते म्हणतात, "आपला एक संस्कार आहे. ज्यांना आपण अवतार मानतों त्यांच्या चरित्रांत पदोपदीं अध्यात्मिक तत्त्व, ब्रह्मत्व, शोधण्याचा आपण प्रयत्न करतों. पण अशांच्यासाठीं ही काव्यरचना नाहीं. श्रीकृष्णाला एका महापुरुषाच्या स्वरूपांत मी अंकित केलें आहें; ब्रह्म-स्वरूपांत नाहीं. गीतेच्या मतानुसार महापुरुष हे अवतार समजले जाणें साहजिक आहे पण श्रीकृष्णाचें चरित्र आठवून आपण ठरविलें पाहिजे कीं, खरोखर ते कोण होते. एकीकडे ते ब्रह्मस्वरूप आहेत असें म्हणत जायचें आणि दुसरीकडे साधारण माणसालासुद्धां घृणा वाटावी अशा कर्मांचा त्याला 'कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुं समर्थः प्रभुः' असें कर्तेपण देणें हें कितपत सुसंगत आहे ? कदाचित् माझें हें म्हणणें उचित वाटणार नाहीं. परंतु याच विचारानें मी कृष्णचरित्र रंगविलें

आहे कीं जे आधुनिक लोकांना सुद्धां सम्मत व्हावें " या विचारानें हरिऔधांनीं आपलें महाकाव्य विसाव्या शतकांतील हिंदु जनमनाला सुसंगत वाटण्यासारखें बनविण्याचा प्रयत्न केला आहे. कृष्णाच्या अलौकिक कार्यांना तर्कसंगत दाखविण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. गोवर्धन पर्वताचें धारण ही एक उपमा म्हणून त्यांनीं सजविली. पौराणिक आणि काव्यपरंपरागत कृष्णलीला एकीकडे सारून हरिऔधांनीं वृष्णीकुलांतील या महान् लोकनायकाच्या उपेक्षित लोकाराधनेकडे अधिक लक्ष देऊन कृष्णकाव्याला एकदम नवीन दिशा दिली आहे. सच्चिदानंद स्वरूपी परमात्मा प्रियप्रवासांत बाराव्या सर्गांत 'महात्मा' बनतो आणि तेराव्यांत 'अपूर्व आदर्श नर' होतो. एक आलोचक लिहितात . सतराव्या सर्गांत कृष्ण एक डॉक्टर, राधा तत्पर नर्स आणि गोपी सेवासमितीच्या सदस्या बनतात. अलौकिक पुरुषांच्या लोकनायक लोकप्रिय स्वरूपाविषयीं आम्हांला कांहीं वाईट म्हणायचें नाहीं; परंतु नाविन्याला सुद्धां कांहीं मर्यादा हव्यात. इतिहास आणि पुराणपरंपरेशीं अगदींच अविसंगत असें कथन कवीनें अभिनवतेच्या भरीला पडून करूं नये. हरिऔध यांनीं कृष्णाला अगदीं आधुनिक कल्पनांप्रमाणें जननायक चितारलें आहे. व्रजजनांच्या सेवेंत कृष्ण सदैव मग्न दाखविला आहे. इतका कीं, "कृष्णाचें शरीर आणि प्रावरण अगदीं ओलेंचिंब झालें, डोक्यावर पर्जन्याची वृष्टि होवो, अथवा समीर असह्य उग्रता धारण करो; परंतु त्या व्रज-सिंधुला विराम असा माहीतच नव्हता. " याच असीम सेवातत्पर वृत्तीमुळें व्रजवासियांनीं त्याला गिरिधर म्हणून संबोधिलें. कृष्णानें लोकसेवाव्रतासाठीं आपल्या प्रेमावर पाणी कसें सोडलें याचें वर्णन कवीनें केलें आहे. उद्धवाला निरोप देतांना कृष्ण सांगतात, "प्राणाधार राधे, निर्मात्यानें तुला माझ्यापासून अलग कां बनविलें हें कळत नाहीं. आतां प्रियमीलनाची आशा दूर होते आहे. विधिबंधनें कळत नाहींत. संयोगसूत्रें विफल होत आहेत खरीं. . . पण त्यांत कांहीं तरी श्रेयाचें बीज निश्चित दडलेलें असलेंच पाहिजे. हे प्रियकांते, मधुर सुखभोगाची लालसा खरोखर अजून प्रिय आहे. . . परंतु जगहिताची लिप्सा त्याहून मनोज्ञ आहे. . . . . मोक्षासाठीं जो तप करतो तो आत्मार्थी, त्याला आत्मत्यागी कसें म्हणायचें ? पण ज्याला जगाचें हित आणि लोकसेवा प्राणांपलीकडे प्रिय वाटतात तोच खरा आत्मत्यागी. दुःखितांचें दुःखहरण करणें,

सदा सात्त्विक कार्यांत मग्न असणें, स्वार्थरत संसारांत सर्वभूतोपकारी बनणें. . हें जो साधतो, त्याचेंच या भूलोकावर अवतरण सफल झालें असें समजावें."

उद्धवानें कृष्णाचा हा संदेश सांगतांच राधा त्याला म्हणते, "मी तर एक नार, माझें ऊर तरल, प्रेमाला आंचवलेली, मी जर विकल, व्यस्त, विमनस्क झालें तर त्यांत विचित्र असें काय आहे? माझा प्राणप्रिय कृष्ण शांतधी आहे हें खरें, पण त्याच्या संदेशांत सुद्धां हृदयाची वेदना व्यंजित दिसते, नाहीं का? चंद्रास्त होतांच रजनी काळी पडते, वसंतान्तीं वनश्री शोभाहीन बनते. आज व्रजभूमि अशीच कांतिहीन,श्रीहीन झाली आहे. वाऱ्यानें पाण्यावर लहरी उठतात त्याप्रमाणें माझें चित्त चलित झालें तर त्यांत अस्वाभाविक असें काय आहे? परंतु ज्ञानी पुरुष मोहवश होत नाहींत. मलाहि मनाला आवरलें पाहिजे. पण काय करावें? परमप्रिय कृष्णाच्या उपदेशाचें मर्म समजत असून, त्याची इच्छा जाणूनहि, अत्यंत संयतचित्तानें प्रतिदिन प्रयत्न करूनहि विरहाग्नि माझ्या मनाला त्रास देतो. आकाशांत पक्षी उडतांना पाहून वाटतें... आपणाला जर पंख असते तर आपण त्या श्यामाच्याजवळ उडून नसतों का गेलों? . . . मी निर्लिप्त आहें, संयत आहें . . . पण श्यामाची आठवण आली कीं, व्यथित होतें . . . . खरें सांगायचें म्हणजे प्रियमीलनाची जितकी लालसा आहे तितकी कांहीं जगद्हिताची इच्छा नाहीं." "आजभी है न होती."

राधा-कृष्णाचें प्रेम भारतीय काव्यसंकेतांत एक अकल्पनीय, अज्ञेय, कदाचित् अनुभवनीय अशी एक भावना, कल्पना आहे. राधा ही प्रकृति व कृष्ण हा पुरुष अशी कल्पना तर सर्व साधारण सर्वमान्य आहे. पुरुष आणि प्रकृति यांमधील अभेद्य असें नातें कृष्णराधा प्रेमांत आरोपिलें जातें. पण हरिऔधांनीं मात्र कृष्णाला जसा समाजसेवक बनविला तसेंच राधिकेला त्यांनीं मानवी, शरीराची सुंदर बालिका बनवून कृष्णावर प्रेम करायला लाविलें. हाडां-मांसाची ही पुतळी साऱ्या व्रजभूमीचें कौतुक बनली. यौवनाच्या दारांत पदार्पण करतांच नकळतच तिनें आपलें हृदय घनश्यामाच्या पायांवर अर्पण केलें. परंतु विधिवत् स्वयंवरण आणि मीलन ही अतृप्त कामनाच राहून गेली. कारण जगत्-हितासाठीं, जाति आणि गोकुलाची पीडा निवारण्यासाठीं, सर्व-लोकोपकारी कार्यासाठीं कृष्णाला गोकुळाचा त्याग करून जावें लागलें तेव्हां राधा रडत कुढत बसली नाहीं. श्याम-विरहाची व्यथा मधूनमधून तिला

उद्विग्न करी पण ती आपल्या प्रियकृष्णाचा संदेश स्मरण करी. ' विश्वाच्या कामीं पडावें, जगाचे हितैषी व्हावें ' अशी त्याची आज्ञा आठवून लोकसेवा-तत्पर बने. राधेनें आपलें प्रेम विश्वसेवेस अर्पण केलें व त्यांतच आपल्या कौमारव्रतास पूर्णता आणण्याचा प्रयत्न केला.

' प्रिय प्रवास ' या काव्याचें प्रधान पात्र कृष्ण असून कृष्णाचें प्रत्यक्ष दर्शन फारच क्वचित् होतें. त्याच्या चरित्र-लीलांच्या निवेदनानें अपरोक्ष आभास उत्पन्न होतो. काव्यांत यशोदा, उद्धव, गोप, गोपी वगैरे आहेत पण काव्याला सूत्रवद्ध असें कथानकच नाहीं.

काव्याच्या शेवटीं कवीनें संकेत-कल्पना राधेला उत्कृष्ट नारी स्वरूपांत उभें केलें आहे. राधा ही सुजनाची पाठीराखी छाया, दुर्जनांची शासिका, कंगालाचा निधी, पीडितांची औषधी, दीन-दुर्बलांची साथी आणि आश्रय इतकेंच नव्हे तर व्रजभूमीची आराध्य देवता आणि अखिल विश्वाची प्रेमिका विश्वप्रेमानुरक्ता बनली होती.

हरिऔधांनीं 'प्रिय प्रवासा'च्याच पद्धतीनें नंतर ' वैदेहि वनवास ' हें दुसरें महाकाव्य लिहिलें. पहिल्यांत सतरा तर दुसऱ्यांत अठरा सर्ग आहेत. ' प्रिय-प्रवासा'प्रमाणेंच ' वैदेहि वनवासा'चा स्थायी-भाव करुणा आहे. भवभूतीच्या उत्तरामचरिताचें कथानक घेऊन आधुनिक अभिनवतेच्या भरीस पडून त्या काव्यांतहि कांहीं काल-विसंगत कल्पना कवीनें घुसडून दिल्या आहेत.

दोन्ही काव्यांची भाषा संस्कृतमय, अत्यंत परिमार्जित अशी आहे. समाज-प्रधान भाषा पाहून कांहीं आलोचकांनीं कवीनें संस्कृतमध्येंच काव्य कां लिहिलें नाहीं अशी चेष्टा केली. भाषा जशी संस्कृत तशीं वृत्तेंहि कवीनें सारीं संस्कृतच योजिलीं आहेत. निर्यमक काव्यरचना संस्कृतमध्यें पुष्कळच आहे आणि ती अत्यंत रमणीय आहे. दोन्ही काव्यांची वर्णनशैली प्रशंसनीय आहे. दोन्ही काव्यांतील प्रकृतिवर्णनें चित्रासारखीं आकर्षक आहेत. ऋतुमानाचीं बदलतीं चित्रें, आकाशांतील तरल अथवा सघन मेघ, वायूच्या मंद वा वेगवान लहरी, वृक्षलतांचें वैधव्य आणि सौभाग्य इ. इ. प्राकृतिक दृश्यें नादमधुर शब्दांनीं आपल्या राधाकृष्ण, रामसीता या पात्रांच्या पार्श्वभूमीसाठीं रेखाटलीं आहेत. कांहींच्या मतें तीं रसाचें आलंबन आहेत तर दुसऱ्या मतें कांहींच्या उद्दीपन. वहुतेक प्रत्येक सर्गाचा प्रारंभ निसर्गवर्णनानेंच होतो. असा एकादाच सर्ग

असेल कीं ज्यांत निसर्गाचें चित्र वातावरणावर प्रकाश टाकीत नाहीं. महाकाव्यांच्या संकेतांचें पालन करण्यांत वास्तविकता विसरल्यावर काय होतें याचें हास्यास्पद दृश्य दाखवावयाचें झाल्यास दोन ओळी पहा.

'जंबू अंब कंदम्ब निम्ब फलसा जम्बीर और आंवला
लीची दाडिम नारिकेल इमली औ शिशिया इंगुदी ।।

हीं सर्व वृक्षनामें कवीनें दिलीं पण हे सर्व वृक्ष एकाच उपवनांत कधीं कोणाला पाहण्यास मिळतात का? असे कांहीं क्षुल्लक दोष सोडल्यास हरिऔधांचीं निसर्गवर्णनें रमणीय आहेत. विशेषतः कारुण्यरसाला भरती आणणारीं त्यांचीं गोरज आणि रात्रीच्या कालाचीं शब्दचित्रें हृदयस्पर्शी बनलेलीं आहेत.

काव्याचा रचनाकाल, विशेषतः हिंदी साहित्यांतील या शतकाचें पहिलें-वहिलें महाकाव्य आणि तेंहि काव्यरचनेला अयोग्य समजल्या गेलेल्या खडी बोलींत रचलें गेलें या गोष्टीचा विचार करतां 'प्रिय प्रवास' हें लोकप्रिय ठरलें यांतच त्याच्या गुणांचें रहस्य आहे. 'प्रिय प्रवास' आणि 'वैदेहि वनवास' हीं दोन्ही महाकाव्यें समजलीं जातात. महाकाव्याचे सारे संकेत त्यांत सांभाळले गेले आहेत पण तेवढ्यानेंच त्यांना महाकाव्य म्हणायचें का? प्रत्यक्ष कवी म्हणतो कीं," 'प्रिय प्रवासा'च्या रचनेनें खडी बोलींतील महाकाव्याची न्यूनता भरत आली. मी अत्यंत विनयानें सांगतों कीं, सतरा सर्गांच्या महाकाव्याचा आभास-रूप हा ग्रंथ केवळ या उद्देशानें मी लिहिला कीं याला पाहून हिंदी साहित्यांतील लब्धप्रतिष्ठित कवींचें आणि लेखकांचें लक्ष या न्यूनतेकडे आकर्षित होईल व खडी बोलींत एक सर्वांगसुंदर महाकाव्य निर्माण होईल."

महाकवि हरिऔध हे अत्यंत सुचरित विनम्र वृत्तीचे पुरुष होते. विनयानें त्यांनीं आपल्या कवितेविषयीं कांहींहि म्हटलें असलें, आणि कांहीं अंध टीकाकारांना 'प्रिय प्रवासां'त व 'वैदेहि वनवासां'त या महाकवीनें सूचित केलेल संदेश महाकाव्याला योग्य वाटत नसला तरी एक सत्य मात्र मान्यच करावें लागेल कीं, या महाकाव्याच्या रचनेनेंच एक दोन अधिक प्रतिभावान् कवींच्या हृदयांत कळत नकळत प्रेरणा उत्पन्न झाली; आणि एकानें तर केवळ भारतीयच नव्हे तर विश्वसाहित्यांत अमृतोपम असें एक महाकाव्य गाइलें.' प्रिय प्रवास' आणि 'वैदेहि वनवास' हीं दोन्ही महाकाव्यें आजसुद्धां हिंदी जगतांत वाचलीं जातात, इतकेंच नव्हे तर प्रशंसिलीं जातात.

******

* ५ *

# ॥ साकेत ॥

■ ■

## मैथिलीशरण गुप्त

विश्वसाहित्यांत मानव समाजासाठीं सर्वोत्कृष्ट जीवनाचे आदर्श समोर ठेवणारें असें एक कोणतें महाकाव्य असेल तर तें वाल्मीकि रामायण होय. भारतीय महाकाव्याचा प्रारंभच मुळीं आद्यकवींच्या या रामायणापासून झाला. किंबहुना "मच्छन्दादेव प्रवृत्तेयं सरस्वती" हें वाल्मीकीचें वचनच सत्य आहे. कारण भारतीय सारस्वताचा उगम सुद्धां रामायणांतच आढळतो.

काव्यदृष्टीनें रामायण सर्वांगपरिपूर्ण आहे, परंतु त्याहिपेक्षां रामचरित्राच्या रूपानें आदर्श माणसांचें व समाजाचें जें चित्र या काव्यांत पाहायला मिळतें त्याचें आकर्षण आणि प्रभाव भारतीय मनावर सहस्रावधि वर्षें लोटलीं तरी अद्ययावत् आश्चर्यजनक कायम राहिला आहे; इतकेंच नव्हे, तर दिवसानुदिवस वृद्धिंगत होत आहे. रामायणानंतर अनेक महाकाव्यें रचलीं गेलीं पण रामायणांतील गोडी आणि ओढी त्या एकांतहि नाहीं. श्रीकृष्ण, गौतम बुद्ध, येसु ख्रिस्त, महंमद पैगंबर इत्यादि धर्मप्रवर्तक, भीष्म, अर्जुन, महारथी कर्ण, सम्राट चंद्रगुप्त आणि अशोक, जगज्जेता अलेक्झांडर व विश्वविजिगिषु नेपोलियन, हिटलरसारखा सेनापति इत्यादि इत्यादि महाकाव्यांचे विषय झालेले अथवा तद्योग्य महापुरुष ह्यांचीं जीवनचरित्रें कांहीं अंशीं कांहीं बाबतींत रामापेक्षां कमी अद्भुत अथवा अलौकिक आहेत असें नाहीं. परंतु रामचरित्राबरोबर त्यांची तुलना करूं लागतांच तीं अपूर्ण अथवा सदोष दिसतात. रामपंचायतनांतील व परिवारांतील व्यक्ति ह्यांचीं चरित्रें कोणत्याहि कसोटीवर घासून पाहिलीं तर तीं बावनकशी सोन्याइतकीं मानवी मनाला भुरळ घालतात. वैयक्तिक, पारिवारिक आणि सामाजिक व्यवहार, मित्र आणि शत्रु, दास आणि स्वामी, स्वकीय आणि परराष्ट्रीय इत्यादि

कोणत्याहि जटिल संबंधांत, इतकेंच नव्हे, तर राज्यशासन नीति आणि मूलभूत तत्त्वज्ञान–थोडक्यांत सांगायचें म्हणजे गर्भधारणेपासून अन्त्येष्टीपर्यंत जन्माला येणाऱ्या जीवानें यशस्वी होण्यासाठीं जगावें कसें व मरावें कसें हें शिकविणारे आदर्श रामायणांत पाहण्यास मिळतात. हेंच रहस्य आहे रामचरित्राच्या भारतीय मनावरील अक्षुण्ण प्रभावाचें. व्यक्ति व समाजाचीं जीवनविषयक भिन्न तत्त्वज्ञानें व शासनसंस्थेचे भिन्न भिन्न प्रकार प्रसृत करणारे कवि, तत्त्वज्ञ, आचार्य आणि कर्मयोगी वाल्मीकीनंतर कमी का झालेत ? परंतु आजहि भारतीयांना असेंच वाटतें कीं, रामचरित्राच्या उदाहरणानें मानवी व्यवहाराच्या ज्या मर्यादा घालून दिल्या त्या इतक्या उंच व उदात्त आहेत कीं, अजून रामाच्या पायापर्यंतसुद्धां कोणीहि मानव पोहोंचला नाहीं. आणि म्हणूनच रामाला आपण मर्यादा-पुरुषोत्तम मानतों. सूर्यवंशांतील अशा आदर्श राजा रामाचें अयन, जीवनयात्रा-वर्णन करणारें तें रामायण सर्वोत्कृष्ट महाकाव्य ठरलें ह्यांत आश्चर्य नाहीं. रामायणाची पकड भारतीय मनावर अजूनपर्यंत अविचल राहिली आहे कारण रामाला पदच्युत करणारा त्याहून श्रेष्ठ मानव अजून निर्माण झाला नाहीं. पुढें होईल ? वाल्मीकि तर म्हणतात,

**यावत्स्थास्यन्ति गिरयः सरितश्चमहीतले ।**
**तावद्रामायणकथा लोकेषु प्रचलिष्यति ।।**

आजकालचे मानवआदर्श पाहून असेंच वाटतें कीं,छे! रामानें घालून दिलेल्या विक्रममर्यादांचे उच्चांक मोडणारा मानव निर्माण होईलसें दिसत नाहीं. रामायणानंतर पुष्कळ महाकाव्यें झालीं. महाभारत, हरिवंश, रघुवंश, अश्वघोषाचें बुद्धचरित, नैषधीयचरित, शिशुपालवध, दशकुमारचरित इत्यादि. पण या कोणालाहि रामायणाची बरोबरी करतां आली नाहीं. सार्वभाषिक, सार्वदेशिक, सामान्य समाजांत लोकप्रियता मिळाली नाहीं. राम आणि रामायण यांची लोकमनावर इतकी मोहिनी आहे कीं, रामकथा कवींना सदैव उत्स्फूर्त करीत आली आहे. रामाची कथा भारतीय जनतेचा सर्वांत हृदयंगम विषय. ही कथाच अशी अद्भुत व काव्यमय आहे कीं, जो सांगायला जातो तो अनायासेंच कवि बनतो. भारताच्या सर्व भाषांतून रामायणें रचलीं गेलीं आणि तीं अविस्मरणीय झालीं. एकेका काव्यरचनेनें कम्भम्, तुळशीदास,

रामदास, तोरवई इत्यादि प्रादेशिक कवि अमर झाले. कोणी म्हणेल ही झाली कहाणी गतशतकांची; आधुनिक काळांत काय महत्त्व या कथेचें ?

विसाव्या शतकाच्या या पूर्वार्धांत सुद्धां रामकथेचें आकर्षण यत्किंचित् सुद्धां कमी झालेलें नाहीं.

आश्चर्य म्हणजे श्रीनिवास शास्त्री ह्यांच्यासारख्या बुद्धिवादी आधुनिकालासुद्धां राम आणि त्याच्या परिसरांतील व्यक्तींच्या चारित्र्याविषयीं असा कांहीं आदर आणि भक्तिभाव निर्माण झाला कीं, त्यांनीं रामचरित्रावर आपल्या जीवनाच्या अखेरीस एक अत्यंत हृद्यशी विचारमाला भाषणद्वारां प्रकाशित केली. किती कवि आणि कथा-लेखकांनीं या पन्नास वर्षांत रामायणकथेच्या सुवर्णाची व सुगंधाची लयलूट चालविलेली आहे हें सांगणें नको. जवळजवळ सर्वच प्रादेशिक भाषांतून आधुनिक कवींनीं या पन्नास वर्षांत काव्यरचना केली. आपल्या मराठींतसुद्धां माडगुळकरांना रामकथेनें गानमुखर केलें. त्यांनीं जें गीतरामायण गायिलें तें आज महाराष्ट्रांत घरोघरीं गुणगुणलें जात आहे. गीतरामायणाइतकें असाधारण लोकप्रियता मिळवणारें मराठी काव्य दुसरें कोणतें झालें आहे का ?

या आधुनिक काळांतील रामकथेवरील महाकाव्यामध्यें सर्वप्रथम आणि सर्वोत्कृष्ट असें महाकाव्य हिन्दी भाषेंत तीस वर्षांपूर्वी रचलें गेलें. हें ऐकून हिंदीची अवहेलना करणाऱ्या अज्ञ अन्यभाषिकांना आश्चर्य वाटेल. श्री. मैथिलीशरण गुप्त यांना हिन्दी साहित्यांत महाकवीचें अढळ स्थान प्राप्त करून देणाऱ्या 'साकेत' या अभिनव आधुनिक महाकाव्याचा मी आज परिचय करून देतों.

'साकेत' या महाकाव्याची कथावस्तु रामायणांतील एक उपकथा आहे. काव्याचा आधार अर्थात् वाल्मीकींचे आणि तुळशीदासांचें रामायणच आहे. परंतु काव्याची प्रेरणा मात्र एका अभिनव कल्पनेंत आहे. रामायण हें काव्यदृष्टीनें सर्वोत्कृष्ट आहे हें खरें पण त्यांतसुद्धां कांहीं थोडे बारीकसारीक दोष राहून गेले आहेत; कांहीं उणेपणा आढळतो, कोठें कोठें अपेक्षा पुऱ्या होत नाहींत. कविसम्राट रवींद्रांना आपल्या प्राचीन साहित्यांत अस्वस्थता उत्पन्न करणारे कांहीं प्रसंग ध्यानांत आले. काव्याचा अभ्यास करतांना आद्य महाकवींनीं कारुण्यास्पद स्त्रीजीवनाविषयीं अनास्था आणि उपेक्षा दाखविली

असें त्यांना वाटलें." काव्यांतील उपेक्षिता" या विचारप्रवर्तक लेखांत रवींद्रांनीं आपल्या हृदयांतील हळहळ व्यक्त केली. त्यांनीं म्हटलें आहे, "संस्कृत साहित्यांतील काव्यप्रांतांत ज्या कांहीं स्त्रिया अनाहूत अशा डोकावतांना दिसतात त्यांमध्यें उर्मिला हिची करुण कहाणी प्रथमस्थानीं आहे ! हाय दैवा, अव्यक्त वेदना देवी उर्मिला . . . प्रभातींच्या एखाद्या तारकेसारखें महाकाव्याच्या प्रारंभीं तुझें एक ओझरतें दर्शन होतें तेंच अखेरचें. त्यानंतर तूं डोकावतसुद्धां नाहींस. तुझें काय झालें, तुझा पुढें अस्त केव्हां व कसा झाला हें कवीनेंहि सांगितलें नाहीं; आणि आम्हींहि विचारपूस केली नाहीं. ' उर्मिलेला महाकवि वाल्मीकि इतके कसे विसरले ? पति वनवासास गेला असतांना त्या तरुण उर्मिलेनें चौदा वर्षांचा प्रदीर्घ विरह कसा सहन केला ? थोडा विचार करूं लागलें तर पटतें कीं, रामायणांतील सर्वांत कारुण्यपूर्ण कहाणी असेल तर ती उर्मिलेची. सीतेला वनवासांतसुद्धां पतिसहवासाचें सुखसौभाग्य लाभलें. उर्मिलेला मात्र प्रासादांत राहून एक दोन नाहीं तर चौदा वर्षें पतीच्या पुनरागमनाकडे डोळे लावून काढावे लागले.

रविंद्रांच्या त्या लेखानंतर कांहीं दिवसांनीं मैथिलीशरण गुप्त ह्यांचे गुरु आचार्य द्विवेदी यांनींहि ' कवींची उर्मिलेसंबंधीं उदासीनता ' असा लेख लिहिला. रामायणाखालोखाल, किंबहुना त्याहून अधिक, रामकथा लोकप्रिय करणाऱ्या तुळशीदासांच्या 'रामचरित मानसां'त तर उर्मिलेचा नामनिर्देशसुद्धां कोठेंहि आढळत नाहीं. आधुनिक भारताच्या या महान् कविद्वयांनीं उर्मिलेच्या बाबतींत झालेल्या अन्यायास व उपेक्षेस वाचा फोडतांच तरुण कविशिष्याच्या हृदयांत काव्यदेवता स्फुरली. हा शिष्य म्हणजे मैथिलीशरण गुप्त.

श्री. मैथिलीशरणांचा जन्म बुंदेलखंडांत झांशीजवळच्या चिरगांवीं एका रामभक्त वैश्य कुटुंबांत संवत् १९४३ मध्यें झाला.

सेठ रामचरण गुप्त लक्ष्मीपति असूनहि सरस्वतीचे उपासक होते. हिन्दी साहित्याविषयीं त्यांना अभिमान आणि अनुराग होता. संपन्न स्थिति आणि घरंदाज वळण या कारणांमुळें त्यांनीं मैथिलीशरणांचें शिक्षण घरींच करवून घेतलें. आणि याच कारणांमुळें आंग्लविद्येशीं त्यांचा परिचय झाला नाहीं. जीवनाच्या प्रारंभींच मैथिलीशरणांची काव्यप्रतिभा जागृत झाली आणि त्यांनीं काव्यरचना आरंभली होती. सुदैवानें आधुनिक हिंदी साहित्यांतील

द्वितीय युगाचे महान् प्रणेते पं. महावीरप्रसाद द्विवेदी यांच्याशीं मैथिलीशरणांची गांठभेट झाली. ओळखीचें पर्यवसान गुरु–शिष्य संबंधांत झालें. सहज काव्यशक्तीवर आचार्य द्विवेदीचे संस्कार झाले; आणि त्यांच्या वरील निर्दिष्ट लेखानें एका अभिनव कल्पनेची प्रेरणा मैथिलीशरणांना मिळाली. या अगोदरच भारत-भारती, जयद्रथवध इत्यादि विविध काव्य-रचनेमुळें हिंदी काव्यप्रांतांत गुप्तजींनीं लौकिक मिळविला होता.

वडिलांकडून आलेली रामभक्ति आणि गुरूंकडून मिळालेली दृष्टि यांचा संयोग होतांच रामचरित्रावर महाकाव्य लिहावें अशी मनीषा गुप्तजींच्या अंतःकरणांत उद्‌भवली आणि ते काव्याच्या रूप-रेखा, हेतु आणि कार्य यांचा विचार करूं लागले. गुप्तजी रामभक्त असले तरी प्रगतिवादी कवि आहेत. वाल्मीकि, भवभूति, तुळशीदास हे सर्वच रामाला आदर्श समजतात. पण प्रत्येकाच्या रामचरित्रांत थोडा भेद आहे. आपला राम कसा असावा? आपली कैकेयी कशी दिसावी? याविषयीं खूप विचारमंथन झालें त्यांच्या मनांत. उपेक्षिता उर्मिला त्यांना परंपरागत महाकाव्यांत दिसेना मुळीं!

उर्मिलेसारखी नवोढा सीतेप्रमाणें आपल्या पतीबरोबर वनाला जाऊं शकली नाहीं. लक्ष्मणानें तिला सांगितलें–विचारलें–कीं नाहीं कोण जाणें... पण समजा तिच्या अनुमतीनें तो वनांत गेला. नंतर तिनें काय आपल्या प्रासादाच्या खिडक्या-दारें बंद करून स्वतःला कोंडून घेतलें असेल? मुसमुसत्या यौवनानें तिच्या चित्ताला शांतता मिळूं दिली असेल? पति-विरहांत तळमळणाऱ्या उर्मिलेच्या डोळ्यांतून एक सुद्धां अश्रुबिंदु गळला नसेल का? उर्मिला कांहीं देवता वा दगडाची मूर्ति नव्हती. तिनें शोक केला असेल; अश्रु ढाळले असतील, अन्नपान वर्ज्य केलें असेल; अलंकार झुगारून दिले असले पाहिजेत, आणि काय काय केलें असेल तें केवळ विरहिणी आणि कवीलाच ठाऊक. इतकें मात्र खरें कीं, ती दिवसरात्र, ऋतु आणि वर्षे मोजीत राहिली असेल. प्रतिदिन, जागेपणीं वा झोपेंत, लक्ष्मणाचाच ध्यास तिला लागला असला पाहिजे. पण काळ तरी कांहीं लहान का होता? चौदा वर्षें. उर्मिलेच्या शरीराची वात प्रेमपूर्तीच्या आशेवर किती दिवस तेवत राहील? काय दशा होईल तिच्या शरीराची या दीर्घ कालावधींत? आणि ज्या दिवशीं लक्ष्मण परतेल त्या दिवशीं ती उजाळण्यासाठीं उभी तरी राहूं शकेल का? कदाचित्

पुनर्मीलनाच्या प्रसंगीं वस्त्रालंकरांनीं उर्मिला आपलें शरीर सजवीलहि ! परंतु कोमेजलेलें यौवन ?

इतक्या हृदयस्पंदिनी कल्पना स्फुरल्यावर त्या तरुण कवीला स्वस्थ राहवेना. आपल्या संकल्पित मनोरथाला महाकाव्याच्या रूपरेखेंत साकार करण्याचा त्यांनीं प्रारंभ केला. पण कवीची महत्त्वाकांक्षा होती कीं हें महाकाव्य आपल्या साहित्यतपस्येचें सुमधुर फळ बनावें. तें हिंदी सारस्वताला जीवनाच्या अखेरीस आपण अर्पण करावें.

या विचारामुळें साकेत-रचना फार सावकाश चालू होती. काव्यांत व्यंग येऊं नये म्हणून ते अनेक वेळां आपल्या कल्पना आणि प्रसंग बदलूं लागले. शेवटीं काव्याची चित्ररेखा तयार झाली. उर्मिला हीच त्यांच्या महाकाव्याची नायिका ठरली. उर्मिला अयोध्येच्या बाहेर कधींच गेली नाहीं. फक्त एक चित्रकूट प्रसंग वगळला तर ती साकेत नगरीच्या राजप्रासादांतच १४ वर्षांचा विरहकाल कंठीत राहिली. आणि म्हणून काव्याचें नांव ठरलें ‘साकेत’.

महाकाव्यांच्या सर्व कसोटचा ‘साकेता’स लावल्या तर तें महाकाव्य ठरेल कीं नाहीं हे साहित्याचे व्यवच्छेदक ठरवीत राहोत. मैथिलीशरणांनीं महाकाव्याचे अनेक संकेत झुगारूनहि ‘साकेता’ला अभिनव महाकाव्याची सर्वमान्यता आणि प्रतिष्ठा मिळवून दिली आहे.

कवीची हार्दिक इच्छा ‘साहित्यिकांना साकेताची भेट देऊन त्यांचा अखेरचा निरोप घ्यावा’ अशी असल्यामुळें अर्थातच रचनेची गति मंद होती. वर्षामागून वर्षें जात होतीं पण ‘उपेक्षिता उर्मिला’ प्रकाशांत येईना. अशा स्थितींत कवीला एका मोठ्या आजारानें शयनासन्न केलें. सर्व औषधोपाय थकले. मृत्यु अगदीं उंबरठ्यावर उभा असलेला परिवारांतील आप्तांना दिसला. त्याच्या भयानें आजूबाजूस चाललेली कुजबूज, अस्फुट दुःखावेग व रुदन मरणासन्न मैथिलीशरणांच्या दृष्टि–कानीं पडलें, पण त्यांना बोलण्याचीहि शक्ति नव्हती. अखेरची इच्छा प्रकट करणारे दोनच उद्गार ते काढूं शकले. “सियाराम–साकेत !” ‘मी जातों आतां साकेत मात्र तुम्हींच पूर्ण करा !’ असेंच त्यांनीं आपले कनिष्ठ बंधु कवि सियारामशरण यांना सुचविलें.

हिंदीच नव्हे तर भारतीय सारस्वताचें सौभाग्य मोठें. निर्दय यमराजालाहि कसा न कळ सुविचार आला. गुप्तजींना हांक न मारतांच तो पुढें सरकला. कवि वरे झाले. 'साकेता' साठींच यमानें तुम्हांला सुट्टी दिली आहे. आतां तें अगोदर पुरें करा' असा मित्रांनीं आग्रह केला. आणि कवीनेंहि त्यापुढें मन:पूर्वक दररोज ३।४ घटका सतत आसन मांडून रचना चालू केली . . . एके दिवशीं १५–१६वर्षे ऐरणीवर घडत असलेलें महाकाव्यरत्न 'साकेत' प्रकाशलें. त्याच्या प्रतिभा-प्रकाशानें अवघ्या हिंदी सृष्टींतील साहित्यिकांना दिपवून टाकलें; सुशिक्षित व सुसंस्कृत वाचकांचीं मनें प्रसन्न केलीं; सर्व साधारण जनतेला मुग्ध करून टाकलें; गुप्तजींना आधुनिक युगांतील हिंदीचे आद्य महाकवि असें अलौकिक मानास्पद स्थान प्राप्त करून दिलें. जनतेनें राष्ट्रकवि म्हणून त्यांना संबोधलें.

या अद्वितीय यशानंतर मैथिलीशरणांनीं हिंदी सरस्वतीला आणखी अनेक सुगंधी सुरंगी काव्यकुसुमें वाहिलीं. उर्मिलेसारख्या दुसऱ्या उपेक्षिता यशोधरा, विष्णुप्रिया यांच्या करुण कथांवर अभूतपूर्व अशीं काव्यें लिहिलीं आहेत. मैथिलीशरणांची गेल्या साठ पासष्ट वर्षांतली काव्यरचना विशाल आहे. पण त्या सर्व कृतींत सर्वांत सुमधुर फळ कोणतें हें सांगायचें झाल्यास तें 'साकेत' असेंच म्हणावें लागेल १२ सर्गांचें साकेत हें या अर्धशतकांतलें हिंदी तसेंच नव्हे तर भारत-भारतीच्या साहित्य संसारांतलें पहिलें वहिलें अभिनव महाकाव्य आहे. त्यांत भारतीय हिंदु जीवनदर्शन करविण्याची अत्यंत यशस्वी सिद्धि कवीनें साधली आहे. शुद्ध भारतीय जीवनादर्शाचें इतकें भव्योदात्त चित्र नि:संशय दुसऱ्या कोणत्याहि भाषा-भगिनीच्या साहित्यसारांत या अर्धशतकांत रंगविलें गेलेलें नाहीं.

महाकवि मैथिलीशरण हे केवळ काव्यगुंजतांनाच रमलेले नाहींत. कट्टर राष्ट्रीय वृत्तींचा हा कवि देशाच्या स्वातंत्र्ययुद्धांत सैनिक या नात्यानें राष्ट्रीय आंदोलनांत शिरला आणि परिणामीं इंग्रजी राज्यांतील कारावासाचा पाहुणचार घेऊन आला.

जनतेनें अगोदरच त्यांना राष्ट्रकवि म्हणून सन्मानिलें होतें. जनतेचें शासन झाल्यावर राष्ट्रपतींनीं त्यांना 'पद्मश्री' भूषण अर्पण करून गौरविलें आणि केंद्रीय राज्य परिषदेंत सभासद म्हणून बोलाविलें. वयाच्या ७५व्या वर्षीं

आज-सुद्धां—वृद्ध मैथिलीशरण आपली कविता गाऊं लागले कीं, श्रोत्यांना तल्लीन करून टाकतात.

हिंदु असून रामकथा माहीत नाहीं असें म्हणणारा एखादाहि अभागी पुरुष या भारतांत शोधून सांपडेल काय? तेव्हां सर्वांच्या परिचयाच्या गोष्टी न सांगतां मूळ रामायणांत न सांपडणारीं, पण आपल्या काव्यविषयाच्या परिपोषणासाठीं आवश्यक अशीं कोणतीं हृदयंगम कल्पनारम्य चित्रें आणि प्रसंग रंगवीत कवीनें 'साकेतां'तील काव्यरसाला भरतें आणलें आहे हेंच मी संक्षेपानें सांगणार आहें. येथें एक गोष्ट ध्यानांत आणून देणें आवश्यक आहे कीं, वाल्मीकींच्या रामाचें कार्य होतें रावणवधाचें; तुळशीदासाच्या काव्यरचनेचा हेतु होता 'स्वान्तःसुखाय' भगवान रामाच्या अवतार-लीलेचें भजन-कीर्तन करणें आणि मैथिलीशरणांच्या 'साकेता'चा प्रधान हेतु 'उपेक्षिता' उर्मिलेची करुण कथा सांगून उर्मिला-लक्ष्मण मीलन घडवून आणणें. अर्थात् रामायणांतील प्रमुख प्रसंग या काव्यांत केवळ अनुषंगिक दाखविले आहेत. उर्मिलेचा अनुराग, त्याग, विरहक्लेश आणि शेवटीं पतिसमागम हेंच या काव्यांतील सूत्र आहे. तें न विसरतां आतां आपण 'साकेता'वर दृष्टि टाकूं या.

**सर्ग १** :—ती पहा, ती साकेत नगरी जणुं स्वर्गाला भेटण्यासाठीं आकाशांत उंच उंच डोकावते आहे. पण खरें म्हणजे आजकाल स्वर्गापेक्षां भूतलाचेंच माहात्म्य वाढलें आहे. निर्गुण परमेश्वरानें कशासाठीं कोण जाणें या नगरींत अवतार घेतला; देवानें मानवाचें पयःपान केलें. पृथ्वीचा भार कमी करण्यासाठीं का भूतलाचा स्वर्ग बनविण्यासाठीं? कदाचित् आर्य-सभ्यता प्रस्थापित करण्यासाठीं असेल! साकेतराज दशरथाच्या राजवाड्यांत निर्गुण निराकार परब्रह्म राम-लक्ष्मण भरत शत्रुघ्नाच्या रूपांत खेळत आहे.

साकेतनगरीची इंद्राच्या अमरावतीशीं तुलना केली. पण कोणी म्हणेल, कोठें ती सुरसरिता भागिरथी आणि कोठें ही शरयु? भागिरथी मोक्षदायिनी आहे हें खरेंच, पण त्यासाठीं मरावें लागतें! पण पुण्याची प्रत्यक्ष धारा ही शरयु जिवंतपणींच माणसाला तारून नेते. काय हे विचित्र तरंग! स्नानें करतांना पुरांगनांच्या अंतरंगांनीं रंगलें आहे हें पाणी. अशा या शरयु-तीरावर वसली आहे ही साकेत नगरी.

एखाद्या महान् वृक्षाला सुंदर सुगंधी फुलाफळांचा बहर आला म्हणजे तो जसा दिसतो तसे आहेत तेथील पुरजन. सर्वच स्वस्थ, शिक्षित, शिष्ट, उद्योगी, सर्व उपभोगांचा आनंद घेणारे पण अंतर्यामीं पूर्ण अनासक्त. या नगरींत आधींची शंका नाहीं, ना व्याधींची बाधा. सर्वच सधन, मग चोराची भीति कोठली? एखादेंहि अंगण असें नव्हतें कीं, ज्यांत खेळणाऱ्या बाल-बालिकांची कलकल कधीं थांबली असेल! धनधान्यांनीं कोठारें, गाईवांसरांनीं खिल्लारें, हत्तीघोड्यांनीं पागा भरलेल्या असत. काव्य, कला, नाट्य संगीतांची गांवांत सदैव धूमधाम. घरांत काय किंवा घाटावर काय, कोठेंहि पहा लोकांचा मोठा थाट पाहायला मिळे! आणि आजची गोष्ट तर विचारूंच नका. आनंद, उत्साह अगदीं थयथय नाचतो आहे. कारण उद्यां रामाला यौवराज्याभिषेक व्हायचा आहे.

राजप्रासादाच्या खिडकींत कोण दिसते ती उषेसारखी? सुवर्णाची प्रतिमा कमळासारखी कोमळ घडविणाऱ्या त्या शिल्पकाराची धन्य झाली. स्वर्गांतलें सुमन धरणीवर उमलल्यासारखी दिसते ही उर्मिला. ती पहा आपल्या आव-डत्या पोपटाला काय विचारते आहे. "सुभाषी, बोल ना? कोणाला पाहून गप्प झालास?" पाठीकडून आलेल्या लक्ष्मणाला पाहून तो गप्प झाला नसला तरी त्याचें बोलणें कोणी ऐकलें असतें!

लक्ष्मण-उर्मिला यांचा वाग्विनोद सुरू होतो. रामाच्या अभिषेकाची सुखद वार्ता लक्ष्मण सांगतो. तो बेत इतका घाईनें ठरला कीं, आप्तमित्र, राजे आणि मांडलिकच काय पण मातुलगृहीं गेलेल्या भरतालासुद्धां बोलावणें शक्य झालें नाहीं. इतकें म्हणून लक्ष्मणानें उर्मिलेचा हात आपल्या हातांत घेतला. तेव्हां ती म्हणते: "सांभाळा हं, कमळ समजून माझा हात घेतां, पण एखाद्या मत्त गजासारखा विवेक सोडून तो तोडूं नका बरें!" असा प्रेमविनोद चालू असतां-नाच रामराज्याभिषेकाचें चित्र काढायला घेते उर्मिला.

लक्ष्मण म्हणाला: "जें जें घडतें आहे तें सांगण्यासाठीं कला कशाला? काय झालें पाहिजे हें सांगण्यांत कलेची इतिकर्तव्यता आहे! कलेंत अर्थ शोधणें म्हणजे व्यर्थ तिला स्वार्थिनी करणें आहे!"

उर्मिलेची लेखणी चित्रपटावर झटझप चालत होती . . . तोंच पिवळ्या रंगाचा एक तरंग अभिषेक घटावर एकदम वाहून गेला. "अरेरे, रंगानेंच अभिषेकाचा घट बेरंग केला, थांबा!" खजीलशी उर्मिला मोत्याच्या लडी-सारखी हंसली. लक्ष्मण जायला निघाला.

पतिदैवताला नमस्कार करण्यासाठीं उर्मिला खालीं वांकली. अर्धभालचंद्रच जणुं भुईचें चुंबन घेत होता ; कृष्णकेश मेघजालासारखे त्यावर पसरले ; प्राणपतीचा वरद हस्त छत्राप्रमाणें तिच्या डोक्यावर शोभला ; प्रकृतीच जणुं आपोआप आज सनाथ झालेली दिसली.

**सर्ग २** :--राणी कैकयीच्या प्रासादांत आनंदाचा पूर वाहत होता. आमराईंत मोहोर खूप दरवळला आणि मग त्यावर कीड पडावी तसें झालें त्या राज-वाड्यांत. कैकेयीचा आनंद मंथरेच्या किडक्या दृष्टीला पाहवला नाहीं. ती कैकयीला ती म्हणाली : "राम माझा म्हणतां, राम आणि भरतांत अंतर नाहीं म्हणतां, अंतर उद्यां कळेल. बाईसाहेब, जेव्हां कौसल्या राजमाता म्हणवून मिरवील तेव्हां ! आणि भरताचा इतकासुद्धां विश्वास नसावा कीं त्याला मामाकडे पाठवून हा अभिषेक ?"

शंका आणि द्वेषानें उसळलेली कैकयी महालांत जाते. सूड घेण्याचा निश्चय करून शृंगार-भूषणें फेकते. सर्व दालनांत दिसेल त्या वस्तूवर राग काढते आणि जमिनीवर लोळण घेऊन सर्पिणीप्रमाणें फुसफुस करूं लागते.

"नगरी आनंदांत आणि माझी कैकयी दुःखांत ?" अकस्मात् आलेल्या दशरथानें फणफणणाऱ्या कैकयीस विचारलें. "बरें का नाहीं ? वैद्याला बोलावूं कां ? मागशील तर अमृतसुद्धां नाहीं अलभ्य आपणाला ! माग, तुला हवें तें माग. नाहींतरी दोन वर देणें आहे मी तुझें !" दशरथ म्हणाला.

"माघार नाहीं घेणार ना पहा बरें ! माझ्या भरताला राज्य द्या आणि त्या रामाला वनवासाला धाडा." कैकयी बोलली.

कैकयीचे ते शब्द--शब्द कसले ; वज्राहून कठोर अशा त्या शब्दांनीं वृद्ध दशरथाला भूमीवर लोळवलें ; स्वप्नांत तर नाहींना आपण, असेंच वाटलें त्याला क्षणभर. स्त्री-हृदय इतकें स्वार्थी, इतकें द्वेषी असूं शकेल ? राज्यलोभ का रामद्वेष, काय असेल कारण ? गुडघ्यांत डोकें खुपसून 'राम, राम' असा

आक्रोश करीत, वचनभंग करावा कीं रामाला वनाला धाडावें ?" याच एका चिंतेंत रात्र गेली तेथें.

**सर्ग ३** :–" वडिलांना वंदन करायला जाऊं या," असें म्हणून राम-लक्ष्मण कैकेयीच्या महालांत पोहोंचतात तों " हा राम, हा सुत, " असा दशरथाचा आक्रोश त्यांच्या कानावर येतो.

" हा आलों मी, बाबा, बोला, आज्ञा सांगा, डोळे उघडा, " राम म्हणाला. दशरथाला बोलवेना. रामानें कैकयीकडे पाहिलें. स्वतःचा दुष्टपणा तिला सांगवेना. दशरथानें सारें बळ एकवटून म्हटलें : " अभागिनी, तूं काय सांगितलेंस ? या रामाला तूं १४ वर्षांसाठीं वनांत ढकलणार ? राम–भरता-सारख्या भावाभावांत फूट पाडणार तूं ? " पुढें त्यांना बोलवेना. ग्लानि आली. केवळ " राम राम " म्हणत राहिले ते !

काय झालें असलें पाहिजे हें सर्वज्ञ रामाला कोणी सांगायला का हवें होतें ? राम दशरथाकडे पाहून म्हणाला : " बाबा, राज्यावर भरत काय कीं, मी काय, कोणीहि बसलें तरी काय अंतर पडणार त्यामुळें ? तो येथें प्रजेचें भय निवारील. मी वनांतील ऋषि-मुनींना निर्भय करीन, आर्यत्वाची प्रतिष्ठा वाढवीन. नाहींतरी मला पृथ्वीवरील धर्मसंकट दूर करायचेंच आहे. मग उगाच माझ्या आईला कां असे शापून बोलतां ? " दीन दशरथ. समाधान झालें नाहीं त्याचें. तो तळमळत म्हणाला, " रामा, कशाला रे आलास या माझ्या अभाग्याच्या पोटीं जन्माला ?"

गरीब बिचारा लक्ष्मण. त्याला हें सर्व सहन झालें नाहीं. " आई, हें सर्व ठीक झालें का ? ' कैकयीकडे क्रोधदृष्टि टाकीत तो म्हणाला.

" मी काय सांगूं, बोलेन तर रेणुकेसारखी माझी गति होईल " मार मला तूं, आणि हो मातृघातकी. भरत नाहीं म्हणून आतां ! " कैकयी म्हणाली.

" उगाच कशाला सांगतेस गप्पा मातृत्वाच्या. भरताला सुद्धां ठार करीन. आणि तुला तर नरकांतसुद्धां जागा मिळूं देणार नाहीं. भरताचें नांव कशाला काढतेस? तो असता तर बुडून मेला असता लाजेनें. पिलें खाणारी सापीण आहेस तूं ! " लक्ष्मण रागावला.

कैकयी यावर कांहींच बोलली नाहीं, पण प्रभू रामचंद्र म्हणाले, " अरेरे सौमित्रा, तूं काय मांडलें आहेस आज ? आवर आपला आवेश. सांभाळ बरें,

फारच वाहवलास तूं . . . वडिलांच्या आज्ञा पाळायच्या असतात, त्यावर असे तर्क-वितर्क करायचे नसतात ! लक्ष्मणा, देवतुल्य माता-पित्याचा आज तूं अपमान कसा केलास ? किया है आज कुछ पान लक्ष्मण ? पित्यांच्या शब्दापुढें मला राज्य तुच्छ वाटतें. मन आवर. अरे, अखिल जग आपलें राज्य आहे असें मान ! " रामाच्या शब्दांनीं लक्ष्मणाचा कोप शमला. तो रामाच्या पायां पडला आणि म्हणाला. " ठीक आहे. आपली आज्ञा प्रमाण. पण मला मात्र आपल्या पायांशींच ठेवा. आपण जाल तेथें अयोध्या. वनांत सुद्धां. नाहींतरी आपण गेल्यावर अयोध्येचें स्मशानच होईल नाहीं का ? रामच नाहीं तर रामराज्य कोठलें ?" राजा दशरथ मध्येंच म्हणाला, " लक्ष्मणा, तूं प्रथम बोललास तेंच करून कां दाखवीत नाहीस ?"

राम उद्‌गारला : " बाबा, कशाला इतका मोह ? पुत्रानें पित्याची आज्ञा पालन न करणें, केवढा द्रोह ? शिवाय आपल्या कुळाचें ब्रीद ? प्राण जाईल—पण वचनभंग होणार नाहीं ही रघुकुलाची प्रतिज्ञा तुम्हींच आम्हांला शिकविलीत ना ? "

राम, लक्ष्मण दोघांनीं दशरथ आणि कैकयीला नमस्कार केले. ते प्रसन्न चित्तानें बाहेर पडले, तेव्हां त्यांच्या कानांवर शब्द पडले. " रामा, रामा, मला कसा रे मृत्यूच्या तोंडीं सोडून चाललास ! "

**सर्ग ४** :– रामलक्ष्मण कौसल्येला भेटतात, " आज मी कृतार्थ झालों, आई. पित्याची आज्ञा. मी जातों वनाला व भरत येथें राज्य करील. " कौसल्या रामाच्या अभिषेकासाठीं तयार होत होती. सीता जवळच होती. रामाचे ते शब्द ऐकून कौसल्या सुन्न झाली. इतक्यांत सुमित्रा तेथें येते. " सीता मात्र हंसतच रामाला म्हणते : " वा: आतां वनाचा स्वर्ग होईल, मी सुद्धां तुमच्याबरोबर येणार बरें का ! " तें ऐकून उर्मिला मनांत म्हणाली, " राम जाणार, सीता जाणार, लक्ष्मणहि जाणार. आणि मी जाऊं कीं राहूं ? आणि बोलूं तरी काय आतां ? "

लक्ष्मणाच्या मनांत प्रश्न उभा राहिला–" काय सांगावें हिला, चल कीं मागें राहा ? आणि सांगावें तरी कसें ? कदाचित् राम मला सुद्धां बरोबर नेणार नाहीं. तिला मागें राहण्यास सांगावें !' उर्मिलेनें पतीच्या मुद्रेवरील

भाव ओळखला; तिच्या डोळ्यांतून अश्रुधारा गळल्या, सीतेचा खांदा त्या अश्रूंनीं ओला केला.

पण माता कौसल्या धीराची. प्रसंग ओळखला तिनें. राममाताच ती ! ती म्हणाली, "बरें आहे बेटा, वनाला जा आणि धर्माचें धन मिळवून आण; पित्याच्या वचनाचें रक्षण कर. याशिवाय दुसरें मी तुला काय व कसें सांगूं ? वनांतच तुझ्या जीवनवृक्षाचा विकास होऊं दे... सुमित्रे, पाहा काय नशीव आपलें ? ज्याला मांडीवर खेळवलें, त्याला आज हिंस्र पशूंच्या रानांत ढकलावें लागत आहे !"

सुमित्रा म्हणाली, "जीजी, जाऊं दे. काळ आतां निघून जाईल. आशा आपणा सर्वांना जगवील !"

कौसल्या : "रामा, ज्यासाठीं तूं जन्म घेतलास तें कार्य पुरें करून ये. लक्ष्मणा, धन्य आहे तुझा जन्म ! जन्म देऊन आम्हांला जो नाहीं तो रामसहवास तुला लाभला. आपल्या भावाबरोबर जा, त्याला एकटा सोडूं नकोस. बरें जा."

कौसल्येच्या आदेशानें लक्ष्मणाचें शरीर पुलकित झालें ! पण उर्मिलेचें हृदय ? ती स्वतःला म्हणाली, "हे मना, आतां तूं प्रियपतीच्या मार्गांत विघ्न नको आणूंस, बंधुप्रेमाच्या अमृतानें या भूतलावर स्वर्गभाव अवतरूं दे !"

वनवासोचित वल्कलें त्या राजपुत्रांसाठीं आणण्यांत आलीं. सीतेनें हात पुढें केला. तिला थांबविण्याचा खूप प्रयत्न झाला पण व्यर्थ. सीता म्हणाली, "वनांत कसलें भय ? आत्मिक बल असल्यावर जंगल सुद्धां मंगल बनतें. असतील कांटे, पण वनकुसुमेंहि असतीलच ना ? छायावृक्ष, निर्झर, कंदमुळें, फळें सर्व कांहीं नाहीं का तेथें ? आणि समजा, कांहीं नसलें तरी सीतेचा राम तेथें असेलना ? पति हीच पत्नीची गति; अगम्य, गहन काय ? दहनांत सुद्धां सतींना पतिसंगच प्रिय असतो !"

सीतेचे वरील उद्‌गार ऐकतांच उर्मिला, 'हाय–दैवा !' असें म्हणते, तोंच मूर्च्छा येऊन ती जमिनीवर पडली. सीतेनें पंखा घेऊन तिला वारा घातला. तिचें दुःख पाहून ती म्हणाली, "प्रिय बहिणी, हाय, हाय,–काय दुर्दैव तुझें; माझें वनवासांतलें सौभाग्यसुद्धां तुला मिळूं नये ?"

उर्मिलेची ती दशा पाहून दयाघन राम म्हणाला, "लक्ष्मणा, अजून विचार कर... तुझ्या हट्टामुळें केवढा मोठा हृदयभंग होईल, पाहा बुवा ! मला तर

वाटतें, वनाला जायचें मला तो मी जाणार गृहस्थासारखा, खरा वनवास तुम्हां दोघांच्या नशिवीं आला आहे हा ! "

सुमित्रा त्यावर म्हणाली, "जें ठरलें तें ठरलें. जा तुम्ही. आमच्यासारखीच ती राहील. रडत रडत काढूं आम्ही हे दिवस तुम्हीं परत येईपर्यंत, जा तुम्ही."

**सर्ग ५** :– राम वनाला निघतात. नगरांत कोलाहल माजतो. कोणी म्हणाले, "राम तेथें आपण जाऊं या. करूं द्या राज्य भरताला या विटामातीवर !" सारी साकेत जनता रामाला निरोप द्यायला निघाली, ती परतेना. राम म्हणाला, "असा रडका निरोप का देणार तुम्हीं मला? आणि आम्हीं परत काय येणार नाहीं ! उठा; परत जा, माझा भरतावर विश्वास आहे, तसाच तुम्हीं ठेवा. देवकार्यासाठीं संग्राम करणारे, सर्वस्वाचा होम करणारे असे आहोंत आम्ही संगर वंशांतले राजे; तुम्हीं परत जा. आशीर्वाद द्या आम्हांला. म्हणजे आमच्या मार्गांतील कांटे कुसुमें बनतील. आम्हीं पापसंहार व पुण्यविस्तार करूं ! उठा; धर्माच्या कामांत अडचण आणूं नका ! "

रामानें नंतर भूमिवंदन केलें आणि म्हटलें, "जन्मभूमे, माझा प्रणाम घे. तुझा जयजयकार होवो. मी काय, केव्हां तरी परतेन .किंवा परतणारहि नाहीं. पण तूं मात्र रामाची अयोध्या म्हणूनच राहा ! "

असें म्हणून रामानें अयोध्या सोडली; लक्ष्मणानें उर्मिला आणि निद्रा घरीं ठेवली. नंतर ते तमसा नदीच्या तीरावर पोहोंचले.

गुहक राजानें रामसीतेचें पदवंदन करून स्वागत केलें. तेथें रामानें वटदुग्ध लावून आपल्या केसांच्या जटा बनविल्या. क्षात्रधर्मानें पूर्णपणें वैराग्यधर्म स्वीकारला. आतां मात्र राम परतण्याची आशा संपली.

गुहक राजानें रामसीतेला आपल्या नावेंतून गंगापार केलें. निरोप घेतांना तो म्हणाला , "रामा, मला स्वर्ण नको. मृत्तिका पाषाणाला घेऊन मी काय करूं ? ज्या तुझ्या पादस्पर्शानें जडसुद्धां चेतन होतें, त्या पायांच्या धुळीचा एक कण मला दे." रामानें गुहकाला प्रेमानें आलिंगन दिलें.

**सर्ग ६** : –साकेत नगरी. राजप्रासादांत उर्मिला मूर्च्छित मौनशी पडून राहिली आहे. सीतेला आपलें सौभाग्य लाभलें, परंतु उर्मिलेला त्याचा त्याग करावा लागला होता ; यौवनांत तिला यतिवेष घ्यावा लागला ; सुखोपभोग म्हणजे भयंकर रोगसा तिला वाटूं लागला. पण ती आपल्या मनाचें

समाधान करी. ती त्याला समजावी, "कांहीं हरकत नाहीं. आपलें बंधुप्रेम अगदीं निर्दोष राहो. ते साऱ्या जगापुढें एक आदर्श म्हणून ठरो. माझी इच्छा फक्त एकच कीं, निशा निस्तब्ध झाल्यावर माझी आठवण एकवार जरी तुम्हीं केलीत तरी मला सर्व कांहीं मिळालें असें समजेन मी."

सुमंत रामाला पोंचवून एकटेच परतले. दशरथाची आशा तुटली. "राम, राम" असा आर्त आक्रोश करीत त्यांनीं आपला प्राण सोडला. तिन्ही राण्या मूर्च्छित झाल्या.

"आई, कोठें गेले महाराज दशरथ?" असें विचारीत दुःखानें पांढरी पडलेली उर्मिला कैकयीच्या समोर कोसळली.

**सर्ग ७** – मातुलग्रामाहून भरत-शत्रुघ्नांना बोलावण्यांत आलें. वडिलांच्या मृत्यूची वार्ता त्यांना सांगण्यांत आली नाहीं; पण वाटेंतच भयंकर अशुभ लक्षणें त्यांना दिसलीं. त्यांचें मन कातर झालेंच होतें. त्यांनीं नगरप्रवेश केला... पण कोठेंच चैतन्य, आनंद आढळेना. त्यांनाहि विचारण्याचें धैर्य होईना. प्रासादाच्या आंत शिरून, शुद्धान्ताच्या उंबरठ्यावर पाय ठेवतांच पित्याचा मृतदेह दृष्टीस पडला मात्र–"बाबा, अहो बाबा," असें बोलून भरतानें दुःखावेगानें अंग टाकलें. कैकयी जवळच होती. आपलें कुकृत्य भरताला कसें सांगावें हें तिला कळेना. शेवटीं ती म्हणाली, "भरता, तुझ्यासाठीं मी राज्य मागितलें आणि रामाला वनवासाला घालवून दिलें; त्याचाच परिणाम महाराज पुत्रशोकानें मृत्युमुखांत पडले. या पतिहत्येचें कारण मीच ठरलें वरें बाळा, भरता, वाटेल तो दोष दे मला. झालें खरें माझ्या हातून पाप. पण तुझ्या शपथ, केवळ पुत्रप्रेमानेंच मी हें असें केलें. तेव्हां ऊठ आतां आणि राज्य हातीं घे. देशील तो दंड भोगायला मी तयार आहें."

भरतानें म्हटलें, "अहाहा, काय हें पुत्रप्रेम? तें तृप्त करण्यासाठीं तूं पति-देह भाजून खाल्लास! वा ग आई!"

कैकयी "भरता, माझें ऐक जरा. माझें प्रेम तुला कळलेंच नाहीं... सर्व करोत माझी निंदा; पण भरता, तूं तरी असें बोलूं नकोस रे. मी काय पाप केलें? ऐक मी काय सांगत्यें तें. तुझे वडील जीवन्मुक्त झाले होते. पण दोन वरांचें ऋण फेडायचें होतें त्यांना. तें केल्याशिवाय त्यांनी जाणें उचित नव्हतें. त्यांना ऋणमुक्त करण्यासाठींच मी हे वर मागून घेतले बरें, भरता!"

भरत : " मागून हें काय मागितलेंस अभद्र ?न्याय, धर्म, स्नेह, कोठें गेलीं होतीं तुझीं सारीं ? स्वार्थिनी, तूं आपल्या हातानेंच घराला आग लावलीस नाहीं का ? "

इतकें बोलून भरत कौसल्येजवळ जातो. तिची क्षमा मागतो. कौसल्येचें उदात्त मातृहृदय त्याला पोटाशीं धरतें आणि ती बोलते. " बेटा, भरता, ये, तुझा काय दोष ? ये बाळा. तूं आलास आणि माझा राम मला मिळाला. राम आणि भरत. फरक काय तुम्हां दोघांत ? केवळ नांवाचाच ना ! एकाच सुवर्णाचीं दोन पात्रें. ये बाळा, महाराज झोपीं गेले आहेत; हृदयाची गति थांवली आहे. पण स्नेह कांहीं कमी झाला नाहीं बरें ! राज्य देऊन गेले आहेत तुला ! तूंच त्यांचें अन्त्यकर्म उरक आतां ! "

कौसल्या, सुमित्रा यांच्या मनांत सती जाण्याचे विचार आले पण पुरोहितांनीं त्यांचें मन वळविलें. दुसऱ्या दिवशीं दशरथाचा अन्त्यविधि झाला.

**सर्ग ८:** – श्रीराम चित्रकूटला पोहोंचले होते. लक्ष्मणानें एक सुंदरशी कुटी बांधली होती. श्रीराम सीतेसह वनवासाचा आनंद घेत होते. सीता आपल्या असीम सुखाचीं वनगाणीं गात राही. तिच्या सुखगानाचें ध्रुवपद होतें " **मेरी कुटियामें राजभवन मन भाया** " ( माझ्या ग कुटिरांत राजभवन मनिं भासे–) राम–सीता वाक्-विनोदांत हंसत-बोलत आहेत. इतक्यांत दूर आकाशांत पक्ष्यांच्या झुंडी उडतांना दिसल्या, हरिणांचे तांडे उड्या मारीत पळूं लागले ; दूरचा कोलाहल जवळजवळ ऐकूं येऊं लागला; धुळीचे ढग वरवर चढूं लागले. सीतेला भयाची शंका आली. लक्ष्मणाला तिनें म्हटलें, " भाऊजी, पाहा तर खरें झाडावरून काय आलें तें ? "

" राजा भरत आपल्या दळभारासहित इकडे येतो आहे. वाईट हेतूनें जर तो आला असेल, तर या एकाच बाणानें त्याला उडवीन ! " लक्ष्मण म्हणाला.

रामानें त्याला " शांत हो " म्हटलें. आणि भरताला भेटण्यासाठीं तो समोर आला. भरत आणि शत्रुघ्न जवळ आले. दोघे भाई रामाच्या पायांवर डोकें ठेऊन नमस्कार करते झाले. त्यांना उठवून रामानें गाढ आलिंगन दिलें. नंतर त्यांनीं सीतेचे पाय आपल्या अश्रूंनीं धुऊन काढले. त्यांच्या मागोमाग राजमाता, गुरुजन, पुरजन, पंचजन, सचिव, अमात्यहि आले; हय, गज, रथांनीं लोकसमूह लोटले. चित्रकूटांत त्या वेळीं एक विचित्र जनसंमर्द जमला.

सारी अयोध्याच मुळीं आपल्या प्रियप्राणाच्या शोधासाठीं तेथें पोहोंचली होती. प्रभु रामचंद्रानें गुरु आणि मातांना यथोचित वंदन केलें. रामाला पाहतांच त्या तिन्ही आयांचें भावोन्मेष हृदयांचे बांध तोडून वाहूं लागले. वसिष्ठानें सर्वांचें सांत्वन केलें.

रामानें पित्याला श्रद्धांजलि अर्पण केली. नंतर आपल्या माता आणि गुरुजनांबरोबर वनभोजन केलें. रामकुटीच्या समोर एक अंगण होतें; त्यांत सभा भरली.

" भरता, आतां काय आहे तुझी इच्छा ? बोल ! " राम.

" आणखी काय इच्छा ? अकंटक राज्य मिळालें. आणिक काय असणार माझी इच्छा ? " भरताचें शरीर आणि शब्द कांपत होते. " दुर्दैव माझें रामा, माझ्याच आईच्याकारणें हें अपयश माझ्या वाटे आलें. तुला वनवास ? रामा, माझें कशाला विचारतोस ? मी तर आज आत्मविन्मुख झालों आहें. तुझीच काय इच्छा आहे तें सांग ! "

रामानें भरताला ओढून हृदयाशीं लावलें; त्याच्या डोळ्यांतून जणुं गंगा-यमुना वाहूं लागल्या. जो जन्म देणाऱ्या जननीला कळला नव्हता तो भरतभाव रामाला उमगला होता. तो भरताला म्हणाला, " ऊठ आतां भरता, अयोध्येला जा आणि राज्य कर ! "

रामाचे ते शांत, स्वस्थ शब्द ऐकून कैकयी म्हणाली, " भरता, अपराधी मी. मला तुझें हृदय कळलें नाहीं हेंच खरें. पण महाराजांप्रमाणें मी आपल्या मुलाला गमावून कां वसूं ? माझें म्हणणें ऐका. रामा, डोंगराएवढें पाप केलें मी. आतां गप्प वसूं ? तिळभर पश्चात्ताप करूं देणार नाहीं तुम्ही मला ? ती मेली मंथरा काय करणार ? माझ्या मनांत अविश्वास उत्पन्न झाला; असूयेनें कीड लावली माझ्या दृष्टीला ; हृदयांत आग लावली लोभानें ! पण खरें सांगतें, विश्वास ठेवा. मी विचारतें, माझ्या रखरखत्या हृदयांत दुसरी कांहींच भावना नव्हती का ? माझ्या वात्सल्याचें मूल्यच नाहीं का ? तिन्ही लोक माझ्यावर थुंकतील. थूंकूं द्या खुशाल ! हवें तें म्हणा मला ! पण माझा एकच ठेवा हिरावून घेऊं नका. भरताचें मातृपद. रामा, इतकेंच एक वरदान दे मला ! लोक म्हणतात : " **माता न कुमाता–पुत्र कुपुत्र भलेहि** " विधात्यानें हें खोटे ठरविलें आहे. . .असो. मी वाईट माता असेन

पण माझा भरत कधींहि निंदाभाजन बनूं नये. मी कुमाता असलें तरी भरता-सारखा सुपुत्र मीच जगाला दिला असें म्हणोत सर्व ! दुर्दैव माझें, मला भरताचे भाव कळले नाहींत. केवळ मांसाच्या गोळ्यावर मी प्रेम केलें... आतां युगान्तापर्यंत एक कहाणी राहील... " रघुकुलांत सुद्धां एक अभागीण राणी झाली.. तिचें नांव कैकयी.. धिक्कार असो तिला. स्वार्थानें तिला अंध केलें. खुशाल करोत माझा धिक्कार... पण तेहि म्हणोत : **सो बार धन्य वह एक लालको माई। जिस जननी है जना भरतसा भाई॥** "

कैकयीचें बोलणें ऐकून सर्व स्तिमित झाले; सर्वांचीं हृदयें विरघळलीं; त्यांनीं मनोमन तिला दुष्टपणाची क्षमा केली. कैकयीला आपलें मातृपद मान्य झाल्याचें पाहून आनंद झाला. ती म्हणाली, " रामा, भरत माझा प्रिय आणि तूं भरताचा, तेव्हां तुम्ही दोघेहि माझेच. माझ्या नांवाला माझ्या कृतीनें कलंक लावला. पण मला आतां पश्चात्ताप होतो आहे. चूक लक्षांत आली. माझे सारे मोहपाश तुटले आतां. मी तीच पूर्वींची कैकयी बनलें आहें, तूं माझा राम नाहींस कां ? "

श्रीरामानें कैकयीला झालें तें सर्व विसरून जाण्यास विनविलें. अयोध्येला परतण्याचा आग्रह केला. ती ऐकेना. ती म्हणाली, " कौसल्या आणि सुमित्रा वाट पाहतील तुझी तेरा वर्षें पण मला काय आशा आणि समाधान त्यांत... आणि ही पहा माझी पोर उर्मिला... ती म्हणते, " अजून सुद्धां मी जिवंत आहें. आई, तुझ्या पायाची दासी बनून जगेन. "

कैकयीनें आपली आठवण ठेवली आहे हें पाहून उर्मिला अधिकच कष्टी झाली.

अशा रीतीनें मनोमालिन्य धुऊन काढणाऱ्या खूप गप्पागोष्टी झाल्या. भरतानें राज्यकारभार सांभाळण्याचें मान्य केलें आणि आलेली सर्व मंडळी अयोध्येस परतण्यासाठीं सिद्ध झाली.

सीतेच्या सांगण्यावरून लक्ष्मण कुटीरांत गेला तों एका कोपऱ्यांत त्याला उर्मिलेची आकृति दिसली. लक्ष्मणाला क्षणभर धक्का बसला. " ही खरोखर उर्मिला कीं, तिची छाया अशी त्याला भीति वाटली. तेव्हां उर्मिला त्याला पाहून म्हणाली,

**मेरे उपवन के हरिण, आज वनचारी।**
**मैं बाँध न लूँगी तुम्हें– तजो भय भारी ॥**

लक्ष्मण म्हणाला, "प्रिये, तूं माझ्या वहिनीची बहीण आहेस. तुझ्यायोग्य बनण्यासाठीं मला वनांत थोडी तपश्चर्या करून येऊं दे."

उर्मिला : "नाथ, किती किती सांगायचें होतें मनांत पण बोलतांच येत नाहीं. असो. माझा कर्मदोष. आतां इतकेंच म्हणतें कीं, ज्यामध्यें तुम्हांला संतोष होईल त्यांतच माझें सुख."

**सर्ग ९:**–रामानें वनाचें तपोवन केलें. सीतेनें गहनकाननांत नंदनवन समजून दिवस काढले, भरतानें राजभवनांत वनाचें व्रत घेतलें; आणि उर्मिला बिचारी आपल्या उपवनांतसुद्धां वनासमान समजूं लागली. मनोमंदिरांत पतीची प्रतिमा ठेवून ती सतत जळत राहिली ; उपभोग तिनें विषासारखे त्यागले ; अलंकार बोचणाऱ्या काटयासारखें काढून फेकून दिले; दिवसरात्र विलाप करीत उर्मिला आपल्या पतीच्या वनवासाचा शिल्लक काळ मोजीत असे. प्रेमाचे आणि वियोगाचे सारे विचार येऊन ती विव्हल होई. पतंग आणि दीप, चंद्र आणि चांदणें, निद्रा आणि स्वप्न सर्वच रूपकें तिच्यासमोर उभीं राहत आणि त्यांतून हातीं येई केवळ उद्वेग. निद्राच मुळीं नाहीं तर स्वप्नें कोठून? आणि स्वप्नांत प्रियसंग कोठला? चातकी रडत होती ; ऋतु एकामागून दुसरा येई आणि जाई. पृथ्वी चौदा वेळ चक्कर खाईल तेव्हां कोठें उर्मिलेचा प्रियकर तिला भेटणार होता! ती मोठयानें मनाला विचारी, "माझा प्रियकर मला विसरून त्रिभुवनांत हिंडत आहे ; मी मागूं तरी काय? हे भगवंता, मला त्यांचा विसर न पडो इतकेंच दे मला. **लक्ष्मी पाण्यांत डुंबूनसुद्धां वांचते; सती अग्नींत उडी टाकून सुद्धां जळत नाहीं ; आणि उर्मिला . . . घरींच राहून सर्व सहन करते. प्रतीक्षा करीत अजून जिवंत राहिली आहे** . . . . हें माझें रडणेंच गाणें आहे" (सबंध ९ वा सर्ग उर्मिला-विलाप आहे)

**सर्ग १० :**– उर्मिलेला बाळपणापासून आपल्या जीवनांतील गोड प्रसंग आठवतात. आणि प्रत्येक वेळीं ती त्या कथेंतून सद्यःस्थितीकडे वळते. लक्ष्मण आपणांस सोडून गेला. तो घरीं राहिला असता तर लोक काय म्हणाले असते? पहा किती स्त्रैण आहे हा भाऊ? ती आपलें समाधान करते. विरहकाळ सरला आहे.

**सर्ग ११ :–** रामाच्या पादुकांचें पूजन करीत, राजधानीच्या वेशीवर निवास करीत भरत राज्यकारभार करीत आला. चातकाला आठ महिनेच घनाची वाट पाहावी लागते, पण भरतानें १४ वर्षें घनःश्यामाची वाट पाहिली. एकदां मांडवी भरतापाशीं आली व तक्रार करूं लागली : " रामाला अयोध्येला परतण्यापासून कोण थांबवील" असें सांगून मी तिन्ही आयांना जेऊं घातलें ; पण ही उर्मिला, आज घोटभर पाणीसुद्धां पाजूं शकलें नाहीं तिला. याच वेळेस शत्रुघ्न येतो. राम-लक्ष्मणाच्या साहसपूर्ण पराक्रमाच्या ऐकूं आलेल्या कथा तो सांगतो. यानंतर एकाएकीं हनुमान उपस्थित होतो. तो उत्तरेकडून औषध घेऊन दक्षिणेस चालला होता. " सीतेला रावणानें पळवलें; तिचा शोध लंकेंत लागला ; तिला मिळविण्यासाठीं रावणाशीं युद्ध चालू आहे आणि लक्ष्मण शक्ति लागून मूर्च्छित पडला आहे. त्याच्यासाठीं ही औषधि घेऊन चाललों आहें " असें त्यानें साद्यंत वृत्त सांगितलें; आणि तो दक्षिणेकडे निघाला.

त्या विचित्र वृत्तानें खवळलेली साकेत जनता लंकेवर चढाई करण्यासाठीं सिद्धता करते. पतीच्या साहाय्यासाठीं वीरपत्नी उर्मिलासुद्धां शस्त्रसज्ज होऊन येते. त्या क्षणीं तिच्या रूपानें जणुं भारतमाताच साक्षात् समोर उभी आहे असें वाटतें. उर्मिला त्या वेळेस जें बोलते तो पीडित स्वदेशाचा संदेश आहे. देशाच्या रक्षणार्थ, भारतमातेच्या जयजयार्थ, देशवासीयांना उत्स्फूर्त करणारें काव्य आहे तें.

त्यानंतर राम-लक्ष्मणाच्या चिंतेनें सारी प्रजा आणि आप्त पुढें काय झालें हें जाणण्यास अति उतावळे झालेले आहेत, पण तें कळायचें कसें? म्हणून वसिष्ठ आपल्या अद्‌भुत योगसामर्थ्यानें राम-रावण युद्धाचा चित्रपट साकेत जनतेला दाखवितात. घरांत बसल्या बसल्या त्यांना मेघनादवध, रावण-हनन वगैरे सर्व कांहीं पहायला मिळतें. आणि राम-लक्ष्मण सीतेसहित अयोध्येच्या वेशीपर्यंत येऊन पोहोंचतात.

**सर्ग १२ :–**राम-लक्ष्मण अयोध्येस परतले; त्यांना भेटण्यासाठीं सर्व सोत्सुक हंसतमुख अलंकार-आभूषणांनीं नटून-सजून तयार होतात. अयोध्येचा राजा, १४ वर्षांनीं राजधानीस परतला, यापेक्षां आणखी कोणती असणार आनंद-दायक गोष्ट ? भरताच्या भक्तीला उधाण आलें; कौसल्यादि मातांच्या आनंदानें त्यांना अवाक् केलें; आणि उर्मिला ? तिची मति अवर्णनीय अशी होती.

उर्मिलेच्या सखीनें म्हटलें: तुला विरहानलांत भाजत ठेवणारा तो अपराधी आज येईल आणि तुझें दैन्य जाईल. काल रुदन करीत होतीस आतां *आजपासून गान बरें का? . . . त्याला भेटण्यासाठीं मी शृंगार आणतें तुझे.*

उर्मिला : " शृंगार? शृंगार कशाला? आतां का मला शृंगार शोभतील? आणि वस्त्रशृंगारावरच कां ते मोहतील? सखी, तें मी "दग्ध-वर्तिका" नांवाचें चित्र काढलें. त्यांतल्या जळून खालीं पडलेल्या वातीला का तूं आतां उभी करूं शकशील? "

सखी : "म्हणून काय तूं अशा वेशांत त्यांच्यासमोर जाणार? तुला पाहून त्यांना किती दुःख होईल? हा कोणता तुझा राग? सूर्योदय झाला, पद्मिनी, कां खुलत नाहीं?"

उर्मिला : "सखे, विरह रडण्यांत गेला. मीलनांतसुद्धां का मी रडूं? मला कांहीं नको. केवळ पाय धुवायचे आहेत अश्रूंनीं! पण डोळ्यांत पाणी नाहीं ग! फोडले तरी एक थेंबसुद्धां सांपडणार नाहीं. २।४ फुलें आण, पुरे तीं वनवासीच्या स्वागतासाठीं." लक्ष्मण आला. उर्मिला त्याच्या पाया पडली. लक्ष्मणानें तिला उचलून कुरवाळून घेतलें. उर्मिलेची शरीरलता कांपत होती. शुष्क डोळ्यांतून अश्रुवर्षाव झाला. मेघनादाची शक्ति सहन करणारी लक्ष्मणाची छाती द्रवूं लागली आणि तिला पाहून राम म्हणाला, "उर्मिले –

**'तूने तो सहधर्मचारिणी के भी ऊपर ।**
**धर्म स्थापन किया भाग्यशालिनी इस भू पर ॥'**

******

* ६ *

# ॥ कामायनी ॥

■ ■

## जयशंकर प्रसाद

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धीत जीं थोडीं महाकाव्यें भारतांत रचलीं गेलीं. त्यांत श्री. जयशंकर प्रसाद यांचें 'कामायनी' हें सर्वोत्कृष्ट ठरेल. अति प्रगल्भ आणि प्रगत समजल्या जाणाऱ्या बंगाली, तामीळ, मराठी या भाषांचें सारस्वत सुन्दर साहित्य पुष्पांनीं बहरलेलें आहे. या भाषांचा संसार मोठा विस्तृत समजला जातो. परन्तु अशा बहुरत्नप्रसवा भाषांच्या कुशींत भारतीय मान्यता प्राप्त करून घेणारें असें एकहि महाकाव्य या पन्नास वर्षांत जन्माला आलें नाहीं. 'वैनतेया'ची प्रतिभा महाकाव्य रचनेस निःसंशय समर्थ होती, परन्तु त्यांना आपली काव्यप्रतिभा स्वातन्त्र्ययज्ञाच्या होम मन्त्रगायनांतच लावावी लागली, दिगन्तकीर्ति रवींद्रांनीं महाकाव्यरचनेची इच्छा असूनहि ती असम्भव कशी ठरली हें लिहून ठेवलें आहे. आपल्या 'क्षणिक' या कवितेंत ते हळहळतात,

आमी नब महाकाब्य, संरचने, छिल मने,–ठेकल करवन
तोमार कांकना किंकिणीते कल्पनाटि गेल फटि।
हजार गीते महाकाब्य सेई अभाव्य दुर्घटनाय
पायेर काछे छेडिये आछे, कणाय कणाय।
आमी नब महाकाब्य संरचने छिल मने।

रवीन्द्र म्हणतात, "माझ्या मनांत नव महाकाव्य रचावें असें फार होतें परंतु तुझ्या कंकणकिंकिणीत स्वरांनीं माझी कल्पना सहस्र गीतांत फुटून गेली. या दुर्घटनेमुळें माझ्या महाकाव्याचे कणकण होऊन तुझ्या चरणांवर सड्यासारखे विखुरले. माझी महाकाव्य-रचनेची इच्छा मनांतच राहिली."

रवीन्द्रांची आणि वंगभाषेंतील ही अवस्था; मग दुसऱ्या अप्रगत भाषा-भगिनींची काय कथा ! पण आश्चर्य हें कीं, जिला आपण मागासलेली समजून अवहेलना करतों त्या हिंदी भाषेंत गेल्या, अर्धशतकांत खरोखरच नांव घेण्यासारखीं बरींच महाकाव्यें रचलीं गेलीं आहेत. 'प्रिय प्रवास', 'साकेत' 'कामायनी','यशोधरा','अंगराज','एकलव्य','कुरुक्षेत्र' व 'पार्वती' हीं त्यांमधील कौतुकास्पद ठळक नांवें आहेत. 'कामायनी' हें तर हिंदी भाषेंतीलच नव्हे तर जागतिक साहित्यांत एक उत्कृष्टतम महाकाव्य ठरण्यासारखें आहे.

हिन्दी महाकाव्यांची परंपरा चन्द कवीच्या पृथ्वीराज रासोपासून सुरू झाली. एकोणिसाव्या शतकापर्यंत हिंदींत भक्ति आणि रीतिकालांत अनेक महाकाव्यें रचलीं गेलीं. त्यांत तुळशीदासाचें 'रामचरितमानस' हें अमरकाव्य निपजलें. विसाव्या शतकांत हिंदी भाषेंत महाकाव्य-रचनेचा आरंभ 'प्रिय प्रवासा'नें केला. त्यानंतर झालें 'साकेत'. कृष्ण आणि रामकथांवर लिहिलेलीं काव्यें लोकप्रिय होतात यांत आश्चर्य नाहीं. 'कामायनी'चा विषय मात्र अगदीं अभिनव, अद्‌भुत आणि शाश्वत असा आहे. वेद वाङ्मयांतील एक छोटेंसें मौलिक आख्यान घेऊन कवीनें त्यावर संगीत, शास्त्र, कला यांचे कुशल संस्कार करून, मानवजातीला सदैव संदेहांत घुमवून संघर्ष करायला लावणाऱ्या कांहीं मानसिक प्रवृत्तींची उकल कशी व्हायला पाहिजे हें सुरम्य रीतीनें दाखविलें आहे.

'कामायनी' हें एक युगकाव्य आहे असें मानण्यांत यत्किंचित् अतिशयोक्ति नाहीं. १९३७ सालीं 'कामायनी' प्रकाशांत आली व तिचा पिता प्रकाशापलीकडे गेला. तेव्हांपासून या अभिनव कलाकृतीनें हिंदी जगतास इतकें मोहून टाकलें आहे कीं, 'रामचरितमानस' जसें सर्वांचें तसेंच 'कामायनी' सुशिक्षितांचें प्रिय काव्य ठरलें.गेल्या २०-२२ वर्षांत 'कामायनी'-वर अगणित परीक्षण-ग्रन्थ आणि प्रबन्ध लिहिले गेले आहेत. प्रतिवर्षी 'कामायनी' साहित्यांत वाढ होत आहे. कामायनीचे अनुवाद अनेक भाषांतून झाले आहेत. नुकतीच रशियन भाषावेषांत 'कामायनी' अवतरली. 'कामायनी' व 'प्रसाद' यांवर लिहिलेल्या ग्रंथांची संख्या फारच मोठी आहे. एका हलवायानें लिहिलेलें महाकाव्य आज विश्वविद्यालयांतील साहित्यांच्या सर्वोच्च

परीक्षाश्रेणीपर्यंत अभ्यासविषय बनलें आहे. कारण 'कामायनीं'त आविष्कृत केलेला विषयच असा शाश्वत मोलाचा आहे.

कर्म आणि संन्यास, सुख व दुःख, साधन व साध्य, हिंसा आणि बलिदान, कारण आणि उद्देश अशा मानवी जीवनमरणाशीं संबंधित असलेल्या मूलगामी कूटरहस्यांचें व त्यांच्या उकलींचें सम्यक् दर्शन कवीनें या महाकाव्यांत आपल्या अभिजात कलाकुसरीनें रसिकांच्या समोर घडविलें आहे. शब्द, अर्थ, स्वर, ताल, नृत्य, संगीत, कथाप्रामाण्य आणि तिचें रचनाप्रमाण, तसेंच पार्श्वभूमि, छाया आणि प्रकाश यांच्या अत्यंत प्रभावी योजनेनें सच्चित् आनंदाचा रमणीय साक्षात्कार करून देणारी ही आहे 'कामायनी'. तिचा मी आपणांस आज परिचय करून देणार आहें.

कालिदासाचें 'शाकुंतल', शेक्सपियरचें 'हॅम्लेट', मिल्टनचें 'पॅरॅडाइज लॉस्ट', गटेचें 'फाऊस्ट' इत्यादि विश्वसाहित्यांतील अमर काव्यकृतींच्या पंक्तींत जाऊन बसणारी आहे ही 'कामायनी'. कामायनीच्या प्रकाशानें प्रसादांना यथावश्यक कालानंतर महाकवींच्या प्रासादांत मानाचें अढळ स्थान मिळणार आहे. जयशंकर हे हिंदीचे आधुनिक युगप्रवर्तक साहित्यसम्राट होऊन गेले. छायावादाचा सर्वांत मोठा पुरस्कर्ता म्हणजे प्रसाद. 'कामायनी' हें छाया-वादाचें अति रमणीय उदाहरण आहे. मानवी मनांतील भावनांच्या छाया, प्रकृतीच्या पटलावर कशा रंगतात तें 'कामायनीं'त सुंदर पहायला मिळतें.

मी म्हटलें आहे कीं, 'कामायनी'वर आजपर्यंत महान् आचार्यांनीं अनेक परीक्षणें लिहिलीं आहेत. कामायनींतील गुणवैशिष्ठ्यांची चिकित्सा त्यांनीं केली आहे. माझा उद्देश केवळ 'कामायनी'ची आपणांस ओळख करून देणें हा आहे. तेव्हां त्या चिकित्सकांच्या अथवा माझ्याहि दृष्टीनें 'कामायनीं'तील गुण-दोष न सांगतां तिलाच आपल्यासमोर उभी करणें योग्य होईल. पण त्या-पूर्वीं 'कामायनी'चे जनक श्री. जयशंकर प्रसाद यांची थोडीशी तोंडओळख करून देतों. म्हणजे तेच सांगतील दोन शब्द आपल्या या कविताकन्येविषयीं. मग आपण प्रत्यक्ष पहा व ठरवा कीं या 'कामायनी'ला मराठी साडी चोळी पेहरवून आपलीशी कां करून घेऊं नये ?

श्री. जयशंकर प्रसाद यांचा जन्म एका प्रतिष्ठित शिवभक्त घराण्यांत संवत् १९४६ माघ शुक्ल द्वादशीस झाला. 'संघनीसाहु' म्हणून नांवाजलेल्या

त्या वैश्य घरांत प्रसादांच्या आजोबापासून लक्ष्मीनें आपला तळ ठोकला होता. प्रसादांच्या जन्मकाळीं तर हें घराणें अत्यंत सधन आणि दानशूर म्हणून प्रसिद्ध होतें. प्रत्यक्ष काशी-नरेशाच्या खालोखाल साहु शिवरत्न यांची त्या काळीं मान प्रतिष्ठा लोकमान्य झाली होती. या वश्य हलवाई साहु कुटुंबांत लक्ष्मी आली ती मात्र जर्दा, सुरती आणि तम्बाकूच्या व्यापारानें. साहु शिवरत्नांचे चिरंजीव देवीप्रसाद यांनीं वडिलांची प्रतिष्ठा चालू ठेवली. त्यांचाच दुसरा मुलगा म्हणजे आपला कवि जयशंकर प्रसाद.

सोन्याच्या ताटांत दूधभात खाण्याचें ऐश्वर्य असलेल्या जयशंकर बालकाचे काय काय लाड झाले असतील तें त्यांनीं सांगून ठेवलें आहे. त्या काळच्या घरंदाज कुटुंबांतील मुलांचीं शिक्षणें घरगुती करण्याचा परिपाठ असल्यामुळें प्रसाद शाळेंत फारच थोडा काळ गेले. घरीं मात्र हिन्दी, संस्कृत आणि इंग्रजीचा त्यांचा अभ्यास करवून घेण्यांत आला होता. मोठेपणीं त्यांनीं या भाषांतील इतिहास, साहित्य आणि तत्त्वज्ञानांचा सखोल अभ्यास केला. क्रमागत असें शिक्षण आठव्या वर्गापर्यंत. तें बाराव्या वर्षींच थांबलें. या वर्षीं बाबू देवीप्रसाद यांचा स्वर्गवास झाला. कुटुंबाचा सारा भार मोठ्या भावावर होता. त्यांनीं प्रसादांच्या शिक्षणाची घरींच उत्तम व्यवस्था केली. संस्कृत विद्या, भारतीय संस्कृति आणि इतिहासपुराणांत प्रसादांना अतिशय गोडी लागली. आपलें सारें प्राचीन साहित्य त्यांनीं वाचून काढलें.

वडिलांच्या मरणानन्तर तीन वर्षांनीं प्रसादांची आई वारली आणि अवघ्या दोन वर्षांत त्यांचे मोठे बंधूहि गेले. सतराव्या वर्षी प्रसादांच्या खांद्यावर मोठ्या घराण्याचा आणि गुंतागुंतीच्या व्यापाराचा व्याप येऊन पडला. वडील आणि मोठ्या बंधूंनीं आपलें दानव्रत चालविण्यासाठीं खूप कर्ज करून ठेवलें होतें. प्रसादांनीं सारा प्रसंग ओळखून सर्व व्यवहार आपल्या हातीं घेतले. घराण्याच्या इभ्रतीस संभाळून हळूहळू कर्ज फेडीत ते संसार चालवूं लागले होते. परन्तु —

संसाराच्या संघर्षांत कोमल कविमन कोमेजून न जातां हिन्दी साहित्यांतील प्रत्येक विभागांत अति रमणीय रचना कसें करूं शकलें हेंच आश्चर्य आहे. घराण्याचीं कर्जें, व्यापारी मन्दी, दयादानाचा गृहकलह, हें सर्व स्थितप्रज्ञ होते म्हणूनच प्रसाद सहन करूं शकले. दुसरा कोणीहि त्या भाराखालीं

मोडून पडला असता. यांच सुमारास प्रसादांच्या दोन्हीं पत्नींचा अंत झाला आणि ते एकाकी बनले.

प्रसाद अगदीं लहानपणापासूनच कविता लिहूं लागले यांत आश्चर्य नाहीं. जन्मानेंच ते कवि होते. अन्नप्राशन संस्काराच्या वेळीं, असें सांगतात कीं, या बालकासमोर अनेक सुंदर मोहक वस्तु ठेवल्या होत्या. त्यांपैकीं त्यानें नेमकी लेखणीच उचलून घेऊन आपल्या जीवनरुचीचा जणुं संकेत देऊन ठेवला होता. पंधराव्या वर्षांपासून प्रसादांची कविता प्रसिद्ध होऊं लागली. 'भारतेन्दु' या प्रसिद्ध पत्रांत इ. स. १९०५ पासून त्यांचें काव्य नियमित येऊं लागलें. त्या नन्तर त्यांनीं स्वतःच 'इन्दू' नांवाची मासिकपत्रिका इसवी सन १९०९ ते १६ पर्यन्त चालविली. या पत्रिकेंत प्रसादांचें पुष्कळच काव्य प्रसिद्ध झालें. पण याच सुमारास प्रसादांचा बराचसा वेळ घरच्या कटकटींत आणि दुकानांतलीं कामें यांमध्यें जाऊं लागला. लेखनास अवकाश असा मिळेना. तरीपण त्यांनीं आपल्या लेखणींतून उत्तमोत्तम काव्यें जमेल तशीं लिहून काढण्याचा उपक्रम चालू ठेविला.

जयशंकर प्रसाद हा काशीचा एक असाधारण व्यक्तिमत्वसंपन्न पुरुष होऊन गेला. प्रसन्नचित्त, सदैव हंसत गोरें मुख, निर्दोष साधी राहणी आणि वेष व त्यांत उठून दिसणारें प्रसादांचें कमावलेलें शरीर, बाहेर पडतांना हातांत छडी घेऊन प्रसाद हलतडुलत मित्रांबरोबर जातांना दिसत. प्रसादांचा मित्रपरिवार फार मोठा. पण आपलें दुकान सोडून सभा-संमेलनांना ते क्वचितच जात असत. कधीं काळीं एखादा नामवंत वक्ता नगरांत आला तर मात्र प्रसाद न चुकतां त्याच्या व्याख्यानाला जात. मंदिर, फुलबाग काणि आखाडा हीं प्रसादांचीं तीन अत्यंत आवडतीं ठिकाणें. घराच्या आवारांतच त्यांची फुलबाग होती आणि फुलबागेंतच मंदिर व आखाडाहि होता. प्रसाद परम शिवभक्त होते.

आतीव आपत्तींशीं झगडतांना या प्रतिभासंपन्न कवीनें आपल्या अल्पशा आयुष्यांत इतकें कौतुकास्पद साहित्य निर्माण केलें आहे हें ऐकून आपणास आश्चर्य वाटेल. प्रसादांची काव्यप्रतिभा सर्वंकष होती आणि काव्यशक्ति सदैव जागृत आणि शीघ्र असे. सन १९२१ मध्यें प्रसाद जगन्नाथपुरीला गेले असतांना प्रथम समुद्रदर्शन घेतलें तेव्हां त्यांनीं तीरावरच ज्या काव्यपंक्ति

लिहिल्या त्या हिंदी साहित्यांत सुप्रसिद्ध ठरल्या आहेत. सावरकरांच्या ' सागरा प्राण तळमळला ' या कवितेशीं त्यांचें साम्य पाहणें मोठें मनोरंजक आहे. प्रसाद लिहितात, "ले चल वहाँ भुलावा दे कर मेरे नाविक धीरे धीरे।"

प्रसाद स्वतः संगीत आणि चित्र या कलांचे मार्मिक होते. आणि म्हणूनच त्यांच्या काव्यांत पंक्ति पंक्तीला शब्दचित्रांचे जणु चित्रपटच उभे राहतात. प्रसादांची सर्वच कविता गेय, नादमधुर आहे. पण ' कामायनी 'मधील प्रत्येक गीतांत जें गानमाधुर्य सांपडतें तसें गानमाधुर्य इतर हिंदी काव्यांत क्वचितच आढळतें.

प्रसादांच्या साहित्यरचनेचा केवळ नामनिर्देशच करणें शक्य आहे येथें.

कविता –चित्राधार, करुणालय, प्रेमपथिक, महाराणाका महत्त्व, कानन-कुसुम, झरना, आँसू, लहर, आणि कामायनी.

नाटक –सज्जन, कल्याणी परिचय, प्रायश्चित्त, राज्यश्री, विशाखा, अजात-शत्रु, जनमेजय का नागयज्ञ, कामना, स्कन्धगुप्त, एक घूंट, चन्द्रगुप्त व ध्रुवस्वामिनी.

कहानी –छाया, प्रतिध्वनि, आंधी, आकाशदीप व इन्द्रजाल.

उपन्यास –कंकाल, तितली व इरावती.

चंपू –उर्वशी आणि प्रेमराज.

प्रसादांच्या किरकोळ लेखनाचा आढावा घेणें शक्य नाहीं. हिंदी साहित्यांत उपन्यास आणि लघुकथा यांचाहि अत्यंत यशस्वी प्रारंभ जयशंकर प्रसादांनींच केला. प्रसादांचीं नाटकें हीं अतिशय प्रभावी उतरलीं आहेत. प्रसादांच्या मतें आधुनिक युगांत भारतीय युवकांचा आदर्श वैदिक इन्द्रच होऊं शकतो. त्यांना इन्द्रावर महाकाव्य रचायचें होतें. पण काळानें अवेळीं त्यांना बोलावून घेतलें. इन्द्राच्या कल्पनेंतूनच अवतरलेली ' कामायनी ' ही मात्र जन्माला आली; आणि तिचा जनक जयशंकर प्रसाद वयाच्या पंचेचाळिसाव्या वर्षी सन १९३७ मध्यें दिवंगत झाला.

प्रसाद अधिक जगते तर ते रवींद्रांसारखी कीर्ति कमावून जाते. त्यांनीं जी काव्यकृति मागें ठेवली आहे ती जसजशी अधिकअधिक लोकांना परिचित होईल, तसतसें त्यांचें महत्त्व जगाला मान्य होईल. प्रसादांना ' कामायनी 'च्या विषयीं काय सांगायचें आहे हें ऐकूनच तिकडे वळूं.

" आर्य साहित्यांत मानवाचा आदिपुरुप जो मनु त्याचा इतिहास, वेद पुराण आणि ऐतिहासिक वाङ्मय यांत विखुरलेला सांपडतो. श्रद्धा आणि मनु यांच्या साहचर्यातून मानवी संस्कृतीचा विकास झाला ही वैदिक कथा. पण ती केवळ एक रूपक आहे असें मानण्याची परिपाठी निरुक्तकारानंतर पडली. मुळांत मन्वन्तर अर्थात् नवयुगाचा प्रवर्तक म्हणूनच मनूला वैदिक आर्य मानीत असले पाहिजेत हें निःसंशय. वैवस्वत मनु हा ऐतिहासिक पुरुष होऊन गेला असें मानणें हेंच उचित आहे. गाथा आणि इतिहास यांतील अंतर प्रायः लोकांना मिथ्या आणि सत्य इतकेंच वाटतें, परंतु सत्य तर मिथ्यापेक्षांहि विचित्र असतें. प्रथम युगांतील मानवाच्या प्रत्येक गटानें ज्ञानोदयाच्या प्रभातकाळीं जें भावपूर्ण इतिवृत्त संग्रहित करून ठेवलें त्याला आज गाथा व पुराणें असें म्हटलें जातें आणि बाजूला सारलें जातें. त्यांत कांहीं घटना अतिरंजित असतील. मधेंमधें भावनांची अतिशयोक्ति असेल, तार्किक बुद्धि अशा घटनांना रूपक समजते. पण हें मानणें अपरिहार्य आहे कीं त्यांत सुद्धां कांहीं सत्यांश असलाच पाहिजे.

" श्रद्धा आणि मनु अर्थात् मनन यांचें साहचर्य म्हणजे एक रूपक आहे असें मानलें तरी किती भव्य, भावनामय आहे तें? कदाचित् त्यांत मानवाच्या मनोविज्ञानाचा सारा इतिहास सांपडेल. सत्य म्हणजे घटना, तिथिक्रमवार घटना असें आपण आज म्हणतों. पण इतक्यानें संतोष होतो का? घटनेच्या मागील मनोव्यापार, हेतु, रहस्य आपण शोधतों. आत्म्याची अनुभूति, सूक्ष्म अनुभूति अथवा भाव – जे चिरंतन सत्याच्या रूपानें प्रतिष्ठित असतात, ज्यामुळें युगांयुगांतून पुरुषोत्तमांचे अवतार आणि पुरुषार्थाचा आविष्कार होतो – तें खरें सत्य !

" जलप्रलय भारतीय इतिहासांतील अशीच एक अद्भुत घटना आहे. यांत मनूला देवाहून भिन्न अशी मानवी संस्कृतीची प्रतिष्ठापना करण्याचा सुयोग आला हा इतिहास आहे. शतपथ ब्राह्मणाच्या आठव्या अध्यायांत "मनवे वै प्रातः" असा प्रारंभ करून मनु आणि त्याचा मासा व तो जलप्रलय ही कथा सांगण्यांत आली आहे. देवांचा उच्छृंखल व अनिर्बंध आत्मसुख हा अंतिम अध्याय होता. त्यानंतर मानवीय भाव अर्थात् श्रद्धा आणि मनु यांचा समन्वय होऊन एका नवयुगाचा प्रारंभ होतो. या युगान्तराचा प्रवर्तक मनु

झाला. म्हणूनच मनूला आपण आदिपुरुष मानतों. शतपथ ब्राह्मणांत मनूला "श्रद्धादेवो: वै मनु:" असें म्हटलें आहे. भागवत सांगतें :

ततो मनु श्राद्धदेवः संज्ञायामास भारत।
श्रद्धायां जनयामास दशपुत्रान् स आत्मवान् ॥ ९ ॥ ११॥

छांदोग्य उपनिषदांत मनु आणि श्रद्धा यांच्या भावमूलक व्याख्या अशा आहेत. "यदा वै श्रद्धधाति अथ मनुते नाऽ श्रद्दधन् मनुते." ऋग्वेदांत श्रद्धा आणि मनु यांचे निर्देश ऋषीसमान आहेत. सायणाचार्य म्हणतात, "कामगोत्रजा श्रद्धानामार्षिका" म्हणून श्रद्धेला कामायनी असें दुसरें नांव आहे. मनु हे मानव जातीचे पहिले पथप्रदर्शक व अग्निहोत्र रूपानें कर्मचक्राला गति देणारे समजले जातात.

जलप्रलयाचें वर्णन शतपथांत सांगितलें आहे तें असें: मनूच्या माशानें तारलेली नाव उत्तरगिरी हिमवान प्रदेशांत पोहोंचते. प्रलय ओसरल्यावर गिरिशिखरावरून मनु खालीं उतरले. त्या स्थानाला 'मनोखसर्पंग' असें म्हणतात. श्रद्धेची भेट झाल्यावर शून्य झालेल्या मानव कुळाला वसविण्याचा प्रारंभ होतो. प्रलयांत वांचलेले असुर पुरोहित मनूला भेटतात आणि यज्ञ करण्याचा आग्रह करतात. त्या यज्ञांत पशूचें बलिदान दिलें जातें. किलात व आकुली यांच्या आग्रहास्तव मनूनें पशुयज्ञ उरकला, सोमपान केलें आणि त्याची पूर्वपरिचित देवप्रवृत्ति जागी झाली. या वेळीं श्रद्धेच्या खेरीज इडा म्हणजे बुद्धि मनूसमोर विलोभनीय अशा स्वरूपांत नाचूं लागली. ही इडा यज्ञहवीं-तून उत्पन्न व पुष्ट झाली होती. पूर्णयोषितेच्या रूपांत मनूसमोर ती उभी राहिली, तेव्हां मनूनें तिला विचारलें, "का असि?" इडा म्हणाली, "तव दुहिता!" मनूनें परत विचारलें, "कथं भगवती मम दुहिता?" इडा म्हणाली, "यज्ञांत तुम्हीं अर्पण केलेल्या दहीं, दूध, घृतावर माझें पोषण झालें आहे. म्हणून मी तुमची दुहिता."

इडा समोर आल्यावर मनु तिच्याकडे अधिकाधिक आकर्षित झाला. श्रद्धेला त्यानें मागें सारलें. इडा ऋग्वेदांत अनेक ठिकाणीं आढळते. ती मानवाची पथप्रदर्शक आहे असें म्हटलें आहे. "इडा अतृण्वत् मनुषस्य शासनीम्"। (ऋग्वेद १. ३१, ११)। "इडा मनुश्वदिह चेतयन्ति" (ऋग्वेद १०. ११०. ८)। या मंत्रांतून मध्यमा, वैखरि आणि पश्यन्ति या तीन

वाग्देवतांची प्रतिनिधि जी भारती सरस्वती तिच्याबरोबर इडा येते. अर्थात् सरस्वती आणि बुद्धि यांचें साहचर्य सहजच आहे. अमरकोशांत सुद्धां इडा शब्दांचा लौकिक अर्थ बुद्धि असाहि एक आहे. आयुर्वेदांतहि इडा म्हणजे ज्ञानवाहिनी नाडी समजली जाते.

बुद्धीचा विकास राज्यशासन, समाजव्यवस्था आणि धर्मशास्त्र इत्यादि इडेच्या प्रतिभेनेंच मनूनें निर्माण केलीं. मानव समाजाला संघटित नियमबद्ध बनविल्यावर त्या समाज-नियामकानेंच आपली दुहिता समजल्या जाणाऱ्या इडेवर बलात्कार करण्याची चेष्टा केली. परिणामीं मनु देव व प्रकृति यांच्या क्षोभास पात्र झाला. "तद्वैदेवानां आग आस" (शतपथ ७. ४)। या अपराधाचा दण्ड त्याला भोगावा लागला. इडा देवांची बहीण होती. मानवाला चेतना-प्रदान करणारी होती. यज्ञामध्यें इडाकर्म म्हणजे अग्नि चेतवणें हें महत्त्वाचें कार्य असतें. इडा ही अर्थात् मनु आणि श्रद्धा म्हणजे मन व श्रद्धा यांमध्यें एक आडपडदा आणीत असते. बुद्धिवाद मनाला श्रद्धेपासून दूर नेतो, सुखाच्या कल्पनांमागें धांवायला लावतो आणि दुःखांत ढकलतो. मनूनें, मानवानें बुद्धीच्या मोहक वादजालांत फसून न अडकतां श्रद्धेच्या मागोमाग जाण्यांतच सत् चित् आनंदाचा साक्षात्कार होऊं शकतो.

हें आख्यान इतकें प्राचीन परंपरागत आहे कीं त्यांतील सत्य इतिहास आतां केवळ रूपक आहे असें वाटतें लोकांना. पण मनु, इडा आणि श्रद्धा यांचें ऐतिहासिक अस्तित्व मान्य करून त्यांतून कोणी सांकेतिक अर्थ काढतों म्हणेल तर त्यांत आपत्ति नाहीं. मनु अर्थात् मनाचीं दोन्हीं अंगें हृदय आणि मेंदु याच अर्थीं मनूचा हृदयाश्रित श्रद्धा आणि मेंदूतील बुद्धि यांचा संबंध लागतो.

## चिन्ता सर्ग

हिमगिरिच्या उत्तुंग शिखेवर बसुनी शिलेच्या शीतल छायेंत।
एक पुरुष ओल्या नयनीं पाहात बसला प्रलय प्रवाह ॥

खालीं तरल जलतरंग, वर सघन हिम दृष्टि पोहोंचेपर्यन्त पसरलेलें होतें ; शिळेच्या पायाशीं प्रभंजन टकरा देत होता ; जलप्रलयाच्या लाटा त्या तरुण तपस्याच्या पायांशीं फुटून परतत होत्या.

प्रलयाच्या ताण्डवानन्तर हाच एकमात्र पुरुष मनु जलमग्न भूगोलावर जिवंत राहिला होता. प्रलयानें बुडविलेल्या धरणीला पाहून त्या मनूचें हृदय भीतीनें, उदासीनतेनें भरून गेलें होतें. हळूहळू प्रलयप्रवाह ओसरूं लागला; प्रभंजन शमला, धरणी वर येऊं लागली, वटवृक्षाला बांधन ठेवलेली नौका सुक्या जमिनीवर स्थिर झाली. सृष्टि हसूं लागली. पण एकलेपणाची जाणीव मनूला किती व्याकुळ करून राहिली आहे!

चिन्तेनें मनूचें मन खाऊन टाकलें आहे. अभावांतून निर्माण होणारी चिन्ता म्हणजे मानवाला मिळालेला मधुर अभिशापच आहे असें म्हणतात. मनूला मात्र काळजी लागली होती. "मानव मरेल काय?" याच एका चिन्तेनें मनूचें हृदय हळहळत होतें. "मानव जात समाप्त झाली काय?" हाच एक प्रश्न त्याला प्रतिक्षण अस्वस्थ करीत होता.

मनूच्या मनांत अतीव सुखाचीं चित्रें डोकावूं लागतात. तशाच भावी दुःखाच्या रेखा भयभीत करतात. भविष्य निराशापूर्ण वाटतें त्याला. "देवलोकांतील नृत्य, संगीत आणि विलास यांच्या मदांत दंग असतांना आपण पराजित झालों, प्रकृति दुर्जेय ठरली. विलाससागरांत डुंबणारें तें सर्व प्रलयानें बुडवून टाकलें. वैभव विलासांच्या त्या मर्मभेदक आठवणी आणि तो जलप्रलय, तो भीषण प्रभंजन, त्यानें स्वर्गीय सुखावर पाणी फिरविलें." मनूचें मन मुळूमुळू रडत होतें. त्याच्या अंगाअंगांतून हृदयाच्या व्यथा फुटून उठत होत्या. देवजातीचा तो उन्मत्त विलास, संगीत, नृत्य, आलिंगन, चुम्बन, सुगंधित वस्त्रप्रावरण, विश्वांतसुद्धां किती मधुर! देवांच्या स्वर्गांत सर्व सुखांचा संग्रह केंद्रित झाला होता. सर्वच स्वाधीन बल, वैभव, अप्रतिहत गति आणि अस्पर्ध सत्ता. मग सुखाच्या अनुभवांना आणि आनन्दाला सीमा कसल्या? कीर्ति आणि तेज, अरुणाच्या किरणांप्रमाणें दशदिशांना उजळीत होतें. त्या स्वायत्त देवांची शक्ति? प्रत्यक्ष प्रकृति त्यांच्या पायांपाशीं सेवा करण्यासाठीं अहोरात्र तत्परशी उभी होती. ते देव चालूं लागले कीं, त्यांच्या पदाघातानें धरणी सुद्धां कंप पावत असे. सर्वच त्या वेळीं देवसदृश झालेले होते. त्याच क्षणाला अकस्मात् आपत्तींची वृष्टि झाली. सर्व कांहीं विलयाला गेलें. मधुर सुरबालांचा शृंगार, वासनासरितांचा तो मदमत्त प्रवाह, सर्व कांहीं वाहून गेलें. विकल वासना आपल्या ज्वाळेंतच जळून गेल्या.

अमरता, अतृप्ति, अनिर्बंध विलास, कोठें गेलीं तीं सर्व ? रत्नसौधांच्या खिडक्यांत देवकामिनींच्या डोळ्यांतून जेथें नीलनलिनांची वृष्टि होत असे. तेथें आज पंचमहाभूतांनीं भैरवताण्डव केलें. जललाटा आकाशाला चुंबायला वर उसळल्या. विजांनीं अविरत नाच केले. पवन जणुं सृष्टीला उडविण्यासाठीं वाहूं लागला. ग्रह, नक्षत्र आणि तारे बुडबुडल्यासारखे तरंगतांना दिसले, उदधीनें अखिल धरणीला बुडवून एक वार आपल्या साऱ्या मर्यादा मोडून दाखविल्या.

अशा त्या प्रलयांत मनूची ती नाव, ना तिला सुकाणूं ना वल्हीं. तरल-तरंगावर ती नाव वेड्यासारखी डुलक्या खात होती. किती प्रहर, किती दिवस, किती मास तें ताण्डव चालू होतें हें कोण सांगणार ? मृत्यूनें भूगोलावर आपलें अधिपत्य किती दिवस गाजविलें हें सांगायलाच कोणी शिल्लक नव्हतें. मनूला वाटलें "अमरता मेली, मी राहिलों तो केवळ तिचा जर्जर दंभ !"

अशा नामशेष सुखाच्या आठवणींत मनूसमोर पसरलेला प्रलयकृत विनाश व एकाकीपणांत उत्पन्न झालेली निराशा ! मनु विफलतेनें व्याकुळ होऊन मुग्ध होऊन पडला. त्यांतच निद्रेनें त्याला घेरलें.

सोनेरी उषा जललक्ष्मीसारखी आपले अरुण किरण फेकीत उदयाचळीं आली. त्रस्त प्रकृतीचें विवर्ण मुख परत हसूं लागलें. आळसलेल्या वनस्पति जागूं लागल्या. वर आलेल्या सूर्याच्या चैतन्यप्रेरक किरणांनीं मनूला जागें केलें. मनु उठून बसला आणि परत तेंच मनन करूं लागला, "कोणीं ? कोणाच्या आज्ञेनें हीं सर्व भुतें व देवता ? प्रकृतीच्या शक्तीचीं हीं चिन्हें कोणीं गतिमान केलीं होतीं ? आम्ही तर देव नव्हतोंच. आम्ही तर परि-वर्तनशील पुतळे आहोंत. पण कोण आहे त्याच्या सत्तेसमोर ? हे अनल, अनिल, जल, हे ग्रह, नक्षत्र, सारें विश्व आणि त्यांतील कणकण नम्र होतात ? हे अनन्त रमणीय सर्वशक्तिमय, कोण आहेस तूं ? तूं कसा आहेस हें मला कळेल का ? नको, नको, या प्रश्नांचा भारसुद्धां माझ्या मेंदूला पेलवत नाहीं."

त्या हंसणाऱ्या सृष्टीला पाहून मनूच्या मनोमंदिरांत आशा अंकुरली. जगण्याची इच्छा त्याला कर्मव्यापारांत खेचूं लागली. 'मी आहें' या विचा-रानें मी जगावें अशी त्याला प्रेरणा दिली. जीवनाची लालसा त्याला कार्य-रत करूं लागली. त्यानें एकदां स्वतःच्या मनाला विचारलें, 'मला जगलें

पाहिजे ? पण जगून करायचें तरी काय ? देवा, मला मागें एकदां ही अमर वेदना घेऊन मरण केव्हां येईल ? '

मनूनें हिमगिरीच्या त्या शुभ्रशृंगांच्या एका विस्तृत व रमणीय अशा गव्हरांत आपल्या निवासासाठीं सुंदर स्थान निवडलें. पूर्वीच कोणीतरी चेतवून ठेवलेला अग्नि तेथें आढळला. जरा फुंकर मारतांच अग्नीची ज्वाळा भडकली. खालीं सागराच्या तीरावर मनूनें त्या प्रज्वलित अग्निदेवाचें अग्निहोत्र चालू केलें.

मनु आपला यज्ञ रोज नियमानें करूं लागला. यज्ञधूमानें अन्तरिक्षांत सुगंध पसरे. मनूच्या मनांत विचार आला, " आपण जसे वांचलों तसें आणखीहि कोणी नसेल का ? आश्चर्य काय त्यांत ? ईश्वराची लीला अगाध आहे."

यदाकदाचित् कोणी अपरिचित प्राणी वांचला असेल तर त्याला समाधान व सुख लाभो या इच्छेनें, यज्ञाहुति दिल्यावर राहिलेल्या अवशेषांतील कांहीं अन्नांश तो दूर जाऊन ठेवून येत असे. दुःखाचा गहन अनुभव आल्या-वरच सहानुभूतीचें मूल्य कळलें मनूला.

अशा रीतीनें दिवसामागून दिवस जात होते. मनु आपल्या यज्ञकर्मांत मग्न होता. सूर्य व चंद्र पृथ्वीच्या भोवतीं आपला लपंडाव खेळत होते. एकीकडे सृष्टीचा तो नवविलास पाहून मनूचें मन विकल झालें. त्याच्या हृदयांत कोठें तरी कसली तरी ओढ उत्पन्न झाली. तो म्हणाला, " आपल्या कल्पनांप्रमाणें जर विश्व बनलें तर तें किती सुंदर होईल! संवेदना व हृदय यांत संघर्ष झाला नाहीं तर अस्सलांचीं व असफलसांची गीतें कोणी गाइलीं असतीं का? पण काय उपयोग ? किती दिवस असा एकलेपण, जीवना सांग तूं. माझी कहाणी तरी मी कोणाला सांगू ? "

सायंकाळ होते. कामना सागरतीरावर तारांचे दीप घेऊन येते. कृष्ण-रजनी तिची सोनेरी साडी फाडून उपहास आरंभते. पण रात्रीच्या अंधकारां-तलें सर्वांत सुंदरतम रहस्य असा एक कांतिपूर्ण तारा उगवतो. जणुं व्यथित विश्वाला शीतल शांती देण्यासाठीं तो बिंदु नवरसानें सारा संसार प्रकट करीत आहे.

रजनी आली. पण कोठल्या कोपऱ्यांतून न कळे. या विश्वाच्या कमळाचें चुंबनपान करण्यासाठीं ती मधुकरी अवतरली आहे. पण वेडे, संभाळ, संभाळ, तुझा तो पदर सुटला कीं ! पहा ती मणिराजी त्यांतून निखळून पडत आहे ! काय ग, ए यौवनमत्ते, तुझें तें नीलवस्त्र फाटलें कीं, पहा, पहा, हें अकिंचन जगत् तुझ्या सौंदर्याची मजा लुटीत आहे. एकीकडे हें असें अतुल अनंत ऐश्वर्य ! पण असें काय हें वैराग्य दुसरीकडे कां हरवलेलें कांहीं शोधीत आहेस तूं ?

" माझें सुद्धां कांहीं तरी हरवलें आहे. काय तें स्मरत नाहीं मात्र. प्रेम, वेदना कीं भ्रांतीच आहे ही ? पण ज्यांत माझें मन सुख पावत असे असें कांहीं तरी होतें. ए रजनी, माझी वस्तु अचानक तुला सांपडली तर मला दे बरं का ! "

उद्विग्न, विकल आणि आतुर मनु एका शिळेवर बसला होता. त्याच्यासमोर एक सुंदर बाला सहजपणें पुढें आली. त्या एकान्त निर्जन प्रदेशांत मनूसारख्या सुंदर पुरुषाला उद्विग्नमुख पाहून ती बाला त्याला विचारते, " कौन तुम ?

संस्कृति–जलनिधि तीर
तरंगों से फेंकी मणि एक,
कर रहे निर्जन का चुपचाप
प्रभा की धारा से अभिषेक ? "

" हे तपस्वी, तूं तर मला जगाचें हरवलेलें रहस्य वाटतोस. हे कारुण मूर्ते, तूं सुंदर मौन आहेस कीं चंचल मनाचें आलस्य आहेस ? कोण, आहेस कोण तूं ? "

कोणातरी मधुकरीचा गुंजारव ऐकतांच मनूचें कमळमुख वळलें, त्याच्या शरीरांतून एक सहर्ष आश्चर्याचा झटका वाहून गेला. इतकें सुंदर शब्दगान कोठून आलें हें तो पाहूं लागला. त्याचें कुतुहल तरी मौन कसें राहणार ?

त्याच्यासमोर डोळ्यांना इन्द्रजालासारखे मोहून टाकणारें एक सुंदर दृश्य अवतरलें होतें. कुसुमोद्गमानें नवतीशीं नटलेली अशी कोणीतरी लतिकाच जणुं त्याच्यापुढें उभी राहिली असें त्याला वाटलें. घनश्यामाची चंद्रिका जितकी नेत्राकर्षक अथवा एखाद्या नवसालाची ( शालवृक्षाची ) सुगंधी

शोभा जशी मनोहारी तशीच वाटली ती विश्वाची कामनामूर्ति त्याला केवळ दर्शनानें जडांत सुद्धां चैतन्य प्रगट करण्याचें सामर्थ्य होतें तिच्यांत.

गांधार देशांतील नीलमेषाच्या रोमयुक्त चर्मानें तिनें आपली कांतवधु झाकली होती. पण त्यांतून कोमल वर्ण अधिकच मोहक बनलेले दिसत होते. निळचा आवरणांत कांतियुक्त विद्युल्लतेचें गुलाबी फूल मेघवनांत फुलावें तशीच होती सौंदर्यशोभा त्या मृदुल अर्घदृष्ट अंगाची, किंवा एखाद्या नील-गिरीच्या शृंगावर ज्वालामुखीची रमणीय ज्योत प्रगट व्हावी तशी ती सुंदरी त्या रात्रीं मनूसमोर उभी राहिली. कुरळे केस तिच्या खांद्यावर नाचत होते, जणुं लहान मेघांच्या नीलमाला चंद्राच्या सुधेसाठीं घिरट्या घालीत होत्या. कुसुमवनांत मंद पवनानें एकत्र केलेल्या परागपरमाणूंची गोडशी मूर्ति तर त्याच्यासमोर उभी नाहीं ना, असेंच त्याला वाटलें.

तिला पाहून मनु उत्तरला, " मी कोण? आहें एक निरुपाय जीवनाचें रहस्य. आकाश आणि भूमीच्या अंतराळांत जळत्या पळत्या उल्केप्रमाणें या शून्यांत असहाय भटकणारा आहें कोणीतरी ! आहें एक पाखण्ड हतभागी मी. शैल आहें मी, निर्झर बनला नाहीं माझा; ना हिमखंडाप्रमाणें वितळून जल-निधीच्या अथांग अंकावर लोळण्यासाठीं जाऊं शकतों मी. "

" मी ? व्यस्त जीवनाला सुधारण्याचा, समसम करण्याचा अभिमान धरणारा एक प्राणी आहें मी. हरवलेलें शोधीत एखाद्या अडाण्याप्रमाणें पुढें चाललों आहें.

" मी ? मी कोण हें काय सांगूं ! मी एक उद्भ्रान्त आहें. आकाशाच्या निळ्या अंतरंगांत वाऱ्याचा एखादा तरंग इतस्ततः तरंगत रहावा तसा आहें मी या शून्य उजाड राज्यांत भ्रमन्ति करणारा.

" मला वाटतें महान् विस्मृतीचा मी एक अचेतन स्तूप आहें; किंवा एखाद्या ज्योतीचें अंधुक प्रतिबिंब तर नाहीं? किंवा असेंहि समजा कीं जडतेची एक जीवनराशी आहें मी. पण खरें म्हणजे साकल्याचा संकलित विलंबच आहें मी मूर्तिमंत ! "

त्या अप्सरेच्या प्रश्नास शक्य तें उत्तर मनूनें दिलें. पण प्रश्न विचारणाऱ्या दिव्य नारीचें कमनीय सौंदर्य पाहून आनंद उत्सुक झालेल्या मनूची जिज्ञासा

मुखर झाली. त्यानें तिला विचारलें, " तूं कोण आहेस ? या रसहीन पत-झडीत ( हिंवाळयांत वृक्षाचीं पानें झडतात त्याला पतझड म्हणतात ) इतकी सुकुमार अशी तूं कोण ? वसंताची दूत तर नाहींस ? घनान्धकारांत विजेची कोर चमकावी अथवा असह्य तपनांत शीतल झुळुक वहावी तसें सुख देणारी तूं कोण उभी आहेस माझ्यासमोर ? आशेच्या किरणासाठीं कविहृदयांतील कोमलकांत कल्पनांच्या लहरीसारखी माझ्या मनांतील अस्वस्थता शांत करणारी तूं कोण अवतरलीस येथें ? "

बालिका : ' मी माझ्या वडिलांची आवडती मुलगी आहें. माझ्या मनांत आलें ललितकलांचें ज्ञान संपादन करावें. अमर्याद अशा या व्योमतलांत हिंड-ण्याची मला फार हौस आहे. म्हणून हिंडण्यासाठीं मी निघालें या हिमगिरी-वर. माझें नांव श्रद्धा. हिंडतां हिंडतां तेथें कोणा तरी भूतहितरतानें बलि अन्न ठेवलेलें मला दिसलें. मला वाटलें कोणीतरी सजीव प्राणी येथें राहत असला पाहिजे आणि तुम्ही दिसलांत. हे तपस्वी पुरुषा, तूं असा क्लान्त कां ? कसली वेदना तुझ्या हृदयांत आहे ? इतका हताश कां तूं ? कसला हा उद्वेग ? अशा कोणत्या वैषम्यानें तुझें मन आज स्पन्दित केलें आहे ? "

मनु : " काय सांगू मी ! जीवन किती अगतिक आहे याचा मला पूर्ण अनु-भव आला आज. आतां मुळींच शंका राहिली नाहीं आणि त्याचा परिणाम म्हणजे ही माझी निराशा आहे.

श्रद्धा: " वाहवा, इतके कसे अधीर झालांत तुम्ही ! जीवनाचा खेळ हर-लांत असें कां वाटतें तुम्हांला ? वीर पुरुष तर मरेपर्यंत जीवनाचा खेळ जिंकण्यासाठीं खेळत राहतात. जगण्याची नव आशा, आकांक्षा धरा ना ! हें पहा. शिळीं फुलें प्रकृतीचा शृंगार करीत नाहींत; प्रकृतीला पुरातनता तिळभरहि सहन होत नाहीं. नित्य नूतनतेंत खरा आनंद असतो. संसार युगायुगांच्या डोक्यावर एकेक पाऊल टाकून पुढें जातो. देव, गंधर्व, असुर सर्व त्याचेंच अनुकरण करतात.

" आणि असें पहा, तुम्ही आहांत एकटे व हें भूखंडाचें साम्राज्य. या साऱ्या प्रकृतींत तर आनंद मुसमुसलेला आहे. कर्माचे भोग आणि भोगानुसार कर्म करीत राहणें यामध्येंच तर खरी मौज आहे.

" तुम्ही एकाकी यजनपूजन तरी कसे करणार ! आपल्याच चिंतेच्या भाराखालीं कां दबून जातां ? कोणीतरी आधार शोधा ना ? ऐका, मी माझी सेवा तुम्हांला समर्पण करायला सिद्ध आहें. काय हवें तें मी देतें. दया, माया, मधुरिमा, विश्वास, हें माझें रत्नखचित हृदय तुमच्यासाठीं मी उघड करतें. उठा, संस्कृतीचें तुम्ही मूलरहस्य बना. तुमच्यापासूनच ही संसारवेल साऱ्या विश्वांत पसरणार आहे. तिचा सुगंध ब्रह्मांडामधें भरून जाणार आहे. तुम्हांला ऐकूं का येत नाहीं विधाता एकसारखें मंगलगान करतो आहे तें ? शक्तिशाली व्हा, विजयी बना. अहो, साऱ्या विश्वांत हें गुंजन ऐकूं येत आहे कीं !"

" अमृतसंतान, भिऊं नका. तुमच्यासमोर अतिमंगल असें भविष्य वाट पाहत आहे. देवांच्या असफलतेंतून सारीं साहित्य-साधनें एकत्र करून मानव आज उभा आहे. चैतन्याचा सुंदर इतिहास यांतूनच लिहिला जाईल. यापुढें मानवाची सत्ता केवळ पृथ्वी, आप, तेज, आकाश यांपर्यंतच सीमित राहणार नाहीं तर साऱ्या विश्वांत स्थापन होईल. मानवाच्या शक्तीची लीला विश्वाच्या दुर्बलतेंतूनच बल निर्माण करून आजपर्यंतचे सारे पराजय धुऊन काढील !

" शक्तीचे विद्युत्कण जे व्यस्त, विकल विखुरले हे निरुपाय
समन्वय करा त्यांचा समस्त, विजयिनी मानवता हो जावो "

## कामसर्ग

एकाकी मनूला सहधर्मचारिणी श्रद्धा लाभल्यामुळें त्याच्या मनांत मावेनासा आनंद फुलला. श्रद्धा आतां त्याची वसंतश्रीसारखी सहयोगिनी बनली होती. तिच्या सान्निध्यांत मनूच्या अंतःकरणांत कामना स्फुरली. मनु म्हणाला, " काय व्हायचें तें होवो. आतां मात्र जीवनाचा हा मधुर भार मी वाहूं शकत नाहीं. काय आपदा यायच्या असतील त्या येवोत. कोणत्याहि रूपांत येवोत. दम, संयम त्यांना मी पार करून जाईन. "

मनु आपल्या कामनेच्या आवेगांत अधिकाधिक खोल जाऊं लागला. तो म्हणे, " छे, माझी तहान अजून शमली नाहीं. देवांची सृष्टि विलीन झाली पण माझा काम संतुष्ट झाला नाहीं. अनादिवासना अजून पूर्वीसारखीच मला

ओढून नेते आहे. आमच्या दोघांचें हें साहचर्य म्हणजे भोवऱ्याच्या गतीसारखें आहे. आमच्या वर्तुळाकार नर्तनांतच संसार साकार होऊन उठणार आहे.

" ऋतुपतीच्या घरीं कुसुमोत्सव असावा. मग मादक मरंदाची वृष्टि झाली तर दोष कोणाचा? मी आतां माझ्या ऋणाची फेड करीन. ही श्रद्धा प्रेमाची जणुं कलाच जीवनांत अवतरली आहे. किती सुंदर, किती निरागस? जणुं बहुरंगी फुलांची परडीच!"

## वासना सर्ग

मनु आणि श्रद्धा दोन पथिक एकत्र चालले आहेत. एकाच्या प्रश्नाचें उत्तर दुसऱ्यांत सांपडतें. एक होता गृहपति, दुसरा अतिथि. एक जीवनसागर, दुसरी त्याच्यावरची लोल लाट. एक प्रभातकाल तर दुसरी त्याची स्वर्णिमा. दोघां अपरिचितांचा तो मिलाफ प्रकृतीनें योजल्याप्रमाणें अधिकाधिक गाढ, गोड होत होता.

मनु एकीकडे यजन, याजन आणि मनन करी; श्रद्धा दुसरीकडे गृह, व्यापार, शस्य, पशु यांचा संग्रह.

एके दिवशीं श्रद्धा मनूपाशीं येऊन उभी राहिली. मनूनें तिला पाहातांच विचारलें, " कोठें गेली होतीस तूं मला न सांगतां? तूं कोण, आहेस तरी कोण मला अशी ओढ लावणारी? लालुच दाखवून अशी दूर कां जातेस? तुला ओळखायचा मी प्रयत्न करतों. असें कोणतें करुण रहस्य या तुझ्या तरुण सौंदर्यांत दडून राहिलें आहे? जी पशु असो वा पाषाण दोघांनाहि नाचायला गायला लावतेस व आलिंगनाच्या आनंदासाठीं बोलावतेस अशी कोण आहेस तूं? तुला पाहून ललित लतिकेचें हास्य डोळ्यांपुढें उभें राहतें माझ्या.

" हे श्रद्धे, तूं कोण आहेस? वासनेची मधुर छाया कीं माझ्या हृदयांतील सौंदर्याची छबी? कोण आहेस तूं माझ्यासमोर या रूपांत? जिला भुललेलें माझें हृदय शोधून राहिलें आहे ती वस्तु तर तूं नाहींस? श्रद्धे, उमलत्या कुसुमानें आपली सौरभसुषमा उधळावी त्याप्रमाणें तूं हंसतेस. पण तुझ्या बंद हृदयाचें कपाट कां उघडीत नाहींस?"

श्रद्धा : "मी एक अतिथि आहें ना ! आणखी परिचय देणें व्यर्थ नाहीं का ? आजच्या इतके उद्विग्न तुम्ही पूर्वीं कधींच दिसलां नाहींत. याचा अर्थ काय ? तो पहा हंसरा चंद्र विश्वाचा काळिमा धुऊन टाकण्यासाठीं वर वर येत आहे. त्याचें तें सुमधुर स्मित पाहून सर्व आपलें दुःख विसरून जातात. चला, आपण या कौमुदी प्रकृतीचें स्वप्नमय शासन आणि साधनेचें साम्राज्य पाहून घेऊं या."

सृष्टि हंसत होती. तिच्या डोळ्यांत अनुराग होता. सर्वदूर पुष्पपरागांचा सुगंध दरवळला होता. श्रद्धेनें मनूचा हात आपल्या हातांत घेतला. दोघेंहि मंद सानंद गतीनें स्नेहाचे संबळ घेऊन स्वप्न-मार्गावरून जात होतीं.

मनु म्हणाला · "आत्तांपर्यंत मी तुला कितीतरी वेळां पाहिलें. पण आज खरोखर मी तुझाच बनलों आहें. सुधाकर अमृताचा वर्षाव करीत आहे, आणि तूं माझ्याजवळ असतांना माझे प्राण असे अधीर कां वरें ? श्रद्धे, हृदयांत कोणत्या वेदनेची धडपड चालू आहे माझ्या ?"

प्रेम आणि आसक्तीनें उन्मत्त झालेला मनु श्रद्धेचा हात धरून तिला म्हणतो, "आज तुझ्यांत मला तोच मधुर भास होत आहे. हो, अगदीं तोच. माझ्या विस्मृतिसागरांत पूर्वस्मृतीची नाव आतांपर्यंत हेलकावे खात होती. प्रलय आला आणि ओसरला, श्रद्धे, आपण वाचलों आणि भेटलों. या अशा शून्य जगताच्या मांडीवर आपलें मीलन व्हायचें होतें. तूं अशी ज्योत्स्ने-सारखी माझ्यासमोर प्रकाशलीस आणि तो पहा चंद्र, तारकांचा हार आपल्या प्रणयमीलनासाठीं घेऊन उभा आहे. तूं साधनेची केंद्रीभूत स्फूर्ति आहेस निःसंशय. जगांतील सर्व सुकुमारतेंत नारीमूर्ति अधिकतम रम्य आहे आणि मी हा एखाद्या श्रांत बालकाप्रमाणें आजपर्यंत भटकत राहिलों. आज तुझ्याकडून माझी कामवासना मला प्राप्त होत आहे तर हें घे माझ्या जीवन-चैतन्याचें दान. विश्वराणी, सुंदर नारी, सृष्टीची मान्यता, माझें जीवन संपूर्ण कर."

मनूचें तें नर्ममय प्रेमसमर्पण ऐकून सुकुमार श्रद्धा लज्जाविनम्र झाली. तिच्या अंतःकरणांतील लज्जायुक्त कातरता मुखावर प्रतिबिंबित झाली. तिचे कान आणि कपोल लाल झाले. कदंबाचें झाड मोहरानें फुलून जातें तसें तिचें आरक्त मुख आनंद गद्गद बोलूं लागलें—"प्रिय देव, आजचें तुमचें हें

समर्पण माझ्या रमणीय हृदयाला सदैव स्नेहबद्ध राहील ना? मी तर दुर्बल अबला आहें. तुमचें दान स्वीकारल्यास समर्थ होईन का?"

## लज्जा सर्ग

तरुणी-हृदयाची अभिन्न कोमल सहचरी लज्जा श्रद्धेसमोर मूर्तिमंत उभी राहिली. लज्जेनें श्रद्धेचे पाय जणुं रेशमी सूत्रांनीं अचल केले. श्रद्धेचें वदन खालीं झुकलें. तिच्या पापण्या मिटल्या. भुवया कानापर्यंत चढल्या. अधीर हात स्पर्श करण्याऐवजीं मागें खेचले गेले. विनोद कलरव ओठावर येऊन थांबला. अंगावरील रोमरोम कसल्यातरी संकेतानें ताठ उभे राहिले. हें सर्व अनुभवून श्रद्धा एकीकडे म्हणाली, "माझ्या हृदयाच्या परवशते, तूं कोण? माझी स्वतंत्रता हिरावून घेण्याचा तुला काय अधिकार! माझें जीवनपुष्प स्वच्छंद उमलूं कां देत नाहींस तूं?"

त्या प्रश्नाचें उत्तर लज्जेनें दिलें, "सुंदर सखे, इतकें कसलें आश्चर्य! मला ओळखलें नाहींस तूं? रमणीय हृदयांतली सूक्ष्म आणि रहस्यपूर्ण अशी पकड आहें मी. मी नेहमीं सांगतें, 'थांब, थोडा विचार कर, अधीर होऊं नकोस.' ज्याला सौंदर्य म्हणतात त्या चैतन्याची मी पाठीराखीण. ज्यामधून जीवनांतील अनंत अभिलाषांचीं स्वप्नें जागृत होतात, त्या चंचल यौवनाची मी धात्री आहें आणि त्यांच्या गौरवाचें माहात्म्य मीच शिकवूं शकतें. रतीची जणुं छायाच अशी मी लज्जा आहें. शालीनता मी शिकवितें; मोहक सौंदर्याच्या पायांतील मी नूपुर आहें, माझा आविर्भाव कपोलावर लाल, डोळ्यांत कृष्ण, केसांत कुरळेपणा आणि मनांच्या मोडेंत असा होतो. चंचल किशोर सौंदर्याची मी पहिली वहिली साथीदार आहें. मी नारीची लज्जा आहें, श्रद्धे."

श्रद्धा "असें, असें! बरें झालें. पण मला माझा मार्ग दाखव ना. माझ्या आज ध्यानांत आलें कीं, दुर्बलता म्हणून कांहीं असेल तर ती मी स्त्री जात आहें. कोमल सौंदर्यानें मला आज पूर्ण हतबल केलें आहे. मला कळत नाहीं कीं एखाद्या महान वृक्षाच्या छत्रछायेंत लतिकेनें पडावें, वाढावें तसेंच सर्वस्व समर्पण करण्याची मनीषा माझ्या मनांत आज कां उद्‌भवली! काय करूं मी? माझ्या या भुजलता वरतरूंच्या खांद्याला विळखा घालण्यासाठीं उत्सुक

आहेत. पण भीति वाटते कीं या समर्पणांत उत्सर्ग तर होणार नाहीं? मी तर सर्वस्व देऊन बसेन पण मला कांहींच मिळणार नाहीं?"

लज्जा : "आतां काय उपयोग! जीवनाचीं सुवर्णस्वप्नें अश्रुजलाच्या संकल्पानें तूं अगोदरच दान देऊन बसली आहेस.श्रद्धे,तूं खरोखरच स्त्री आहेस. आणि तुझें कार्य विश्वासरूपी रजतनगाच्या पायाशीं अमृताच्या झऱ्याप्रमाणें जीवनाच्या सुंदर समजलावर अविरत वाहात राहणें हेंच आहे. देव आणि दानव यांचा संघर्ष मानवाच्या अंतःकरणांत होत असतो. तुझ्याकडे अत्यंत मोठें उत्तरदायित्व आहे.

आंसू से भीगे अचल पर मत का सब कुछ रखना होगा।
तुमको अपनी स्मित रेखा से यह संधिपत्र लिखना होगा।

## कर्म सर्ग

श्रद्धेच्या सहवासांत मनूचें घर, पशुधान्यादि जीवन-साधनांनीं संपूर्ण भरलें जातें. एके दिवशीं एका हरिणशावकाला गोंजारीत श्रद्धा मनूसमोर येते. श्रद्धेची त्या हरिणावरची माया पाहून मनूला असूया उत्पन्न होते. तो म्हणतो, "हें काय? माझ्याच अन्नावर वाढलेला हा प्राणी तुझ्या प्रेमांत माझा वांटेकरी कसा होऊं शकतो? विश्वांत जें जें सुंदर आणि उपभोग्य आहे तें तें सर्व माझें आहे." पण श्रद्धेच्या स्मितानें मनूची असूया आणि अस्वस्थता शमून गेली.

कर्मयोगी मनूला वाटत असे कीं, यज्ञ यथासांग करीत राहिल्यानें जीवनाच्या स्वप्नांचा स्वर्ग मिळेल. पण त्या निबिड अरण्यांत पुरोहित कोठून मिळणार त्याला?

जलप्रलयांतून वांचलेले असुरांचे दोन पुरोहित किलात व आकुल पशु-मांसाच्या शोधांत इतस्ततः भटकत होते. मनूच्या गृहपरिसरांत त्यांना तो हरिणशावक दिसला. त्यांच्या आमिषलोलुप जिभेला पाणी सुटलें. आकुलि म्हणाला, "काय किलात! अरे घासपत्ती खाऊन किती दिवस जगणार आपण! असा जिवंत पशु दिसत असतांना घोटभर रक्तसुद्धां मिळणार नाहीं का आपल्याला?"

"पण त्या पशूबरोबर ममतेची छाया अशी ती मृदुलता सदैव पाठीराखी आहे हें तुला दिसत नाहीं का?"

" कांहींहि होवो. आज कांहीं तरी युक्ति योजलीच पाहिजे. " असें म्हणून ते मनूच्या दाराशीं पोहोंचले. मनु यज्ञक्रियेच्या संकल्पांतच होता. त्याला पाहून ते असुरपुरोहित म्हणाले, " तूं यज्ञ करतोस का ?" मनूला आनन्द झाला, परंपरागत यज्ञशृंखला सांधली गेली. मनूच्या यज्ञांत अग्नीच्या ज्वाला परत प्रसन्न धधकल्या. त्यांत बळी दिला गेला श्रद्धेचा हरिणशावक. यज्ञ तर समाप्त झाला. पण तेथें शिल्लक उरला होता रक्ताचा सडा. हाडांचा सापळा. शेजारीं सोमरसाचें होतें पात्र. श्रद्धा दूर गेलेली होती. यज्ञानंतर सोमपानानें मनूच्या अंतःकरणांत सारे सुप्त भाव जागृत झाले.

श्रद्धा आली आणि तिनें तें दृश्य पाहिलें. तिला मानसिक वेदना झाली. आपल्या शयनगुहेकडे जाऊन ती पडली. जणुं सुक्या लाकडांत अग्नीची ज्वाला गुप्त असावी तशी एका मृदु चर्मासनावर कामायनी पडून राहिली होती.

आकाशाच्या अंगणांत तारे डोकावत होते आणि अदृश्य होत होते. संसार चक्राप्रमाणें गोल फिरतच होता. कर्मशील पण कामवश मनूचा दृष्टिकोन मात्र निराळाच होता. तो म्हणे, " माझ्या अंतःकरणांतील तहान विफलतेमुळें अधिकच वाढते आहे. युगायुगांतील असफलतेच्या आधारानें ती वरवर चढते आहे. मनूच्या मनांत तरल वासना प्रक्षुब्ध झाली.आतां त्याला कोण अडवणार? श्रद्धेचे ते मृदुल हात त्याला आव्हान देत होते. तिचे उन्नत वक्ष आलिंगनासाठीं बोलावीत होते. सुकुमार कामायनी झोपली होती. पण तिचें सौंदर्य जागृतच होतें. तिला तशी पाहतांच विश्वांतील सर्वांत वेड्या सुखकल्पनेनें मनूच्या मनांत विराट स्वरूप धारण केलें. मनूनें तिला स्पर्श केला तोंच तिच्या अंगावर उभा राहिलेला काटा मनूला बोचला. कामायनी जागी झाली. मनूनें तिला आपल्या हातांत सुखावलें. अनुनयपूर्ण आवाजांत तो तिला म्हणाला, " फारच मोठी मानिनी दिसते कीं तुझी माया. माझा स्वर्ग तूं विफल का करणार, हे अप्सरे, त्या अतीत सुखांची नवीं गाणीं ऐकून मला ? हें पहा या आल्हाददायक चंदेरी निर्जन वनांतील वृक्षांच्या खालीं केवळ तूं आणि मीच आहोंत. तिसरें कोण आहे असे डोळे मिटून घ्यायला ? सखे पाहा तर खरें–

आकर्षण से भरा विश्व यह केवल भोग्य हमारा ।
जीवन के दोनों फुलोंमें बहे वासनाधारा ।

" प्रेयसी, ये. एक क्षणभर आपली चेतनता विसरून जाऊं. आणि अनंत स्वर्गसुखाचा अनुभव घेऊं या. कामायनी, देवांनाच अर्पण करण्यास योग्य असा हा सोमरस जरा ओठाशीं तर लावून पहा! म्हणजे आपण सुखाच्या हिंदोळ्यावर झोके घेऊं लागूं!"

मनूचें वेड लावणारें बोलणें ऐकून श्रद्धा जागृत होऊन सहज म्हणाली, " काय म्हणतां तुम्ही? आज ही भावना आणि उद्यां त्यांत परिवर्तन झालें तर! उद्यां कोणा तरी देवाच्या नांवानें तुम्ही दुसऱ्या कोणाचें बलिदान कराल. भर्तृदेवा, या भूलोकावर जे पशुपक्षी वांचले आहेत त्यांचे असे कांहीं अधिकार नाहींत का? मनु, हीच का होणार तुमच्या नवसृष्टिरचनेची मानवता? ज्यांत सर्व कांहीं अपहरण केलें जातें आणि मागें राहते ती केवळ शक्ति?"

श्रद्धेचा प्रश्न ऐकून मनु उत्तरला, " तूं म्हणतेस तें खरें आहे, कामायनी. पण आपल्याहि सुखाचा विचार नको का करायला? तेंहि कांहीं तुच्छ नाहीं. दोन दिवसांच्या आपल्या जीवनांत तेंच तर परम संपादनीय आहे. इंद्रियांच्या अभिलाषा तृप्त केल्याच पाहिजेत. स्वर्गसुख म्हणजे तरी दुसरें काय असतें? आपली कामनापूर्ति व्हावी हीच सर्व कर्तृत्वाची सीमा. यांतच मानवतेच्या अर्थाचा परिपूर्ण उत्कर्ष आहे."

श्रद्धा " सृष्टीनें डोळे उघडले आहेत. प्रलय पयोनिधीच्या लाटा ओसरून गेल्या आहेत. म्हणून सर्व कांहीं स्वतःसाठींच करण्यांत मानवतेचा विकास कसा होईल? अशा एकान्त स्वार्थानें माणूस स्वजातीचा भीषण नाश करून घेईल. खरें म्हणजे–

औरों को हंसते देखो मनु हंसो और सुख पाओ।
अपने सुख को विस्तृत कर लो सब कों सुखी बनाओ।

मनु, हें लक्षांत ठेवा कीं, केवळ आपल्यापुरताच सुखसंग्रह करण्यांत दुःखा-शिवाय दुसरें कांहींहि पदरीं येणार नाहीं. सुखाचा संग्रह नको, समाधान पाहिजे. अशा या निर्जन सृष्टींत एकलेपणीं तुम्हांला काय आनन्द लाभतो? ज्यामुळें दुसऱ्या कोणाचेंहि हृदयपुष्प उमलत नाहीं असें कसलें हें जीवन?"

असा संवाद तर चालू होता. मनु अधिकाधिक उत्तेजित झाला. श्रद्धेच्या अंतःकरणांतील ज्वालांनीं तिच्या ओठाला कोरड पाडली. मनूनें शेजारचा सोमरसाचा चषक उचलला आणि श्रद्धेच्या ओठाशीं लावून तो म्हणाला,

" कामायनी, हें पी आणि पहा तुझ्या बुद्धीचीं बंधनें कशीं तटातट तुटतात. तूं म्हणतेस तेंच मी मानतों. सत्य आहे तें. एकलेपणांत सुख कसलें? हा सुखाचा प्याला पितांना थांबलें तर तें सुखच कसलें!"

दोघांचे डोळे एकमेकांकडे लागले. ओठ रसांत डुंबले. हृदय काल्पनिक सुखांत विजय मानूं लागलें. आणि चैतन्य नसनसेंतून टपकूं लागलें. श्रद्धा सुद्धां प्रणयाच्या आवेगांत चंचल झाली. भान हरपलें तिचें. तनमन तिनें मनूला अर्पण केलें.

मनु म्हणाला, " कामायनी, माझ्या इहजीवनाची तूं सुखसीमा बनलीस. ज्यामुळें मी तूं असा भेद होतो, तें लज्जेचें आवरण दूर कर."

## ईर्षा सर्ग

मनु आणि श्रद्धा हिमगिरीच्या त्या सुंदर प्रदेशांत आनंदानें दिवस कंठीत होतीं. मनु मृगयेंत मग्न असे. हिंस्र पशूच्या शोधांत तो दूर दूर भटके. पण आणखीहि कांहीं तो शोधीत होता. करतलांत होतें त्या सुखामध्यें मनूला आतां रुचि लागेना. श्रद्धेच्या प्रेम, आलिंगन, विनोद, प्रणयांत त्याला गोडी लागेना. श्रद्धेंतील अवघी नवीनता अस्ताला गेली आहे असें त्याला वाटे. जेव्हां पहावें तेव्हां ती आपली गृहउद्योगांत मग्न दिसे. केव्हां बीजसंग्रह कर, तर केव्हां टकळी चालव, केव्हां पशुसंगोपन, तर केव्हां तींच तींच गाणीं गाणारी श्रद्धा मनूला कंटाळवाणी वाटली. श्रद्धा आपल्या गुहेंत श्रान्त क्लान्तशी मृगयेला गेलेल्या मनूची वाट पाहत बसली होती. खांद्यावर मृत हरिण टाकून श्रान्त मनु घरीं आला. त्यानें मृगया खालीं ठेवली. आपलें धनु, तीर वगैरे आयुधें फेकून दिलीं.

श्रद्धेचें मुख केतकीसारखें पिवळें झालें होतें. तिच्या डोळ्यांत आळस भरलेला होता. थोडी विचित्रशी कृशता आली होती. मातृत्वाच्या आगामी ओझ्यानें तिचे पयोधर पीत झाले होते. कामायनी माता होण्याचीं चिन्हें दिसत होतीं. एका महापर्वाचा प्रारम्भ समीप येऊन ठाकला होता.

मनूच्या ध्यानांत हें प्रथम आलें तेव्हां होऊं घातलेलें आपल्या आवडी-विरुद्ध आहे असें त्याला वाटलें. तो बोलला नाहीं. पण त्याच्या मनांतील विचारांचीं प्रतिबिंबें पाहून श्रद्धेला भीति वाटली. प्रसन्नमुखानें त्याच्यासमोर

होऊन ती त्याला म्हणाली, "होतां कोठें दिवसभर? इतकी कशी चटक लागली तुम्हांला हिंसेची कीं देह, गेह, दारा या सर्वांचा सुद्धां विसर पडावा! मी अशी एकटी येथें तुमची वाट पाहतें. सारा दिवस संपला. पशुपक्षी सुद्धां गुहा-घरट्यांना परतले. ती ऐका त्यांची कलकल. आपल्या घरांत असें काय कमी आहे तुम्हांला कीं तुम्ही सदा घराबाहेर भटकत रहावें ?"

मनु : "कामायनी, तुला खरोखरच कांहीं कमी नाहीं पण मला मात्र चुकल्यासारखें वाटतें येथें. त्याच्या अभावामुळें माझें हृदय विकल झालें आहे."

श्रद्धा : "तें असो, पण हिंसेची इतकी आसक्ति कां ? आपलें रक्षण करण्या-साठीं अस्त्र चालविणें मला पटतें. पण ज्यांनीं आपला कधींच अपराध केला नाहीं, उलट जे आपणांला उपयुक्त आहेत अशा पशूंची हत्या तुम्ही कां करतां ? चामड्यापेक्षां त्यांच्या लोकरीनेंच आपलें काम भागतें, मग त्यांना कां मारतां ? दुधाचीं भरलेलीं घरें असे हे पशु आपण कां मारावेत ? ज्यांचा प्रतिपाल करतों त्यांच्याशींच असा विद्रोह आपण करावा का ? पशूपेक्षां आपण मानव उंच नाहीं का ?"

मनु : "सहजलभ्य असें सुख हातचें सोडणें मला मान्य नाहीं. कामायनी, मला एक वरदान दे. केवळ माझीच चिन्ता व प्रेम तुझ्या चित्तांत सतत राहिलीं पाहिजेत. हें सारें मधुमय विश्व माझ्या एकट्याच्याच उपभोगासाठीं असलें पाहिजे."

श्रद्धा मनूचें विक्षिप्त मन शांत करते. आपल्या गुंफेसमोर बनविलेला पुष्पलतिकांचा झोंपाळा ती त्याला दाखविते. मनूच्या पराक्रमाचा संकेत आपल्या शरीराकडे त्याचें लक्ष वेधून ती देते. गृहलक्ष्मीनें ग्रहविधान बनविलें. आतां त्यांत कलरव होणार ही कल्पनाच मनूला रुचली नाहीं. त्याच्या मनांत ईर्षा व असूया प्रवेश करतात.

मनु : "वा, ग वा ! लतिकेसारखी फुलणार तूं आणि मी मात्र कस्तुरी-कुरंगासारखा सुरभीच्या शोधांत वनांतून हिंडणार. ही आग मला सहन होत नाहीं. कामायनी, मला ममत्व पाहिजे. एकान्तिक ! मला द्वैत नको. माझ्या प्रेमांत वांटेकरी नको. मी काय भिक्षुक बनूं ? छे, मला पसंत नाहीं हें. तूं मायाविनी आहेस. तुझ्या स्मितासाठीं मी काय गुडघे टेकूं ?"

श्रद्धा मनूची खूप आळवणी करते. मनूचें मन वळत नाहीं. तिचा त्याग करून तो निघून जातो. श्रद्धा रडत राहते, " रुल जा, सुन तो, ओ निर्मोही !"

## इडा सर्ग

श्रद्धेचा त्याग करून भटकत भटकत मनु एका जनशून्य अशा उध्वस्त सारस्वत प्रदेशांत पोहोंचतो. कामायनीचा पिता काम यानें त्याला शाप दिला कीं जीवनभर सुख व शांती कधींहि लाभणार नाहीं. मनु एकसारखा मनन चिंतन करीतच असतो. "कोणत्या गहनगुहेंतून हा मानवी जीवनाचा प्रवाह निघाला ? आपल्या प्रवाहांत नभ, अनिल, जल आणि क्षिति यांचे परमाणु-पुंज घेऊन स्वतः भयभीत होऊन व दुसऱ्यांना भेडसावीत कोणतें लक्ष ठेवून चालला आहे हा ? मी शैलशृंग जळतांना पाहिलें. त्या जळत्या अग्नींत उडी घेणारे प्राणिपुंजांचे शलभहि पाहिले आणि आतां हा कोणता शून्य प्रान्त मी पाहात आहें ? "

सरस्वती अविरत वाहात होती. पण तो सारा प्रांत शून्य होता. मनूला इंद्राच्या विजयाची कथा आठवली. येथेंच घडली होती ती घटना. त्या स्मृतीनें त्याचें दुःख आज द्विगुणित झालें. तो पावन सारस्वत देश असा कसा दुःस्वप्नासारखा अगदीं उजाड, उध्वस्त झाला होता ? देव आणि असुर यांच्या जीवनविचारांचें जेव्हां द्वन्द्व झालें तेव्हांची ती कथा. असुर सुखसाधनांच्या शोधांत सदैव तत्पर राहून सुधारणा करीत राहतात. तर सुर स्वतःलाच अराध्य, मंगल, उल्हासशील समजून अपूर्ण अहंतेंत गुरफटून राहतात. दोघांचाहि भाव व्यर्थ होता. एक स्वतःच्या देहपूजेंत, दुसरा अहंकारांत. अशा अवस्थेंत त्यांमध्यें युद्ध आणि संघर्ष कां होणार नाहीं ? माझीच स्थिति पहा ना ! मी सुद्धां श्रद्धाहीन होऊन आज मोठें चक्कर खात आलों आहें."

मनु श्रद्धेला मागें सोडून आला होता. वासनातृप्तीला स्वर्ग समजून स्त्रीचा पुरुषत्वावर कांहीं अधिकार आहे हें त्यानें झिडकारलें होते. तृप्त होतांच त्यानें तिला टाकलें आणि तो स्वतंत्र होण्यासाठीं दूर सरकला. त्याला केवळ तिच्या सुंदर देहाची क्षणिक जडता चाखायला मिळाली. किती अभागी मनु. सौंदर्यसागरापाशीं जाऊन त्यानें भरलें कशानें आपलें पात्र ? तर गरल चिखलानें ! मनूला हें कळलें नाहीं कीं, परडींत फुलें घेतलीं तर त्याबरोबर

कांहीं कांटेहि येतात. स्वार्थी माणसाची स्वतंत्रतेची हीच असते कल्पना स्वत:साठीं एक तंत्र आणि दुसऱ्यासाठीं दुसरें. केवळ आपल्या रुचीप्रमाणें फुलें घ्यायचीं आणि कांटे टाकायचे हें योग्य नाहीं. भोगासाठीं त्यागहि करावा लागतो. दान घेतांना प्रतिदान द्यावें लागतें. तसें झालें नाहीं तर उलटें एक-पक्षी प्रजातंत्र शापित होतें. कामानें मनूला शाप दिला. श्रद्धेची त्यानें वंचना केली होती. "ह्यापुढें मनूची प्रजा त्यानेंच निर्माण केलेल्या वर्ण आणि विभाग यांच्या निमित्तानें अनंत समस्या, कारस्थानें रचीत जाईल. आत्मनाश होण्या-पर्यंत अनंत कोलाहल, कलह चालवील. एकता विनाश पावेल. भेदभावना वाढत जातील. अभिलाषा पूर्ण होणार नाहींत. उलट अनपेक्षित दुःख येऊन कोसळेल. हृदयावर पांघरूण घालणारे जड विचार नेहमींच उठत राहतील. कोणी कोणाला ओळखणार नाहीं. जणु सारा संसार कोसळतो आहे. सर्व कांहीं सुखाचीं साधनें जवळ असतांना सुद्धां समाधान संतोष दूर दूर पळतील. श्रद्धाविहीन जीवनाला अंतहीन यातना भोगाव्या लागतील." हा होता कामदेवाचा शाप.

मनु आपल्या परिस्थितीचा विचार करीत असतांना त्याच्यासमोर एक प्रभासदृश बाला उभी राहिली. ईषत्फुल्ल कमळासारखें तिचें मुख होतें. तर्कांच्या जाळ्यासारखे तिचे केस होते. मनूच्या डोळ्याला ती महोत्सवाचें प्रतीक वाटलें ! तिचा भालप्रदेश चंद्रखंडासारखा होता. पद्म आणि पलाश पुष्पाप्रमाणें तिच्या डोळ्यांतून अनुराग आणि विराग स्रवत होते. तिच्या वक्षस्थलावर संसारांतील सारें ज्ञान आणि विज्ञान राशीभूत झालें होतें. एका हातांत कर्माचा कलश होता तिच्या, तर दुसरा हात जणूं विचारांच्या आकाशाला अभय आधार देत होता.आणि तिची त्रिवली तर त्रिगुण तरंगमयी होती. तिच्या पदन्यासांत ताल प्रमाणपूर्ण होता !

तिला पाहतांच मनु उद्गारला, " कोण, अरे, कोण तूं ? प्रकाशवती चेतना कीं सुवर्णछाया ? "

ती प्रसन्नमुख प्रतिभा उत्तरली, "मी इडा आहें. तुम्ही कोण इथें असे विचारांत डोलत बसलां आहांत ? "

" माझें नांव मनु आहे. बाले, मी एक विश्वपथिक आहें. सतत कष्ट करीत हिंडत असतों. "

" स्वागत असो तुमचें. पण माझा हा प्रदेश अगदीं शून्य बनला आहे आज. एके काळीं भौतिक प्रगतीनें उत्कर्षाच्या शिखराला चढला होता तो. परत येईल माझा दिवस या आशेवर मी येथें राहिलें आहें."

" मी सुद्धां येऊन पोहोंचलों इथें आतां. सारस्वतदेवी, तूं सांगशील तें करायला मी तयार आहें. पण माझ्या जीवनाचें मोल काय तें मात्र सांग आणि भयपूर्ण भविष्याचें दार उघडून दाखव एकदां."

इडा "भयपूर्ण भविष्य? ही प्रकृति तर अति रमणीय आहे. अगाध ऐश्वर्यानें भरलेली आहे. दुर्दैव म्हणजे शोधकच नाहीं तिचा. तिच्यावरचा पडदा उघडण्यासाठीं सतत कर्मलीन बना, सर्वांचें नियमन, शासन करीत आपली क्षमता वाढवा. बुद्धि सांगते तें जर तुम्ही ऐकणार नाहीं तर मानव शरण तरी कोणाला जाणार! तुम्हीच या विश्वाचे निर्णायक–स्वामी आहांत. असेल कोठें समता, कोठें विषमता. विज्ञानासारखें सहजसिद्ध साधन हातीं आहे. मग या जडाला चैतन्यपूर्ण कां करीत नाहीं? तसें केलेंत तर तुमचें यश त्रिखंडांत व्यापून राहील."

इडेच्या बोलानें मुग्ध होऊन मनु तिचा अनुगामी बनला. इडा दर्शनानुसार तो कर्मरत होतो. सारस्वत देश परत एकदां समृद्ध आणि वैभवशाली बनतो. साऱ्या साम्राज्याचा मनु शासक होतो. प्रजेचा सारा भार त्यानें आपल्या शिरावर घेतला. गुणकर्मांनुसार मानवी प्रजेची चार वर्णांत त्यानें विभागणी केली. समाजाच्या भरण, रक्षण, उत्कर्षाचीं कामें चहूं वर्णांना वांटून दिलीं. बुद्धीच्या सामर्थ्यानें मानवी प्रजेचें प्रकृतीवर स्वामित्व लादून तिला स्वसुखासाठीं सेवेला लावलें. ज्ञानाचा प्रचार, विज्ञानाचा व्यवहार सारी मानव प्रजा सुखी आणि संतुष्ट झाली.

## स्वप्न सर्ग

इडेच्या सहवासांत ऐश्वर्य उपभोगीत मनु अति आनंदांत होता. इडा त्याला बुद्धि आणि ओजस् यांनीं मिश्रित असें कांहीं भावना कल्पनांचें अति मादक मद्य पाजत राही कीं, मनूची कधीं तृप्तीच होईना. इडेची अग्नीच्या ज्वालेसारखी कर्मलिप्सासुद्धां कधीं संतुष्ट होईना. असे दिवस जात होते.

तिकडे श्रद्धा चिरप्रवासाला गेलेल्या आपल्या प्रियकराचा विचार करीत राही. तो परदेशीं गेलेला प्रियकर आला नाहीं. पण श्रद्धेच्या कुटिरांत 'मा' 'मा'म्हणून कलकल ऐकूं येऊं लागली होती. श्रद्धा त्या लहानग्या मनुसंतानाला म्हणायची, "ए मानवा, पित्याचा प्रतिनिधि आहेस तूं. इतका कसा अचपळ झालास बापासारखा ? मला भय वाटतें तुझें. तूं सुद्धां माझ्यावर रागावलास तर तुझें समाधान मी कसें करूं ? मनुसंतान तिला म्हणे, " मी रागावणार श्रद्धा माते ?तुझ्यावर मी कधीं रागावणार नाहीं. पण तसें झालें तर तूं मला समजावशील ना ? पहा, मी आतां बोलत नाहीं. झोपी जातों. " कामायनी आपल्या मुलाच्या मागोमाग झोपी गेली. पण झोपेंत सुद्धां तिला दिसणार काय दुसरें मनूशिवाय ?

तिला दिसलें, " मनुग्राम मोठें वैभवशाली बनलें आहे. शेतांत कृषक मेहनत करीत. लोहार, सुतार, कुंभकार, सुवर्णकार सर्वच आपापल्या उद्योगांत मग्न. सर्वांच्या सहकार्यानें मनुग्राम श्रीमंत बनलें होतें." एखाद्या मलय बालिकेसारखी श्रद्धा त्या नगराच्या सिंहद्वारापाशीं येऊन पोहोंचली. पुढें आंत शिरते तों तिला दिसलें :

" तो आपला प्रियकर ऋतुमय पुरुष, हातांत सुरेचा चषक. समोर चित्रा-सारखी एक अदृष्टपूर्व तरुणी त्या चषकांत आसव ओतीत होती. मनु ' तृप्त झालों' असें म्हणत नव्हता.

तिला मनूनें विचारलें, "आतां कांहीं कर्तव्य असें तर शिल्लक उरलें नाहीं ना, इडे ?"

इडा उत्तरली, " इतक्यांत काय संपलें ? कर्मांचीं फळें तर आलीं पाहिजेत आणि अजून सर्व साधनें तरी कोठें झालीं आहेत स्वाधीन ? "

मनु म्हणतो, " सारा प्रदेश तर वसविला, पण इडे, माझा मानस देश अजून रिकामाच आहे. इडे, हें तुझें सुंदर मुख माझ्या डोळ्यांचा विषय बनलें आहे. माझ्या चैतन्यमूर्ते, बोल, तूं कोणाची ? हें तुझें सौंदर्य कोणासाठीं ?"

इडा : " मी तुमची प्रजा आहें. तुम्ही प्रजापति आहांत हें विसरलांत का? असा कसा संदेहपूर्ण प्रश्न विचारतां ?"

मनु : " प्रजा कसली ? नाहीं. तूं माझ्या हृदयाची राणी आहेस व मी एक अतृप्त भिकारी आहें तुझ्या मधुर अधररसांत माझी तहान केव्हां भागेल तें मला सांग."

मनु प्रेमपिसा होऊन असा वेडा व्यवहार करील ही कल्पनाच नव्हती इडेला. मनूच्या प्रणयचेष्टेला ती घाबरली. आलिंगन आणि त्याबरोबर भयंकर क्रंदन. जणुं वसुधाच कंप पावून चित्कार करूं लागली त्या क्षणीं. मनु अविचारी बनला. त्याला वाटलें इडा अबला होती. पण—

अंतरिक्षांत रुद्राचा हुंकार झाला. मोठा उत्पात उठला. " अरे, अरे ! आत्मजा प्रजा ! पापाची सीमा झाली." शापाचा उच्चार झाला. देवशक्ति जागृत झाल्या रुद्रानें आपले डोळे वटारले. ती मनुनगरी कापूं लागली.

"प्रजापतीच स्वतः अविचारी बनला, हं !" देव काय उघड्या डोळ्यांनीं पाहतील ? प्रकृति त्रस्त झाली. स्वतः मनु संदिग्ध बनला. आणि प्राणिमात्र प्रलयाच्या शक्तीनें परत घाबरून गेले. सारी प्रजा मनूच्या राजद्वाराशीं धांवून आली. आदर्श शासनाचा अंत तर होणार नाहीं आतां ? इडेनें हें सर्व पाहिलें. राजद्वाराबाहेर कोलाहल माजला होता. मनु एकीकडे लपून विचार करता झाला. " काय घडलें माझे हातून हें ? प्रजा अशी कशी एकदम खवळली ! कांही तरी कुचक्र आलें आहे. असें समजून मनूनें सिंहद्वार बंद करायला सांगितलें पण खरें म्हणजे प्रकृतिकोपाला तो भ्याला होता.

त्या स्वप्नदृश्यानें श्रद्धेला घाबरवून जागें केलें. डोळे उघडतांच ती उद्गारली, " काय पाहिलें मी स्वप्नांत ? इतका कसा झाला छळी हा मनु ?" स्नेहामुळें स्वजनाच्या मनांत जशा शंका येतात त्या सर्व श्रद्धेला त्रास देऊं लागल्या " होणार काय या मनूचें ?"

## संघर्ष सर्ग

वर सांगितलें तें केवळ श्रद्धेचें स्वप्नच नव्हतें. जें घडलें तेंच सत्य तिला स्वप्नांत दिसलें. श्रद्धहीन मनूचें साम्राज्य नष्ट झालें होतें. निरिच्छ आणि कष्टी व विचारमग्न होऊन तो मनु परत आपल्या शयनागरांत पडून होता. मनु विचार करतो. ही सारी माझी प्रजा तिला नियम अनुशासन शिकवून मी वाढविलें आणि तीच माझी आज वैरीण बनली ? श्रद्धेनें माझ्यावर

अधिकार गाजविण्याचा प्रयत्न केला होता. मीं तिला झिडकारलें होतें. ही इडा आतां मला नियमांनीं बांधून परतंत्र बनवूं पाहते! इडा माझा अधिकार मानीत नाहीं. आश्चर्य आहे. मी इडेच्या किंवा श्रद्धेच्या बंधनांत कां राहावें? विश्वसुद्धां एक बंधनहीन परिवर्तन नाहीं का? रवि, शशी, तारे हे जे कांहीं आहेत, केवळ रूप बदलत राहतात नाहीं का? वसुधा जलनिधि बनते तर उदधीची बनते मरूभूमी. आणि केवढें आश्चर्य कीं जो अग्नि जलाला शोपून टाकतो; तोच जलनिधीमधें जळत राहतो. नियम कसला! कोटी कोटी नक्षत्रें निराधार शून्यांत लटकतात. हें विश्वाचें नर्तन कोणत्या नियमांना अनुसरून आहे? एका नियमानें विश्व बांधलें गेलें आहे असें म्हणतात! केवळ प्रचाराचा परिणाम आहे हा. एक घोषवाक्य आहे तें. मी मानव, बंधनाच्या पलीकडे स्वच्छंद, स्वतंत्र, मृत्यूच्या सीमांचें उल्लंघन करीन; पुढें जाईन, ह्राच माझा पण. प्रलयाच्या पूर्वींचा क्षण तेवढाच आपला. चैतन्याचें सारें समाधान त्या क्षणांत मला लाभेल. बाकी सारें मृगजल, स्वप्न!

इडा मनूच्या शेजारींच होती. ती म्हणाली, "हें सर्व खरें पण नियामकानेंच नियम पाळले नाहींत तर सर्वनाश कसा टाळतां येईल. अहो प्रजापति, असें पूर्वीं झालें नाहीं, पुढेंहि होणार नाहीं."

मनु: "मी! प्रजापति! आणि माझी अभिलाषा अपूर्ण राहावी ह्राच माझा अधिकार? जर मला हवें तें तूं देणार नसशील तर दिलें आहेस तें सुद्धां मला नको. इडे, हें घे तुझें दान. मला तूं हवी आहेस. तुझ्यावर अधिकार नसला तर मी प्रजापति कसला? इडे, तूं दृष्टीस पडतांच सारे नियम, सारीं बंधनें तुटतात माझीं, मला नको तें शासन आणि सत्ता. तूं म्हणतेस विश्वाची एक लय आहे. म्हणून मी का त्यांत लीन होऊन जाऊं? त्यांत सुख तरी काय! तूं मला मिळालीस तर महासागर आपल्या मर्यादा सोडून वाहोत अथवा झंझावात पृथ्वीला उडवून नेवो. मला पर्वा नाहीं त्यांची. इडे, तूं मात्र माझ्याजवळ रहा. मीच आहें तुझा पति. खेळणें समजून मला खेळवूं नकोस यापुढें."

इडा. "तुमच्या हिताची गोष्ट सांगतें ती कशी समजत नाहीं तुम्हांला? क्षुब्ध प्रजा दाराशीं उभी आहे अणि प्रकृति कोपलेली आहे हें कसें ध्यानांत येत नाहीं तुमच्या?"

मनु · "मायाविनी, तूंच ही संघर्षभूमिका निर्माण केलीस नाहीं का ? माझा शाप बनून आलीस का तूं माझ्याबरोबर ? रक्तलांछित ती वेदी आणि त्या ज्वालांचे उपचार तूंच मला शिकविलेस ना ? चार वर्ण बनविले त्यांचा श्रमविभाग केला. आणि आतां मी खेळण्यास निघालों तों नियम सांगतेस ! मी नाहीं मानणार कोणतींच बंधनें ! हे सारस्वत राष्ट्रस्वामिनी, हें घे सारें वैभव आपलें. मला तूं पाहिजेस नाहींतर हा सारा सारस्वत देश उध्वस्त होऊन जाईल."

इडा : "मी सांगतें तें विसरूं नकोस, मनु. तुला जें मिळालें आहे त्यामुळें इतका फुलून जाऊं नकोस. या शून्य प्रदेशाचा तुला मी स्वामी बनविलें हें कसें विसरलास ?" (पण प्रमादाचा क्षण जवळ आला होता. इडा दाराकडे वळली तोंच मनूच्या हातांनीं तिला धरलें. असहाय्य अबला, ती इडा, दीनशी पाहात राहिली. )

मनु · "इडे ! नाहीं, मी दास होणार नाहीं. मी शासक आहें,स्वतंत्र आहें मी. तुझ्यावर सुद्धां माझा अधिकार आहे. माझ्या भुजबंदांत तूं बंदी झाली आहेस, राणी !"

सिंहद्वार फाटलें. जनता आंत शिरली. 'आमची राणी' म्हणून चीत्कार झाला. मनूला कंप सुटला. त्यानें आपला वज्रखचित राजदंड हातीं घेतला आणि गर्जना केली, "सुखाचीं सारीं साधनें आणि मार्ग मी तुम्हांला दाखविले, समाजाचे वर्ग बनवून मी निस्पर्ध समन्वय असें तुमचें जीवन केलें ; हे उपकार आठवतात का ?"

प्रजा बोलली "पाप पहा कसें आपल्याच तोंडानें बोलत आहे. योगक्षेमास आवश्यक त्याहिपेक्षां जास्त संचय करण्याचा लोभ तुम्हीं शिकवलात आम्हांला. त्यामुळें हें संकट आज ओढवलें आहे. तुम्ही आमची नैसर्गिक शक्ति खच्ची केलीत. यंत्रांच्या निर्मितीनें आमचें जीवन शोषून चिपाट बनवून टाकलें आहे तुम्ही. आणि आतां या इडेवर, आपल्या राणीवर बलात्कार आरंभलांत ! याचसाठीं का तुम्ही आमच्या बलावर वाढलांत ? कोण तुम्हांला तारणार आतां येथें ?"

मनु म्हणजे या जीवनाच्या संघर्षांत मी परत एकटाच झालों ? प्रकृति आणि तिच्या पुतळ्यांच्या या भीषण दलांत मी एकटाच सांपडलों ? ठीक आहे. साहस आणि पौरुष यांची परीक्षा पहा आतां. राजदंड वेळ प्रसंगीं वज्र कसें बनतें तोहि अनुभव येईल तुम्हांला. "

असें म्हणून मनूनें आपलें अस्त्र सरसावलें. आगीच्या ज्वाळा पसरूं लागल्या. धनुष्यांतील तीक्ष्ण बाण सुटूं लागले. जणुं आकाशच फाटलें. आणि त्यांतून तारे व धूमकेतु तुटूं लागले. पण तिकडे प्रजेचें दलबल सुद्धां वाढूं लागलें होतें. जनतेकडून विजेसारखीं शस्त्रें सोडण्यांत आलीं. शूर मनु तो सर्व मारा अडवीत असे आणि आपल्या खड्गानें जनतेचे प्राण उडवीत असे. त्या तांडवांत भयंकर गति आली. परमाणुसुद्धां विकल होऊन अस्ताव्यस्त पडूं लागले. भयंकर रणगर्जना निनादल्या. अतिभीषण अवस्था झाली होती. एका खांबाच्या आधारानें श्वास घेण्यासाठीं मनु उभा राहिला. त्याच्या धनुष्यानें टंकारव केला. मरणपर्व होतें तें. नेते होते तेच असुरपुरोहित आकुलि आणि किलात. गर्जना झाली. 'पुरे, पुरे, सोडूं नका आतां ह्याला.' पण दोघेहि असुरपुरोहित त्या क्षणींच धाराशत्री झाले होते. जवळ पोहोंचताच मनु त्यांना म्हणाला, " तुम्हींच का उभा केलात हा उत्पात ? वा:, मी तर तुम्हांला आपला समजत आलों. आतां पहा बलि कसे दिले जातात रणांत. " असें म्हणून मनूनें दोघांनाहि भूहत केलें.

इडा एकसारखी ओरडत होती. " थांबा, थांबा, युद्ध थांबवा. अरे वेडया प्राण्या, कां उगाच जीवन गमावतोस ? जनसंहार कशाला इतका? थांब, गर्विष्ठ पुरुषा, कां एवढा उच्छाद मांडला आहेस ? अरे, जगूं दे ना सर्वांना, आणि तूंहि जग आनंदांत त्यांच्यावरोबर. " पण बुद्धीचें सांगणें कोण ऐकणार त्या समरकोलाहलांत ? सामूहिक बलिदानाचा आतां एक नवीनच पंथ उत्पन्न झाला होता. रक्तोन्मत्त मनु अजूनसुद्धां आपला हात मागें घ्यायला तयार नव्हता. सारस्वत राणी इडा तें पाहत होती. तिच्यापायापाशीं सूडाचें रक्त पाण्यासारखें वाहात होतें. अशामध्यें एक बाण धूमकेतूसारखा मनूवर येऊन पडला. मनु खालीं कोसळला. रक्ताच्या ओहोळांचा त्या भूप्रदेशावर परत पूर वाहिला.

## निर्वेद सर्ग

अत्यंत दूर विलग्न अशा श्रद्धेनें सारस्वत-राज्यांतील त्या विद्रोहाचें स्वप्न चित्रासारखें पाहिलें. मनु मरणासन्न स्थितींत तिला पडलेला दिसला. व्याकुळ हृदयानें ती आपला पुत्र मानव बरोबर घेऊन मनूच्या शोधासाठीं निघाली.

सारस्वत नगर उध्वस्त, मलिन, मौन झालें होतें. राजमंदिर शून्य स्मशानातील समाधीसारखें दिसत होतें. मनूचें घायाळ शरीर तेथें स्वस्थ पडलें होतें. चिंता व ग्लानीमुळें कष्टी झालेली इडा जवळ बसली होती. अनेक रात्री अशा निघून गेल्या. नारीचेंच हृदय तें. मनूच्या व्यथेनें इडेच्या बुद्धींत सुद्धां सहृदयता आली. ती म्हणाली, " काय विचित्र आहे दैवगति ! एक परदेशी आला. किती दुःखी आणि कष्टी होता. बसायलासुद्धां जागा नव्हती त्याला. चारी दिशा शून्य होत्या त्याच्यापुढें. आणि तोच शासक सूत्रधार बनला. नियमांचा निर्माता झाला. स्वतः दण्ड बनला. सागरलहरींवरून जणुं उत्तुंग शैलशृंगावर चढला होता तो आणि आज पहा मुमुर्षूसा जमिनीवर झोपला आहे. केवळ एका अपराधामुळें: वासनेसाठीं व्रतभंग. केवढा भीम अपराध ! स्नेह, सुख कसलाहि काय अतिरेक झाला कीं तें दुःख वनतें. पण थांबायचें कोठें हें कळत नाहीं मानवाला. अतिरेकाची सीमा कोणती हेंच ध्यानांत येत नाहीं त्याच्या. भविष्याच्या चिंतेंत वर्तमानाकडे पाठ करून मानव धांवत सुटतो आणि आपल्याच मार्गांत विघ्नें पसरवून ठेवतो. अशा उद्दंड मानवाला दंड देण्याचें काम माझ्याकडे येतें."

" अरे ! वक्त दो मुझे दया कर कहाँ प्रवासी है मेरा। "

कोणाची तरी पाऊल चाहुल आणि त्याबरोबरच वरचे करुण स्वर इडेच्या कानांवर आले. तिनें राजपथाकडे दृष्टि टाकली. शिथिल शरीराची-रमणीची एक अंधुक छाया तिला समोर दिसली. तिचें वसन विश्रृंखल झालें होतें. जणुं मकरंद लुटला गेला आणि पाकळ्या गळून पडल्या अशी कोमेजलेली कळीच होती ती. तिच्याबरोबर बोट धरून एक नवकिशोर चालला होता.

इडा : " कोण सोडून गेला तुम्हांला ? काय हरवलें तुमचें ? रात्रीच्या प्रहरीं कोठें जाणार तुम्ही असे ? इकडे या. क्षणभर बसा इथें आणि सांगा तुमची करुण कहाणी. बाई ग, जीवनाच्या दीर्घयात्रेंत हरवलेलें सुद्धां सांपडतें पुष्कळ वेळां. जीवन असेल तरच मीलन संभवतें."

श्रद्धा आणि मानव इडेचे मागून जातात. प्रदीप्त ज्वालेच्या प्रकाशांत मनूची घायाळ मूर्ति श्रद्धेला दिसते. ती उद्‌गारते, " माझें स्वप्न सत्य होतें तर! अरे प्राणप्रिया, हें काय मी पाहतें ! "

श्रद्धेच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहात होत्या. इडा स्तंभित झाली होती. श्रद्धेनें मनूच्या शरीरावर प्रेमाचा हात फिरवला. त्याबरोबर त्याची मूर्च्छित काया स्पन्द पावूं लागली. हळूहळू त्यानें डोळे उघडले.

बाल मानव, मंदिर, मंडप, यज्ञवेदी, राजभवन वगैरे अनेक अदृष्ट दृश्यें आश्चर्यानें पाहत होता.

" अरे, इकडे ये, हे पहा तुझे पिताजी. " श्रद्धेनें मानवाला बोलाविलें.

" बाबा, हा आलों मी. " असें म्हणत मानव श्रद्धेकडे धांवला. मूर्च्छित पित्याला पाहून तो म्हणाला, " आई, थोडें पाणी आण ग. तहान लागली असेल त्यांना. अशी काय रडत बसतेस ! "

दोघेंहि ओंजळीनें मनूला पाणी पाजतात. त्याच्या अंगावर तें शिंपडतात. त्या निश्चेष्ट जागीं जिवन्त परिवार गोळा झाला. श्रद्धेच्या गाण्यानें त्यांत गोडी भरली. सानंद मनु उद्‌गारला, " श्रद्धे, बरें झालें तूं आलीस. मी कोठें आहें ? ओहो, तेंच यज्ञभवन, वेदिका, स्तूप आणि स्तंभ ! आणि ते चहूंकडे रक्ताचे सडे ! "

मनूनें डोळे मिटून घेतले घट्ट. तो श्रद्धेला आळवून म्हणाला, " दूर दूर घेऊन चल मजला, श्रद्धे, दूर जाऊं या आपण. या भयानक स्थानीं नको (इडा दिसतांच) तूं ? दूर सर. जा. श्रद्धे, तूंच ये मजजवळ म्हणजेच माझें हृदयपुष्प खुलेल. "

श्रद्धा : " प्रिय मनु, माझेच आहांत तुम्ही. आतां कशाला कोणाचें भय ? "

पाण्याच्या घोटानें आणि श्रद्धेच्या स्पर्शानें मनु स्वस्थ झाला होता. तो श्रद्धेला म्हणाला, " श्रद्धे, येथल्या छायेंतसुद्धां एक क्षणभरहि राहूं देऊं नकोस तूं मला. कोठेंहि घेऊन चल. नीलनभाच्या खालीं वा कोठेंतरी गिरिगुंफेंत आपण राहूं. आतांपर्यंत सर्व कष्ट झेललेत पुढेंहि सहन करूं. "

श्रद्धा " पण थोडें वळ तर येऊं द्या. मग घेऊन जाईन मी तुम्हांला. तोंपर्यंत ही इडा आपणांस येथें राहूं देणार नाहीं का ? "

संध्या झाली. मनु आपल्या गत सुखस्मृति आठवीत पडला होता. "श्रद्धेची दिव्य अमर अमृतमय मूर्ति. तिचे उपकार मला समजले नाहींत. मी अधम. तिची मंगलमाया मला उमगली नाहीं. तिला टाकून हर्ष, शोक, वासना सुखाच्या सांवल्यांमगें मी लागलों. शापितजीवन असा मी एक कंगाल भटकत राहिलों कशाच्या तरी मागें. श्रद्धा काय काय देत असे मला? पण खरें म्हणजे मी योग्य नव्हतों तिच्या अनुग्रहाला ! माझें पात्रच क्षुद्र. श्रद्धे, किती अमृत ओतणार तूं यांत ? सर्व गळून जातें. माझ्या पात्राला बुद्धि आणि तर्काचीं छिद्रें होतीं ग. त्यांतून तुझें अमृत गळून पडलें. माझें हृदय कधीं भरलें नाहीं. दुर्दैव माझें. हा कुमार माझा उच्चांश केवढें मोठें होतें स्नेहाचें केन्द्र. माझ्या हृदयांतील प्रेमानें ओतलेली ही मूर्ति पण तिलाहि मी सोडलें. मीच अपराधी. श्रद्धे, मला तूं सोड आणि सुखी राहा. हा मानव तुझ्या छायेखालीं सर्वाभूतीं सर्वसुखी होवो. ! "

मनूच्या अंतःकरणांत चाललेलें वावटळ श्रद्धा गुपचुप पाहत राहिली. पण रात्र आली आणि तिच्याबरोबर तंद्रा व निद्रासुद्धां. इडेनें कुमाराला आपल्याजवळ घेतलें. श्रद्धा हाताची उशी करून किंचित् झोपली.

मनु मात्र विचारमग्नच होता. पश्चात्ताप आणि व्यथा त्याला अस्वस्थ करीत होती. " जीवन सत्य आहे का ? छे ! तें एक इंद्रजाल आहे. अरे मनु, ऊठ, पळ येथून, " असा एक विचार त्याला भ्रांत करीत होता. " उषेची सुवर्णप्रभा फाकेल तेव्हां श्रद्धेला हें कलंकित तोंड कसें दाखवूं ? " अशी दुसरी भीति त्याला गांजीत होती. आणि " चहूंकडे तर शत्रू आहेत. कोणी सूड घ्यायला आला तर ? मी असा चुपचाप मरूं ? श्रद्धा जवळ असतांना आतां मला कांहींच करतां येणार नाहीं. तेव्हां हेंच ठीक कीं आपण शांति मिळेल तेथें निघून जावें." तिसऱ्या विचारानें त्याला उभें केलें.

प्रभात झाली. इडा, मानव आणि श्रद्धा जागीं झालीं. पण मनु कोठें होता तेथें ? ' बाबा, बाबा, ' कुमार मनूला शोधूं लागला. ' सर्व दोष माझाच ' असें बुद्धीला वाटलें. ' पुढें काय ? ' श्रद्धा विचार करूं लागली.

## दर्शन सर्ग

मानव : " तूं इतकी उदास कां, आई? मी तर आहें तुझ्याजवळ. रागावलीस का माझ्यावर ? "

श्रद्धेनें मागें वळून पाहिलें, इडेची छबि कशी म्लान राहुग्रस्त शशिलेखे-सारखी तिला वाटली. विषण्णवदन इडेनें श्रद्धेची क्षमा मागितली. श्रद्धेला इडेच्या स्त्रीहृदयाची करुणा आली. प्रेम आणि माता यांच्यासाठीं आसुसली होती ती. आपला प्रिय पुत्र मानव इडेच्या हातांत देऊन श्रद्धा म्हणाली, " संभाळ ह्याला आतां. तूं तर्कमयी आहेत, हा श्रद्धामय आहे, तूं मननशील आहेस, हा कार्यकुशल आहे. तुम्ही दोघें शासक बना. दोघांच्या समन्वयानें मानवतेचा जयजयकार होवो. इडे, मी जातें. पाहूं या मानवा, तुझें यश कसें फांकतें तें. "

इडेनें श्रद्धेला नमस्कार केला. श्रद्धेनें जाऊं नये म्हणून मानवानें खूप आळवणी केली पण श्रद्धा म्हणाली, " छे! मनूला एकटें सोडून मी अशी मागें राहूं शकत नाहीं. त्याला मी शोधून काढीन. माझ्यावांचून त्याचें चालणार नाहीं. "

इतकें म्हणून सजल डोळयांनीं एकवार मागें पाहून श्रद्धा चालती झाली.

रात्रीच्या अंधःकारांत मनु एकसारखा पुढें चालला होता. वाटेंत तो दमला आणि दमून ग्लानीनें मार्गावरच पडला. श्रद्धा तेथें येऊन पोहोंचली वारंवार पडणारा मनु पाहून श्रद्धेला दुःख झालें. पण श्रद्धा आली हें पाहून मनु तिला म्हणाला, " किती दयाळू आहेस ग तूं श्रद्धे! खरोखर तूंच आम्हां सर्वांची महान मंगल माता आहेस. सर्वांचीं दुःखें हलकीं करणारी कल्याणमयी आहेस तूं. मी मात्र क्षुद्र; क्षुधा, तृषा, व्यथा यांच्यांतच फसलेला, निर्जनांत एकटा आहें. या भवचक्रांत गरगर फिरून सत्ताशून्य बनलों आहें. श्रद्धे आतां माझें हृदय फोडून अधिक पाहूं नकोस माझें क्षुद्रत्व. "

श्रद्धा म्हणते, " प्रियतम, ही निस्तब्ध रात्र मला आठवण करून देत आहे त्या प्रलयकालाची. आपण त्या कालरात्रीनंतर भेटलों. मी तुम्हांला आत्म-समर्पण केलें आणि तुमची झालें. चला, आतां तुम्हांला अशा ठिकाणीं घेऊन जातें कीं, जेथें सदैव शांति आणि सुखच असेल. "

# रहस्य सर्ग

श्रद्धा मनूला एका रहस्यमय प्रदेशांत नेते. तेथें नवग्रह, तारे आणि नक्षत्र-ज्योति दिसतात. दोघांची दृष्टि गतिमान अशा तीन दिव्य वर्तुळांकडे जाते. अधीर, जिज्ञासु मनु श्रद्धेला विचारतो, " श्रद्धे, हें इंद्रजाल तर नाहीं ! मला वांचव, दूर ने येथून. "

तो एक अद्‌भुत लोक होता. तेथें भूगोलाची सीमारेखा नव्हती. संपूर्ण निराधार प्रदेश होता तो.

श्रद्धा : " वर्तुळांचा हा त्रिकोण आहे मनु, आणि त्यांच्या मध्यबिंदूंत तुम्ही आहांत. हीं तीनहि वर्तुळें विपुल, क्षमता आणि शक्तिशाली आहेत. जरा धैर्यानें पहा त्यांच्याकडे. हीं तीनहि वर्तुळें म्हणजे अनंत इच्छा, अविरत कर्म आणि ज्योतिर्मय ज्ञान यांच्या अलगअलग सृष्टि आहेत. यांत शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध यांच्या पारदर्शनीं पुतळ्या सदैव नाच करीत आहेत. येथें एकीकडे चिरवसंत दिसतो तर दुसरीकडे पतझड. अमृत आणि विष यांचें येथें मिश्रण झालें आहे. सुख आणि दुःख या वर्तुळांत एकाच सूत्रांत ओवलेलीं आढळतील. "

मनु . " वाहवा, सुंदर ! पण तो कोणता श्याम प्रदेश, कामायनी ? सांग त्यांतलें रहस्य मला. "

श्रद्धा : " मनु, हा श्यामल लोक कर्माचा आहे. धूमधारेसारखा तो मलीन आहे. कर्माचें चक्र येथें सदैव फिरत असतें. कोणती तरी एखादी ईषणा प्रत्येकाच्या मागें लागून त्याला कर्मरत करते. क्षणभरसुद्धां विसांवा घेऊं देत नाहीं. क्रियातंत्राचा दास बनतो जीव या प्रदेशांत. नियति हें कर्मचक्र चाल-वीत असते. पंचमहाभूतांची येथें सदैव उपासना चालू असते. अविच्छिन्न संघर्ष, विफलता, कोलाहल इत्यादींचा येथें धुमाकूळ आहे. जणुं सर्वजण अंधःकारांत एकसारखे धांवत आहेत. येथेंच एकीकडे विजयी शासनांच्या घोषणा होतात, दर दुसरीकडे क्षुधापीडितांना पददळीं चिरडलें जातें. मृग-जळासारख्या वैभवाच्या राशी येथें दिसतात. कीर्तीची आणि यशाची लालसा येथें किती असते ती काय सांगूं ! मनु, याच लोकांत प्राण सर्वांत अधिक प्रिय मानले जातात. "

मनु : " पुरे, पुरे, श्रद्धे, हें भीषण कर्मजगत् नको दाखवूं मला यापुढें. जो उज्ज्वल आणि दिव्य दिसतो तो तिसरा कोणता प्रदेश ?"

श्रद्धा : " प्रियतम, अहो हीच ती ज्ञानभूमि. येथें तुम्हांला सुख–दुःखाविषयीं उदासीनता आढळेल. येथला न्याय अगदीं निष्ठुर बरें. सर्व असतें बुद्धीच्या आधीन येथें. येथेंच अस्ति-नास्तिसारखे वाद आणि भेद अणु तर्कानें केले जातात. निःसंग असूनहि येथें सुद्धां मोक्षाशीं संबंध लावण्याची सोय करून ठेवली आहे. ज्ञान, तप, ऐश्वर्य या कारणांनीं येथील लोक अति तेजस्वी वागतात. आपापलीं मोजकीं पात्रें घेऊन ते जीवनरसाचा बिंदु बिंदु सांठविण्यासाठीं अधीर असतात. येथें सर्वच तोलून मापून असतें. उत्तमता हीच या लोकाची कसोटी आहे. मधुमक्षिकेप्रमाणें हे ज्ञानी लोक जीवनांतील अमृतसंग्रह क्षणाक्षणाला कणाकणानें करीत असतात. मौज अशी कीं जीवन-रस सांठविला जातो खरा, पण त्याचा ओष्ठस्पर्श केला जात नाहीं. येथील भाग्य इतकेंच कीं, ज्ञान, तृषा, समाधानविरहित विफल तृषा, ज्ञानतृपा ! हे प्रयत्न करतात सामंजस्याचा. पण पसरते मात्र विषमताच सगळीकडे. मनु, पाहिलें का हें त्रिपुर ? ज्योतिर्मय तीन बिंदु प्रत्येकीं किती सुंदर आणि दिव्य ? पण आपल्याच विचारांत कसे दूर दूर फेकले गेलेले. ज्ञान एकीकडे तर क्रिया दुसरीकडे. मग मनांतल्या इच्छा कशा पुऱ्या होणार ! त्या भोवऱ्या-सारख्याच गरगर फिरत राहतात. हीच आहे विटंबना या जीवनाची.

त्याच क्षणीं श्रद्धेच्या अत्यद्भुत स्मितानें महाज्योतीच्या रूपांत त्या तिन्ही लोकांना व्यापून उजळून टाकलें. तिन्ही लोकांचा संबंध श्रद्धेनें घडवून आणला. इच्छा, क्रिया आणि ज्ञान यांचा समन्वय झाला. मनु श्रद्धायुत तन्मय बनला.

## आनन्द सर्ग

मानवतेचा आदिपुरुष मनु आणि त्याची अभिन्न सहचरी श्रद्धा जीवन-यात्रेला निघालीं आहेत. दोघेंहि पथिक एकसारखीं उंच उंच चढतच आहेत ! चढतांना आनंदाचीं गाणीं गात, सुखाचीं रहस्यें शोधून तीं वर वर जातात.

विश्वाची मंगल कामना कामायनी पुढें आणि ऋतुमय मानव तिच्या मागें. सर्व कांहीं सुंदर, साकार, सत्य दिसतें. चेतनता एकमेव सर्वांठायीं विलसते आहे असा साक्षात्कार होतो त्यांना. आणि अखंड आनंद साऱ्या विश्वांत अणुपरमाणूंत घनदाट भरलेला आहे असा अनुभव घेतात तीं !

श्रद्धा आणि तिच्यामागें मानव अनादिकालापासून आपला अनंत पंथ आक्रमीत आहेत.

******

३७०५ दि.
१५१८ नों. दि.



# ॥ कुरुक्षेत्र ॥

## कवि–दिनकर

आधुनिक भारतीय साहित्यांत हिंदी भाषेचें काव्योद्यान अतिशय व्यापक असून रमणीय सुद्धां आहे. गेल्या अर्धशतकांत विशेषत: महाकाव्य आणि खंडकाव्यांच्या बाबतींत दुसऱ्या कोणत्याहि भारतीय भाषेंत झालीं नाहींत इतकीं सुंदर, सत्यबोधक आणि शाश्वत मूल्यांचीं महाकाव्यें हिंदींत रचलीं गेलीं आहेत. 'प्रिय प्रवास', 'वैदेहि वनवास', 'साकेत', 'कामायनी', 'कुरुक्षेत्र', 'अंगराजा', 'एकलव्य', 'कृष्णायन'. 'पार्वती' इत्यादि ठळक ठळक कृतींनीं हिंदी कवींनीं आपल्या साहित्याला सजविलें आहे. यांत 'कामायनी'नें तर इतका गौरव प्राप्त केला आहे कीं आतां विश्वसाहित्यांतील अमर काव्यकृतींत तिची गणना होऊं लागली आहे. दिनकर कवीनें 'कुरुक्षेत्र' रचून हिंदींत एक मौलिक विचारांची भर टाकली आहे. आज हिंदीकाव्यक्षेत्रांत गाजलेल्या या काव्याचा परिचय करून देण्याचें योजलें आहे.

भारतीय युद्धाच्या आरंभींच अर्जुनानें रणभेरी निनादल्यावर आपला पांचजन्य तर वाजविला पण कोणाशीं युद्ध करायचें हें क्षणभर पाहण्यासाठीं तो थांबला. " समोर सारेच बेटे जांवई ! बाप, दादे, काके " पाहून अर्जुनाच्या मनांत विषाद उत्पन्न झाला. त्या मन:स्थितींत तो कृष्णाला म्हणाला,

" हृषिकेशी । या युद्धाची ऐशी तैशी ।
बेहत्तर आहे मेलों उपाशी । पण लढणार नाहीं ।।
"धोंडयांत जावो ही लढाई । आपल्या बाच्यानें होणार नाहीं ।।"

असें म्हणून तो कृष्णाला सांगतो.–

"काखें झोळी, हातीं भोपळा । भीक मागून खाईन बापडा
पण हा वाह्यातपणा कोठला । आपसांत लठ्ठालठी ।।"

अर्जुनाच्या मनांत उठलेलें तें काहूर पाहून आतां हा पळणार युद्धांतून, असें वाटून कृष्ण त्याची चांगली खरडपट्टी काढतो. नागपूरच्या एका दिवंगत प्रतिभावान् लोककवीनें ग्रामीण भाषेंत 'कुरुक्षेत्राच्या युद्धारंभीं'चा तो नाटचमय प्रसंग मोठ्या प्रभावी बोलभाषेंत रंगविला आहे. अर्जुनाचा तो विषाद पाहून कृष्ण त्याला म्हणतो .

हा कोठला बे बायलेपणा ।
पहिल्यानें तर टणटणा । उडत होतास लढाया ।।
मारे रथावरी बैसला । शंखध्वनि काय केला ।
मग आतांच कोठें गेला । जोर तुझा मघांचा ?
तूं बेटचा मुळांतच ढिला । पूर्वींपासून जाणतों तुला ।।
परि आतां तुझ्या बापाला । सोडणार नाहीं बच्चम्‌जी ।।
अहाहारे भागुबाई । म्हणे मी लढणार नाहीं ......
बांगड्या भर कीं रडूबाई । आणि बसा दळत ।
नव्हतें पाहिलें मैदान । तोंवर उगाच करी टुणटुण ।।
म्हणे यंव करीन, त्यंव करीन । आतांच जिरली कशानें ?
अरे तूं क्षत्रिय कीं धेड ?। आहे कीं विकली कुळाची चाड ?
लेका–भीक मागायचें वेड । टाळक्यांत शिरलें कोठून तुझ्या ?

भगवान् कृष्णानें असे कान पिळल्यावर पुढें कुरुक्षेत्रावर काय झालें तें सर्वांना माहीत आहेच ! वरील उतारा ज्या 'ग्रामगीतें'तून दिला ती गीता कवि श्री. उपाध्ये पुरी करूं शकले नाहींत. अगदीं याच धर्तीवर कवि दिनकरानें आपलें 'कुरुक्षेत्र' 'खडी बोली' हिंदींत लिहिलें आहे. पण प्रसंग मात्र निराळा आहे.

'कुरुक्षेत्रां'तील नायक युधिष्ठिर. पांडवांचा विजय झाला. कुरुक्षेत्रावर पांडवांच्या शिबिरांत जयनाद होत होते, पण समोर स्मशान जळत होतें. एक अंध व वृद्धा आणि अगणित विधवा रुदन करीत होत्या; श्वापदें मृत शरीरांची मेजवानी झोडीत होतीं. हें सर्व पाहून युधिष्ठिराच्या कोमल हृदयांत हळहळ उत्पन्न झाली. अगणित मूलभूत प्रश्न त्याला सतावूं लागले. महाभारत व्यर्थ झालें असें त्याच्या अंतःकरणाला

वाटलें. रक्तरंजित सिंहासनावर बसून, जळता किरीट घालून, उध्वस्त साम्राज्यांत विधवा, विकल, पंगु यांच्या समाजावर राज्य करायचें कीं वनांत पळून जायचें असें द्वंद्व त्याच्यासमोर नाचूं लागलें. तो संभ्रान्त झाला. त्याला उत्तर मिळेना. द्रौपदीच्या लाजेसाठीं साऱ्या भरतभूमीचा आपण नाश केला, असें त्याला वाटलें. इतिहासाच्या, आपण घडविलेल्या इतिहासाच्या, अध्यायाचीं पानें उलटत तो रडूं लागला ! भारतीय युद्धानंतर अवघे दहा लोक मागें राहिले. मृतांना श्रद्धांजलि कसली, त्यांची राख सावरायलासुद्धां कोणी नव्हतें. रक्तसरितेच्या तीरावर उभा राहून तो युधिष्ठिर "त्या रणांगणांतील राख सावरून" आपल्या हातीं काय आलें याचा विचार करूं लागला. पण त्याला समाधान लाभलें नाहीं. उद्विग्न, व्यथित, संभ्रान्त युधिष्ठिराला वाटलें कीं पितामह भीष्म कदाचित् आपल्या समस्यांची उकल करतील म्हणून तो त्यांच्याकडे गेला आणि त्यांना आपलें अंत:करण त्यानें उघडें करून दाखविलें. गतइतिहासाचा आढावा घेऊन प्रमादांचें आणि गुणदोषांचें विवेचन करून भीष्म युधिष्ठिराला समाजनीति समजावून सांगूं लागले. "राजानें यतिधर्माचा स्वीकार करूं नये, त्यानें राष्ट्रनाश होतो. वनांत नाहीं तर जनांत आणि कोटिकोटि मानवांच्या दु:खांचा परिहार कर, त्यांच्या जीवनांत आशा आनंद भर, यांतच व्यक्तीचेंहि जीवनसार्थक्य आहे."

हा आहे या 'कुरुक्षेत्र' काव्याचा विषय. 'दिनकर' रामधारिसि १९०९ सालीं मुंगेर जिल्ह्यांत एका साधारण शेतकऱ्याच्या घरांत जन्मले. १९३२ सालीं पदवी घेऊन त्यांनीं शिक्षकाच्या व्यवसायांत पदार्पण केलें. १९३० सालींच त्यांच्या कविता प्रकाशांत येऊं लागल्या होत्या. राष्ट्रीय आंदोलनाच्या लहरी आणि वावटळी कवीच्या काव्यप्रतिभेस हलवून सोडत. 'प्रणभंग', 'रेणुका' या पहिल्या वहिल्या काव्यकृतींतून त्यांचे राष्ट्रीय विचार चांगल्या ओजस्वी भाषेंत आणि काव्यशैलींत प्रसृत झाले. तेव्हांपासून कवीला हिंदी साहित्यांत गौरवाचें स्थान प्राप्त झालें. आतांपर्यंत काव्य, साहित्यसमीक्षा, संस्कृति, इतिहास इ. अनेक विषयांवर या कवीनें लहानमोठे गद्यपद्यात्मक चाळीसवर प्रबंध लिहिले आहेत. "संस्कृतीके चार अध्याय" हा एक विशाल ग्रंथ लिहून दिनकरांनीं भारतीय संस्कृतीच्या इतिहासाचें मूलगामी विचार-मंथन केलें आहे. या ग्रंथांतील अनेक विचार, इतिहासाची घटना–संगति

व अन्वयार्थ अत्यंत विवाद्य ठरले आहेत. पण हें कोणालाहि मान्य करावें लागेल कीं, श्री. दिनकर हे आज हिंदी साहित्यक्षेत्रांत उच्च श्रेणींतील साहित्यिक आहेत. दिनकर गेलीं अनेक वर्षें भारतीय राज्यसभेचे सदस्य आहेत.

'कुरुक्षेत्रावर केवळ परिचयलेख आहे हा. त्याचें साहित्यिक परीक्षण नाहीं, अथवा त्यांत मांडलेल्या विचारांचें खंडन-मंडन नाहीं. हिंदी साहित्यां-तील एका गाजलेल्या काव्याची ओळख मराठी भाषिकांना करून देणें एवढाच हेतु आहे. तसें म्हटलें तर दिनकर हे तत्त्वनिष्ठेनें 'टिळकपंथी' आहेत. त्यांच्या स्वतःच्या कबुलीप्रमाणें 'गीतारहस्याचा' दिनकरांच्या जीवनावर आणि विचारसरणीवर अनन्यसाधारण प्रभाव पडला आहे. "टिळकांचें तत्त्व-ज्ञान पद्यमय काव्यरूपांत मांडण्याचा माझा प्रयत्न होता. तेच श्रेय मला 'कुरुक्षेत्र' रचनेनें मिळालें पाहिजे." कुरुक्षेत्रांत इतर अन्य प्रक्षिप्त प्रश्नांच्या उत्तरांत टिळकांनीं 'गीतारहस्यांत' सांगितलेल्या अनेक गोष्टी आणि व्याख्या ठिकठिकाणीं ग्रथित केलेल्या आढळतील. दिनकरांनीं आपल्या संस्कृ-तीच्या चार अध्यायांत अगदीं स्पष्ट म्हटलें आहे कीं, "गीता एकबार भग-वानके मुखसे कही गयी किंतु दुसरी बार उसका सच्चा आख्यान लोकमान्य-नेही किया। दोनों के बीच की अन्य सारी टीकाएँ और व्याख्याएँ गीता के सत्य पर केवल बादल बन कर छाती रही है।"

कुरुक्षेत्र वाचतांना युधिष्ठिराच्या तोंडून 'गांधीवाद' पूर्वपक्षांत वद-वून दिनकरांनीं उत्तरपक्षांत भीष्माच्या तोंडून सिद्धान्त मांडला तो 'गीता-रहस्यां'तील कर्मयोगाचा यांत संदेह नाहीं.

गांधी आणि टिळक यांच्या तत्त्वज्ञानाविषयीं दिनकर म्हणतात, "गांधी-जीका प्रयोग नष्ट नहीं हुआ—उससे मान कर स्वतंत्र भारतकी वैदेशिक नीति चल रही है। शंकाएँ अबभी है। किंतु यह प्रयोग बडी बडी संभावनाओंसेभी युक्त है। इसके विपरीत, तिलकजीने जो विश्लेषण प्रस्तुत किया था वह भी अभी नष्ट नहीं हुआ है। भारतके बाहर तो आजभी इसी नीतिका बोलवाला है।"

कविमनाची ही वैचारिक पृष्ठभूमि आहे. काव्याचा प्रतिपाद्य विषय समजण्यासाठीं ती सांगणें अवश्य होतें.

'कुरुक्षेत्र' हें काव्य आहे कीं नाहीं? त्याला महाकाव्य कां म्हणायचें? त्यांत कथा अशी नाहींच! रसांचा अभाव, किंबहुना महाकाव्याचीं कोणतीहि लक्षणें त्यांत नाहींत. सत्य आहे. पण तरी ती एक अभिनव काव्यरचना आहे म्हणूनच वाचकांना तिची ओळख करून देतों. ( तिच्यांतील सौंदर्य, वैगुण्य, रसहीनता, इतकेंच काय, हे पितामह भीष्म आणि तो युधिष्ठिर द्वापारांतील भारतीय आहेत कीं नाहींत हें वाचकांनीं ठरवावें. 'कुरुक्षेत्रा'-नंतर युधिष्ठिराच्या मनांत असे विचार येणें शक्य नव्हतें का? ते तसे आले होते—हें शांतिपर्व सांगतें. दिनकरांनीं कलींतील 'युधिष्ठिरा'च्या मनांत काय काय विचार-प्रभंजन होत असेल हें फार चांगल्या रीतीनें मांडलें आहे.) तेव्हां चला आतां कुरुक्षेत्रावर आणि पहा तो 'युधिष्ठिर' कपाळाला हात लावून काय काय चिंतन करीत बसला आहे तें.

"व्यर्थ झालें हें महाभारत, अगदीं निष्फल ठरलें! अरेरे, किती दाहक—किती विषमय! पांच असहिष्णु माणसांच्या द्वेषानें अवघ्या देशाचा सत्यानाश झाला कीं!"

"होईल द्रौपदी दिव्य वस्त्रालंकृता, आणि आम्हांलाहि मिळेल निष्कंटक राज्य भोगायला. परंतु याचकरितां कोटच्यवधि माता आणि अनेक अक्षौहिणी स्त्रिया पुत्र—पति—बंधुहीन आम्हीं केल्या ना? कशासाठीं आम्हीं इतक्या अगणित स्त्रियांचे कुंकुम—सिंदुर पुसले?"

"भगवंता, काय केलें मी हें? कशासाठीं नररक्ताच्या या नद्या वाहविल्या? मुक्तकेशा द्रौपदीची वेणी लाल करण्यासाठीं, का भीमाची शोणित-तृषा शमन करण्यासाठीं?"

"अरेरे, मृत कौरवबांधवांचें श्राद्ध करण्यासाठीं सुद्धां कोणी शिल्लक राहिलें नाहीं. त्यांच्या चितेजवळ रडण्यासाठीं वांचलें कोण तर एक वृद्धा आणि एक अंध!"

भारतीय युद्ध संपलें होतें; कुरुक्षेत्राच्या रणभूमीवर पांडवांच्या शिबिरांत जयजयकार आणि हर्षनिनाद गर्जत होते. परंतु तशा त्या विजयमदानें आनंदोन्मत्त झालेल्या समुदायांत एक असा पुरुष होता कीं जो आपल्या कपाळावर हात मारून आपल्याशींच रडत होता. कुरुक्षेत्राच्या स्मशानभूमींत इतिहासाच्या संपलेल्या अध्यायावर चिन्तालीनसा रुदन करीत होता.

" रक्तलांछित अशा या राज्याचा उपभोग वज्राच्या अंत:करणानें मी कसा घेऊं ? अभिमन्यूचें रक्त आहे त्यांत सांडलेलें. छे, व्यर्थ लढलों हे महाभारत!

युद्धाच्या विजयानें युधिष्ठिराला आनंदित केलें नाहीं. कुरुक्षेत्रावरील स्मशानानें त्याच्या हृदयांत उद्वेगाची आग लावली होती. धर्माची बुद्धि जी आतांपर्यंत दबून सुप्त झाली होती ती आतां चेतली. रणाच्या राखेंत कोणतें तत्त्व सांपडतें हें शोधूं लागली. दु:खोद्वेगानें हृदय भरलें होतें त्याचें. तो धर्मराज इतकेंच बोलला. " पार्था, मी जातों पितामहांजवळ ! "

जीवनाचें अत्युच्च श्रृंग चढून आज पितामह भीष्म शरशय्येवर लेटले होते. अजेय पितामहाला नेण्यासाठीं मृत्यु आला होता, पण उत्तरायणांत निर्याण करण्याची इच्छा असल्यामुळें मृत्यूला त्यांनीं जवळपास थांबायला सांगितलें; पितामहाची आज्ञा मानून मृत्यु हात जोडून शुभमुहूर्ताची वाट पाहत उभा होता.

राजा युधिष्ठिर पितामहांजवळ गेला; त्यांच्या पायांशीं तो नतमस्तक झाला; अश्रुजलानें त्यानें पितामहांचे पाय धुतले तो व्याकुळ, अधिर धर्मराज गद्‌गद स्वरानें विव्हळला, " हाय पितामह, विफल झालें महाभारत ! " अत्यंत व्यथित अंत:करणानें युधिष्ठिर पुढें म्हणाला, " पितामह, दुर्योधन दुन्दुभीच्या जयनादांत वीर गतीनें गेला, आणि माझ्या हातीं राहिला आहे हा उध्वस्त संसार, हें धर्मक्षेत्राचें स्मशान. पितामह, जय कोणाचा झाला? आणि पराजय कोणाचा ?

" आज मी मानवजातीच्या रक्तसरितेच्या कांठीं वसून आपल्याच भाऊबंधांच्या चिता जळतांना पाहिल्या. त्या भस्माच्या राशी सावरून कोणाला सुख मिळणार ? पितामह, पराजय झाला कोणाचा ?

" युद्धाचा परिणाम असा होणार हें अगोदर कळतें तर, शरीरसामर्थ्य दूर ठेवून मी केवळ मनोबळानें माझ्या तप:पुण्यानें, सहिष्णुतेनें, इतकेंच नव्हे तर त्यागानें सुयोधनाचें मन जिंकलें असतें. एका नवयुगाचा इतिहास आरंभला असता, आणि तें जमलें नसतें तरीसुद्धां हा रक्तपात मी होऊं दिला नसता, माझ्या भावांना बरोबर घेऊन भीक मागत मरून गेलों असतों मी.

" परंतु, हाय दुर्बुद्धे ! युद्धाचें बीज पेरलें गेलें तेव्हां असा कसा माझ्या दिव्यज्ञानानें माझा घात केला ? भीमाच्या त्या गदेनें, पार्थाच्या बाणानें

माझी मति फिरवली; माझ्या अर्जुनाला रणांगणांत शंका आलीच, पण भगवंतानें उलट त्या विझत्या ज्वाळेंत धृत ओतून ती अधिकच भडकावली; पितामह, आम्हा सर्वांचा बुद्धिभ्रंश झाला ; अभिमानानें सर्वनाश केला.

" भगवान कृष्ण म्हणतात युद्ध पुण्यमय आहे, स्वर्गांचें द्वार आहे, पण माझें हृदय तर पश्चात्तापानें जळतें आहे. ध्वंसजन्य सुख व शांतिमय दुःख यांमध्यें कोणती गोष्ट नीतीविरुद्ध आहे पितामह ?

" कुरुवंशाचा किरीट माझ्या हातीं आला खरा, पण त्यांत दाहक अग्नि आहे. अभिषेकानें मनांतलें पाप धुतलें कसें जाईल ? तो क्रूर नागासारखा दंश करतो आहे मला. तें विष पचविण्याचें सामर्थ्य माझ्यांत नाहीं. रक्तरंजित राज्यसुख म्हणजे चिखलानें माखलेलें कमळ नाहीं का ?

" पितामह, कुठें अपत्यहीन मातेचें करूण रुदन, तर कोठें पितृहीन बालकांचे आर्त स्वर आणि सगळीकडे कुंकुमहीन विधवांचीं दीन वदनें ! कोठें, जाऊं तरी कोठें ? तिकडे रणांतली आग विझली, त्याच क्षणीं माझ्या मनांत भडका उडाला आहे. कोणालाहि तोंड दाखवूं नयेसें वाटतें ! कोठेंतरी रानावनांत पळून जावें असा विचार मनांत येतो. आत्महत्याच केली असती, पण कुळाला कलंक लागेल, म्हणून वाटतें कुठें तरी दूर जावें. अगदीं दूर, अशा ठिकाणीं कीं, जेथें पशुपक्षी सुद्धां पाहायला नसतील. एकाद्या गुहेंत बसून मनसोक्त रडावें आणि हृदय हलकें करावें. वनांत जाऊन पाप माझी पाठ सोडील असें नाहीं, पण निदान ' धर्मराज ! ' असें हिणवायला तरी कोणी येणार नाहीं तेथें !"

भीष्मानें युधिष्ठिराकडे न्याहाळून पाहिलें. त्याच्या हृदयाचा ठाव घेत ते म्हणाले, " युधिष्ठिरा, तूं कधीं झंझावात पाहिला आहेस का रे ? मानवाची कृति आणि प्रकृति उन्मूलन टाकणारा प्रभंजन वाहतो काय असतें त्याचें कारण ? ग्रीष्माच्या प्रचंड निदाधानें जेव्हां प्रकृतीचें प्राणवायु तापतात, तेव्हां ते आवेगमय विस्फोटांत रूपान्तरित होतात. अगदीं त्याचप्रमाणें मनाच्या आकाशांत विकारांच्या अग्निशाखा धगधगूं लागल्या कीं, क्षोभ, लोभ, ईर्षा, घृणा, द्वेषादि भावनांनीं भडका होतो त्यांचा. अशा रीतीनें भावना तापल्या कीं, मग स्फोट व्हायला काय, कोणतेंहि लहानसहान कारण पुरतें. देशाचें

लज्जारक्षण, राष्ट्राचें मानरक्षण, देशाचें प्रेम, नांवें कांहींहि द्या, पण त्या सर्व कारणांच्या मुळाशीं घृणा, स्वार्थ, द्वेष,असूया इत्यादि प्रकारचें विषच असतें."

"युद्धाचे परिणाम कोणाला माहीत का नसतात ? पांचांच्या सुखासाठीं अक्षौहिणींची हत्या झाली ! पण तें एक निमित्त होतें. धर्मा, खरें म्हणजे आणखी दुसऱ्या अनेक भावना, स्वार्थ, पौरुष, शौर्याचें प्रदर्शन या एकवटल्या कीं मग कोठें तत्त्वाचा विचार करायला वेळ ? धर्मा, आणि तुझ्या मनांत जे हे विचार आले ना, ती तर अगदीं व्यर्थ फोल बडबड आहे बरें. अरे, कसलें पाप आणि कसलें पुण्य घेऊन बसला आहेस ! खरें म्हणजे असें कोणतेंहि कर्म नाहीं कीं ज्याला पापपुण्य म्हणतां येईल. त्या कृष्णानें म्हटलें तें सत्य आहे. कर्ता असतो त्याच्या भावनेवरच अवलंबून असतें पाप आणि पुण्य. जीवनाच्या संघर्षांत आपण किती अनासक्त राहूं शकतों हाच आहे मुख्य प्रश्न. युधिष्ठिरा, मी सुद्धां ऐकल्या पाहिल्या आहेत धर्माधर्माच्या गोष्टी आतांपर्यंत. पण खरें सांगूं ? मला सुद्धां पापपुण्य, धर्माधर्म यांना भेदणारी रेषा कोणती तें समजलें नाहीं; आपलें स्वत्व हरण करण्यासाठीं कोणी आला तर त्याच्याशीं तपत्यागाच्या गोष्टी करायच्या ? आक्रमक हात छिन्न करून टाकणें हेंच पुण्य आहे. ज्याच्या मनगटांत ताकद आहे त्यानें जीवनासाठीं, भिक्षा मागूं नये. जगण्यासाठीं ज्वलन्त वीरता आवश्यक असते. धर्मराजा युद्धाला तूं निंद्य समजतोस, स्वार्थाच्या संघर्षांतून जोंपर्यंत ठिणग्या उडतात तोंपर्यंत विश्वांत युद्ध अनिवार्य राहील. बरें, तुला असें वाटतें का कीं पांडव भिक्षु बनून पळून गेले असते तर युद्धाचा विस्फोट झाला नसता ?

"धर्माचें आणखी एक रहस्य तुला सांगून टाकतों; दोन दिवसांनीं मला हें जग सोडायचें आहे, आतां लपवून ठेवण्यांत तरी काय मतलब ? धर्मा, लक्षांत ठेव कीं तप, त्याग, क्षमा इत्यादि धर्म म्हणून व्यक्तीला शोभा देतात, पण समाजाचा, राष्ट्राचा प्रश्न उद्‌भवतो तेव्हां या सर्व गोष्टी विसराव्या लागतात. कौरवांच्या नाशामुळें जो एक रडत राहिला आहे, त्यालाच जाऊन विचार कीं समाजधर्म म्हणजे काय, आणि महाभारत अनिवार्य नव्हतें का? धन-धाम हरून पांडव वनवासाला गेले तेव्हां त्या समुदायाला काय वाटलें ? अहो धर्मराज, आणखी एक विचारूं का ? व्यक्तिधर्माची थोरवी जाणणारा तूं स्वतःच्या पत्नीचें लज्जाहरण डोळ्यांदेखत होत असतांना तूं पंढासारखा

पाहत कां राहिलास ? त्या वेळेस तूं कांहीं केलें नाहींस ! तें काय पुण्यकार्य होतें?

" एकाद्या भ्याडासारख्या गोष्टी काढून मला आतां संतापवूं नकोस. माझ्या जीवनाचा आदर्श बलिदान आहे. माझ्या ज्ञानमंदिराच्या जयजयकारासाठीं शौर्याची शर्थ करून मी युद्धाच्या मार्गानें विश्वाच्यावर जात आहें."

" त्याग, तप, भिक्षा ? माहीत आहेत या सर्व गोष्टी मला. वेड्या युधिष्ठिरा, अरे विरागी यतिधर्म आहेत हे, किंवा ज्याच्या हातीं शायक नाहीं त्याची ही नीति असते. अथवा बलहीन कापुरुषाचें असें फोल पाखंड असतें. ज्याला युद्धाचें भय वाटतें, मरणापेक्षां मानहीन दरिद्री जीवन रुचतें त्याचें हें प्रवचन असतें. पशु काय आणि मानव काय, हिंसकाशीं गांठ पडली कीं केवळ शरीरबळच उपयोगी पडतें, मनोबल चालत नाहीं. म्हणून म्हणतों धर्मराजा, योग्यांची शक्ति असेल खूप, पण ती समुदायाला हरवूं शकत नाहीं; हिंसकाला भिववीत नाहीं. भगवान रामानेंहि हेंच सांगितलें आहे. मतिभ्रष्ट मानवाच्या सुधारणेचा उपाय केवळ एकच, शस्त्र आहे. मनुष्य तप, त्याग यांनीं सुधारूं शकत नाहीं; पतितसमूहाच्या कुवृत्तीसमोर तप फिकें पडतें, समजलास ? "

पितामह भीष्म पुढें म्हणतात :

" समर निंद्य आहे धर्मराज, पण शांती तरी काय आहे ? क्षुधितांचा घास काढून घेऊन, सुख-समृद्धीचीं कोठारें भरून घेऊन, तीं रक्षण करण्यास प्रहरी बसवून मग सांगायचें, ' शांत, कांहीं बोलूं नका ! शांतीचें साम्राज्य भंग होईल ! ' यालाच का शांति म्हणायचें ? " सुखाची सम्यक् वांटणी जेथें न्यायानें होत नाहीं, जेथें सत्ताधारी नीतीचें पालन करीत नाहींत; जेथें समाजाचे नेतेच मुळीं अन्यायी, अविचारी बनतात; जेथें संधीचीं कलमें पाळलीं जात नाहींत ; ज्या ठिकाणीं सत्यवचन बोलणारें मुख बंद केलें जातें, त्याचें शिर उडविलें जातें; जें शासन केवळ खड्गबलावर चालतें; ज्या राज्यांत व्यक्ति-व्यक्तीच्या हृदयांत असंतोषाचा व क्रोधाचा अग्नि सतत धुमसत राहतो; तेथें तेथें धर्मराजा, वरून कितीहि शांति दिसली तरी, निश्चित समज कीं, तळाशीं ठिणग्या उडून राहिल्या आहेत. केव्हां तरी नवीन जुलुम, असह्य शोषण, अक्षम्य उपेक्षा, किंवा प्रक्षोभक अपमान ह्या सर्व दबलेल्या आवेगांचा विस्फोट करवील, आणि अन्यायी अपराधींच्या विरुद्ध

कृतांत कालासारखा दलित मानवाला उभा करील. धर्मराज, त्या वेळेस कोणाला दोष द्याल तुम्हीं ? कोणाला उत्तरदायी समजाल ?

" कुरुक्षेत्राच्या पूर्वी कधीं युद्धेंच झालीं नव्हतीं का धर्मराज? त्याचें कारण हेंच आहे. जोंपर्यंत सुखाची समविभागणी होत नाहीं तोंपर्यंत या विश्वांत शांति कोठली ? ज्यांच्या वांट्याला सुख आलें आहे ते कशाला मागतील युद्ध ? पण ज्यांचीं हाडें भरडलीं जातात, रक्ताचें पाणी होतें त्यांनीं जगावें कीं शांतिपाठ करीत मरून जावें ? न्याय्य अधिकार मिळाला नाहीं तर तेजस्वी पुरुष त्यासाठीं युद्ध करतो. मग त्यांत मरण येवो, त्याला त्याची पर्वा नसते. स्वत्वासाठीं लढणें यांत पाप आहे असें कोणी सांगितलें तुला ?

" धर्मराज, मला सांगा कीं हिंसेचा आघात तपस्येनें कधीं केला ? सत्य तर हें आहे कीं, देव सदा दानवांकडून पराजित झाले आहेत ! तुला जर मनोबलाचें माहात्म्य इतकें वाटत होतें तर वनांतून परतलास कां त्या राज्यलोभानें ? तूं मोठा तोरा मिरवतोस धर्म, सत्य, क्षमा, तप, मनोबल इत्यादींचा. पण काय, वीर सुयोधन एकदां तरी तुझ्यापुढें नमला आहे काय? तुम्ही मात्र जितके मऊ झालांत तितके तितके भ्याड समजले कौरव तुम्हांला !

" धर्मराज, क्षमा कोणाला शोभते ? विषारी भुजंगालाच ! दंतहीन, विषरहित गाडुळांनीं क्षमेची, शांतीची भाषा करावी ? क्षमेच्या पडद्यामागें आपली भीरुता झांकून ठेवणाऱ्यांना ज्वलन्त, जिवंत माणसाच्या पौरुषाची काय कल्पना येणार ? ज्यांच्या मनगटांत सामर्थ्य नाहीं ते करतात आत्म-बलाच्या गोष्टी. करुणा आणि क्षमा हे माझ्या मतें षंढजातीचे कलंक आहेत; वीराचा अलंकार क्षमा करण्याची क्षमता हा आहे.

" युधिष्ठिरा, प्रबुद्ध दलितांचें खड्ग कधींच पापी नसतें. पददलिताच्या अस्त्राला जो पातकी म्हणतो त्याला तत्त्वज्ञान कळत नाहीं. शोषकांच्या शृंखलेंत अडकलेल्यांनीं शांतिपाठ करणें म्हणजे पातक आहे, मानवतेचें अधः-पतन आहे. मरण आहे. त्या शृंखला तोडण्यासाठीं लढणें म्हणजे अशांति नव्हे, अशांतीचें बीजोन्मूलन होय !

"धर्मराज, हें विसरूं नकों कीं या भूतलावर अजून चहूं दिशांना हिंस्र प्राणी आहेत, चहूंकडे अहंकार हुंकार करतो आहे. चहूंकडे कपट कारस्थान चालू आहे ! "

"आपल्या विश्वांत जिघांसासुद्धां नसावी, भूगोलावर प्रेम, करुणा, अहिंसा नांदावी असें मला का वाटत नाहीं ? मला सुद्धां राहून राहून वाटतें कीं, धरणीवर आपण स्नेहाचें साम्राज्य स्थापन करावें, विष आणि वैर या भूतला-वरून फेकून द्यावींत. परंतु हाय धर्मा ! आपण अजून अर्ध्याच मजले-पर्यंत पोहोंचलों आहोंत. शांतीचें स्वप्न अजून फार दूर आहे, तुझ्यासारखा धर्म कोटयानु कोटींत एकलाच, आणि सुयोधन मात्र अगणित. शांतीची लता कशी वाढणार ?

"धर्मा, शांति कुंभाराच्या चाकावर मातीच्या ढिगांतून का बनते ? धर्मा, शांतीचें आसन समर्थ माणसाचें मन आहे. समता देणारी शांति आहे कोठें ? अरे, आज तर विषमतेचीच ती राखणदार बनली आहे. सावध रहा, धर्मराज ! दिसायला कशी निष्पाप, वाणी किती गोड, मोहक पण अत्यंत शुभ्र वस्त्र परिधान केलेली ती नागीण आहे बरें ! या शांतीचे दांत विषारी आहेत. याच शांतीनें नृपांना जरासंधाच्या कारागारांत अडकावलें होतें. हीच पिते दीनदलितांचें उष्ण रक्त.

"धर्मराया, अरे पापी कोण ? मानवाला न्याय नाकारणारा, कीं न्यायाच्या शोधांत अन्यायाचा शिरच्छेद करणारा ? धर्मराज, सांग, विचार करून सांग !"

पितामह भीष्म आपल्या शरशय्येवरून युधिष्ठिराला अत्यंत मूलगामी असें जीवन तत्त्वज्ञान समजावून सांगत होते. भीष्मासारखा ब्रह्मचारी, धर्म-ज्ञानाचा जणूं स्तूपच, बलाचा सागर, थोर विरागी दुसरा कोण झाला आहे ? धर्मासाठीं राजमुकुट आणि स्नेहासाठीं प्राणहि ज्यानें दिले असा दुसरा कोण होऊन गेला ? असे ते पितामह युधिष्ठिरापुढें गहन तत्त्वज्ञानाच्या विचारांचे सर गुंफून राहिले होते. पितामह म्हणाले,

"धर्मराज, शांति मानवाला प्रिय असते, दानवांना नाहीं. आणि मानव जसजसा शांतिप्रिय बनतो तसतसे दुष्ट दानव त्याला भ्याड समजून आणखी उपद्रव करूं लागतात.

"कौरव पांडवांचें युद्ध झालें तें केवळ दोन घराण्यांतलेंच द्वंद्व होतें का ? युगायुगापासून सांठलेल्या विषाचा तो परिपाक होता. भारतीय युद्धाचीं कारणें अनेक आहेत. केवळ पांच पांडवच नव्हेत. कर्ण, शकुनि, द्रुपद, कृष्ण,

तुझा राजसूय यज्ञ, तुमची साम्राज्यसत्ता, अशा अनेक कारणांमुळें हा युद्धाचा स्फोट झाला. भारताच्या दुर्भाग्यास द्यूत कारण होईल असें कोणाला वाटलें होतें ? भर सभेंत द्रौपदीची साडी सोडली कीं भारतीय युद्धाची चिनगारी सोडली ? दुर्योधनाचा द्वेषाग्नि अगदीं नंगा नाच घालीत होता. कसे कोण जाणें, त्या दिवशीं तूंच नव्हे तर मी सुद्धां अगदीं पराजित झालों. भुजा फोडून रक्ताचे पाट कसे वाहिले नाहींत हें आश्चर्य आहे ! ज्या दिवशीं त्या द्रुपदकन्येनें आम्हांकडे पाहून निराश होऊन भगवंताला बोलावलें त्याच दिवशीं मानवाच्या कीर्तीला कलंक लागला. एका निर्दोष कुलवधूला, ती रजस्वला, एकवस्त्र असतांना द्यूताच्या कारस्थानानें दासी म्हणून कुल-सम्राटाच्या दरबारांत आणलें त्याच दिवशीं वास्तविक महासमर प्रारंभ व्हायला हवें होतें. धर्माच्या गप्पा मारतोस, पण भावी भारतीय पिढ्या आपल्या तोंडावर थुंकतील. त्या दिवशीं सतीचें लज्जावस्त्र फेडलें जात असतां वीर म्हणवून घेणारे षंढासारखे पाहत राहिले. धर्मराजा, त्या प्रसंगाची आठवण होतांच माझ्या हृदयांत काय होतें हें कसें सांगूं तुला ? धिक्कार असो मला, ज्यानें राज-वधूची, एका अबलेची, लाज डोळ्यांदेखत लुटली जातांना पाहून शस्त्र उचललें नाहीं. मी जिवंत श्वासोच्छवास करीत राहिलों. धरणी कशी दुभंगली नाहीं ? दिग्गज कसे ढळले नाहींत ? वज्र कां कोसळलें नाहीं त्या क्षणीं ? धर्मराया, भीष्मानें कोणाचाहि अनुचित दर्प सहन केला नव्हता, अन्याय कोठेंहि होवो, भीष्मानें तो मौन राहून कधींहि पाहिला नव्हता ! ”

पितामह भीष्म अत्यंत हळहळत होते; आपल्या वीरचरितासंबंधीं एक प्रश्न सदैव मागें विचारला जाईल असें त्यांना वाटत होतें. ते म्हणाले, “ धर्मा, माझ्या त्या दिवशींच्या वर्तनाविषयीं लोक कांहींहि म्हणोत, जातांना तुला एक उपदेश करून जातों. धर्मा, वीरांचा धर्म जळत्या निखाऱ्यावर निर्भय चालणें, तरवारीच्या तीक्ष्ण पात्यावर हंसत, नाचत, चालत राहणें हा आहे. उघड्या छातीवर तीर झेलणें हें शूरांचें काम असतें. वेळ येतांच हलाहल पितांना सुद्धां आनंद मानणें हें केवळ वीरालाच जमतें. धर्मराज ! वीरानें सत्तेपेक्षां स्वधर्माला श्रेष्ठ मानलें पाहिजे; राष्ट्राचें आव्हान येतांच बुद्धीचे दीप विझवून, डोळे मिटून रणवेदीवर चढून जाणें हें असतें शूराचें कर्तव्य.

धर्मराया, हें निश्चित समज कीं, ' वीरता ' जेव्हां विवेकाला विचारायला जाते तेव्हां तिला अपमान गिळायची पाळी येते ! तिचें तेज मलिन होऊन जातें. विवेक आणि बुद्धि यांचा विचार कांहीं मर्यादेपर्यंत घ्यावा, पण कांहीं प्रश्नांवर त्यांना मुळींच विचारूं नये. त्या विवेकानेंच तुझ्या पौरुषाला षंढ केलें, द्रौपदीच्या साडीला हात लावूं दिला. तुझे डोळें जळले कसे नाहींत ? पण तुला कां म्हणूं ? आश्चर्य आहे, माझ्या वीरतेलासुद्धां त्यांनीं बांधून टाकलें ! जगण्याची इच्छा धर्मा, एकच क्षण माझें वय त्या विवेकाला नमलें आणि तो क्षण निघून गेला ! यौवनानें शिर ताठ आणि शरावर हात ठेवून सदा चालावें. वृद्धत्व वाकतें, मीसुद्धां वाकलों होतों. निमित्त सांगितलें विवेकाचें. धर्मराया, आतां आपण असें विचारूं या, क्षमा कीं प्रतिकार ? माणसाचें कर्तव्य काय ? बल आणि विवेक, शस्त्र कीं शांति प्रार्थना–कोणतें अनुसरावें माणसानें ? माझ्यासारखें श्रांत लुप्ततेज सिंह विवेक, विचार शोधून काढतात आणि उपहासाला कारण होतात. तरुणानें सदैव उच्छलगतीच असावें. सुयोधनाच्या दरबारांत वृद्धापकाल फल भोगीत राहिलों तेव्हांच माझी वीरता अस्थिपंजर झालेली होती. मीच दोषी आहें कौरवपांडवांच्या नाशाला. धर्म आणि स्नेह, स्वधर्म सांगत होता मी सुयोधनाचा सेवक, कौरवकुलाच्या सिंहासनाचा संरक्षक पण माझें प्रेम होतें तुम्हां पांचांवर. वेळ आली तेव्हां धर्मपालनाचा आव तर आणला, पण स्नेहानें धर्मावर मात केली. संकट-कालींच माणसाचें खरें रूप बाहेर पडतें. धर्मा, शरीर दुर्योधनाला विकलें होतें पण हृदय पांडवांकडे होतें. न्याय-धर्माचा मोठा थोरला अभेद्य व्यूह स्नेहानें फोडला; पण हेंच जर अगोदर घडलें असतें तर कदाचित् कुरुक्षेत्र झालें नसतें. भारताचा इतिहास बदलला असता. पण....पण.... जीवनाच्या प्रभात प्रहरापासूनच कोमल स्नेहभावनांना माझ्या हृदयांत जागा दिली नाहीं. त्यांना ठोकरून कर्माचें कठोर व्रत घेतलें होतें मी. कर्मापेक्षां प्रेम श्रेष्ठ आहे, सुंदर आहे असें मला तेव्हांच कळलें असतें तर ? पाठीवर भाता, हातांत बाण आणि मनांत नीतिज्ञान घेऊन प्रदीर्घ जीवन भटकत राहिलों. दुसऱ्या कशाकडे पाहिलेंच नाहीं मुळीं. अनुशासन आणि नीति यांच्या बंधनांनीं जखडलेला मी आपल्याच घरांत पराधीन लाचार दास बनलों. मी कधीं विचारलें नाहीं, ' भीष्मा, कुठें चाललास वाहत ? न्यायदंड तूं ! अन्याय

कसा करतोस सहन ? पण माझ्याच बुद्धीनें मला संभ्रान्त केलें. आतां वाटतें कीं त्या बुद्धीचें ऐकलें नसतें, कलुष राजनीति स्नेहवलानें धुऊन पाहिली असती; मस्तकाच्या कठोर शासनांतून मुक्त होऊन हृदयाचें म्हणणें ऐकलें असतें, मंत्र्याच्या उन्नत आसनावरून खालीं उडी मारून दलित द्रौपदीला हात दिला असता, दुष्ट दु:शासनाला मागें खेचलें असतें, न्याय्य पक्ष घेऊन, राजद्रोहाची पर्वा न करतां, दुर्योधनाला आव्हान दिलें असतें तर तो कदाचित् भेदरून गेला असता. आणि मग भरतभूमि रणांगणांत पडलीच नसती. पण आतां काय ? झाल्या गोष्टी विसरा आतां. धर्मराज, नव्या युगाला भूगोलावर अवतरूं द्या " !

पितामह भीष्माच्या तोंडून तें उदात्त सत्य ऐकून धर्मराजाच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. थोडें शांत होऊन तो म्हणाला, " पितामह, खरेंच कांहीं राहिलें नाहीं मागे. केवळ हा मृत्यु प्रवेश– जणुं कांहीं विक्रांत कालच शवासारखा या धर्मक्षेत्रांत श्रांत होऊन झोपला आहे. कावळे, गिधाडें, कोल्हे आणि कुत्रे यमराजाच्या पाठीमागून जाणारे बाजार बुणगे आज एकत्र जमले आहेत. कारण मनूच्या संतानाची मेजवानी आहे त्या पशूंना ! अरेरे हीच का व्हावी मानवाची गति ?

" वैभव, तेज, सौंदर्य सर्व कांहीं दुर्योधनाबरोबर गेलें आणि माझ्या हातीं काय राहिलें ? तर एक शुष्क, रसहीन, प्राणहीन साम्राज्याचा सांपळा. शूर वीर होते ते सर्व दुर्योधनाबरोबर स्वर्गाला गेले, आणि मागें राहिलें कोण या मृतदेशांत ? मातृवत्सल माता, तरुण विधवा, अनाथ बालकें आणि पुत्रहीन वृद्ध, अपंग, अंध ! आणि तो सुयोधन मला हिणवतो आहे, ' धर्मा, तुझा तो तप, त्याग, क्षमा, करुणा इत्यादि मोठमोठ्या तत्त्वांचा उपदेश खरा होता का ? तुझ्यांत खरोखर का सहिष्णुता होती कीं, सूडाचा अग्नीच धुमसत होता तुझ्या अंत:करणांत ? सुयोधनाचें सुख पाहून खरोखर तुझ्या पोटांत नव्हतें का दुखत ? तुम्ही पांडव, जन्मभर आमच्या सुखाविषयीं राज्या-विषयीं द्वेषांनीं जळत होतां. आणि बाहेर मात्र निरागस साधुतेचें प्रदर्शन करीत होतां ? पितामह– हा सुयोधन मला विचारतो आहे– अहो धर्मराज, बोला– धर्मक्षेत्रावर जेव्हां रणाग्नि पेटला तेव्हां कोणतीं पापें करायचें तूं टाळलेंस ? सांग ना प्रत्यक्ष पूज्य गुरूचा वध साधण्यासाठीं सुद्धां तूं

खोटें बोललास कीं ? कौरव राजपुत्राची मांडी फोडण्यासाठीं केवढी फसवणूक केलीस तूं ? क्षात्रधर्मच राखलास नाहीं का नवा रणधर्म चालू केलास तूं ? अरे पापी पुरुषा, मरणाच्या पंथाला लागलेल्या मानवाच्या मांडींतलें रक्त प्यालांत तुम्ही. अघोरी राक्षसांनों, सांगा धर्मराज–तुम्ही अगदीं धर्मनिष्ठ ना ? जिच्यासाठीं हीं सारीं दुष्कर्में केलींस तिला आतां कां घेत नाहींस मांडीवर ? आतां नाहीं का वाटत भीति द्रौपदीची तुला ? आतां कसली आहे अडचण ? राजमुकुट घे डोक्यावर, सिंहासनावर ठेव पाय. यथेच्छ सुख भोगाना आतां. आहेत कोठें वीर शिल्लक तुम्हांला विरोध करायला ? सुखानें करा राज्य आतां विधवांवर ! "

" पितामह, सुयोधन म्हणतो तें बरोबर नाहीं का ? खरोखर मला युद्धाचे हे परिणाम अगोदर कळते तर द्रौपदीची काय कथा, त्या कृष्णाचें म्हणणें सुद्धां मी ऐकलें नसतें. हें युद्धच होऊं दिलें नसतें मी ! पितामह, मला सांगा, सुयोधन हट्टी झाला म्हणून मी माझें व्रत सोडणें युक्त होतें कां ? तो पापकर्दमांतून बाहेर येईना म्हणून मी त्यांत उडी घ्यायला हवी होती का ? त्यानें खड्ग घेतलें म्हणून मी कृपाण घेण्याची काय आवश्यकता होती ? द्रौपदीच्या लाजेसाठीं साऱ्या भारताचा सत्यानाश ? कोणा एकाचा कोणी तरी अपमान केला म्हणून काय समस्त महीतलाचें स्मशान करायला सांगणार तुम्ही ?"

"पितामह, महाभारत संपलें, पांडवाचे सात आणि कौरवाचे तीनजण वांचले, बाकी सर्व मारले गेले, राहिले असतील पंगु, व्रणी, विकलांग, विवर्ण, विधवा. कोणालाहि कांहींहि मिळालें नाहीं. सर्वांचें सर्वस्व हरलें. कशासाठीं आम्ही केलें हें ? या राजसिंहासनासाठीं–लोभानें हें सर्व करविलें–तो लोभ मेला नाहीं. पितामह, तो जिवंत आहे तोंपर्यंत मी विजेता कसला ? नाहीं. मला परत महारण केलें पाहिजे रागलोभाबरोबर, तरच मानवाचा उत्कर्ष होईल. मी मनुपुत्र आहें, निराश नाहीं झालों मी ! नवधर्माचा दीप आतां उजाळीन मी ! "

**सर्ग ६ वा**

या सर्गांत कवीनें मानवानें प्रकृति-पंचमहाभूतांवर केवढा मोठा विजय मिळवला आहे याचें वर्णन केलें आहे पण त्याचा रस्ता तो पुराणाच आहे असें

म्हटलें आहे. द्वापारयुग संपून मानव फार पुढें सरकला; विज्ञानाच्या साहाय्यानें विश्वांतलीं अनेक रहस्यें त्याला उमगलीं आहेत. सर्व पंचमहाभूतें मानवाचा आदेश आतां शिरसामान्य करतात. सारा भूगोल मानवानें पादाक्रान्त केला आहे; आकाशाला मुठींत पकडलें आहे. त्याला हा भूगोल लहानसा वाटून तो आतां शनि, मंगळ व चंद्रलोकांना जिंकायची सिद्धता करून राहिला आहे. पण मानव जाणार तरी कोठें पुढें ? त्याचें लक्ष्य काय ? विज्ञान जर त्याला हें सारें सांगणार तर तें व्यर्थ आहे ! हा मानव, जो गगनांत आतां कोठेंहि यानानें जातो, ज्याला पाहून विश्वांतील परमाणु सुद्धां आतां थरथर कांपतात त्या मानवाला आपल्या वासनेवर मात्र अजून विजय मिळवितां आला आहीं ! हा मानव ज्याच्या हातांत विज्ञानाचीं फुलें व स्वत:चें कर्म आणि धर्म विसरून वज्र होऊन फुटतात असा झाला आहे शक्तिशाली.... पण मानवा, ह्या विज्ञानाचा तलवारीसारखा उपयोग होणार असेल तर ती लवकर फेकून दे,नाहीं तर तुझेंच अंग कापील ती. अति तीक्ष्ण धार आहे तिची: पण विज्ञान खरोखर वरदान होऊं शकतें. त्यामुळें मानवी श्रमांचा अपव्यय थांबेल, सुखाची सर्वांना समविभागणी करतां येईल, सगळीकडे समता प्रस्थापित करतां यईल ! ज्या दिवशीं हें विश्व युद्धाच्या भयापासून मुक्त होईल, त्याच दिवशीं वसुधेंत सुधावृष्टि झाली असें म्हणतां येईल !'' अशा विचारांनीं भरला आहे हा सर्ग. कथेपासून तो अगदीं असंबद्ध प्रक्षिप्तच आहे असें कवीनें स्वत:च म्हटलें आहे.

**सर्ग ७ वा :**

मनसोक्त रडल्यानंतर युधिष्ठिराचें मन हलकें झालें. अश्रूंनीं अंत:करण धुतलें गेल्यावर युधिष्ठिराला आशा वाटूं लागली. त्याला पाहून भीष्म म्हणतात, '' धर्मराज, द्वापारयुग संपलें बरें आतां. पण असें समजूं नको कीं मानवी भवितव्याची या रणांगणावर राख झाली आहे. माणूस रक्तांत रंगला असेल, माणुसकी नाहीं. आशा माणसाच्या मनांत असते. तिला शोधायला वनांत जायला नको. जरा वर उठून तर पहा. मुकुट, धन, राज्य, सिंहासन, तप, जप, याग, योग यांच्यापेक्षांहि माणुसकी मोठी नाहीं का ? पण हेंहि खरेंच आहे कीं लढतां-झगडतां माणूस मोठाच होत गेला आहे.

"या धरणीवर सुखाच्या राशी विखुरल्या आहेत. पण मानवाला त्यांचा उपभोग घेतां आला नाहीं. हा प्रकाश, पवन, जल, फळफूल, बहुरत्ना वसुंधरा, इतकें सर्व आहे. माणूस म्हणेल तर या धरणीचा स्वर्ग बनवूं शकेल, पण शोधणाऱ्यासच तें लाभतें. ब्रह्मदेव कशाला कोणाच्या कपाळीं लिहायला जातो? जें कांहीं लाभतें तें आपल्या भुजबळानेंच. प्रकृति कोणाला भिऊन का कोणापुढें वांकते? ती उद्यमी माणसालाच तेवढी वश होते. धर्मराया, ब्रह्मदेवानें काय लेख लिहिला आहे हें पाहायला उद्योगी पुरुषाला वेळच नसतो. तो केवळ निरुद्योग्याचा छंद असतो. श्रम आणि भुजबल हें ज्याच्यापाशीं असतें त्याच्यापुढें पृथ्वीच नव्हे, नभतलहि लोटांगण घालतें. जो श्रमबल देतो त्याला सुखाचा वांटा प्रथम दिला पाहिजे. कारण श्रम हें सर्वांत मोठें अमूल्य धन आहे. राजा कोण आणि प्रजा कोण? भ्रान्त माणसांच्या डोक्यांतूनच या कल्पना प्रथम निघाल्या. पूर्वीं असें कांहींच नव्हतें. राजा नव्हता, ना होती प्रजा. धर्माच्या मर्यादा संभाळून सर्व सुखानें समतेंत राहत होते. शासनआणि दंड यांची आवश्यकताच नव्हती. पण तें सर्व बदललें. स्वार्थ, संचय, इ. भावनांनीं ही समता भंग पावली. विषमतेचें विष पसरूं लागलें समाजांत. चोरी, लूटमार, शोषण, प्रहार, दंड सर्व आले. समष्टि संपली, व्यक्तिनिष्ठा वाढली, स्पर्धा आली; स्पर्धिष्णु व्यक्ति आणि समाजाला नियंत्रित ठेवण्यासाठीं खड्गधर नृपति अवश्य झाला. कारण नियंत्रक नृपतीवांचून मानव सरळ रस्त्यानें जाईनासा झाला. खट्याळ पशूप्रमाणें त्याला दंडानें मार्गावर ठेवणें भाग झालें ... त्यालाच शासन म्हटलें ... आणि त्याचा अर्थ म्हणजे 'आहे तें रक्षिणें' ... शासनाला नवें असें कांहीं रुचत नाहीं, सहन होत नाहीं, तें रूढिप्रिय असतें. जोंपर्यंत मानवी मनांतून स्वार्थ आणि लोभ जात नाहींत तोंपर्यंत खड्गधारी शासक राहणारच. अरे नर विकृत म्हणून तर नरपति धर्मराज पाहिजे. धर्मराज... संन्यासाचा मार्ग शोधणें म्हणजे भ्याडपणा आहे. पूर्ण ... खरें मनुष्यत्व, वीरता तर जीवनांतील कटरहस्यांच्या गांठी आणि गुंतागुंत सोडविण्यांत आहे. अरे, एकट्या व्यक्तीचें सुख संपादन करणें हें का कठिण आहे? परीक्षा आहे ती कोटि-कोटि मानवांच्या सुखाची चिंता वाहून त्यांना सुखी बनवण्यांत!

व्यक्तीचें सुख (मोक्ष) कीं पृथ्वीचा स्वर्ग बनवून सर्वांना सुखी करणें असे आहेत खरे दोन प्रश्न. पण धर्मराज, तुझ्या तपांत विश्वाला सुखी करण्याची क्षमता असतांना मानवतेला सुखमोक्षापासून वंचित ठेवणें हेंच का तुझें न्यायदर्शन? अरे, तूं सर्व विश्वाचा विचार कां करीत नाहींस? समजा, तुला वनांत सुख मिळालें, पण या जळत्या जगानें कोठें जावें सुखाच्या शोधांत? तुलाच आदर्श समजून साऱ्या समाजानें वनांत येऊन राहावें काय? मग परिणामीं राजभवन आणि नगरें स्मशानें बनतील. आणि ज्याला भिऊन यति-वैरागी वनांत गेले तीं वनें उपवनें बनतील. वनांत मग विविध ताप होतील आणि त्या संन्याशाला आपला कमंडलू घेऊन तेथून पळावें लागेल, नाहीं का? धर्मराया, यति पळतो तो घरादारापासून नव्हे, तर जीवनापासून. त्याला सदैव मधुर रस हवा असतो. तिक्त, कटु नको असतो. जीवनापासून जो पळून जातो त्याचें जगणें कसलें? धर्मा, तें पळणें आहे. पयोधीच्या पाण्यानें कोणाचें तोंड कधीं गोड केलें? पण त्याला ज्यांनीं घुसळलें त्यांना त्यानें अमृत दिलें. अगदीं तसेंच, जीवन कसें खारट आहे म्हणून जो तें टाकतो तो लक्ष्मी, कौस्तुभ, पारिजातक, सुरभी आणि सुधामृताला, प्रत्यक्ष अमरतेला आंचवला. वेड्या, सुखाच्या शोधार्थ जीवन सोडून वनास जाऊं म्हणतोस पण वनांत का सुखाचे रांजण आणि कोष भरून ठेवले आहेत? भरलेलें, गजबजलेलें जग सोडून जंगलांत जाणें म्हणजे घोर पराजय आहे; पलायन आहे हें, अति निंद्य; बुद्धीचा भ्रम आहे! अरे, तूं असा पळून गेलास, म्हणजे या जगांतील सारीं दाहक दुःखें शमतील आणि तुला तरी कर्म सुटेल का? पोटासाठीं भीक तर मागावी लागेलच ना?

" दीपकानें विझण्यांत काय महात्म्य? त्रिभुवनाचें तिमिर नष्ट करणें यांतच त्याचें श्रेय! धर्मराज, संभाळ वरें. स्वतःला या विरक्तीच्या भोंवऱ्यांत सावर. एकदां का त्यांत सांपडलास कीं डुबवून टाकील तो. निष्क्रियतेची साथीदारीण ही विरक्ति ' सर्व कांहीं अनित्य, ' सर्व क्षणभंगुर ' असें कानीं कपाळीं ओरडून जीवन रसहीन करून टाकते. निद्रा उडवून लावते, ' जीवनापेक्षां मरण वरें ' म्हणते. ' सर्वांत श्रेष्ठ कर्म म्हणजे कांहीं न करणें ' असेंच ती प्रतिपादन करते. ही एकदां घरांत आणि मनांत शिरली कीं आनंद, उल्हास पळालाच समजा. श्री. 'सौंदर्य, तेज, उत्कर्ष वगैरे सर्व हीन, तुच्छ आहेत ' असें सांगते ही

वया. ती मानवाला दीन, दुर्बल बनवते. धर्मराया, असें कोण म्हणतो कीं मानव अमर आहे! पण म्हणून प्रत्येक क्षणीं जर मरणाची धास्ती बाळगली तर माणसाला किती वेळां मरावें लागेल? आणि मग त्याच्या हातून होईल तरी काय? अकर्मण्य पंडित अमर होत नाहीं. आणि कर्माचे भार वाहून माणूस झिजून जात नाहीं, वा त्यांचें आयुष्य कमी होत नाहीं. दोघांत अंतर मात्र फार मोठें आहे. एक मृत्यूला हंसत असतो, दुसरा रडत राहतो. एक धरणीचें अंग उत्फुल्ल, सुगंधी, सुवर्णी सुमनांनीं शृंगारतो. कधीं ज्योतिबरोबर तर कधीं तिमिरांत वाहत जगाचे त्रिविध ताप झेलीत, कधीं रसपान करीत, तर कधीं मानवतेच्या जयाच्या दुदुंभी निनादित या जगांतून आनंदानें जातो. त्याच्या जगण्यानें जग पूर्वीपेक्षां कांहीं तरी अधिक रमणीय झालेलें असतें. आणि दुसरा कर्महीन, सदैव चिंतामग्न, रत्नाकराच्या किनाऱ्यावर दगड आणि शिंपले गोळा करीत भटकत राहतो. कर्मयोगी मानवाच्या भिक्षेवर आपलें पोट भरीत जगाला अधम म्हणत अलिप्ततेची बतावणी करीत असतो. 'दृश्य तें असत्य, माया आहे' आणि 'सत्य अदृश्य आहे' असें मानलें, सारें कर्म मिथ्या आहे असें म्हणून तें सोडलें तर मानव सुधारेल काय? 'गंध, रस, रूप, शब्द व स्पर्शसुख अनित्य आहे' असें मानलें तर काय आत्महत्येनें नित्य शाश्वत आनंद मिळेल? धर्मराया, सर्व असत्य मानलें तरी आपण येथें आहोंत हें तरी सत्य आहे ना! जर देहानें सुखाचा उपभोग घेतां आला नाहीं तर मनोरथांचा स्वर्ग मृगजळासारखा व्यर्थ ठरेल! मस्तिष्क आणि भुजा, कल्पना आणि कार्य यांतील द्वंद्व ज्ञानमय निवृत्तीनें सुटत नाहीं, शत्रु मनांत लपलेले असतात. त्यांना कसें टाळणार? त्यांना जिंकणें मनाच्या रणांगणांतच शक्य आहे. सुख मानवतेच्या सुखांत आहे. तिच्या दुःखांत सह-भागी होऊन तें हलकें करण्यांत पौरुष आहे. जरा डोळे उघडून पहा. पावलो-पावलीं दीनता, दारिद्र्य, तुझ्या साहाय्यासाठीं आक्रोश करीत आहेत. अन्न, वस्त्र, उत्साह, आशा, हीं त्यांना कोण देणार? कर्तव्याचा संन्यास करून तूं कुठं पळून जाणार? तेव्हां थोडा विचार कर. मानवतेला सुखशांति देण्यासाठीं तुझ्या हातीं असलेल्या अमृताचा वर्षाव कर. धर्मराज, या भरतभूमीचें अंग-प्रत्यंग बाणांनीं विद्ध झालेलें आहे, 'त्राहि त्राहि' असा नरनारींचा आर्त कोलाहल तुला ऐकूं येत नाहीं का? अरे, त्यांना असें रडत-विव्हळत मागें

सोडून तूं वनांत चाललास? ऊठ, पूस ते डोळे आणि जा आतां वनाला नाहीं राजभवनाला! असंख्य मानवतेच्या आशा तुझ्यांत केंद्रित झाल्या आहेत. सुयोधन गेला, आतां तुझ्यावांचून हा भार कोण संभाळील? अरे, या पृथ्वीचा भार खांद्यावर घे. भूगोल सोडून अंतराळांत कसा जाणार? आहे काय तेथें शून्याशिवाय! जें कांहीं आहे तें या मातींत आहे! धर्मराज, या मृत्तिकेचें असें सेवन कर कीं डाग लागणार नाहीं हाताला! मानवाला हा नवीन भोगवाद शिकव. मातींत न मिसळतां मातींतील रूप, रस, स्पर्श, गंधांचा आस्वाद मिळेल, मातीच आपणांत विलीन होऊन जाईल– वल्कल आणि मुकुटाच्या पलीकडेहि एकादा पुरुष असूं शकेल कीं नाहीं त्याला ओळख. तें ज्या दिवशीं समजेल त्या दिवशीं अशी भ्रांति, द्वंद्व, समस्या उभी करणार नाहीं. त्या दिवशीं मानवतेच्या विजयाचा जयनाद निनादेल!

"धर्मराज, अजून पुष्कळ दूर जायचें आहे. उशीर नको करूंस आतां. तूं हो पुढें आणि मानवतेला ने मार्गें. तेथें पोहोंचव तिला.

आशेचा एकमेव प्रदीप, धर्मा, सतत जळत तूं रहा!

होईल भूमि रण-भीति मुक्त ही,
बनेल तेव्हां स्वर्गचि ही मही

******

* ८ *

# ॥ कृष्णायन ॥

■ ■

## पं. द्वारकाप्रसाद मिश्रा

पं. द्वारकाप्रसाद मिश्रा हे राजकारणाच्या क्षितिजावर कांहीं काळ चांगलें चमकलेलें नक्षत्र म्हणून सर्वांना परिचित आहेत. पं. मिश्रा हे उत्तर प्रदेशांतील कान्यकुब्ज ब्राह्मण आहेत. उत्तर प्रदेशांतून मध्यप्रदेशांतील जबलपूर येथें स्थानान्तर करून महाकोशल हीच त्यांनीं आपली कर्मभूमि ठरविली. १९२६ ते १९२९ पर्यंत केंद्रीय विधान सभेचे ते सभासद होते आणि इतक्या तरुण वयांत त्यांनीं निवडणुकींत विजय मिळविला तो सर हरिसिंग गौर यांच्या सारख्या ख्यातनाम कायदेपंडिताला पाडून. समाजकार्य आणि देशसेवा हेंच जीवनाचें व्रत घेऊन त्यांनीं स्वातंत्र्याच्या संग्रामांत प्रत्येक वेळेला कारावास पत्करला. शेवटच्या कारावासांत पं. मिश्रांनीं एक अमर महाकाव्य रचलें. हेंच तुळशीदासाच्या रामायणाच्या तोडीचें समजलें जाणारें महाकाव्य 'कृष्णायन' होय.

'कृष्णायना'ची सर्व रचना कृष्णमंदिरांत झाली. विश्वाच्या वाङ्मयांत कारागृहांत उत्स्फूर्त झालेल्या अनेक साहित्यकृति अमर ठरलेल्या आहेत. चार भिंतींच्या आंत कोंडलेल्या एखाद्या शृंखलाबद्ध पुरुषाच्या अंतःकरणांत जीवनाचें रहस्य, इतिहासाची उकल, गूढार्थाचा अन्वय, शास्त्रांचे शोध आणि काव्यांच्या सरिता प्रसविणारी प्रतिभा कशी स्फुरते हें कौतुकास्पद कोडें आहे. निव्वळ भारतीय वाग्भटांच्या गेल्या अर्धशतकांतील रचना पाहिल्या म्हणजे मन थक्क होऊन जातें. स्वातंत्र्यवीराचें सारें "राष्ट्रसंजीवक वाङ्मय" लोकमान्यांचें "गीतारहस्य" महात्माजींचे "सत्याचे प्रयोग", पं. जवाहरलाल-जींचें "भारतदर्शन" इत्यादि कोणत्याहि राष्ट्राला अभिमान वाटावा असें वाङ्मय कारागृहांतून बाहेर पडलें. कारागृहांत रचलेलें पं. मिश्रांचें 'कृष्णायन'

हेंहि सरस्वतीच्या मंदिरांत अखंड ज्योतीप्रमाणें तेवत राहील. मिश्रांना काव्यांची स्फूर्ति कशी झाली या महाकाव्याचें रूप त्यांनीं कसें निश्चित केलें, त्यांत रंग कोणते व कां भरले आणि रसपरिषोष किती मेहनतीनें केला आहे, त्या साऱ्या लहान मोठ्या गोष्टी मला पं. मिश्रांच्याचें तोंडून ऐकण्याचा सुयोग आला. त्या ऐकतांना कलावंत कवीला काव्य–विषयाचा अभ्यास किती कसोशीनें करावा लागतो हें थोडेसें कळलें. पं. मिश्रांच्या हातून राजकारणांत प्रमाद घडले असतील, त्या प्रमादांमुळें या कन्नोजी ब्राह्मणानें भारतीय राजकारणांतील आपलें अढळ स्थान गमावलें असेल, कदाचित् संघटक, शासक, राजकार्य धुरंधर म्हणून पं. मिश्रांना लोक विसरूनहि जातील, परंतु त्यांचें 'कृष्णायन' हिंदी भाषा आहे तोंपर्यंत त्यांचें नांव संस्मरणीय राखील. अशा या हिंदी सरस्वतीच्या एका अमूल्य आणि अद्वितीय वाङ्मयालंकाराचा आपण थोडा परिचय करून घेऊं.

'कृष्णायन' या महाकाव्याचा विषय कृष्णचरित्र आहे. हिंदु संसाराचे आदर्श पुरुष दोन, राम आणि कृष्ण. रामचंद्राचें चरित्र आदिकवि वाल्मिकीनें एका महाकाव्यांत अमर करून ठेवलें. त्याच साहित्यभांडारांतील भिन्नभिन्न भागांवर मागाहून येणाऱ्या कवींनीं लहान मोठीं काव्यें लिहिलीं. जवळ जवळ प्रत्येक प्रादेशिक भाषेंत राम-चरित्रावर लहान मोठीं काव्यें आहेत. रामचरित्र संपूर्ण संग्रहित असें एका काव्यांत मिळतें पण कृष्ण-चरित्राचें तसें अजून झालें नव्हतें. डॉ. राजेंद्रप्रसाद लिहितात 'कृष्णकथा' संस्कृत साहित्यांत निरनिराळ्या भागांत विखुरलेली आहे. महाभारत आणि श्रीमद्भागवत् या दोन ग्रंथांत कृष्णचरित्राचा विश्वसनीय मूळ भाग सांपडतो. (हरिवंशाची कथा ही महाभारतावरूनच संकलित केली असावी असें दिसतें.) पण या दोन्ही ग्रंथांचा हेतु कृष्णचरित्र हा नाहीं. त्यामुळें कृष्णाच्या जीवनांतील सर्वच प्रसंगांवर त्यांतून प्रकाश पडलेला नाहीं. मूळ संस्कृतांतच जर कृष्ण-चरित्राची ही अवस्था तर प्राकृताची काय कथा ! 'कृष्णायन' लिहून पं. मिश्रांनीं हिंदी भाषेंतील कृष्णचरित्राची ही उणीव भरून काढण्याचा अत्यंत विशद आणि सफळ प्रयत्न केला आहे. जन्मापासून स्वर्गारोहणापर्यंत सर्व घटना या महाकाव्यांत कालानुक्रमें चित्रित केल्या आहेत. या प्रबंध काव्यांत पं. मिश्रानीं शील, सौंदर्य आणि शक्ति इत्यादि कृष्ण-जीवनांतील मूल तत्त्वांचें

चित्रण करण्यांत असाधारण प्रतिभा प्रकट केली आहे. एकीकडे माता आणि वत्स, आणि गोप-गोपींच्या मृदु स्नेहाचा आपण अनुभव घेतों तर दुसऱ्या ठिकाणीं अत्यंत विकट, विक्राळ युद्धाचें भयंकर चित्र पहाण्यास मिळतें. वसंत ऋतूचें सुंदर, सुखद वर्णन वाचावें तोंच पुढेंच अत्यंत भयानक वनांतून आपणांस जावें लागतें. या काव्यांत गीतेंतील ज्ञानासह चार्वाकाचें चुरचुरीत, चमचमीत तत्त्वज्ञान आणि त्या मिषानें आधुनिक प्रचलित, भौतिक वादांचें दिग्दर्शन आपणांस होतें. 'कृष्णायना'नें आज आपणांसमोर असलेल्या साऱ्या जीवन-संघर्षाचें आणि समस्यांचें यथार्थ चित्रण केलें आहे. त्यांत पीडित जनतेची विप्लव अवस्था पाहायला मिळते. युद्ध टाळण्याचे असफल प्रयत्न, धर्मरक्षणासाठीं युद्ध करण्याची अनिवार्य आपत्ति आणि युद्धानें ज्या समस्या सोडविण्यासाठीं तें लढलें जातें त्यांचा निरास करण्यांत त्याची संपूर्ण निष्फलता व अक्षमता, या सर्वांचें उत्कृष्ट विवेचन या महाकाव्यांत आपणांस सांपडतें. ईश्वरभक्तांना कृष्णजीवनांतील अनेक अद्भुत प्रसंगांचें दर्शन मिळतें, तर देशभक्तांना अखंड भारताचें; भारतीय सभ्यता व संस्कृतीविषयीं आस्था असणाऱ्यांना या ग्रंथांत प्रोत्साहन लाभतें. तसेंच काव्यप्रेमींना रसांचा आस्वाद चाखायला मिळतो. हा ग्रंथ युगप्रवर्तक होण्यास व 'रामचरित-मानसा'प्रमाणें घरोघरीं प्रवेश करून घेण्यास समर्थ असा आहे.

त्रेता युगांतील रामावतार ही एक कवि-कल्पना आहे असें कांहीं थोड्या आक्षेपकांचें मत आहे. परंतु द्वापारयुगांतील कृष्णाविषयीं अजून तसें कोणी म्हटलें नाहीं. कृष्णाला आपण ऐतिहासिक पुरुष मानतों. कृष्णचरित्राविषयीं भारतीय जनतेला जन्मापासून उत्सर्गापर्यंत संपूर्ण ज्ञान आहे. पं. मिश्रांनीं असें हें सर्वश्रुत लोकप्रिय चरित्र अवधी भाषेंत लिहिलें आहे. केवळ नांवांतच नव्हे तर शैलींतसुद्धां पं. मिश्रांनीं तुळशीदासाचेंच अनुकरण केलें आहे. धर्म-संस्थापक, गोपी जनवल्लभ आणि बाल-गोपालप्रिय अशा कृष्णाच्या त्रिविध स्वरूपाचें मार्मिक चित्र या काव्यांत पं. मिश्रांनीं रेखाटलें आहे. "उदधि-पारवे नितनववाद" खंडून जें कृष्णमुखानें गीता रूपानें गायिलें गेलें तेंच आपलें सनातन तत्त्वज्ञान प्रभावीपणें बिंबविण्याचें काव्य-यश पं. मिश्रांनीं संपादिलें आहे.

पं. मिश्रा हे मातृभूमीच्या दास्य-शृंखला तोडण्यासाठीं साम्राज्यशाहीशीं जो भारतीय संघर्ष झाला त्यांतले आघाडीचे एक सैनिक होते. अनेकांप्रमाणें ते अनेक वेळां बंदी झाले. एका राजबंद्याची बंदीवासांतील भावना पं. मिश्रांच्या महाकाव्याच्या आरंभीं अत्यंत ओजस्वी शब्दांत मुखरित झालेली आहे. मातेला मुक्त कसें करावयाचें या 'चिंतनां'तच कृष्णायनाची प्रेरणा त्यांना मिळाली. पं. मिश्रांचें ग्रंथारंभींचें नमन किती भावनापूर्ण आहे तें पहा :

" जन्मेउ बंदी-धाम, जो जनजननी मुक्तीहित,
बंदे हुँ सोई घन:श्याम, मैं बंदी, बंदिनी–तनय "

मी बंदी आहें. बंदिनीचा मी पुत्र (भारतमातेचा) ज्यानें जन व जननीच्या मुक्तीसाठीं बंदीगृहांत जन्म घेतला त्याच घन:श्यामाला वंदन करतों.

असें भावपूर्ण वंदन करून 'कृष्णायन' वाचण्यासाठीं कोण अधिकारी आहे हें कवि खालील शब्दांत सांगतो––

" जिनही न धर्म, न संस्कृति ज्ञाना,
जिनहि गरल सम शास्त्र पुराणा,
जीवन तरुही समुल विनाशी,
जे नवबिज वपन अभिलाषी
उदधि पारके नित नववादा
धरत शीष ने मानि प्रसादा,
तिन हित यह प्रयास नहि मोरा "

पं. मिश्रा हे भारतीय स्वाधीनता, स्वातंत्र्य, हिंदुधर्म,संस्कृति आणि तत्त्वज्ञान यांचे कट्टर अभिमानी आहेत. भारतीय अस्मितेचा जोरदार आग्रह आणि परकीय आसुरी संपत्तीविषयीं व आधिभौतिक तत्त्वज्ञानाबद्दल कठोर आघात या ग्रंथांत स्थळोस्थळीं आढळतात. आर्य आणि अनार्य संस्कृतींतील स्पष्ट भेद उकलून कवि मार्मिकपणें म्हणतों कीं, खरें म्हणजे

" शृंग अनार्यललाट न जामा
आर्य भाल नहि विधु अभिरामा. "

साऱ्या कृष्णायनांत सद्य:स्थिति जन-गण आणि बुद्धिवंतांची विचार करण्याची घातक पद्धती, आणि प्रवृत्ति यांवर प्रखर कोरडे ओढलेले आहेत. तथाकथित

बुद्धिवाद्यांसंबंधीं कवि म्हणतो, "बुद्धि भावना संतुलन हाच आर्य धर्माचा आधार आहे. आज मात्र भावना नष्ट झाल्या आहेत. शेष राहिला आहे तो बुद्धीचा व्यभिचार."

आजच्या लोकस्थितिविषयीं कवी हळहळतो :

" चंचल मानस थिर न विचारा,
मन क्षण कछु, क्षण अन्य प्रकारा,
आत्मघात-पथ जनु बौरायि,
ध्येय विहिन रहे नर .....,
अनुचित ज्ञानोपासन नाहीं,
श्रद्धा विनु न सार तेही माही,
भक्ति सहारा लहत जब ज्ञाना,
सकत तबहि करि नर-कल्याणा,
सृजन-शक्ति नाहि मह होई
प्रकटत प्रतिपल जीवन जायि,
बुद्धिजीवी हम मुनि जग माहि
सकत ज्ञान दे श्रद्धा नाहीं,
तेही हित प्रभु अवतार तुम्हारा,
तुम कृति-भक्ति ज्ञान साकारा."

साम्राज्यशाहीशीं चाललेल्या संघर्षांत ' कृष्णायन ' लिहिलें गेलें. त्या काळीं 'शठं प्रति सत्यं ' कीं ' श्याठ्यं ' हा वाद उदंड चालू असे. ' कृष्णायना'च्या कवीनें या वादावर अति मार्मिकपणें म्हटलें आहे,

" बद्धमूल अब कंस-सिंहासन,
बल ते पलटि सकत नहिं शासन,
छल ते सकत हम करि काजू,
छलिन संग जे छल नहिं करहि
दलित परास्त मूढ ते मरहि."

सप्तम कांडीं 'कृष्णायनां'त भगवान् कृष्णाचें अवतरण, बाललीला, कंसानें धाडलेल्या अनेक असुरांचें व प्रत्यक्ष त्याचें हनन इत्यादि गोष्टी आहेत. पहिल्या कांडांत कवीनें एक अभिनव उपक्रम केला आहे. कृष्णचरित्र हें सर्वांत गूढतम, बहुरंगी, बहुरूपी आहे. पहाणाऱ्याच्या बुद्धि आणि दृष्टीप्रमाणें कृष्ण समोर

उभा राहतो. बुद्धिवंतांना कृष्ण तत्त्वज्ञानी, राजकारण्यांना तो कुटिल राजनीतिज्ञ, प्रेमिकांना तो गोपीप्रिय इत्यादि अनेक रूपांनीं कृष्णाचीं निरनिराळीं स्वरूपें निरनिराळ्या काळीं लोकप्रिय झालीं. कृष्णाच्या राजनीतीचा आणि तत्त्वज्ञानाचा भारतीय अस्मितेवर पडलेला चिरंतन संस्कार मान्य करूनहि हें स्वीकारावेंच लागतें कीं, कांहीं कालखंडांत आणि सामान्य जन-मनांत कृष्णभक्ति रुजली ती तत्त्वज्ञानाच्या आविष्कारानें नाहीं तर गोपी-कृष्ण व राधाकृष्णाच्या प्रेमानेंच. या कृष्ण-भक्तींतून पुढें तर एका सांप्रदायाचें दर्शनच निर्माण झालें. अनेकांनीं आपल्या भक्ति-मार्गावर कृष्ण-रूपाचीं विविध रहस्यपूर्ण प्रतिबिंबें समावून घेतलीं. महाभारतांतील कृष्णाभोवतीं असें अद्भुत वलय नाहीं अथवा अशा विविध भावनांनीं व दृष्टिकोनांनीं त्याचें चरित्र लिहिलें गेलें नाहीं. परंतु परिवंशानें, भागवतानें तसेंच जयदेव व विद्यापति या दोन कवींनीं कृष्णाला एका नव्या रूपांत अवतारिलें. त्यामुळें गोपींचा कृष्ण, राधेचा कृष्ण, हाच इतका मनोहर मोहनीय झाला कीं, साऱ्या भारतांत या त्याच्या नवदर्शनानें भावनांचें युगान्तर घडवून आणलें. 'योग: कर्मसु कौशलम्, जहि मा व्यथिष्ठा: जहि शत्रुम्' इत्यादि गीतेंतील कठोर सूत्रें सांगणारा राजनीतज्ञ आणि राष्ट्रधर्मोपदेशक असा एके काळचा जगांतील अनन्य उपदेष्टा. पुढें कांहीं शतकांनंतर गोपींच्या बरोबर 'कामपि पश्यति, कामपि चुंबति, कामपि श्लिष्यति, कामपि रमयति रामाम्, अपराम्, अनुगच्छति वामाम्' असे विविध नाचरंग करूं लागला. प्रेममूर्ति कृष्णाच्या साक्षात्कारानें मोहून गेलेले संतकवि आणि भक्त यांनीं कृष्णाच्या अशा आणि इतक्या लीला गायिल्या कीं, भक्ति-काळांत त्या मोहक रूपानें ऐतिहासिक कृष्णाला व त्याच्या संदेशाला पार विसरवून लावलें. कृष्णाच्या या अनैतिहासिक भावुक भक्तिस्वरूपाचा पगडा अजून विसाव्या शतकांतहि जनमनावर इतका आहे कीं, पं. मिश्रांसारखा कूटराजनीतिज्ञ श्रीकृष्णचरित्र लिहितांना वल्लभ, सूरदास परंपरेला अनुसरून कृष्णाच्या बाललीला व जयदेव विद्यापतींच्या कल्पनांप्रमाणें गोपीप्रेम, यांचीं रसभरित वर्णनें करतो. परमेश्वर हा पति कल्पून त्याची भक्ति करणाऱ्या पंथाची आपणांस माहिती आहे. परन्तु परमेश्वराला बालक समजून त्यावर मातेप्रमाणें प्रेम करणें याविषयीं आपल्याकडे सर्वांना माहिती नसेल. सूरदास या अंध संतकवीनें ही

बालगोपालभक्ति प्रचलित केली. पं. मिश्रांनीं कृष्णाच्या या सर्व स्वरूपांचें दर्शन 'कृष्णायनां'त घडविलें आहे.

गोपीवस्त्रहरणाचा प्रसंग वर्णन करतांना पं. मिश्रा यांनीं एक नवीनच अर्थ लावला आहे. जलाशयांत नग्न-स्नान करण्याची प्रथा बंद पाडण्यासाठीं कृष्णानें गोपींचीं वस्त्रें पळविलीं व त्यांच्याकडून ती प्रथा बंद पाडण्याचें आश्वासन घेऊन परत केलीं. कृष्ण एक समाजसुधारक होता अशी उपपत्ति पं. मिश्रांनीं लाविली आहे. मथुरेला जाण्यासाठीं कृष्ण निघाला तेव्हां 'राधे, राधे!' असें म्हणत रथांतून उतरून त्यानें राधेकडे सानुराग हृदयभर पाहिलें. त्याच्या डोळ्यांतून जलधारा वाहिल्या. आणि कवि म्हणतो, "राधेचें अंग जणु सुधासिक्त झालें."

मथुरा, द्वारका या दोन कांडांत कवीनें पुराणांतील कथेंत थोडा फरक केला आहे. द्वारकेला भारताचें प्रवेशद्वार कल्पून अति वैभवशाली दाखविलें आहे. द्वारकेचें वर्णन तेथील समुद्रतीर वगैरे फारच सुरम्य साधलें आहे. याच कांडांत रुक्मिणी आणि इतर स्त्रियांशीं कृष्णाचे विवाह प्रसंग वर्णिले आहेत.

चौथ्या कांडाचें नांव पूजाकांड असें आहे. भारताच्या तत्कालीन इतिहासांत सर्वांत मोठा राजसूय यज्ञ युधिष्ठिरानें केला. त्या यज्ञांत श्रीकृष्णाची पुरुषश्रेष्ठ म्हणून अग्रपूजा करण्यांत आली. याच प्रसंगीं शिशुपालानें कृष्णाच्या योग्यतेविषयीं अनेक आक्षेप घेतले. अनेक प्रकारचे आरोप करून कृष्ण हा पुरुषोत्तम नाहीं हें त्यानें सुचविलें व अग्रपूजेचा मान त्याला देण्यांत येऊं नये असें प्रतिपादिलें. पूर्णावतार कृष्णावर सुद्धां त्याचे समकालीन लोक कसे क्षुद्र आरोप करीत असत, हें कवीनें मोठ्या कुशलतेनें दाखविलें आहे. या वर्णनांतच आपल्या समकालीन महात्मा गांधींवर जे आरोप केले जातात त्यांचें जणुं प्रतिबिंबच दिसतें. तत्कालीन भारतीय सम्राटानें श्रीकृष्णाची अग्रपूजा करून त्याचें अनन्य अलौकिकत्व मान्य केलें आहे.

पुढचें कांड म्हणजे भारतीय युद्धाचें. या युद्धांत अठरा अक्षौहिणी सैन्य मारलें गेलें. पांडवांचा काय लाभ झाला असेल तो असो. परन्तु मानव वंशाला एक अक्षय्य अमृत-कुंभ मिळाला, व तो म्हणजे भगवंताचें गीतगान. या कांडांत कवीनें भगवद्गीतेचा अनुवाद उत्कृष्ट रीतीनें सरळ हिंदींत केला.

आहे. पं. मिश्रा हे टिळक पंथीय असल्यामुळें गीतेचा अर्थ त्यांनीं टिळकांच्या गीतारहस्यानुसार कर्मयोगपर लावला आहे.

'कृष्णायना'चें सहावें कांड 'जय' नांवाचें आहे. या कांडांत भारतीय युद्धाचें संपूर्ण वर्णन केलें आहे. वास्तविक हें भारतीय युद्ध कौरव-पांडवांचें होतें. जय झाला तो पांडवांचा. कृष्ण फक्त सारथी होता. पण हें सर्वमान्यच आहे कीं, भारतीय युद्धांतील दोन्ही बाजूंचे सारे वीर केवळ निमित्तमात्र होते. खरा सूत्रधार कृष्णच होय. आणि या अर्थानें भारतीय युद्धांतील विजय हा कृष्णाचाच जय होता. "जेथें योगेश्वर कृष्ण तेथेंच विजय आणि भूति" हें संजयानें काढलेलें सार पं. मिश्रांनीं अत्यंत प्रभावीपणें विशद केलें आहे.

शेवटच्या सातव्या कांडांत युधिष्ठिराला स्थिर करून कृष्ण द्वारकेला परततो. कृष्णाच्या अनुपस्थितींत सारे यादव विलासांत स्वेच्छाचाराच्या गर्तेंत लोळत पडलेले कृष्णाला आढळले. आपल्याच कुळांत यादवी माजलेली पाहून आपल्या अवताराचा शेवट आला असें ठरवून कृष्ण स्वर्गारोहणाचा निश्चय करतो. एके दिवशीं विश्राम करण्यासाठीं वनांत गेला असतांना एका व्याधाच्या तीरानें त्याला मृत्यु येतो. मृत्यूपूर्वीं मैत्रेयऋषि त्या स्थानीं उपस्थित झालेले असतात. कृष्ण त्यांना मानवी जीवनाचें तत्त्वज्ञान विषद करून सांगतो. या कांडांत कवि कृष्णावताराचें यथार्थ दर्शन अत्यंत सरळ मधुर भाषेंत घडवितो.

"जीव हा गेहबंदी आहे; भक्ति मुक्ति देते, आणि शरीराच्या कारागारांतून जीवाला सोडविते. जीव मोहांत एकसारखा भ्रमण करतो; अमृतत्वाच्या शोधांत तो भटकतो; पण त्याला अमरपुरीचें सम्राटपद कसें मिळवावें तें कळत नाहीं; अहंतेचा भेद करूनच ईश्वरत्व प्राप्त होतें. ज्ञानविदग्धाला कर्मतिमिर बांधूं शकत नाहीं" असें भवनाट्यरहस्य सांगून कृष्ण म्हणतो, 'मी ईश्वर, मनुष्य बनून भक्त माणसाला ईश्वर बनवितों. माझ्या जीवनलीलेचा उद्देश माझें अवतारकार्य हेंच कीं ज्यामुळें—

"होय महि माम धाम सम, **मोहि सम मनुज-समाज**"

पुढें कृष्णाच्या तोंडून कवि सांगतो कीं, "भारत-विकास-पंथांत दोन बाधा आहेत. त्या टाळल्या तर अखिल भू-गोलाचें हित भारताला साधतां येईल. त्या दोन बाधा म्हणजे.

" जे अनुदार हृदय, माते, दीना दीना ।
सदा विभक्तहि ....
ते यदुवंशिन सदृश अभागी ;
अन्य कछुक कछुक अहं-कृति दासा,
जरासंध सम रक्त पियासे
नाना राज्य-वंश जेहि नासे. "

आपसांतील दुही आणि स्वाभिमान या त्या दोन बाधा भारताला शाप आहेत. "नृपति असो, प्रजा असो, अथवा संन्यासी असो, **जो जो भारतवासी तो तो हरिवंशी** " असें समीकरण सांगून श्रीकृष्ण भारतीयांना आश्वासन देतो कीं,

" युग युग तासु विकास नव युग युग मैं तेहि सार्थ.

युगायुगांत भारताचा नवविकास होवो. मी युगें युगें भारताचा साथीदार आहें. असें अभिवचन उच्चारतांच " प्रभू मौन झाले. " मैत्रेयानें ( जे डोळे मिटून ऐकत होते ) आपले डोळे उघडले, पण " भगवंताचे डोळे त्याला मिटलेले दिसले. " असा होतो या काव्याचा शांत अंत.

अवधी भाषेंत गेल्या शतकांत प्रवंध काव्य-रचना थांबली होती. पं. मिश्रांनीं या अत्यंत सूक्ष्म प्रसादयुक्त काव्य भाषेंत एक अभिनवच नव्हे तर अविस्मरणीय महाकाव्य रचून कृष्णसंदेश घरोघरीं, मनोमनीं, पोहोंचविण्यास समर्थ असें 'कृष्णायन' भारताला दिलें आहे. प्रसादांच्या 'कामायनी' प्रमाणेंच पं. मिश्रांचें 'कृष्णायन' शतकानुशतकें लोकप्रिय होत जाईल यांत मुळींच संदेह नाहीं.

७३९१०
REFBK-0013100

# याच तोलामोलाचीं हीं आमचीं
# आणखी इतर-प्रकाशनें

**रामकथा-माला**
भाग १-२-३-४
'रामचरितमानसा'धारें
संपूर्ण रामकथा
प्रत्येक भाग : रु. १-५०

**आषाढी-कार्तिकी**
महाराष्ट्र-संतदर्शनें
भा. द. खेर : रु. १-५०

**शब्दसृष्टीचे ईश्वर**
बालशंकर देशपांडे : रु. २-००

**नामयाची जनी**
रसाळ, साधार चरित्र
रा. चिं. ढेरे : रु. १-७५

**शेक्सपीअर-जीवन व कला**
अभ्यास-प्रबंध
अजय आरोसकर : रु. २-००

**नगाधिराज हिमालय**
संस्कृत साहित्यांतील
हिमालय-दर्शन
डॉ. के. ना. वाटवे : रु. १-२५

**मराठी शेक्सपीअर**
हॅम्लेट, ज्युलियस सीझर इ.
शेक्सपीअरच्या अठरा
प्रसिद्ध नाटकांचीं मराठी
कथारूप निवेदनें
प्रत्येक पुस्तक : रु. १-२५
सर्व तेरा पुस्तकें : रु. १६-२५

**महाभारत**
मूळ महाभारताचा संक्षिप्त
पण विश्वसनीय मराठी
अनुवाद
के. ज. स. करंदीकर : रु. ३-००

**रामायण**
मूळ वाल्मीकि-रामायणाचा
संक्षिप्त पण विश्वसनीय
अनुवाद ( रामायणकालीन
स्थिति व अनुमानें यांसह )
अनु. वि. गो. आपटे : रु. २-००

**भागवत**
मूळ भागवत ग्रंथाचा
संक्षिप्त पण विश्वसनीय
अनुवाद

**वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रा. लि., मुंबई २**